122 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. २९५
(जिल्हा वाचनालय)
7

मासिकाचे नांव — रत्नमाला

संपादक — ग. का. रायकर

मासिक क्रमांक — सन — १९५८

अंक —

(महिने) नोव्हेंबर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय)

# रत्नमाला

(मराठी।। संसार दि-अं )

१९५

# रत्नमाला



तीच्यासंसारचा दिवाळी अंक १९५७ किं १ रु.


परांजपे ब्रदर्स


आयुर्वेदिक औषधि
स्पेशियल न १
रामतीर्थ
ब्राम्ही तेल
शांत निद्रा आती है तथा बाल काले होते है
श्री रामतीर्थ योगाश्रम दादर, मुंबई १४

एकमेकां सहाय्य करूं। अवघे धरूं सुपंथ

# मराठीचा संसार


संपादक

गजानन काशीनाथ रायकर

गजानन पांडुरंग परचुरे

वर्ष २ रें : अंक ८ वा : दिवाळी अंक : नोव्हेंबर १९५७

मूल्य एक रुपया : वार्षिक वर्गणी दोन रुपये


## या अंकांत


राजकवि यशवंत ( कविता )

चित्रकार गोलिवडेकर ( रेखाचित्रें )

चिं. वि. जोशी ( विनोदी लेख )

पुरु. शिव. रेगे ( कविता )

वि. स. खांडेकर ( लघुनिबंध )

बा. वा. फाटक ( विनोदी साहित्य )

इंदिरा संत ( कविता )

संजीवनी मराठे ( कविता )

पु. रा. बेहेरे ( विनोदी लेख )

पं. महादेवशास्त्री जोशी ( [illegible] )

वा. रा. ढवळे ( लघुनिबंध )

ज्ञानेश्वर नाडकर्णी ( सचित्र कथा )

शिरीष पै ( लघुकथा )

कृ. वि. सोमणशास्त्री ( भविष्य )

प्रफुल्लदत्त ( कविता )

वि. आ. बुवा ( विनोदी लेख )

वि. द. चिंदरकर ( लघुकथा )

ग. ल. ठोकळ ( दीर्घ कथा )

राधाबाई शेवडे ( कादंबरी )



मराठीचा संसार कार्यालय : झावबाची वाडी : मुंबई नं. २

संपादक, मुद्रक व प्रकाशक : ग. का. रायकर : राष्ट्रवैभव छापखाना : मुंबई ४

प्रकाशन स्थळ : 'मराठीचा संसार' कार्यालय : १० ए झावबाची वाडी : मुंबई २

'ढेकूण नाशासाठीं साधा व
बिनधोक उपाय'

# किलोझोन

'एक महान
ढेकूण संहारक'



१ औंस बाटली--७५ नये पैसे.

१ औंस किलोझोन दीड पौंड रॉकेलमध्ये
मिसळा. या मिश्रणाचा ढेकूण असतील तेथें
जोराने फवारा उडवा.
कांहीं मिनिटांचे आंत आपणाला
ढेकूण मेल्याचे आढळून येईल.

वेस्टर्न इंडिया केमिकल कंपनी, मुंबई २.




# संपादकीय



'मराठीचा संसार' चा हा '**रत्नमाला**' खास दिवाळी अंक आमच्या वाचकांच्या हातीं देतांना कर्तव्य-पूर्तीचें एक प्रकारचें समाधान आम्हांस मिळत आहे, हें नमूद करावयास आनंद होतो. महाराष्ट्रांतील ग्रंथविक्री व प्रकाशन या धंद्यांतील विविध प्रश्नांची चर्चा करून, त्या धंद्याला प्रगत व प्रतिष्ठित स्वरूप प्राप्त करून देण्याच्या हेतूनें 'मराठीचा संसार' हें मासिक आम्हीं गतवर्षाच्या पाडव्याला सुरू केलें. येत्या पाडव्याला या मासिकाला दोन वर्षें पुरी होतील. या अवधींत ग्रंथप्रकाशन, ग्रंथपरीक्षण, ग्रंथसंग्रह वगैरे ग्रंथविषयक अनेक प्रश्नांची वाङ्मय व व्यवसाय या दोन्ही दृष्टींनीं 'मराठीचा संसार' नें भरपूर उपयुक्त चर्चा केलेली आहे. या व्यावसायीक चर्चेबरोबरच हें मासिक सामान्य वाचकालाहि मनोरंजक व्हावें, आवडावें या हेतूनें प्रस्तुत दिवाळी अंकाची योजना आम्हीं आंखली व 'मराठीचा संसार'च्या वर्गणीदारांना हा अंक विनामूल्य किंबहुना जादा मूल्य न स्वीकारतां देण्याचें आम्हीं ठरविलें. एक कर्तव्य म्हणून आंखलेली ही योजना इतक्या लौकर यशस्वी होत आहे याचें सर्व श्रेय या अंकांतील लेखकांना देणें इष्ट आहे.

ललित वाङ्मयाचें प्रकाशन हें 'मराठीचा संसार' चें प्रधान उद्दिष्ट नव्हे, याची आम्हांला पूर्ण जाणीव आहे. त्या दृष्टीनें ग्रंथविक्री व ग्रंथप्रकाशन या व्यवसायांतील अनेक अडचणींची सांगोपांग चर्चा या मासिकांत सतत केली जाईलच. पण सर्वसामान्य वाचकालाहि या मासिकाबद्दल आपलेपणा वाटावा, त्यांना तें उपयुक्त व मनोरंजक व्हावें या हेतूनें इष्ट असे बदल त्यांत पुढील अंकापासून करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. अर्थात्, पृष्ठांच्या मर्यादेचें बंधन स्वीकारूनच हे सर्व बदल तूर्त करावे लागतील.

मासिकाचें आजचें स्वरूप व त्याचा आकार हीं मर्यादित असलीं तरी वर्गणीदारांचा आश्रय मिळाल्यास त्यांचा विस्तार व्हायला फारसा विलंब लागणार नाहीं. खेड्यापाड्यांतील प्राथमिक शिक्षकापासून तों शहरांतील प्राध्यापकापर्यंत व सामान्य साक्षरापासून तों प्रतिष्ठित सुशिक्षितापर्यंतच्या वाचकांना 'मराठीचा संसार' वाचनीय व्हावा अशी उमेद आम्हीं बाळगीत आहोंत. प्रस्तुत दिवाळी अंकाचें स्वरूप पाहून ही आमची उमेद अनाठायीं नाहीं एवढा माफक अभिप्राय जरी आमच्या वाचकांनीं प्रकट केला तरी आमच्या संकल्पांत आम्हांला प्रोत्साहन मिळेल. गेलीं दोन वर्षें आर्थिक नुकसान सहन करूनहि आमच्या वाचकांची सेवा आम्हीं नम्रपणानें करीत आलों आहोंत. हें नुकसान उत्तरोत्तर कमी होण्याइतके जरी 'मराठीचा संसार' ला ग्राहक व वर्गणीदार मिळूं शकले तरी आम्हांला समाधान होईल. संकल्प व सिद्धि यांच्यामध्यें उभी असलेली ही आर्थिक परिस्थिति जर दूर झाली तरच हें समाधान मिळूं शकेल इतकेंच नव्हे, तर यापुढील अंकांचें स्वरूप अपेक्षेप्रमाणें बदलतां येईल.

प्रस्तुत खास अंक अगदीं थोड्या अवधींत काढण्यासाठीं लेखक, कवि, चित्रकार, जाहिरातदार, मुद्रक, विक्रेते वगैरेंनीं जें तत्परतेनें साहाय्य केलें त्याबद्दल आम्हीं त्या सर्वांचे ऋणी आहोंत.

आमच्या सर्व वाचकांना व हितचिंतकांना ही दिवाळी सुखाची व समृद्धीची जावो!


## आमचीं नवीं प्रकाशनें

**कथा वैभव**
प्रसिद्ध मराठी कथालेखकांनीं स्वतः निवडलेल्या उत्कृष्ट कथांचा अपूर्व प्रातिनिधिक संग्रह
य. गो. जोशी ते गो. नी. दांडेकर
**अठरा कथा : रु. ५-०-०**

**कथासरित्सागर** : १० पुस्तकें
संस्कृत कथासरित्सागरांतील दहा अद्भुतरम्य दीर्घ-कथा
अनुवादक : प्र. शं. जोशी
**प्रत्येक पुस्तक ४० नये पैसे**
**दहा पुस्तकांची संच-पेटी : ४ रु.**

**कुमार साहित्य माला**
कुमारांसाठीं निवडक साहित्य
१. **हद्दपार** : श्री. ना. पेंडसे, सामाजिक कादंबरी रु. १-५०
२. **हेन्री फोर्ड** : अनु. अमरेन्द्र, स्फूर्तिप्रद चरित्र रु. २-००
३. **ओंजळ** : वामन चोरघडे संस्कारी, कथासंग्रह रु. १-७५
४. **कोनटिकी** : अनु. श्रीकान्त राय
साहसी प्रवासवृत्त : रु. २-००
५. **राखेतील निखारे** : अनु. देसाई
१८५७ ची एक कथा : रु. १-७५

**लोकसेवक चरित्रमाला**
सहा चरित्रें : ले. अमरेन्द्र
१ ठक्करबाप्पा, २ डॉ. श्वाइत्झर, ३ विनोबा ४ गाडगेमहाराज, ५ फादर डेमियन ६ रविशंकर
विशेषतः अल्पशिक्षितांसाठीं सोप्या भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें
प्रत्येक पुस्तक ५० न. पै. सहा पुस्तकें : ३ रु. ट. ख. माफ

**तीन गोष्टी** : अमरेन्द्र
भारत सरकारपुरस्कृत 'तीन कहानियाँ' चें रूपान्तर : ६२ न. पै.

**वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड**
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २



# गीत माझें, रूप तूझें

[ गज्जल-व्योमगंगा ]


कविः—यशवन्त

गीत माझें, रूप तूझें
भाव माझे, ओठ तूझे
सूर माझे, ऊर माझें
फक्त ते निःश्वास तूझे

ह्या मिलाफानें परंतू कां मला कांहीं - मिळालें !
मात्र वाट्याला तुझ्या तें प्रीतिचें साफल्य आलें.
संगमीं ओठांवरी, प्रेमोत्सवीं आलिंगनानें
लाभणें तूंतें तयाच्या प्रीतिचीं औदार्य-दानें.
माझिया प्राणेश्वराची गुंफिली मी प्रीत-पूजा
त्याजला कैसें कळावें ती तुझ्या ये प्रीत-काजा

प्रेम लाभे प्रेमळाला
कायदा हा पूर्ण खोटा
प्रेम लाभाया हवा कीं
रूपराशीचा मुखोटा

रूपराशी ! या यशाचें लाभलें सौभाग्य तूंतें
रंगुनी तूं त्यांत जातां वाटतो हेवा न मातें
कंठ तूझा चुंबितां तो चुंबितो मत्प्रेमगीतें
तूझिया आलिंगनीं तो प्राशितो मद्भावनेतें
तूझिया रूपीं तयाशी पावलें मी संगमातें
आकळे माझें नि त्याचें कैंवि कोणा प्रेमनातें


गोमटेश्वर
श्रावण बेळगोळ
टिपूची समाधी
श्रीरंगपट्टण,
कृष्णराज सागर
रॉक-फोर्ट
त्रिचनापल्ली
रामेश्वर
धनुष-कोडी
पक्षी तीर्थम्
कन्याकुमारी
माझी
दक्षिणयात्रा
देवी कन्याकुमारी
मदुरा

# विरंगुळा मिळविण्याचा मार्ग

लेखक : चिं. वि. जोशी

भगवंतरावांना अलीकडे मेंदूचा शीण (ब्रेनफॅग्) झाला होता. झोप येत नसे, मेंदूचें काम करवत नसे, शिणल्या-भागल्यासारखें होई. औषध घेऊन गुण आला नाहीं, काय करावें कांहीं सुचेना.

आठवड्याच्या 'आलेपाक' मध्यें इंदिरामामी सल्ला देतात ना ? त्यांना विचारा पत्र लिहून—सौ. कृष्णाबाईंनीं सुचविलें.

भगवंतरावांनीं लगेच इंदिरामामींना पत्र लिहून आपली तक्रार कळविली. इंदिरामामींनीं उपाय दिला—

अंथरुणावर पडल्यावर आपल्या नेहमीच्या विचारप्रवाहाला भिन्न विचारांचा बांध घाला आणि मेंदूला विसावा द्या. ब्रिजचा काल्पनिक डाव खेळा, पायीं पंढरीला जाण्याचा बेत करा, मित्राला पत्र लिहा, कोणत्याहि आनंदी प्रसंगाची आठवण करा.

भगवंतराव रात्रीं दहाला सवयीप्रमाणें अंथरुणावर पडले. पहिलें काम काल्पनिक ब्रिजचा डाव खेळणें हें होतें. भगवंतराव हे विक्रीकर इन्स्पेक्टर असल्यामुळें दररोजच्या झालेल्या व उद्यां होणाऱ्या कामाची ते चिंतनिका करीत असत. व्यापाऱ्याला निष्कारण भुर्दण्ड पडूं नये, सरकारचें न्याय्य उत्पन्न त्याला मिळावें आणि स्वतःच्या संसाराला थोडा हातभार लागावा अशा त्रिविध कल्याणकारी धोरणानें ते वागत. हीं तिन्ही धोरणें एकसमयावच्छेदें कशीं साधावीं या विचारांत त्यांचा निद्रानाश होत असे. आतां मात्र इंदिरामामींच्या उपदेशावरून त्यांनीं विक्रीकराविषयींची विचारमालिका एकदम थांबविली आणि मनांतल्या मनांत ब्रिजचा डाव मांडला.

भगवंतरावांनीं आपले मित्र गुणवंतराव यांना पार्टनर करून समोर बसविलें. आपली बायको कृष्णाबाई हिला उजव्या हाताला आणि तिच्यासमोर सौ. गुणाताई यांना विरोधी पक्ष केलें. पिसणी त्यांच्या स्वतःकडे आली. कृष्णाबाईंनीं काहणी केल्यावर पत्ते पिसून ते वाटूं लागले.

खऱ्या कृष्णाबाई पडल्यापडल्या मासिक वाचीत होत्या. वाचतांवाचतां त्यांतला एक गमतीदार चुटका नवऱ्याला वाचून दाखविण्याकरितां त्यांनीं त्यांच्याकडे पाहिलें. 'आज असं काय करतां आहां ?' त्या घाबरून म्हणाल्या.

'काय करतों आहें ?'

'असे एका दिशेला डोळे फिरवतां, मान हालवतां अन् मग दुसऱ्या दिशेला तसंच करतां.'

'अग मी मनांतल्या मनांत पत्त्यांचा डाव खेळतों आहे.'

'तो कशाला ? खरोखरचा डाव खेळायची तुम्हांला कोणी बंदी केली आहे कीं काय ?'

'नाहीं पण मी रविवारच्या आलेपाक अंकांतल्या इंदिरामामीच्या उपदेशाप्रमाणें अंथरुणावर पडल्यावर आपल्या नेहमीच्या विचार प्रवाहाला ब्रिजच्या काल्पनिक डावाचा बांध घालून मेंदूला विसावा देतों आहें.'

'चालूं द्या' असें म्हणून कृष्णाबाई मासिक वाचूं लागल्या. भगवंतरावांनीं काल्पनिक पत्ते काल्पनिक खेळाडूंत वाटले. मग स्वतःच्या हाताकडे ते पाहूं लागले.

कृष्णाबाईंनीं एक गमतीचें व्यंगचित्र मासिकांत पाहिलें आणि तें पतिराजांपुढें धरलें. 'आहे का नाहीं गमतीचं !' त्यांनीं विचारलें.

'ओ रॉटन् ! अगदींच फडतूस !' भगवंतरावांनीं उद्‌गार काढले.

'काय म्हणतां हें फडतूस आहे ? विनोदबुद्धीचा लवलेश नाहीं तुमच्या अंगांत !'

'डॅम् युअर विनोदबुद्धि. माझ्या हातांत अगदींच रॉटन् पानं आली आहेत. हीं पहा सगळे अठ्ठे, नव्वे, गुलाम !'

'हो हो तुम्ही काल्पनिक ब्रिज खेळतां नाहीं का ? चालूं द्या.'

गेमावर गेम झाल्या. रबर झालें पण भगवंतरावांना झोप येईना. कृष्णाबाईंना एक झोपेचा चुटका लागला होता. त्यांतून जाग्या होऊन त्या पहातात तर भगवंतराव टाळ्या वाजविण्याचा अभिनय करीत तोंडानें कांहीं तरी पुटपुटत होते. कृष्णाबाईंनीं विचारलें, 'हा काय चाळा चालला आहे ? अन् डोळे असे, वेड्यासारखे आढ्याकडे काय लावले आहेत ताठ करून ?'

'पंढरीकडे डोळे लागले आहेत. माहेरच्या वाटेकडे टक लावून पहातों आहे. अहाहा ! केव्हां एकदा पंढरीला जाईन न् त्या जगन्माउलीच्या पावन चरणांना घट्ट मिठी मारीन—'

'हें काय भलतंच ? वारकऱ्याला शिव्या देतां देतां सगळा जन्म गेला नि आजच काय हें वेड आलं आहे डोक्यांत ?'

'हा आलेपाकच्या इंदिरामामींचा उपदेश. मनांतल्या मनांत पायीं पंढरीला जायचा बेत करा असा उपाय त्यांनीं निद्रानाशावर सुचवला आहे. विठ्ठलावर माझी श्रद्धा असो नसो, इंदिरामामींच्या सल्ल्यावर फार आहे.'

'कोणामुळें का होईना ? पुण्यकारक कृत्य तुमच्या हातून–'

'हातून नव्हे मनून.'

'बरं मनून; पण पुण्यकारक कृत्य घडतं आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे,' कृष्णाबाई म्हणाल्या, 'पण कधीं निघणार ? झांजा, टाळ, एकतारी नि भगवी पताका इतकं साहित्य आणून देऊं का ? तें ठाकुरद्वारच्या नाक्यावर नाटकी सामानाचं दुकान आहे तेथून भाड्यानं आणून देईन.'

'चालेल. वारकरी व्हायचं तर पूर्णपणें सांगोपांग झालं पाहिजे. आळंदीच्या पालखीबरोबर निघूं का–देहूच्या ? का पुण्याला दोन्ही पालख्या एकत्र येऊन बरोबर निघतात त्यांच्या बरोबर जाऊं ?'

कृष्णाबाईंना झोप येत होती. त्या म्हणाल्या, 'तें तुमचं तुम्ही ठरवा. मनांतल्या मनांत विचार करा न् नेहमीच्या विचार-प्रवाहाला बांध घाला. उगीच माझ्या निद्रा-प्रवाहाला बांध घालूं नका.' असें म्हणून त्या दुसऱ्या कुशीला वळून घोरूं लागल्या.

पंढरीचें कांहीं केल्या जमेना. पालखीच्या मागोमाग प्रि. सोनोपंत मामा दांडेकरांच्या दिंडींत त्यांना प्रवेश मिळेना, श्रीमंत तात्यासाहेब मिरजकरांच्या कॅम्पमधून त्यांना डिच्चू मिळाला, श्री. सौ. निंबाळकर राणीसाहेबांच्या सेक्रेटरीनें त्यांना घालवून दिलें. श्री. पंत सचिवांच्या डॉक्टरनी त्यांना आपल्या गोटांत मज्जाव केला. एका सामान्य वारकरी जथ्थ्यास भगवंतराव जाऊन मिळाले. त्यांचें ज्ञानेश्वरीवर प्रवचन ठरलें. ज्ञानेश्वरीच्या वेगळाल्या पोथ्या एकत्र बांधून ठेवलेलें गाठोडें त्यांच्या समोर ठेवलेलें होतें. भोंवतालीं निवडक श्रोतृ-समुदाय जमला होता. संकेश्वरचे शिष्यस्वामी, करवीरचे गुरुस्वामी, पंढरपूरचे दास गणू महाराज, प्रि. सोनोपंत मामा, पुण्याचे ह. भ. प. नेऊरगांवकर इत्यादि बडे श्रोते. पण भगवंतराव घाबरले नाहींत. सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर सुद्धां ज्ञानेश्वरीवर प्रवचन करायला डरेल कीं काय ? अहो रेड्यापेक्षां का विक्रीकर तपासनीस ढ असेल ?

या कुंदेंदुतुषारधवला, यं ब्रम्हा वगैरे स्तोत्रें गुणगुणत त्यांनीं समोरचें गाठोडें सोडलें. ज्ञानेश्वरीच्या वेगळाल्या आवृत्त्यांतल्या पाठांचा समन्वय ते सांगणार होते. पण गाठोडें सोडून पहातात तर ज्ञानेश्वरीच्या आवृत्त्या त्यांत नव्हत्या, दुकान-[illegible] हिशेबांच्या चोपड्या होत्या. आतां विद्वान् श्रोते 'काय म्हणतील या भयानें त्यांनीं भोंवतीं नजर फेकली. मघांचे विद्वान् श्रोते नाहींसे झाले असून त्यांची जागा खटमल लालवानी, वच्छराज ढढ्ढा, बदरुद्दिन तैयबजी हार्ड वेयर मर्चण्ट, वगैरे दुकानदार आणि व्यापारी लोकांनीं घेतली होती. जो तो, 'साहेब माझं काम आधीं घ्या, मला दिल्लीला अमक्यातमक्याला भेटायला जायचं आहे' असें म्हणत होता.

आपल्या नेहमीच्या विचार प्रवाहाला भिन्न विचारांचा बांध घालतां येणें शक्य नाहीं अशी भगवंतरावांची खात्री झाली. आपल्याला झोप येत नसली तर निजूं नये, जागत रहावें एवढाच उपाय आहे व तो फार चांगला आहे अशी त्यांची खात्री झाली.

●●●

# एक

धीर ?
अवश्य, पण तो येण्यापूर्वीं;
नंतर तुला सारं झुगारून दिलं पाहिजे.
तो कांहीं मागणार नाहीं.
त्याची रीत तुला शोधायला हवी
आभाळाच्या गोवर्णीत
नितळ पाण्याच्या झुळकींत.

तुझ्यासारख्याच एकीला
त्यानं काय सांगितलं होतं माहीत आहे ?
मी तुझा आहे, तुझा आहे,
तुझा आहे.

त्यानं हें कधीं घोकलं नाहीं,
पण तुलाहि तो हेंच सांगणार आहे.

पुरु. शिव. रेगे

सांडू ओरिजिनल ब्राह्मी ते



# मावळता सूर्य

वि. स. खांडेकर

'वेडा! वेडा!' चोंहीकडून हा एकच शब्द आणि त्याचे प्रतिध्वनि माझ्या कानांवर पडत आहेत. आकाश, पृथ्वी, डोंगर, दरी, वृक्ष, वेली, हीं सर्व मला उपदेश करीत आहेत. 'मागं फिर, वेड्या, अजून मागं फिर!'

किती उंच शिखर आहे हें! जणुं उग्र तपश्चर्या करतांना पर्वतानें उभारलेला हातच!

हें शिखर दुर्गम आहे हें मी बाळपणापासून ऐकत आलों आहे. पण आज—आतां—या क्षणीं मला तें गांठलेंच पाहिजे. माझ्या लेखीं प्रत्येक क्षण मोलाचा आहे.

पायांनो, उगीच रक्ताचे अश्रू गाळूं नका. ज्याला आपल्या आत्म्याशीं प्रामाणिक राहायचें आहे, सत्याची प्रतिष्ठा पायांखालीं तुडविण्यापेक्षां जगांत अधिक मोठें पाप नाहीं अशी ज्याची श्रद्धा आहे, प्रीतीची अमरता हाच खरा स्वर्ग आहे अशी ज्याची मनोदेवता सांगत आहे, त्यानें मावळत्या सूर्याला अर्घ्यदान करण्याकरतां जिवाचें रान केलेंच पाहिजे.

सावल्या पळापळाला अधिक काळसर होत आहेत. मवाशीं समोर हसत उभें असलेलें, एखाद्या बालकाप्रमाणें आपला चिमुकला हात हलवून 'ये, ये' म्हणणारें तें शिखर आतां नीट दिसत सुद्धां नाहीं. काजळी धरलेल्या नंदादीपाच्या मंद, अंधुक प्रकाशांत देवाची मूर्ति स्पष्ट दिसूं नये तशी माझी स्थिति झाली आहे.

पण मला चढत राहिलेंच पाहिजे, शिखर गांठलेंच पाहिजे. तिथूनच मावळत्या सूर्याचें शेवटचें पवित्र दर्शन मला होईल.

उगवत्या सूर्याला अर्घ्यदान करायला सारें जग एका पायावर तयार असतें. पण हा मावळता सूर्य आहे. म्हणूनच या मार्गावर मी एकाकी आहे!

पुढें जाऊं कीं मागें फिरूं! शेजारच्या दरींतून मधुर पण अस्फुट स्वर येत आहे,—'वेड्या, मागं

फिर. शिखरावरून तूं परतशील तेव्हां जिकडे तिकडे काळोख पडलेला असेल! पायाखालची वाट तुला पुसटपणें सुद्धां दिसणार नाहीं. तुझें एक पाऊल चुकलें तर तूं या खोल खोल दरींत पडशील. मी वनराणी तुला सांगतेंय्. या भयंकर दरींत पांच चेटकिणींनीं मला कोंडून ठेवलें आहे. या तुरुंगांतून जिवाच्या आकांतानें मी ओरडत आहे. ऐक, वेड्या, ऐक.

त्या चेटकिणी शिखरावर गेल्या आहेत. मावळत्या सूर्याचा मृत्यु पाहायला. त्याचा लाल रंग डोळे भरून पाहिला कीं लुसलुशीत तान्ह्या मुलाचं रक्त प्याल्याइतकं समाधान होतं असं त्या मला दररोज सांगतात. त्यांच्या हातांत तूं सापडलास तर—मागं फिर, माझ्या, राजा अजून मागं फिर.'

वनराणी, तुझ्या निरपेक्ष वात्सल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. पण मी मागें फिरूं शकत नाहीं. ही माझी ओंजळ पाहिलीस का? ती अश्रूंनीं भरली आहे. किती जपून मी हे अश्रू आणले आहेत. त्या अश्रूंचें अर्घ्य अर्पायला मी निघालों आहे.

होय. या मावळत्या सूर्याला अर्घ्यदान करायला मी निघालों आहे. या शेवटच्या क्षणीं पृथ्वीवरून त्याचें दर्शन कसें होणार? म्हणून मी शिखराकडे धांव घेत आहे.

मृत्यूच्या दारांत उभ्या असलेल्या सूर्याची पूजा करायला मी कां धावत आहे हें कुणालाच कसें कळत नाहीं? हें आकाश, ती पृथ्वी, हा डोंगर, ती दरी, हे वृक्ष, त्या वेली हीं सारींच कशीं भावनाशून्य झालीं आहेत!

याच सूर्यानें मला सकाळीं निद्रेंतून जागें केलें. याच सूर्यानें आपला सोनेरी हात पाठीवरून फिरवून माझ्या आत्म्याचा उत्साह द्विगुणीत केला. याच सूर्यानें माझ्या भोवतालीं रुसून बसलेल्या पुष्पसृष्टीला हसायला लावलें. धूसर चांदण्यांतल्या स्वप्नाळु प्रीतीपेक्षां निर्मल प्रकाशांतील वास्तव प्रीति हाच जीवनाचा खराखुरा आधार आहे हें याच सूर्यानें मला शिकविलें. खरें काव्य स्वप्नरंजनांत नसतें, तें सक्रिय जीवनांत असतें ही जाणीव याच सूर्यानें मला करून दिली.

हें सारें मी कसें विसरूं?

आधीच उशीर झाला आहे. जाऊं द्या, माझ्या ज्ञात आणि अज्ञात मित्रमैत्रिणींनो, मला जाऊं द्या. कदाचित् मी शिखरावर पोंचण्यापूर्वींच सूर्यास्त होऊन जाईल. मला जाऊं द्या. मला अडवूं नका.

कदाचित् घाईघाईनें शिखर गांठतांना माझा पाय घसरून मी दरींत पडेन? पडलों तर पडलों! आपण मावळत्या सूर्याची जागा घ्यावी आणि अस्ताला जाणाऱ्या सूर्याच्या अंतिम प्रकाशानें आपलें अर्घ्य व्हावें, यापेक्षा जगांत अधिक भाग्याची दुसरी कुठली गोष्ट आहे?

●●●


**मराठवाड्यांत सर्व प्रकारचें वाङ्मय मिळण्याचें एकमेव ठिकाण**

# जो शी ब्र द र्स

प्रकाशक व पुस्तकविक्रेते.

**औरंगपुरा ... ... ... औरंगाबाद**
**गौळीगुडा ... ... ... हैद्राबाद**

# काळी राधा

लेखक : **बी. रघुनाथ**

मराठवाड्याचें वैशिष्ट्य व सौंदर्य यांनीं नटलेल्या

११ लघुकथांचा संग्रह

**सुंदर तिरंगी मुखपृष्ठ ............ मूल्य २ रुपये**



# रामराम पाहुणे

वा. वा. फाटक

परगांवीं जाणाऱ्या पाहुण्याला चार पावलें पोहोंचविण्यास जाणें हा आपला पूर्वापार चालत आलेला शिष्टाचार आहे. आगगाडी, आगबोट, विमानें यांचें सुधारणा-युग सुरू झाल्यापासून या चार पावलांची मर्यादा चारशें पावलेंच काय चार मैलही वाढलेली दिसून येते! आपल्या घरीं न बोलावतां आलेली—आणि जळूसारखी चिकटलेली—पाहुणेश्वराची ब्याद एकदांची गाडींत, बोटींत अगर विमानांत बसवून दिल्यामुळें कायमची गेली अशी खात्री व्हावी या कारणासाठींच यजमानानें पाहुण्यास चार पावलें पोहोंचविण्यास जाण्याची पद्धत पडली असावी असें माझ्या एका मित्राचें मत आहे; माझेंही तसेंच होतें पण—

कांहीं दिवसांपूर्वींची गोष्ट. माझ्याकडे आलेल्या अशाच एका अनाहूत पाहुण्याची ब्याद जावी म्हणून सर्वसाधारण रीतीप्रमाणें मीही त्याला स्टेशनवर पोहोंचविण्यास गेलों होतों. आमच्या पाहुण्यांना बाजारांत कांहीं खरेदीचें काम असल्यामुळें ते मागाहून स्टेशनवर येणार होते. अर्थात पुढें स्टेशनवर जाऊन त्यांचें तिकिट काढून, त्यांच्यासाठीं, अगदीं बायकांच्या डब्याजवळ, (हो म्हणजे सुरक्षित असतें!) छानशी खिडकीजवळची जागा धरून मी पाहुणे येण्याची वाट पहात बसलों. गाडी सुटण्याची वेळ होत आली तरी पाहुण्यांचा पत्ता नव्हता! गाडींत तर गर्दी मी म्हणत होती. मी डब्यांतील जागा सोडून गेलों तर त्यांना ऐनवेळीं जागा मिळावयाची नाहीं म्हणून मला जागेवर बसून रहाणेंच भाग होतें; पण माझे डोळे मात्र माझ्या पाहुण्यांची मूर्ति केव्हां एकदां दरवाज्यांतून आंत शिरतांना दिसते म्हणून प्लॅटफॉर्मजवळच्या फाटकाकडे लागलेली होती. गाडी सुटण्याची घंटा वाजली, गार्डनें शिटी वाजविली तशी माझें हृदय कां काय म्हणतात तें-धडधडूं लागलें! आतां तर गाडी हलूंही लागली; इतक्यांत माझ्या डोळयांना दरवाज्यांतून आंत शिरण्याचा प्रयत्न करणारा पाहुणारूपी 'आशेचा किरण' दिसला! त्यामुळें मी उतरूं कीं बसूनच राहूं; का तूर्त कांहींच करूं नको तेंच कळेना! माझी जागच्याजागीं चुळबूळ सुरू झाली. तो तर धांवत गाडीकडे येत होता. ती इलेक्ट्रिक गाडी असल्यामुळें तिला पहातां पहातां वेग प्राप्त झाला. 'हा आलों पहा' अशा थाटांत हात वर करून तो माझ्या डब्याकडे धांवतच होता. शेवटीं त्याची माझी फक्त दृष्टादृष्ट काय ती झाली. तो कांहींतरी बोलला...मी कांहीं तरी म्हणालों परंतु तें त्याला किंवा मला कळलेंच नाहीं. आणि पहातां पहातां गाडी प्लॅटफॉर्माबाहेर गेली देखील!

पाहुण्यासाठीं स्वतः पैसे खर्च करून घेतलेल्या माझ्या हातांतील तिकिटाकडे पहात मी खिडकीच्या चौकटीवर

मटकन डोकें टेकलें. ज्या पाहुण्याचा कांटा काढावा म्हणू मी येवढी आटापीट केली तो तर राहिलाच, (आणि घ जाऊन, त्यानें आणखी एक दिवस मुक्कामही केला!) आ भाशीच–म्हणजे खुद्द यजमानाचीच व्याद गांवाला गेली!

हा अनुभव आल्यानंतर, सहाजिकच या चार पाव पोहोंचविण्यास जाण्याच्या प्रकाराकडे माझें लक्ष वेधले ऱ्यांच निरीक्षणानंतर आणि प्रत्यक्ष अनुभवानंतर 'पोहों विण्यास जाणें' हें इतर तंत्राप्रमाणेंच एक तंत्र आहे याविष माझी खात्री झाली माझ्या ह्या अनुभवाचा फायदा माझ् अज्ञ देशबांधवांस मिळणें जरूर असल्यामुळेंच मी हें पांढऱ्या काळें करीत आहे जोंपर्यंत पाहुणे आहेत—आणि जगाच अंतापर्यंत ते असणारच!—तोंपर्यंत त्यांना पोहोंचविण्य जाण्याचा प्रसंग केव्हां ना केव्हां येणारच. तेव्हां अशा प्रस यजमानानें कसें वागावें हें सांगणें हाच या लेखाचा उद्दे आहे. अस्तु, प्रस्तुतम् अनुसरामः।

कुणालाही पोहोंचविण्यास जावयाचें म्हणजे एकटेंदु जाऊं नये, आपले इष्टमित्र, सगेसोयरे, शेजारीपाजारी अ पांच-पन्नास मंडळींना बरोबर घेऊन जावें. 'संघे शक्ति कलौ युगे' हें वचन ध्यानीं घेतल्यास मी असें कां सांग तें सहज समजेल. अज्ञजनांसाठीं येवढेंच सांगतों कीं, जागा मिळविण्यासाठीं प्रसंगीं मारामारी करण्याचा प्रसंग आल्यास येवढ्या मंडळीचा अर्थात उपयोग होईल. शिवाय मी एकटाच पोहोंचविण्यास गेल्यामुळें माझी जी अवस्था झाली तशी स्थिती होणार नाहीं. दुसरी एक गोष्ट अशी कीं, असें करण्यामुळें स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीही साधतां येतात. इतके लोक पोहोंचविण्यास गेल्यामुळें रेल्वे अगर आगबोट कंपनीचें प्लॅटफॉर्म तिकिटांचें उत्पन्न वाढून पर्यायानें राष्ट्राच्या उद्योगधंद्यास हातभार लावल्याचें श्रेय प्राप्त होईल. अशा रीतीनें पोहोंचविण्यास गेलेल्या पांच–पंचवीस लोकांनीं आगगाडीच्या डब्यांत बसून सर्वच्या सर्व डबा अडवून ठेवावा. अर्थात या डब्यांत बसावयास येणारा प्रत्येक प्रवासी गर्दी आहे म्हणून आंत येण्याच्या भानगडींत पडणार नाहीं. यामुळें ज्याला आपण पोहोंचविण्यास गेलेलों असतों त्याला हा डबा 'रिझर्व्ह' न करतां 'रिझर्व्ह' केल्यासारखा मिळेल. त्यानंतर गाडी सुटण्यास थोडा वेळ राहिला असतांना इतरांनीं डब्याबाहेर यावें आणि जातेल्या पाहुण्यांच्या गळयांत लठ्ठसा हार (जास्वंद, कणेर, झेंडू इत्यादि कसल्याही फुलांचा चालेल; पण लठ्ठ असावा) घालावा. गार्डानें व गाडीनें शिट्टी देतांच गाडीला गति मिळाल्याबरोबर, 'मुंबादेवी की जय!' 'बाबुलनाथ टेकडीवाले कीं जय!' आमचा पाहुणा (येथें त्याचें नांव घालावें) कीं जय!' आणि जय कीं जय!! असा एकच आक्रोश सर्व मंडळींनीं एक सुरांत सुरू करावा. या ओरडण्यामुळें स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरील इतर लोकांची जाणारा इसम कोणीतरी बडी व्यक्ति असावी अशी समजूत होईल व जाणाऱ्या पाहुण्याला फुकटचें मोठेंपण मिळवून दिल्याचें श्रेय पोहोंचविणाऱ्यास मिळेल. आतां हा जो आक्रोश करावयाचा त्यामुळें दुसरी एक गोष्ट अनायासें साध्य होते ती म्हणजे जाणाऱ्या पाहुण्याच्या विरहानें दुःख होऊन रडावें लागतें तसलें निराळें रडण्याचें काम शिल्लकच रहाणार नाहीं!!

पोहोंचविण्यास जाणाऱ्यानें (प्रत्यक्ष जाणाऱ्यानें देखील ही गोष्ट केल्यास वावगें नाहीं) आणखी एक महत्त्वाची बाब ध्यानांत धरली पाहिजे ती म्हणजे स्टेशनांत शिरल्याबरोबर जावयास तयार असलेल्या गाडीस साष्टांग नमस्कार घालणें ही होय. गंगेंत स्नान करण्यास उतरण्यापूर्वी गंगाभक्त तिची अगोदर पूजा करून मगच पाण्यांत उतरतो तद्वत गाडींत शिरण्यापूर्वी तसें पाहिल्यास आगगाडीची पूजाच व्हावयास पाहिजे. अर्थात् हें पूजेचें काम जाणाऱ्या माणसानें करावयाचें असल्यानें पोहोंचविण्यास जाणाऱ्यानें निदान


## अभिनव कलाकृति

**भरतकामाचीं सुंदर डिझाइन्स**

संपादक : श्री. ह. पोतदार

भाग १–आवृत्ति ४ थी, किं. रु. १–२५

भाग २–आवृत्ति ३ री, किं. रु. १–२५

भाग ३–आवृत्ति २ री, किं. रु. १–५०

टपाल खर्च निराळा

२२०, चर्नी रोड, मुंबई नं. ४

गाडीला साष्टांग नमस्कार तरी घालावा. पळत पळत स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर शिरत असतांना केळीच्या सालीवर पाय घसरून अनायासें कैक वेळां साष्टांग नमस्कार घडतोच! पण हें खात्रीचें नसतें; कारण सर्वच प्रवासी केळी खाऊन त्याचीं सालें प्लॅटफॉर्मवर टाकणारे नसतात. कांहींना तीं डब्यांत टाकणेंच आवडतें! असो; गाडीचें नमन झाल्यावर ड्रायव्हर व गार्ड यांना दुरून तरी नमस्कार करावा! ह्या संबंधांत माझे प्रिय मित्र कवि '**वैकुंठवासी**' यांनीं एक आरती केलेली आहे. तिचा उपयोग करतां आल्यास चहांत साखर पडल्यासारखें होईल!—

**जयदेवी नमन तुला जय आगगाडी, जय आगगाडी।**
**अमुच्या पाहुण्यातें निट नेऊन सोडी ॥ जयदेवी ॥**
**अमुचा नमस्कार ड्रायव्हर गार्डांना।**
**ऐकावी विनंति पडतों मी पायां॥**
**अमुच्या मित्राची शाबूत काया॥**
**राखोनिया, त्यासी न्यावें प्रभुराया ॥ जयदेवी ॥**

पोहोंचविण्यास जाण्यांत आणखी एक उद्देश असतो तो म्हणजे जाणाऱ्या व्यक्तीस उपदेश करणें हा होय. जाणाऱ्यास अगदीं दूरदेशीं जावयाचें असो वा जवळ जावयाचें असो; या उपदेशावांचून पोहोंचविण्यास जाणाऱ्याचें कर्तव्य पुरें होत नाहीं. अशा वेळीं प्रत्यक्ष गाडींत बसला असतांना आणि इष्ट स्थळीं जाईपर्यंत जाणाऱ्या इसमानें काय करावें, कसें वागावें, तोंड उघडें ठेवावें कीं बंद करावें, तसेंच डोळे मिटावे कीं सताड उघडे ठेवावे, कान खाजवावा कीं खाजवूं नये, शिंक आल्यास तिला येऊं द्यावी कीं ती दाबून टाकावी; कोट टोपी तशीच घालून ठेवावी कीं काढून ठेवणें युक्त इत्यादि अनेक महत्त्वाच्या विषयावर उपदेश करणें जरूर आहे. गाडी सुटण्यास पांच मिनिटें राहिली कीं झटकन् खालीं उतरून निरोप देण्यास गेलेल्या इसमानें घसा साफ करण्याच्या कामास लागावें. गद्यापेक्षां पद्यांत केलेला उपदेश (अर्थात गुद्यांचा उपदेश अंगीं चांगला ठसतो ही गोष्ट बाजूस ठेऊन) अधिक परिणामकारक होत असल्यामुळें मघां सांगितलेल्या कविरायांनीं तयार केलेला पुढील फटका, फटकाऱ्यासारखा परिणामकारक ठरणारा असल्यानें, त्याचा वापर करावा. हा फटका वापरण्यास प्रत्येक वेळेस एक 'नया पैसा' असा कवीचा प्रयोग हक्क मान्य करावा लागतो; पण तो नया पैसाही खर्च करावयाचा नसल्यास त्याला न कळवितां, (नाटककारांना न कळवितां गुपचूप त्याच्या नाटकाचे प्रयोग करतात त्याप्रमाणें) मारून न्यावा म्हणजे उगाच येवढ्या मोठ्या खर्चांत पडावें लागणार नाहीं. तो फटका

**ट्रंकेजवळुन हलूं नको, तिकिट खिशांतुन काढूं नको**
**प्रवासामधीं निजूं नको रे, मध्येंच कोठें उतरूं नको॥**
**पैसे खर्चुन खाऊं नको, फुकट मिळालें सोडूं नको**
**खिडकिबाहेर मान काढुनि बायकांकडे पाहूं नको॥**

शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें त्या फटक्यापैकीं वर थोडासा नमुना दिला आहे. मुळांत तो अनंतफंदींच्या 'बिकटवाट–वहिवाट एवढा' मोठा आहे आणि तो सर्व गात राहिल्यास गाडी निघून गेली तरी पुरेल! पण गाडी गेल्यावर गात बसण्यांत मतलब काय? येऊन जाऊन प्लॅटफॉर्मवर जमलेल्या इतर लोकांसाठींच तें गाणें होणार ना? पण त्याचें कारणच रहात नाहीं! पोहोंचविण्यास गेलेला असें गात आहे हें पाहून–नव्हे ऐकून–प्लॅटफॉर्मवरील मंडळी फुलाकडे जसा भृंग तसे आकर्षिले जाणारच; एवढेंच काय; त्यांतले कांहीं गाडीच्या खिडकीच्या चौकटीजवळ तबल्याचा तालही धरणार! मग काय; हें उपदेशामृत अनायासेंच त्यांनाही पाजलें जाणारच. आणि हा काय 'चेचा' प्रकार आहे म्हणून गार्ड, ड्रायव्हर, स्टेशनमास्तर, रेल्वे–पोलिस हेही गोळा झाले कीं या उपदेशाला चांगलेंच सार्वजनिक स्वरूप प्राप्त होईल!

आतां अगदीं गाडी सुटण्याचे वेळीं जें शेवटचें कर्तव्य करावें लागतें तें सांगतों. 'या', 'पुन्हा कधीं भेट?' 'गेल्याबरोबर पत्र घाला,' 'वरचेवर येत चला' अशी बडबड तोंडानें चालू ठेवावी. हात जोडलेले असावे. मग गाडी सुरू झाल्याबरोबर, जाणाऱ्या पाहुण्याचा खिडकीबाहेर काढलेला हात हस्तांदोलनासाठीं घट्ट पकडावा; व गाडीचा तो डबा प्लॅटफॉर्मच्या शेवटास जाईपर्यंत तसाच धरून ठेऊन सुरू झालेल्या गाडीबरोबर पळण्याची शर्यत लावून पहावी. असें करावयास मनुष्य चांगला धडधाकट असावयास पाहिजे. म्हणून हा 'धकाधकीचा मामला ज्या अशक्ताला' सोसवणार नाहीं त्यानें आपल्या खिशांतील हातरुमाल काढून तो हलविण्यास सुरवात करावी. हातरुमाल नसल्यास नुसता हातच हलवावा व हात हलविणें शक्य नसल्यास पाय हलविण्यासही हरकत नाहीं! जाणाऱ्या इसमास दिसावें म्हणून मधून मधून उड्या मारून, 'या', 'लवकर या' 'संभाळून' इत्यादि शब्दांच्या तालावर तांडव-नृत्य केल्यास पोहोंचविण्याच्या प्रसंगास अर्थातच शोभा येणार आहे! पण हा नाच गाडी जाईपर्यंतच सुरू ठेवावा; कारण तो खास जाणाऱ्या पाहुण्यासाठीं असतो. प्लॅटफॉर्मवर जमलेल्या लोकांसाठीं नसतो. म्हणून गाडी गेल्याबरोबर आपण नाचण्याचा पवित्रा बदलून 'वन', 'टू' 'क्वुइक मार्च'! अशी आपणांस, मनांतल्यामनांत, ऑर्डर देऊन घरचा रस्ता सुधारावा. ● ● ●

## चंद्रच जेव्हां



चंद्रच जेव्हां झळकुनि गेला माझ्या प्राणांतुनी
कणाकणांतुन जाई निनादत जोत्स्नेची रागिणी
फुलल्या ग नवभाव कुमुदिनी
पराग लवथवले
मधुरतेंत अनिवार तळींचें
जीवन रसरसले
विरहतमांतुनि सुटलें ग मी, मिटलें आलिंगनीं
चंद्रच जेव्हां झळकुनि गेला माझ्या प्राणांतुनी !
डोळे झाले रसहिंदोळे
झुलल्या दाही दिशा
तेजाशीं सोयरीक जडली
आली भाग्यदशा
चराचराची प्रीती गेली अंतरंग व्यापुनी
चंद्रच जेव्हां झळकुनि गेला माझ्या प्राणांतुनी !

संजीवनी

## गडद पापणी जडावलेली



गडद पापणी जडावलेली
आभाळाची;
उदासवाणा पहाड काळा
बघत राहतो एकटकीनें;
उसळत भवती भाव धुक्याचे;
मातीच्या तळकाठावरती
खुणा...जळाच्या;
असतिल
कां हे डोळे......डोळे
वाट पाहुनी
व्याकुळलेले
राधेसाठीं....मीरेसाठीं......
त्याच क्षणीं
बेभानपणानें उड्या टाकती
खालीं
दोन बाहुल्या
माझ्या डोळ्यामधल्या.

इंदिरा



# बायको आणि सात्त्विक अन्नाचे प्रयोग

पु. रा. बेहेरे

तुमची बायको कधीं माहेरीं गेली आहे काय? असे समाधानाचे प्रसंग वारंवार येत नाहींत हें मलाहि माहीत आहे, पण म्हणूनच त्यांचें महत्त्व आहे. तुमची बायको कधीं ना कधीं माहेरीं गेली असणारच. आणि माझीहि बायको एकदां माहेरीं गेली. माहेरीं गेली तो प्रसंगच असा होता ज्याला सामान्यत: 'सहा महिने सक्तमजुरी आणि पांचशें रुपये दंड' असें नवरे लोकांत पारिभाषिक नांव आहे. ती माहेरीं गेल्यामुळें पांचशें रुपये दंडाची सूट मिळणार होती. आणि सहा महिने सक्त मजुरीचा प्रश्न मोठासा नव्हता. बायकोच्या तडाख्यांतून आपण सुटणार या आनंदाप्रीत्यर्थ नवरा खरी सक्तमजुरीसुद्धां स्वीकारील. ही तर केवळ पारिभाषिक होती.

त्याचें असें झालें कीं, आमच्या हिचें तें चौथें बाळंतपण होतें. पहिलीं तीन मुंबईंत घरींच (म्हणजे हॉस्पिटलांत) झालीं होतीं. त्यामुळें हॉस्पिटलांतून घरीं (म्हणजे खोलींत) आल्यापासून मुलांचें तिलाच करावें लागे आणि घरांतलेंहि तिला पहावेंच लागे. पाळणा टांगायला खोलींत जागा नाहीं हें तर उघडच होतें. पण पाळणाहि लांबत नव्हता. तें काय कोणाच्या हातांत असतें थोडेंच! पण यामुळें तिला फार गजबज होऊन जायची. आणि बाळंतपण म्हणून अंगीं लागत नव्हतें. चौथ्या खेपेला तिच्या वडिलांनींच कौतुकानें तिला न्यायचें ठरवलें. तिला अगदीं आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. आपण माहेरीं जाणार ही बातमी सांगतांना तिनें मला धमकी देत म्हटलें, 'आतां अगदीं सहा महिने यायची नाहीं.

माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना. कारण सगळाच प्रकार कल्पनेच्या पलिकडचा होता. तिच्या वडिलांनीं तिला नेणें आणि ती सहा महिने जाणें याच्यावर माझा स्वप्नांतहि विश्वास बसणें शक्य नव्हतें. पहिला आश्चर्याचा धक्का निघून गेला आणि ती म्हणते आहे याला तिच्या वडिलांच्या पत्राचा लेखी आधार आहे हें दिसलें त्यावेळी मी आनंदानें उड्या मारण्याच्या बेतांत होतों. पण बायको समोरच उभी होती. आपण सहा महिने माहेरीं जाणार हें पाहून नवऱ्याला आनंद झाला आहे हें तिला सहन होणार नाहीं हें लक्षांत येतांच मी खोटाच चिंताग्रस्त चेहरा केला. 'तूं खुशाल सहा महिने रहा' असें म्हटलें तर ती तीन महिन्यांतच परत येईल हें वर्म माहिती असल्यामुळें 'तूं मुळीं जाऊंच नकोस' येथूनच मी सुरवात केली. त्यामुळें अपेक्षेप्रमाणें जोरदार भांडण होऊन तिनें माहेरीं जाऊन सहा महिने रहाण्याचा बेत तर पक्का केलाच; पण पुढच्याच आठवड्यांत प्रयाणाचा मुहूर्तहि नक्की केला. एकूण सगळें ठीक झालें.

तसें म्हटलें तर बायकोबद्दल तक्रार करायला मला फारशी जागा नाहीं. म्हणजे असें कीं, सर्वसामान्य नवरा या प्राण्याला

त्याच्या बायकोपासून जितका त्रास होतो त्यापेक्षां मला अधिक होते असें मी दाखवूं शकणार नाहीं. इतकेंच नव्हे तर कित्येकदां तिचें वागणें हा माझ्या कौतुकाचाहि विषय होतो. अर्थात् बायकोच ती! त्यामुळें अशा प्रसंगीं माझेंहि कौतुक करण्याचा उदारपणा ती दाखविते. सांगितलें तर खरें वाटणार नाहीं, पण खरोखरच कित्येक वेळां आमचे चार चार दिवस एकमेकांशीं न भांडता गेलेले मला माहीत आहेत. दोन तीन वेळां तर माझ्या शर्टासाठीं आम्ही कापड विकत घ्यायला गेलों असतांना, तुम्हाला आवडेल तें कापड घ्या असें ती खुशाल म्हणाली. याच्यापेक्षां कळस म्हणजे एकदां तिनें स्वतःचें पातळ माझ्या पसंतीनें निवडलें हा होय.

नेहमींप्रमाणें आम्ही दुकानांत गेलों. त्या दिवशीं दुकानदाराला काय झालें होतें कोण जाणे? त्याचें माझ्याकडे लक्ष गेलें. आणि कपाटांतल्या पातळांच्या निरनिराळ्या घड्या काढून त्यानें हिला दाखविल्या, तशाच मलाही दाखविल्या. 'पहा तुला कोणतें हवें तें' मी माझ्या उदारपणाचें दुकानदारापुढें प्रदर्शन केलें. हिचें माझ्याकडे लक्ष नव्हतेंच. ती निरनिराळीं पातळें उलटीं पालटीं करीत होती. 'तुम्हीहि पहा' दुकानदारालाहि औदार्याची ऊर्मि आली. 'पाहून काय, आम्हाला नेसायची आहेत थोडींच.' असा विनोद करून दाखवावीत मी पातळें पाहूं लागलों. एका पातळाचा रंग मला एकदम आवडला. 'हेंच पातळ तूं घे,' असें मी सहज म्हणून गेलों. सौभाग्यवतीनें त्या पातळाकडे एकदां पाहिलें. पण तें तिच्या मनांत भरलेसें दिसलें नाहीं. वीस-पंचवीस पातळें उलटीं सुलटीं करून झाल्यानंतर तिनें प्रत्येकाच्या दराची चौकशी सुरू केली. मी दाखविलेल्या पातळाची किंमत सगळ्यांत अधिक आहे असें तिच्या लक्षांत येतांच, 'बरं तर हेंच पातळ घेतें; तुम्हालाहि आवडलं आहे' असें म्हणून तें पातळ तिनें पसंत केलें.

सिनेमाची पुस्तकें, कॅलेंडरें, गोष्टींचीं व गाण्यांचीं पुस्तकें आणि मासिकांचीं मुखपृष्ठें यांची

तिरंगी छपाई

उत्तम व स्वस्त भावांत मिळण्यासाठीं आम्हांला भेटा अगर पत्रानें चौकशी करा.

आशा प्रिंटरी

१३ खेतवाडी : गिरगांव मुंबई नं. ४

एकूण बायकोबद्दल तक्रार करण्यास तसा मला वाव नाहीं. पण एका गोष्टींत तिचें माझें जमत नाहीं. ती गोष्ट म्हणजे भोजन. 'अन्नं न निंदयात् तत् व्रतम्' तेव्हां अन्नाची निंदा करूं नये. आणि बायको म्हणजे अन्नपूर्णा. तिनें तयार केलेल्या पदार्थांची निंदा करणें तर अगदींच चूक. पण जेवणा-खाणांत तिची माझी आवड-निवड जुळत नाहीं. ती कौतुकानें कांहीं जिन्नस करते आणि त्याच वेळीं माझी सात्विक आहाराबद्दलची कल्पना साकार होते. एकादे वेळीं रुचीबद्दल महत्त्वपूर्ण विचार सुरू होतात. आणि या मत-भेदांचा परिणाम ठरल्याप्रमाणें भांडणांत होतो. 'अन्नात् भवन्ति भूतानि' असें गीतेंत सांगितलें आहे. जेवतांना भांडण सुरू झालें कीं, 'भूतानि' हा शब्द आमच्यासारख्या माणसांनाच उद्देशून योजलेला आहे हें लक्षांत येतें.

अर्थात् जेवणाखाणांतून उद्भवणाऱ्या भांडणाचें कारण बायको हीच असते. मी तिला स्पष्ट सांगतों, 'तिखट, चुरचुरीत, तळलेल्या अशा पदार्थांमुळें माणसाचा स्वभाव रागीट बनतो. तेव्हां सात्विक आहार मी घेणार. तूं नेहमीं अळवड्या, थालीपीठ, भजीं असले पदार्थ करतेस त्यामुळें माझा स्वभाव संतापी बनला आहे.'

'पण तुम्ही सांगतां म्हणून तर मी भजीं आणि थालिपीठ करतें.'

'हें सांगूं नकोस. तुला ही गोष्ट समजायला पाहिजे.'

'हें उलटं बोलणं नको. तुम्ही हवीं म्हणून भजीं केलीं नाहींत तर तुम्ही तसे ओरडायला लागाल. तुम्हाला कसलं तें सात्विक अन्न हवं तें तुम्हीच करा. माणसानं आंबटतिखट सगळं खाल्लं पाहिजे.'

'हें बघ, तुझा नसता शहाणपणा नको. तुला आहार-शास्त्रांत काय कळतं आहे?'

'नाहीं, तुम्हालाच कळतं आहे!'

'कळतं आहे म्हणून तर सांगतों.'

'मीहि सांगतें ना रोज तुम्हीच करीत चला तुम्हाला काय काय हवें तें! सगळं खायचं आणि वर पुन्हा बोलत रहायचं.'

असा हा आमचा सं-वाद मधून मधून चालूच असतो. तिचें निर्वाणीचें उत्तर 'तुम्हीच करा काय हवं तें' हें असतें. अर्थात् 'हो, हो, करीन, करीन. म्हणजे वाटतं काय तुला?' हेंहि माझें निर्वाणीचें प्रत्युत्तर असतेंच.

अलिकडच्या अनेक मुलींना स्वयंपाक करतां येत नाहीं. तरीहि आपण स्वयंपाक करतों म्हणजे पुरुषांवर मोठे उपकार करतों अशीच बायकांची समजूत असते. कुठें मीठ कमी तिखट जास्त असं कांहीं म्हटलं कीं, 'करून बघा स्वयंपाक म्हणजे कळेल' हा टोमणा बायकोनें दिलाच. 'शेळी जाते जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातड' ही तर आमच्या हिची अगदीं आवडती म्हण! शेळी असली तरी शिंगें रोखूनच असते!

माझा आपला आध्यात्मिक कीं काय म्हणतात तसा स्वभाव आहे. सगळं आपलं सात्विक असावं असं मला वाटतं. बोलणं सात्विक, चालणं सात्विक, जेवणं सात्विक, खाणं सात्विक. पण बायको घरांत असली कीं कसलीच सात्विकता जमत नाहीं. बायको सहा महिने माहेरीं जाणार या वार्तेनें मला सर्वांत आनंद होण्याचें कारण म्हणजे आतां स्वतंत्रपणें सात्विक अन्नाचे प्रयोग मला करायला मोकळीक झाली. आणि तें मी तिला सांगूनहि टाकलें. पण त्याच्यावरून वादंग झालंच.

'तुम्हाला सांगतें, तुम्ही आपले खानावळींत जाऊन जेवत जा. एका खानावळीचा कंटाळा आला तर दुसरी.'

'मुळींच नाहीं. खानावळींतलें अन्न म्हणजे संस्कारहीन अन्न तें. मी स्वतःच घरीं अगदीं सात्विक, साधा आणि स्वस्त असा आहार घेणार.'

'अहो, तुम्हाला जमायचं नाहीं तें. चहा सुद्धां करतां येत नाहीं आणि म्हणे स्वयंपाक करणार!'

'बघ. तो तुझा प्रश्न नाहीं. स्वयंपाक करणार मी आणि जेवणाराहि मीच. तुझा संबंध काय?'

'तुम्हीच कशाला जेवतां? मी सुद्धां तयार आहे. उद्यांच करा स्वयंपाक. सुटी आहेच तुम्हाला. मीहि सुटी घेईन आणि जेवीनसुद्धां.'

'मुळींच करणार नाहीं. तुझ्या जिभेचे चोंचले मला ठाऊक आहेत. उगीच सात्विक अन्नाची सुरवातीलाच तुझ्या तोंडून निंदा व्हायला नको. तूं गेलीस म्हणजे मगच ती माझे प्रयोग सुरू करणार.'

'तुम्ही कसले प्रयोग करणार? मला ठाऊक आहे. माझाच कंटाळा आला आहे तुम्हाला. मी एकदां गेलें म्हणजे सुटाल.' वगैरे वगैरे.

आणि बायकोला गाडीच्या डब्यांत बसवतांना माझ्या मनांत सात्विक आहाराच्या कल्पना भिरभिरत होत्या. गाडी सुटली आणि त्या भिरभिरत्या कल्पना घेऊनच मी घरीं आलों. खोलीचा दरवाजा उघडून एकदां स्वयंपाकघरांत डोकावलों. आतां सहा महिने मीच त्या स्वयंपाकग्रहाचा स्वामी होतों. सौ. नें धान्याचे, तिखटा-मिठाचे, डबे रांगेनें लावून त्यांच्यावर आंतील वस्तूंच्या नांवाच्या चिठ्ठ्या डकवून ठेवल्या होत्या. नवऱ्याला कोणतीहि वस्तू शोधण्याचा म्हणून प्रसंग येऊं नये यासाठीं तिनें ही दक्षता घेतली होती. मी त्यांच्याकडे एकदां नजर टाकली. मनांत म्हटलें, 'कशाला हा सगळा पसारा? मला याची कांहींच गरज नाहीं.'


केसरी वगैरे वृत्तपत्रांचे उत्कृष्ट अभिप्राय

**सामुद्रिक विवरण–करांगुली**

लेखक—**पं. रं. कुळकर्णी**, बी. ए.

पृष्ठसंख्या ११६ (हातांचे फोटो १९)

सामुद्रिक व हस्त सामुद्रिक, घटक व रेषा यांचा अन्योन्य संबंध, आनुवंशिक गुणावगुण व कौटुंबिक व्यक्तींत त्यांचें संक्रमण, करांगुलीच्या वक्रीभवनाचें भिन्नत्व व त्याचा अपराध शास्त्राशीं संबंध, मनोविकृतींचे घटकपरत्वें निदान इत्यादि विषयांचें सामुद्रिक शास्त्रदृष्ट्या चिकित्सा-पूर्वक, टीकात्मक सोदाहरण व अद्यावत् माहितीपूर्ण शास्त्रीय विवेचन.

पाश्चात्य सामुद्रिक ग्रंथांतही न आढळणारी अनुभवसिद्ध शास्त्रीय माहिती शिवाय डॉ. परांजपे, नामदार श्रीनिवासशास्त्री, सरहरि सिंग गौर इत्यादि प्रसिद्ध व्यक्तींच्या हातांच्या ठशांचें नोटक समालोचन-अभ्यासू वाचकांना मार्गदर्शन व अनभिज्ञ वाचकांची ज्ञानलालसा पूर्ण करणारा एकमेव प्रबंध.

**किंमत २॥ रुपये ... टपाल खर्च बारा आणे**

**तुकाराम बुकडेपो : माधवबाग-मुंबई ४**

इतक्यांत शेगडीच्यासमोर पसरलेले कप, बशा, चहाचें भांडें, गाळणें इत्यादी वस्तु दिसल्या. जातां जातां केलेला चहा प्याल्यानंतर मी तिला भांडींहि विसळूं दिलीं नव्हतीं. 'हें सगळें मी करीन' हें माझें पालुपद न ऐकतां गाडींत बसल्यानंतरहि 'भांडीवालीकडून वाटलं तर घ्या धुवून तीं भांडीं' हें तिनें मला ऐकवलेंच होतें. तींच भांडीं माझ्यासमोर होतीं. मोठ्या नेटानें तीं उचलून मी कशींबशीं धुतलीं. एवढें होईपर्यंत गाळण्यांतला चहाचा चोथा मोरींत आणि चहाच्या भांड्यांची काजळी माझ्या हातावर पसरली होती. स्वयंपाकघराबरोबरची पहिलीच सलामी मोठीशी चांगली झाली नाहीं. पण म्हटलें, 'सात्विक अन्नांत चहा येतोच कुठें? यापुढें सहा महिने चहा बंद. वाटल्यास हॉटेलांतच घेऊं?'

चहाचा विषय झटकून माझें मन पुन्हा सात्विक आहारांत भिरभिरूं लागलें. सकाळीं दूध. वाटल्यास थोडा खजूर. त्यानंतर फक्त भात करायचा. भातावर मध आणि मागच्या भातावर दहीं. असल्या तर कच्च्या भाज्या किंवा त्या नुसत्याच मीठ घालून उकडाव्या. जेवणानंतर पेरू किंवा टोमॅटो. किंवा खारीक. बस, बस. दुपारच्या जेवणापर्यंतच्या सात्विक आहाराचा विचारच इतका पोटभर झाला कीं सायंकाळच्या जेवणाच्या विचाराचें अजीर्ण होईल म्हणून मी तो तसाच ठेवून दिला.

'काय टोणपे, आतां खाणावळ का?' नारायणराव आगलावे यांनीं चौकसपणा दाखवला. मलाहि त्या चौकसपणाची गरज होतीच. कारण एरवीं माझा सात्विक आहाराचा निश्चय इतरांना कसा कळला असता? म्हणून आगलाव्यांच्या खाणावळ शब्दाला तुच्छतापूर्वक मान झटकीत मी म्हटलें, 'हें पहा नारायणराव, आपल्याला तें खाणावळीचें अन्न पचायचें नाहीं.'

'कल्पना आहे तुमची टोणपे! अहो, खाणावळ म्हटली म्हणजे कांहींतरीच तुच्छ कल्पना करून घेतली आहे तुम्हीं. आज मुंबईत लाखों लोकांची अन्नपूर्णा आहे ती.'

'असेल! पण मला पचायचें नाहीं तें अन्न. घरीं बायकोच्या हातचा स्वयंपाक पचत नाहीं. तर खाणावळींतलें तें गणान्न कसें मानवणार?'

'बरोब्बर आहे. त्यापेक्षां तुम्हीं एखाद्या घरगुती खाणावळींतच जा. आपले पेइंग गेस्ट म्हणून!' आगलाव्यांना खोडून काढल्याचें समाधान पटकावण्यासाठीं कोलत्यांनीं मला पाठिंबा देत नवी सूचना केली.

'नाहीं बुवा. त्यापेक्षां आपणच हातानें स्वयंपाक करायचा असें ठरवलें आहे मी.' आगलावे आणि कोलते दोघांवरहि बॉम्बगोळा टाकीत मी म्हटलें.

'पण हें जमणार कसें?'

'कसें जमत नाहीं तेंच पहायचें आहे मला.' आणि मग त्यांना माझ्या सात्विक आहाराच्या प्रथमार्धाची माहिती त्यांना दिली. त्यांतच यापुढें चहाला घरांत कां व कशी बंदी केली आहे हेंहि ओघानें सांगितलें. चहाबद्दलचा निर्णय ऐकतांच माझ्याबद्दल असलेली उरलीसुरली सहानुभूती त्यांच्या मनांतून नष्ट झाली. आमच्या सौ. पेक्षांहि अधिक त्वेषानें त्यांनीं माझ्या या योजनेवर हल्ला केला. पण जेथें मी बायकोला दाद दिली नाहीं तो काय आगलावे-कोलते यांना थोडाच भीक घालणार होतों. त्यांना माझा मत्सर वाटत होता हें मी ओळखलें. माझा सात्विक आहार यशस्वी करूनच या लोकांची जिरवायची असें म्हणून मी त्यांच्याशीं अधिक वादंग घालायचें बंद केलें.

रात्रीच्या जेवणाचा प्रश्न नव्हता. पोळ्या, भाजी आणि इतरहि जिन्नस होते. नव्या प्रयोगाचा प्रारंभ उद्यांपासूनच करावा असें म्हणून मी रात्रीं त्या पोळ्यांचा समाचार घेतला.


**प्रकाशकांना व पुस्तकविक्रेत्यांना**
**खास सवलतीचे दर**

**लाइन**
**❁ हाफटोन ❁**
**बहुरंगी**

**ब्लॉक्स करण्याचे वेळीं प्रथम आमचेकडे चौकशी करा.**

# गुप्ता ब्रदर्स

(टे. नं. ६३२८३)
चमारबाग पोस्ट ऑफिस लेन : पोयबावडी
परेल : मुंबई नं. १२

पोळया एकट्यानें खातांना कसेसेंच वाटत होतें. सौ. मुद्दाम गरम पोळया करून देत असे. या रोजच्या संवयीमुळें प्रथम गार पोळया खातांना कसेसेंच वाटलें. पण इतक्यांत एक उंदीर डोकावूं लागला. मध्येंच धीटपणानें माझ्या ताटाजवळ येई, मध्येंच दूर पळत जाऊन आपला विचित्र आवाज आणि खुडखुड सुरू करी. मी एकटाच पोळी खात बसलों आहे म्हणून मला हिणवण्यासाठींच कीं काय तो जीभ काढून दाखवीत होता. त्यामुळें एकटेपणा अधिकच जाणवूं लागला. हातांतलें भांडें त्याच्यावर फेंकून मारावें असा एक विचार मनांत आला पण बायकोला भिववूं शकणारा उंदीर म्हणून त्याच्याविषयीं असणारा माझा आदर या विचाराच्या आड आला.

आणि दुसऱ्या दिवशीं मी माझा प्रयोग सुरू केला. आधीं उठायलाच उशीर झाला. कपबशा आणि भांडीं धुण्याची भीति समोर उभी रहायला नको म्हणून चहाबद्दलचा निर्णय आधींच घेतलेला होता. करायचा होता असा फक्त भात. स्टोव पेटवून त्याच्यावर आधण टाकीपर्यंत बराच घामाघूम होऊन गेलों होतों. आणि तें सहाजिकच होतें. स्टोव आधीं पेटवायचा आणि मग त्याला पिन करायची म्हणजे असाच त्रास होतो. मध्येंच तेल वर उसळतें. भात शिजून तयार होईपर्यंत दोनदां स्टोव पेटवावा लागला. कारण आधण उकळून तें पाणी स्टोवर पडत असे.

भात तसा चांगला होता. वरचा थोडा कच्चा होता. तळाचा मुळीं पातेलीलाच चिकटला होता. पण मधला शिजून छान तयार झाला होता. आधीं मध आणि मागून दहीं यांच्याबरोबर मी तो संपवला. जीव थकून गेला होता एवढेंच. पण पोट भरल्यासारखें वाटत होतें. आणि कचेरींत गेल्यावर चांगला कपभर चहा प्यालों तेव्हां जरा बरें वाटलें.

या सात्विक आहारानें नेहमींपेक्षां लवकर भूक लागूं लागली. चेहरा मलूल दिसूं लागला. (म्हणजे असें वाटूं लागलें.) परत संध्याकाळीं आपणच स्टोव पेटवायचा म्हणजे परत बोटांना चटके, हाताला काळें, तोंडाला घाम असें सगळें दृश्य डोळयांसमोर उभें राहिलें. त्यापेक्षां कोरडे पोहे आणि खोबरेंच खावें, तेंही चांगलें असतें; आणि केळीं खाऊन दूध प्याल्यावर तर बघायलाच नको. हाच विचार पक्का करून घरीं जातांना मी पोहे आणि केळीं घेऊन गेलों.

पोहे खातां खातां मध्येंच कड्कन् खडा दांताखालीं चावला गेला. अरेच्या! पोहे बाजारी; म्हणजे ते निवडले पाहिजेत. जाऊ द्यां. निवडून निवडूनच खाऊं असें म्हणून ते एकदांचे संपवले. केळीं आणि दूध या आहारानंतर झोंप आली. पण ती स्वस्थ नव्हती. स्वप्नें पडत होतीं......

मी केळीं आणि दूध संपवून झोंपण्याच्या तयारींत होतों इतक्यांत दरवाजावर थाप पडली. दरवाजा उघडतों तर सौभाग्यवती हजर. 'म्हणजे तूं मध्येंच कशी परत आलीस?' मी आश्चर्यानें विचारलें. तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. स्वयंपाकघरांत जाऊन तिनें भांड्याकुंड्यांचा पसारा पाहिला. 'तरी मी सांगितलें होतें कीं, सरळ खाणावळींत जा. घरांत हा पसारा. आणि जेवणसुद्धां धड नाहीं.' तिनें सरबत्ती सुरू केली. आधींच माझ्या पोटांत थोडी भूक होती आणि त्यांत हा हल्ला. मग मी बायकोवर खूपच तोंड सोडलें. बायकोनेंहि संतापून हातांतला एक डबा जमिनीवर आदळला आणि मी जागा झालों. उंदरानें फळीवरचा डबा खालीं ढकलला होता. घड्याळांत साडेबारा वाजून गेले होते. स्वप्नांत सुद्धां बायको पिच्छा पुरवते आहे पण मी माझा सात्त्विक आहार सोडणार नाहींच. पोटांत भूक असल्यामुळें स्वप्नें पडतात दुसरें काय!

आणखी दोन दिवस माझे हे प्रयोग मी शिकस्ती केले. तोंपर्यंत स्टोव पुरा काळा झाला होता. त्याला कसाहि स्पर्श केला तरी हाताला काळें लागूं लागलें. नुसत्या भातानें समाधान होईना. मध, गोड लागेना. भातावर का कोण




आवृत्ति ११ वी, तीन रंगी मुखपृष्ठ
शिवाय उपकरणांचा चित्रपट
**पृष्ठें ४६० : मूल्य ५ रुपये**
शाकाहारी आणि मांसाहारी लोकांना उपयुक्त अशा एक हजार खाद्य-पदार्थांच्या कृती असलेलें अत्यंत लोकप्रिय पुस्तक आणि आजारी माणसांच्या खाद्यपदार्थांची माहिती.
**बलवंत पुस्तक भाण्डार : मुंबई ४**

मध घेतात ? घेतात असें मी वाचलें होतें. पण आपल्या कोठ्याला तें जमणारें नसेल ! पोळीशिवाय भागायचें नाहीं. भाजीशिवाय बरें वाटत नाहीं असें सारखें वाटूं लागलें. मनाची खूप समजूत घालीत होतों. पण त्याला बायकोची फूस म्हणजे रोज रात्रीं स्वप्नांत येऊन ती खाणावळींत जायला सांगायची. तीन दिवस ( म्हणजे रात्रीं ) असें झालें तेव्हां शेवटीं सकाळींच कोल्त्यांकडे गेलों.

'तुमची ती घरगुती खाणावळ–' 'तुम्ही येणार काय ? चला, आजच या. अहो, आपल्यासारख्या पुरुषांना हें जमत नाहीं घरीं करायचें '–कोलते.

'पण बघा कोलते, मला तो खाणावळींतला मसाला आवडत नाहीं बघा !'

'अहो, पण ही खाणावळ नव्हेच. घरगुती जेवण. आणि आत्याबाईंना तर खाणावळ असें कोणी म्हटलेलेंसुद्धां खपत नाहीं.'

'मग जमेल म्हणतां आमचं तिथें ?'

'जमेल म्हणजे काय ? जमलेंच पाहिजे.' कोल्त्यांच्या मार्गदर्शनानें आत्याबाईच्या घरगुती खाणावळींत मी 'पेईंग गेस्ट' म्हणून प्रविष्ट झालों. बायको म्हणते खाणावळींत चला. बायकोचें म्हणणें आपण ऐकलें नाहीं हें एक समाधान मला आत्याबाईकडे जातांना होतें. त्या समाधानांत माझे घरींच सात्विक अन्न खाण्याचे प्रयोग थंडावले याचें दुःख मी विसरून टाकलें. असल्या गोष्टी काय एकदम होतात ? बरें, सात्विक आहाराची कल्पना मी कायमची सोडून दिली असें थोडेंच होतें !

आत्याबाईवर वजन टाकण्यासाठीं मी माझ्या सात्विक आहाराच्या योजनेची कल्पना बोलतां बोलतां दिली. खाणावळींचें अन्न आपल्याला पचणारच नाहीं हेंहि मी बोलून टाकलें. 'खाणावळ हें नांव सुद्धां काढूं नका इथें.' खाणावळीबद्दलचा तिटकारा व्यक्त करीत आत्याबाई म्हणाल्या. 'इथें अगदीं घरच्यासारखं वागायचं' पंधरा दिवसांचा अॅडवान्स त्यांनीं आधींच घेतला होता. खाणावळींत अन्नाला चव कशी नसते, मालक कसे मग्रूर असतात, नोकर कसे उद्धट वागतात हें आत्याबाई प्रसंगोपात्त सविस्तर सांगत असत. 'आणि खाणावळींत जाणारे लोकहि तसेच ! त्यांना चव ना ढव. नुसती मिजास आणि तालेवारपणा करतात मेले ! मला एक वेळ नाहीं खपायचीं असलीं माणसें.' या शब्दांत ते खाणावळ पुराणाचा समारोप करीत. आत्याबाईंना कोणत्या गोष्टी खपत नाहींत हें दोन तीन दिवसांत माझ्या बरेंच परिचयाचें झालें. अर्थात् यासंबंधींच्या माझ्या ज्ञानांत दर वेळीं भरच पडत होती. शिवाय मला कांहीं खपत नाहीं असें त्यांना मुळीं वाटतच नव्हतें.

दुध्या भोपळ्याची भाजी मला आवडत नाहीं. पण माझ्या पानावर ती शिल्लक राहिली आहे हें पाहून आत्याबाई म्हणाल्या, 'टोणपे, दुध्या आवडत नाहीं कीं काय तुम्हाला ? हें कसं चालेल ?' टोणप्याला प्रत्येक गोष्ट आवडलीच पाहिजे असा आत्याबाईंचा खाक्या होता. बाकीच्या टोणप्यांना आवडत होतीच कीं नाहीं ? आत्याबाई भात चांगला करीत. पण तांदुळ चांगले नसत त्याला त्या बिचाऱ्या तरी काय करणार ? त्या कांहीं तांदुळ तयार करीत नव्हत्या !

तशाच पोळ्या. पोळ्या नांवाची वस्तु गरम असते ही गोष्ट आत्याबाईकडे गेल्यापासून मला खरीच वाटत नाहींशी झाली. पोळ्या कच्च्या राहूं नयेत याबद्दल त्या दक्ष असत. त्यामुळें संसर्गदोषानें तव्याचा रंग पोळीला ठिकठिकाणीं आलेला असे. प्रत्येक पोळीचा तुकडा मोडतांना सौभाग्यवती न डागळतां भाजलेली गरम पोळी माझ्या

**पुस्तकांच्या व मासिकांच्या मुखपृष्ठाची**

**बहुरंगी छपाई**

हें आमचें वैशिष्ठ्य आहे. स्वस्त भाव, उत्तम काम.

| | |
|---|---|
| **कंगाल भारत** ( नाटक ) ( देसाई गुरुजी ) | १–८–० |
| **बालकाकरितां डायरी** | १–०–० |
| **रसायनशास्त्रांतील नवलकथा** भाग १ ला | १–४–० |
| ,, ,, ,, २ रा | १–८–० |
| **बीजगणित** ( दिवेकर–दळवी ) | ३–०–० |

एक्झरसाईज बुकें, ड्रॉइंग बुकें, अकाउंट बुकें, शाळेची स्टेशनरी, निळीकाळी शाई वगैरेसाठीं चौकशी करा–

**हिंद प्रिंटिंग वर्क्स** : कांदेवाडी नाका गिरगांव–मुंबई ४

पानावर वाढण्याची कशी शिकस्त करी हें चित्र डोळ्यासमोर उभें राही. भाजी तोंडांत घालतांच तिखटाचा चटका बसे किंवा मिठानें खारटपणा सोडल्याचें तरी लक्षांत येई. अर्थात् असल्या गोष्टींबद्दल तक्रार करायला आत्याबाईंची खाणावळ थोडीच होती! बोलून चालून मी त्यांच्याकडे 'पेईंग गेस्ट' होतों. घरासारखा पाहुणा. शिवाय हें घरगुती जेवण होतें. आणि आत्याबाईंना काय काय खपत नाहीं हें तर त्यांनीं वेळोवेळीं सांगितलेंच होतें.

मी आत्याबाईंकडे जेवायला जातों हें नारायणराव आगलाव्यांना कळलेंच होतें. 'कांय म्हणतें आहे आत्याबाईंचें घरगुती जेवण?' एकदां आगलाव्यांनीं खंवचटपणें विचारलें. मी उदासपणें म्हटलें, 'तें जेवण बिचारें काय म्हणणार? आत्याबाईच सारख्या काय तें म्हणत असतात!' आगलाव्यांना बरें वाटलें, 'मला वाटलेंच होतें. अहो या घरगुती खाणावळींत कांहीं अर्थ नाहीं. ती घरगुतीहि नसते आणि खाणावळहि नसते. त्यापेक्षां चक्क खाणावळ बरी.' मलाहि तसेंच वाटूं लागलें होतें. पण आगलाव्यांना एकदम शरणचिठी देण्यांत कांहीं अर्थ नव्हता. 'खाणावळींतले मसाले! आपल्या पोटाला ते पचणार नाहींत.' मी नम्रपणें म्हणालों. 'कोण म्हणतो खाणावळींतले मसाले भडक असतात म्हणून? तुम्ही खाऊन बघितले आहेत का?' 'खाऊन नाहीं पाहिले. पण ते मसाले तसेच असणार!' 'हें पहा टोणपे, अनुभवाशिवाय उगीच नांवें ठेवूं नयेत. तुम्ही श्रीखंड्यांच्या खाणाळींत जा. आणि मग सांगा.'

श्रीखंडे हें नांवच मोठें मिष्ठ होतें. खाणावळवाल्याचें नांवहि असेंच हवें. उगीच आपला शहाणपणा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नाहीं तरी सौभाग्यवतीचाहि हट्ट होताच मी खाणावळींत जावें म्हणून, तर तिचेंहि ऐकल्यासारखें होईल. दुसऱ्याच दिवशीं आत्याबाईंना रामराम ठोकून श्रीखंड्यांना भेट दिली.

श्रीखंड्यांची खाणावळ 'अप् टु डेट' म्हणून प्रसिद्ध होती. सुरवातीलाच श्रीखंड्यांच्या समोर गेलों तेव्हां त्यांचा आंबट चेहरा बघून माझी थोडी चलबिचल झालीच. पण खाणावळवाल्याचा चेहरा बघून काय करायचें आहे असा विचार करून मी आंत गेलों. खाणावळ 'अप् टु डेट' होतीच. कसें चालावें, कसें बसावें, केवढ्या आवाजांत बोलावें, याबद्दल आज्ञा करणारे फलक ठिकठिकाणीं लावलेले होते.


**संयुक्त महाराष्ट्र विरोधकांची दाणादाण उडवणारा ग्रंथ**

**आचार्य अत्रे यांची**

# सिं ह ग र्ज ना

**मूल्य ७॥ रुपये**

---

**सौ. शिरीष अत्रे (पै) यांचा कथासंग्रह**

# सु ख स्व प्न

**मूल्य ३॥ रुपये**

**ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर** गोरेगांवकर चाळ २ गिरगांव, मुंबई ४

त्यांचा अभ्यास करून मी अन्न-ब्रह्माची प्रतीक्षा करूं लागलों. इतक्यांत एक इसम खांद्यावरचें फडकें झाडीत आला. त्यानें माझ्याकडे पाहून आरोळी ठोकली. ' एक साधा. '

' काय स्पेशल सांगूं काय ? '

' नको. '

' एक साधा. ' अशी पुन्हा ललकारी देत त्यानें चौकशी केली. ' पोळ्या घेणार कीं नुसताच भात ? '

' पोळयाहि हव्यात. '

' वांगी भाजी चालेल ना ? कीं स्पेशल भाजी सांगूं ? '

' भाजी स्पेशलच सांग. '

' दोन भात, चार चपाती, वांगी भाजी नको; एक स्पेशल भाजी. ' त्यानें पुन्हा ललकारी ठोकली.

समोर ताट येईपर्यंत समोरच्या भिंतीचें निरीक्षण केलें. निरीक्षण करणें हा गुणच आहे. पण तेथें भिंतीवरहि मला उद्देशून हुकूमच लावलेले होते. जेवावें कसें, अन्नाचें महत्त्व काय, पानावर अन्न टाकूं नये, अन्नाला नांव ठेवूं नये वगैरे आज्ञा तेथें लिहिलेल्या होत्या. कांहीं वचनें संस्कृत भाषेंत होतीं. त्यांचा अर्थ कळेल, न कळेल म्हणून मुद्दाम तीं मराठींत पुन्हा लिहिलीं होती. आणि शेवटीं तर कहरच होता. ' नोकरांशीं भांडण करूं नये. ' हें वाचून तर माझें डोकेंच फिरण्याची वेळ आली. आम्ही इथें जेवायला आलों तर या श्रीखंड्यानें आमच्यापुढें क्रिमिनल प्रोसिजर कोडच उघडून ठेवलें आहे. इतक्यांत नोकरानें जेवणाचें ताट आणून माझ्या समोरच्या टेबलावर आदळलें आणि माझ्याकडे तीक्ष्ण दृष्टिक्षेप टाकून तो चालता झाला. ' टोणप्या, तुला बायको-बिऱ्हाड कांहीं आहे कीं नाहीं, इथं गिळायला आलास तो ? ' असेंच जणूं तो विचारत होता. गंमत अशी कीं जेवायला येणाऱ्या गिऱ्हाइकाला उद्देशून शेंकडों हुकूम लटकारणाऱ्या श्रीखंड्यानें आपल्या नोकरांना उद्देशून कोणतीच विनंति केलेली पहाण्यांत येत नव्हती. ते नोकर मालकाच्या गुर्मींत आणि आम्ही गिऱ्हाइकें नोकराच्या अदबींत तेथें रहात होतों. सभोवार नजर टाकली तर इतर बुभुक्षित मंडळी श्रीखंड्यांच्या नोकरांकडे आणि भिंतीभिंतींवर लावलेल्या आज्ञापत्रांकडे लक्ष न देतां समोरच्या जेवणावर तुटून पडली होती. त्यांच्यासारखें वागण्याचा मीहि प्रयत्न करूं लागलों.

अशा तऱ्हेनें मी श्रीखंड्यांना आश्रय देऊं लागलों. पण एकूण बस्तान नीट बसत नव्हतें. एका संध्याकाळीं शेजारची ठमी संस्कृत श्लोकांची शंका विचारायला आली. ' गृहम् तु गृहिणीहीनम् । कान्तारात् अतिरिच्यते ' म्हणजे हो काय टोणपे काका ? ' ठमीनें शंका विचारली. हल्लीं या पोरीबाळी संस्कृतच फार शिकूं लागल्या आहेत. आणि शंका तरी कसली विचारतात तर गृहं तु गृहिणीहीनम् ! पण ठमीला उत्तर देणं जरूरच होतें. मी म्हटलं, ' बायको नसलेलं घर म्हणजे अरण्यच होय. '

' आणि अरण्यपंडित म्हणजे हो काय ? असल्या घरांत रहातो तो का ? ' ठमीची शंका वाढतच चालली. इतक्यांत उंदरानें घरांत डबा पाडला. आणि मी घरांत गेलों.

माझें घर म्हणजे अरण्यच झालें होतें. त्या घरांत मला कांहीं खायला मिळत नव्हतें; उलट तें घरच मला खायला येत होतें. दार असल्याशिवाय घराला शोभा नाहीं. रात्रभर याच विषयावर विचार केला आणि सकाळीं एक पत्र लिहून आमच्या श्वशुरांना रवाना केलें.

× × ×

दुसऱ्या दिवशीं सौभाग्यवती आमच्या सासूबाईसह हजर झाल्या. माझी प्रकृति बिघडल्याचें तर तिला दिसत नव्हतें. ' म्हणजे तुम्ही खोटंच कळवलंत कीं काय ? '

' काय खोटं कळवलं ? तुमच्या तिकडे फ्लूची साथ आहे. उगीच मुलं आणि तूं आजारी पडलांत म्हणजे मला इकडे काळजी ! '

' पण तुमची प्रकृति बरी नाहीं असं लिहिलं होतंत ना ? '

' मग नाहींच आहे. आतां निवांतपणें चार दिवस औषधपाणी घेईन तेव्हां बरं वाटेल. '

' पण औषध सुरू केलं आहे का ? '

' तें मग सांगतों तुला. आधीं चांगलं खमंग थालिपीठ कर. तूं गेल्यापासून सुखानं चार घांससुद्धां जेवायला मिळाले नाहींत. छान जेवण आणि थालीपीठ हेंच औषध आहे. '


# ब्रम्हचारी

लेखक : डॉ. कृ. श्री. म्हसकर

या ग्रंथांत १३ ते १९ वर्षापर्यंतच्या मुलांच्या संगोपनासंबंधीं चर्चा केलेली आहे. कौटुंबिक उन्नतीच्या दृष्टीनें हा ग्रंथ अत्यंत वाचनीय आहे.

**सुंदर दुरंगी मुखपृष्ठ : मूल्य दीड रुपया**

**जय हिंद प्रकाशन**

**झावबाची वाडी : ठाकुरद्वार : मुंबई नंबर २**

# केरळांतील एक प्रसिद्ध सण : तिरुवातिरा

लेखक : श्री. पं. महादेवशास्त्री जोशी

केरळांतला एक प्रसिद्ध सण. पौष मासांतल्या आर्द्रा नक्षत्रावर हा सण साजरा करतात. पार्वतीच्या कठोर तपानें प्रसन्न होऊन भगवान शिवानें ह्या नक्षत्रावर नवा जन्म घेतला आणि तिचें पाणिग्रहण केलें. ह्या दंतकथेला अनुसरून केरळांतल्या स्त्रिया सौभाग्यासाठीं हा सण करतात. मुख्य दिवसाच्या आधीं दहा दिवस गांवांतल्या स्त्रिया ब्राह्ममुहूर्तीं उठून नदीवर स्नानाला जातात. स्नान करतांना गाणीं म्हणतात, आणि दोन्ही हातांनीं पाणी वर उडवतात. असें पाणी उडवणें हें ह्या व्रताचें अनिवार्य अंग आहे. स्नानानंतर कपाळीं मांगलिक तिलक लावतात आणि 'दशपुष्प' केसांत माळतात.

मुख्य दिवशीं म्हणजे आर्द्रा नक्षत्रावर शिव-पार्वतीच्या मंदिरांत जाऊन दर्शन करतात. आदल्या रात्रीं जागरण करतात आणि नाचगाण्यांत रात्र घालवतात. त्या रात्रीं 'पातिराप्पुवु' नांवाचें फूल वेणींत माळलें पाहिजे असा संकेत आहे. इतकेंच नव्हे; तर त्या दिवशीं सौभाग्यवती स्त्रीनें एकशेंएक पानें खाल्लीं पाहिजेत असाहि नियम आहे. कारण पार्वतीनें तशीं खाल्लीं होतीं. आतिराच्या आदल्या रात्रीं पार्वतीनें शिवासह क्रीडा केली होती, झोपाळ्यावर झोके घेतले होते आणि कंदमुळें खाल्लीं होती. म्हणून या व्रताची पद्धत त्या धर्तीवर ठेवलेली आहे. मुली या सणांत झोपाळ्यावर बसून नानाप्रकारचीं गाणीं गातात. दहा दिवस आधीं रोज रात्रौ केरळी स्त्रिया जें नृत्य करतात, त्याचें नांव 'तिरुवातिरा कळि' असें आहे. ह्या नृत्याचीं अनेक लोकगीतें आहेत. सकाळीं स्नानास जातानांहि बायका गाणी म्हणतच जातात—

" धनुमासत्रिल तिरुवातिरा  
भगवान्टे तिरुनाळ्ळो  
भगवतिक्कु तिरुनोयम्व  
उण्णरुते उरङ्ङुरुते  
आटणमपोल पाटणमपोल  
तुटिकणमपोल कुळिकणमपोल "

'पौषमासांतला तिरुवातिरा हा शिवाचा जन्म-दिन आहेत. हें भगवतीचें महाव्रत आहे. म्हणून सर्वजणी उपास करा, नाचा, गा, सकाळीं उठून पाण्यांत बुडी मारा आणि पाणी वर उडवा.'

सर्व स्त्रिया मिळून उच्च स्वानें ह्या उत्सवाचा 'वाक्किला' ह्या शब्दांत आवाज देतात. पुरुषांचा 'आरप्पु' आणि स्त्रियांचा 'वाक्किला' हे ध्वनि केरळांत मंगलसूचक समजतात. कोणत्याहि मंगलप्रसंगीं ह्या ध्वनींचा उद्घोष होतो.

ह्या सणावर स्त्रियांचेंच आधिपत्य असतें. पुरुषांनीं फक्त फळें-फुलें गोळा करून त्यांच्या व्रताची सामग्री जमवून द्यायची. केरळांत मातृसत्ताक कुटुंबपद्धति असल्यामुळें पुरुष हा स्त्री-पुत्रांच्या पालनाच्या जबाबदारींतून मुक्त असतो. त्या स्त्रियांचें पतीकडे एकच मागणें असतें कीं, त्यानें 'तिरुवातिरा'च्या व्रतासाठीं आवश्यक ती सामग्री स्वतःच्या खर्चानें विकत घेऊन द्यावी. जो पुरुष ही मागणी पुरी करूं शकत नाहीं तो तिकडे नामर्द समजला जातो. ●●●

सतत ३६ वर्षांच्या अनुभवानें जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेले सुप्रसिद्ध

**कृ. ब. पेटकर आणि मंडळी**

सोनें, चांदी, जवाहीर व उत्कृष्ट कल्चर मोत्यांचे, फॅन्सी दागिन्यांचे व्यापारी  
चर्नी रोड, प्रार्थनासमाजासमोर, मुंबई ४

# ॥ विठ्ठल विठ्ठल म्हणा कीं आनंदानें ॥
# ॥ वैकुंठीं ध्वजा लाविली साईनाथानें ॥

## साईबाबांच्या पूजेसाठीं आजच आपल्या ऐपतीनुसार चांदीची सुबक मूर्ति खरेदी करा.

त्याचप्रमाणें साईबाबांच्या पूजनासाठीं पादुका, पूजेची भांडीं, पंचारती निरांजनें, समई, उदबत्ती घरें, देव्हारे, कापूरआरती, पंचामृत भांडीं, ताम्हनें, तबकें, गंधाची तातली, पळ्या, फोटो फ्रेम, लॉकेट, आंगठ्या, वगैरे नेहमीं तयार मिळतात. तसेंच खरें कल्चर्ड मोती मिळतात. नवग्रहादि खडे तयार मिळतील.

ता. क. :—आपल्या सोन्याचे दागीने तयार करून दिले जातात.




स्थापना १९११

**ई. आर. मालपेकर**

सोने चांदी व मोत्याच्या दागिन्याचे व्यापारी

जितेकर चाळ ठाकुरद्वार मुंबई २

# ही ईश्वराची दया

**—वा. श. ढवळे**

ईश्वराची दया कशी विविध प्रकारांनीं प्रकट होत असते याचें क्रमवार वर्णन करणारी एक कविता माझ्या लहानपणीं तोंडपाठ झाली होती. अभ्यासक्रमांत असलेल्या इतर कवितांप्रमाणें तीहि कविता माझ्या स्मरणांत अजून आहे. तींत काव्य नाहीं असें जर कोणी मला त्यावेळीं सांगितलें असतें, तर मी त्याच्याशीं मोठा कडाक्याचा वाद घातला असता. कारण काव्यासंबंधींच्या त्या वेळच्या माझ्या कल्पना अगदीं निराळ्या होत्या. पद्यमय रचना म्हणजे कविता ही माझी त्यावेळची सरळ साधी समजूत होती. ही कल्पना माझ्या मनांत एवढी वज्रलेप झालेली होती, कीं ती नाहींशी व्हायला कित्येक दिवस लोटावे लागले. पण आज त्या कवितांना काव्य म्हणायला मी धजूं शकणार नाहीं. कार्यकारण भाव संगतवार सांगण्यासाठीं केलेली एक पद्यमय कसरत एवढेंच फार तर मी त्यांना आज महत्त्व देईन. काव्याच्या स्वरूपाबद्दलची माझी कल्पना जरी आज बदललेली असली तरी लहानपणीं तोंडपाठ झालेल्या कविता माझ्या स्मरणांतून अद्यापि जाऊं शकत नाहींत, हें सत्य आहे. परवांच कोणीतरी ईश्वराच्या दयेचें विश्वरूप दर्शन व तिचें स्वरूप यासंबंधीं मला मोठ्या धार्मिक भावनेनें नि तळमळीनें सांगत होता. त्याच वेळीं लहानपणीं तोंडपाठ केलेली पुढील कविता मला सहज आठवली. कविता तोंडपाठ केलेली असल्यामुळें, तींत कांहीं पाठ-भेद झाले असणें शक्य आहे. ती कविता अशी:

**डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कानीं, पदीं चालतों**<br>**जिव्हेनें रस चाखतों मधुरहि वाचे अम्हीं बोलतों**<br>**हातांनीं बहुसाळ काम करितों, विश्रान्ति ही घ्यावया**<br>**घेतों झोंप सुखें फिरूनि उठतों ही ईश्वराची दया !**

या कवितेंत कवीनें मनुष्याच्या पंचेन्द्रियांचे सर्व कारभार अगदीं सुतासारखे सरळ होतात याचें कारण ईश्वराची दया असें अगदीं सरळ सरळ सांगून टाकलें आहे. यावर कोणी असें म्हणेल कीं, यांत ईश्वराच्या दयेचा प्रश्न आलाच कुठें ? डोळ्यांचें कार्य बघणें, कानांचें ऐकणें, जिभेचें रसास्वाद घेणें, वाणीचें बोलणें व हातांचें काम करणें वगैरे कामें हीं त्या त्या इंद्रियांचे स्वभावधर्मच नाहींत काय ? कोणी असेंहि म्हणेल कीं, कवीला विज्ञानाच्या प्रगतीची वाटचाल माहीत नसल्यामुळें, ईश्वराच्या दयेचे हे सर्व प्रकार म्हणून कवीनें मोठ्या भाविकतेनें वर्णन केले असले पाहिजेत. येथें कवीच्या दृष्टिकोनांतून बोलायचें झालें म्हणजे असें म्हणतां येईल कीं एखाद्याची दृष्टि गेली अगर एखादा मनुष्य जन्मजात आंधळा, मुका, बहिरा, लुळा असला तर तो प्राणी ईश्वराच्या दयेला सर्वस्वी मुकलेला आहे असेंच समजलें पाहिजे. जोपर्यंन्त त्या त्या इंद्रियांचे स्वभावधर्म चालू आहेत तोंपर्यन्त परमेश्वराच्या दयेचें महत्त्व कळत नाहीं. पण जर का त्या स्वभावधर्मांत कांहीं वैगुण्य निर्माण झालें तर मात्र त्याचें कारण ईश्वराच्या अवकृपेपर्यन्त भिडविण्याची मनुष्याची सहज प्रवृत्ति असते. आपलें प्रिय माणूस आपल्या जवळ सतत असलें म्हणजे त्याचें तितकेसें महत्त्व वाटत नाहीं. पण जर का त्याचा विरह कांहीं काल झाला तर मात्र त्या मनुष्याची अनुपस्थिति विशेष जाणवते, हा अनुभव कोणाला नाहीं ?

पण आज विज्ञानाची प्रगति एवढी झालेली आहे कीं माणसाच्या विचारसरणींतच फार मोठा बदल झालेला आहे असें नसून इंद्रियांचीं हीं सारीं वैगुण्यें दूर अगर कमी करण्याचें सामर्थ्य वैज्ञानिक शोधांतूनच निर्माण झालेलें आहे, नव्हे काय ? दृष्टि अधु

झाली तर डोळ्यांवर शस्त्रक्रिया करून अगर चष्मा लावून सुधारतां येते. कानांची ऐकण्याची शक्ति शस्त्रक्रियेनें अगर यंत्रानें वाढवितां येते. सायकली, मोटार सायकली, मोटारी, आगगाड्या, विमानें वगैरे अनेक वेगवान वाहनें निर्माण झाल्यामुळें जनकपुत्र रामाचे जसे अरण्यांतून फिरतांना हाल झाले तसे होण्याची भीति आज राहिलेली नाहीं! जिव्हा छाटली गेली अगर एखाद्या कॅन्सर सारख्या दुर्धर रोगानें घसा बंद झाला तरी अन्न-नलिकेंत जीवनरस पोंचविण्याचे कृत्रिम उपाय आजच्या शस्त्रक्रिया-विशारदाना करतां येतात. वाचेचें कार्य हात करूं शकतात व हातांचें कार्य आज यंत्रें बिनबोभाट करीत आहेत. विश्रान्तीसाठीं झोंप आली नाहीं तर झोंपेची गोळी अगर इंजेक्शन घेऊन झोंप आणतां येते व अपेक्षित विश्रान्तिहि घेतां येते. समजा घटकाभर ईश्वराची अवकृपा झाली तरी विज्ञानाच्या प्रगतीमुळें वरील सर्व कामें होणें शक्य झाल्यामुळें, फारसें डगमगण्याचें अगर हतबुद्ध होण्याचें कारण आहे असें नाहीं. अर्थात्, ईश्वराच्या दयेचे फाजील पवाडेहि गात बसण्याचें प्रयोजन उरणार नाहीं, हें तितकेंच खरें.

पण मी म्हणतो ईश्वराच्या दयेचेच कशाला, विज्ञानाचे पवाडेहि गाण्याची आवश्यकता नाहीं. मनुष्याच्या अन्तःकरणांत संपूर्ण समाधानाची जर वृत्ति असेल तर पांचहि इंद्रियांच्या वैगुण्यांना तो मोठ्या आनन्दानें, धैर्यानें तोंड देऊं शकेल. 'आंधळा झालों तर–' या रे. टिळकांच्या कवितेंतील विचार यावेळीं मला अगदीं सार्थ वाटतात. नेत्रें असणें हें इष्ट असलें तरी नेत्रावलंबी मन असणें हें इष्ट नाहीं असें सांगून परमेश्वराला ते म्हणतात,

**अनेकविध दर्शनीं मन चळे तुझ्यापासुनी**
**म्हणूनि जग चिंतितें तुज विलोचनां झांकुनी;**
**बघेन तुजलाच मी सतत अंध झालों तरी**
**नकोत नयनें! प्रभो! वसति मन्मनीं तूं करीं!**

परमेश्वराशीं समरस होऊं पहाणाऱ्या टिळकांना, आपली दृष्टि गेली तरी मुळींच भय वाटत नाहीं, याचें कारण त्यांच्या या समाधानी वृत्तींतच सांपडतें.

भक्तिमार्गी रे. टिळकांचे हे विचार एक वेळ जुने मानले तरी आजच्या यशवन्त कवींनीहि 'आंधळा झालों तर–' या कवितेंतहि जवळ जवळ असेच विचार प्रकट केलेले नाहींत काय? आंधळा होण्यापेक्षां मेलेलें बरें असें जरी सुरवातीला क्षणभर त्यांना वाटलें तरी थोड्याशा विचारानें त्यांची भीति नाहींशी होऊन, आंधळा झालों तरी गळ्यानें गाणीं गाऊन लोकांना सन्मार्ग दाखविण्याची त्यांची आशावादी अगर प्रवृत्तिवादी भाषा कौतुकास्पदच नव्हे काय? इतकेंच कशाला?

**ज्याचें दर्शन नेइं ओढुनि मना पापी विचाराकडे**
**आपोआप टळेल तें मज गमे सद्भाग्य हें केवढें!**

ही त्यांची समाधानी वृत्तीची विचारसरणी लक्षांत घेतल्यावर मानवी दृष्टीच्या वैगुण्याबद्दल उगाच कोण कुरकूर करील?

विज्ञानाच्या दृष्टींतून अगर समाधानी वृत्तीच्या चष्म्यांतून पाहिलें तरी पंचेंद्रियांच्या स्वभावधर्मांतील संभाव्य वैगुण्यांनीं प्रथम दर्शनीं वाटणारी भीति कालांतरानें नाहींशी होते. आणि मग ईश्वराच्या दयेचें विविध प्रकार म्हणून कवीनें केलेलें पहिल्या तीन ओळींतील वर्णन एक अतिशयोक्त तरी वाटतें अगर पादपूरक तरी वाटतें. मात्र त्या कवितेच्या शेवटच्या चरणांत कवीनें ईश्वराच्या दयेचें एक बिनतोड अगर निर्विवाद असें गमक दिलें आहे. तेवढेंच त्या कवितेंतील संपूर्ण सत्य समजायला हरकत नाहीं. विशेषतः आपण झोंप सुखानें घेतों, यापेक्षां 'फिरूनि उठतों' ही खरोखरच ईश्वराची दया म्हटली पाहिजे. कारण आपण जर झोंपेंतून दुसऱ्या दिवशीं अजिबात उठलोंच नाहीं अगर आपली झोंप ही कालनिद्राच ठरली तर केवढे अनवस्था प्रसंग उद्भवतील या कल्पनेनेंच अंगावर शहारे उभे रहातात! असें झालें तर आपले सर्वांचे बेत तर धुळीला मिळतीलच पण साऱ्या जगाचें भवितव्य काय होईल याची कल्पनाच केलेली बरी! ●●●



# तरंग

**— ज्ञानेश्वर नाडकर्णी**

सुएझ मागें टाकून बोट तांबड्या समुद्रांत शिरली तसें विलक्षण उकडूं लागलें. डेकवर नुसतें स्वस्थ बसलें तरी अंगांतून घामाच्या धारा वाहायच्या. सबंध बोटीची एक मोठी कढई झाली होती, नि तींत लहानमोठे, काळेगोरे, सर्व उतारू तळून निघत होते. अर्ध्या चड्ड्या आणि तलम कापडाचे शर्ट घालून कांहीं युरोपियन तरुण उन्हाळी पोशाखांतल्या तरुणींबरोबर डेकवरचे नेहमींचे खेळ खेळतच होते. परंतु बहुतेक आपापल्या केबिनमध्यें उघडे नागडे लोळत होते, हवेला शिव्या मोजीत होते किंवा लाउंजमध्यें मादाम तुस्सोमधल्या मेणाच्या पुतळ्यासारखे, अंग वितळत नाहीं याचें आश्चर्य करीत, हालचाल न करतां बसत होते.

एकटा रामस्वामी मात्र सकाळीं सहा वाजतां उठून आपली स्विमिंग ट्रंक नेसायचा, अंगावर ड्रेसिंग गाउन घ्यायचा, नि पायांत चपला चढवून केबिनबाहेर पडायचा.

टूरिस्ट क्लासच्या अगदीं वरच्या उघड्या टेकडीवरील छोट्याशा पोहण्याच्या हौदावर टाकलेलें दोरखंडाचें जाळें लास्करांनीं नुकतेंच ओढून काढलेलें असे. ड्रेसिंग गाउन काढून रामस्वामी तो हौदाला वेढणाऱ्या कठड्यावर ठेवी. पायांतल्या चपला बाजूला सरकवी, आणि हळूंच हौदांत उतरे.

सकाळच्या निरभ्र आकाशाचें प्रतिबिंब त्या गारगार, खाऱ्या पाण्यांत सुस्त पडलेलें असे. रामस्वामी आला कीं जणूं कोणी ओळखीचें भेटल्यासारखें तें त्याच्याशीं लगट करी. आकाशाचे तुकडे तुकडे होत, नि त्या निळसर पांढऱ्या पाण्यावर उठणारे तरंग त्या तुकड्यांना वरचेवर झेलून सांधण्याचा प्रयत्न करीत.

भराभर दोनचार हात मारीत हौदाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत गेलें, कीं रामस्वामीच्या अंगांतली सुस्ती पार पळून जाई. कढईच्या खालीं काडी लावण्यापूर्वीचे हे एकदोन तास. सूर्य गळाभर वर आला, कीं मग डेकवर फिरण्याची सोय नसे. पण सकाळीं, या निवान्त क्षणीं हौदांतलें पाणी अगदीं बर्फासारखें गार असे.

एवढ्या सकाळीं बहुतेकजण आपापल्या केबिनमध्यें झोंपून राहत. फर्स्ट क्लासच्या डेकवर तर शुकशुकाट असे. पांचदहा मिनिटें पाण्यांत हात मारून रामस्वामीच्या अंगांतलें रक्त किंचित् सळसळतें आहे इतक्यांत प्रभातफेरीला निघालेला एखादा उत्साही म्हातारा हौदाच्या कठड्याशीं थांबून विचारी, "काय हो, पाणी गार नाहीं?"

"सुरुवातीला तेवढं गार लागतं!" रामस्वामी म्हणायचा, "मग संवय झाली कीं कांहीं वाटत नाहीं!"

अभिमानाची क्षीण लाट रामस्वामीच्या पायांपासून डोक्यापर्यंत सरपटत जाई. आणखी पांचदहा मिनिटें गेलीं, कीं हौदाच्या कठड्याशीं बोटीवरच्या उरल्यासुरल्या उत्साही उतारूंचे छोटेछोटे गट जमूं लागत. मग रामस्वमी मुद्दाम पाठीवर उताणें पडून तरंगत राही, पाण्याच्या पोटांतून सुरसुर करीत जाई किंवा हौदाच्या जास्त खोल बाजूनें धडाधड पाण्यांत उड्या मारण्याचा सपाटा लावी. आणि हें सगळें चालूं असतांनाच चोरट्या नजरेनें कांठावरचे लोक आपल्या कौशल्याचें हें प्रदर्शन पाहताहेत कीं नाहीं याचा तो अजमास घेई.

क्वचित् याच वेळेला एखादी गौरकाय युवती हौदाच्या पायऱ्या उतरून पाण्यांत प्रवेश करी. रामस्वामीच्या अंगांतलें रक्त थोडें जास्त सळसळूं लागे. त्याचे कान लाल होत, आणि संकोचानें तो इतका बेजार होई, कीं पाण्यांत पाय सोडून हौदाच्या कांठावर बसत, तो त्या तरुणीची जलक्रीडा पाहूं लागे. मनांतल्या मनांत त्या परक्या स्त्रीबरोबर तो मैत्रीचें संभाषण करी.

"तुम्हीं कुठं मुंबईला चाललां का?" रामस्वामी म्हणे.

"नाहीं, मी ऑस्ट्रेलियाला चाललें आहे! तुम्हीं?"

"मी मद्रासला! मद्रासचा नि ऑस्ट्रेलियाचा किनारा एकमेकांसमोर तोंड करून राहिले आहेत, नाहीं?"

"खरंच!" मुक्तपणें हंसत ती तरुणी म्हणे. तिच्या उघड्या खांद्यांवर पाण्याचे थेंब निलाजरेपणें बसलेले असत. सूर्याचे पहिले किरण बोटीच्या पलीकडून वर आले, कीं ते

या थेंबांना गुदगुल्या करीत आणि मग आपलें हंसू दाबीत ते थेंब त्या गोऱ्यागोऱ्या खांद्यांवरून पसार होत.

रामस्वामीची अशी तंद्री लागते आहे न लागते, इतक्यांत ती तरुणी खरोखरच नव्यानें पाण्यांत उतरलेल्या एखाद्या गोऱ्या तरुणाशीं हंसतखिदळत बोलूं लागे. कांठावरून उठत रामस्वामी मनांत म्हणे, "हे गोरे लोक साले आपापसांतच थट्टामस्करी करणार! नि मी काय तसा कोळशासारखा काळा आहे?"

आपला ड्रेसिंग गाउन तसाच ओल्या अंगावर चढवून, चपला घालून तो आपल्या केबिनमध्यें जाई, आणि त्या तरुणीचें चित्र डोळयांपुढून दूर करण्याचा प्रयत्न करीत, सिगरेट ओढीत आपल्या बर्थवर पडून राही.

गेल्या कांहीं दिवसांत, पोर्ट सैद आणि सुएझच्या दरम्यान मात्र त्याची फर्स्ट क्लासमधल्या दोन छोट्या पोरींशी ओळख झाली होती. त्यांना फर्स्ट क्लासमध्यें करमत नसे, त्यामुळें त्या सारख्या टूरिस्ट डेकवर हुंदडत असायच्या. एके दिवशीं त्या दोघीहि सकाळीं टूरिस्ट हौदाशीं आल्या नि पाण्यांत रामस्वामीला एकटाच पाहतांच म्हणाल्या, "काय हो, एकटेच पोहतां काय हो?"



बारीक, बालीश आवाज कानांवर पडतांच रामस्वामीनें चमकून वर पाहिलें. पाहतों तर जवळजवळ जुळया वाटतील अशा पांचसहा वर्षांच्या दोन मुली कठड्यावर चढून अर्धवट ओणवून, त्याच्याकडे पाहून हंसत होत्या!

"पाणी चावतं कां हो तुम्हांला?" चेहऱ्यावरून वडील वाटणारी पोरगी म्हणाली.

"चावतं? चावायला काय तें मांजर आहे?" रामस्वामी म्हणाला.

"नाहीं, पण तें फार थंड असेल!" दुसरी पोरगी म्हणाली.

"तुम्हीं येऊन बघा ना, पाणी थंड आहे कीं नाहीं तें!" रामस्वामी सलगीच्या स्वरांत म्हणाला.

"अय्या! आई ओरडेल आम्हांला!"

"मग आईलाहि बोलवा!" जवळपास दुसरें कोणी गोरें माणूस असतें तर हें बोलण्याची रामस्वामीची छाती झाली नसती! पण या पोरींना काय कळतेंय?

थोड्या वेळानें त्यांची आणि रामस्वामीची सलगी इतकी वाढली, कीं तो त्यांच्या अंगावर पाणी उडवूं लागला, आणि त्या आपल्या जागेवरून न हलतांच किंचाळूं लागल्या.

त्या तिघांनीं एकमेकांना आपलीं नांवें विचारून घेतलीं. वडील बहिणीचें नांव होतें बेटी, नि धाकटीचें ल्यूसी. रामस्वामीचें नांव मात्र त्यांना उच्चारतांच येईना! तेव्हां रामस्वामी म्हणाला, "मला तुम्हीं आपलें अंकल म्हणा!"

त्या पोरी फर्स्टक्लासमधल्या होत्या, परंतु त्यांची कातडी युरोपियन लोकांप्रमाणें लालबुंद नव्हती, ती मद्रासच्या समुद्रकिनाऱ्यावरील पुळणीसारखी पांढरट होती. नि त्यांच्या चेहऱ्यांवर वाळूसारखे ठिपकेहि होते. त्या अँग्लोइंडियन असाव्यात असा रामस्वामीनें तर्क केला.

त्या दिवशीं ब्रेकफास्ट झाल्यावर रामस्वामी आपल्या केबिनमध्यें आला, आणि सिगरेट ओढीत बर्थवर पडून राहिला. त्याच्या खालच्या बर्थवर कृष्णन् नांवाचा दुसरा एक मद्रासी होता. काळाकुट्ट, थोराड अंगाचा आणि डोळयांत मिष्कीलपणाची चमक असलेला कृष्णन् पूर्वीं म्हणे रॉयल एअर फोर्समध्यें होता. त्याच्या बॅगेवर तसें लिहिलेलें देखील होतें! रामस्वामीला इतक्या सकाळींच बर्थवर पडलेला पाहून कृष्णन्नें विचारलें "काय, आज तबियत ठीक नाहीं वाटतं?"

"छे, ठीक आहे! डेकवर फार उकडतंय् म्हणून सहज पडलोंय् इथं!" रामस्वामी म्हणाला.

"चला, बियर मारून येऊं! थंड वाटेल!" कृष्णननें सुचविलें.

सिगरेट तशीच तोंडांत ठेवून रामस्वामीनें नकार दिला.

कृष्णन् परत म्हणाला, "आज तुमच्या ब्रेकफास्ट टेबलवर ती हेलन दिसली नाहीं कुठं?"

"हो, काय झालं कोण जाणे बुवा तिला!"

"अहो, काय झालं काय! काल एकसारखा डान्स करून जाग्रण झालं असेल तिला!" कृष्णन् आवाज न करतां हंसत म्हणाला.

"असेल! मी डान्सला जात नाहीं कधीं!" रामस्वामी म्हणाला. हा कृष्णन् जर असाच केबिनच्या बाहेर चालता होईल तर किती बरें होईल असें त्याला वाटत होतें. परंतु कृष्णन्‌नें हें अंतर्ज्ञानानें ओळखणें शक्य नसल्यामुळें त्याचें बोलणें चालू राहिलें.

"तुम्हीं डान्स बघायलासुद्धां कधीं येत नाहीं, त्यामुळं बऱ्याच गंमतीला मुकतां!"

"रात्रीं मला फार लवकर झोंप येते!" रामस्वामी उद्‌गारला.

"अहो, काय सांगूं तुम्हांला, अगदीं नवराबायको असल्यासारखीं ती हेलन आणि तो बिनदाढीचा शीख जंटलमन एकमेकांना घट्ट मिठी मारून नाचत होती!"

क्षणभर रामस्वामीच्या डोळयांपुढें तें दृश्य उभें राहिलें. हेलनची किंचित् ठेंगणी पण घाटदार आकृती जणुं आपल्याच मिठींत आहे, नि आपण तिच्याबरोबर सावकाश, रुबाबांत पावलें टाकीत नृत्य करीत आहोंत असें त्याला वाटलें. त्यानें डोळे मिटले, आणि कृष्णन्‌ची बडबड तो नुसती ऐकत राहिला.

हेलनची आणि त्याची पूर्वीची ओझरती ओळख होती. त्याच्याप्रमाणें तीहि इंडिया हाउसमध्यें नोकरीला होती. तो होता शिक्षणखात्यांत कारकून आणि ती होती कॉमर्स खात्यांत टायपिस्ट. त्याच्या खात्यांतल्या टायपिस्ट मुलींशीं गप्पा मारायला ती जेवणाच्या सुटींत येई तेव्हां रामस्वामीचें नि तिचें एखादें मिनिट किरकोळ बोलणें होई.

लिव्हरपूलला तो बोटीवर चढला त्याच दिवशीं डायनिंग हॉलमध्यें त्याची आणि हेलनची गांठ पडली. साहजिकच तीं दोघें त्यानंतर एका टेबलाशीं बसूं लागलीं. दररोज त्या टेबलाशीं तीनचारदां त्यांची भेट होई तेवढीच—एरवीं डेकवर तो तिच्या वाऱ्याला जात नसे. तिच्याशीं दोस्ती करणें त्याला सहज शक्य होतें, पण त्याला स्वतःचीच खात्री नव्हती!

कृष्णन् मात्र सदा तिच्याबद्दल बोलत असे. दिसायला निष्पाप वाटली तरी खरोखरी ती मोठी 'फ्लर्ट' आहे असें तो रामस्वामीला सांगे. रामस्वामीला कृष्णन्‌चा राग येई. परंतु कृष्णन्‌चें बोलणेंच असें कांहीं होतें, कीं रामस्वामीला त्याचें एक विचित्र आकर्षण वाटे. केबिनमधल्या इतर दोघांची नि त्याची इतकी घसट जमली नव्हती. उलट कृष्णन्‌ला आपली सगळी कथा ऐकवावी असें त्याला पुष्कळदां वाटे. आतां तो हेलनच्या चाळयांचें वर्णन करीत होता, तेव्हां त्याला एकदम थांबवून आपण लंडन अचानक कां सोडलें तो सगळा विचित्र इतिहास सांगावा असें रामस्वामीला वाटलें.

दुपारच्या जेवणाला हेलन नेहमींप्रमाणें त्याच्या समोरच्या जागेवर येऊन बसली. तिचे डोळे लाल झाले होते.

रामस्वामी सहज तिला म्हणाला, "रात्रीं खूप जागरण झालेलं दिसतंयू तुम्हांला!"

"काय सांगूं हो, रात्रीं एक वाजेपर्यंत डान्स चालला होता!" हेलन म्हणाली, "नि त्यानंतर आम्हीं कांहीं जण एकाच्या केबिनमध्यें शेरी पीत, गप्पा मारीत बसलों होतों!"

"इतक्या रात्रीं बार उघडा असतो!"

"नाहीं हो, पण माझ्या एका मित्रानं अगोदरच बाटली आणून ठेवली होती शेरीची!"

सूप, डेस्सर्ट वगैरे कांहीं न घेतां हेलननें फक्त एकाच कोर्सवर जेवण संपविलें. तिचे डोळेच नुसते लाल झालेले नव्हते, तर तिच्या गालांवरसुद्धां एक विचित्र लाली चढली होती. जणूं खूप वेळ ते बर्फांत ठेवण्यांत आले होते, आणि नंतर लगेच त्यांना अग्नीची प्रखर धग मिळून ते फुलले


# गणेश बुक डेपो

**आनंद निवास,**
**पांडुरंग वाडीजवळ**
**गिरगांव रोड, मुंबई ४**

**येथें सर्व प्रकारचीं हिंदी, मराठी व इंग्रजी त्याचप्रमाणें प्रत्येक जिल्ह्याचीं व तालुक्याचीं पुस्तकें मिळतील. तसेंच S. S. C. चीं टेक्स्ट व अनेक लेखकांचीं गाईडसुद्धां मिळतील.**

बुकसेलर्सनां सर्व माल व्यापारी भावानें मिळतो.

होते रामस्वामीच्या डोळयांसमोर हेलनला आपल्या केबिनमध्यें बोलावून तिचे गाल कुसकरणाऱ्या, तिला शेरी पाजून बेभान करणाऱ्या आणि रात्रभर तिच्याशीं निर्लज्ज चाळे करणाऱ्या तिच्या निनांवी मित्रांचें चित्र उभें राहिलें. आणि कारण नसतांना मत्सराची ठिणगी त्याच्या मनांत हळूंच पेट घेत राहिली.

"आज भूक दिसत नाहीं तुम्हांला?" रामस्वामीनें हेलनला विचारलें.

"खरं सांगूं? आज माझं जेवण झालंय्!" हेलन म्हणाली.

"म्हणजे?"

"आम्हीं एका लास्कराची ओळख काढली नि त्यांच्याकडून कोंबडीचं कालवण आणि भात मिळवला!" हेलन सांगूं लागली, "त्यांचं जेवण वेगळं असतं, माहीत आहे ना तुम्हांला? इथलं हें मिळमिळीत जेवण जेऊन इतका कंटाळा आला होता, कीं ती कोंबडी तिखट असूनसुद्धां अधाशीपणं खाल्ली आम्हीं!"

"कुठं झालं तुमचं जेवण?" रामस्वामीनें विचारलें.

"सुरिंदरच्या केबिनमध्यें!"

सुरिंदर म्हणजे तो दाढी नसलेला शीख! अशी ही किती जणांच्या केबिनमध्यें जाऊन खातपीत होती तर? बोटीवरील पंधरा दिवसांच्या प्रवासांत आपल्यासारखा भिडस्त माणूससुद्धां बऱ्याच मोकळेपणानें वागूं शकतो हें रामस्वामीला माहीत होतें. पण मोकळेपणालासुद्धां लोकलज्जेची कांहीं बंधनें आहेत! बोटीवर जमलेल्या मैत्रीलासुद्धां कांहीं मर्यादा आहेत! निदान पुरुषांच्या केबिनमध्यें जाऊन त्यांच्या बरोबरीनें दंगामस्ती करण्यापूर्वी हेलनला हें कळायला हवें होतें!

क्षणभर रामस्वामीला वाटलें, आपण हेलनच्या वडील भावासारखे आहोंत. आपण तिला उपदेश करावा! मनांतल्या मनांत तो हेलनकडे मोठ्या गंभीरपणें बोलूंहि लागला, "हें बघ, अशा भलत्यासलत्या लोकांच्या नादीं लागूं नकोस तूं! उगाच पंधरा दिवसांत कशाला प्रदर्शन मांडतेस हें असं?"

पण त्याच्या टेबलाशीं बसलेली हेलन किती निष्पाप वाटत होती. अँग्लोइंडियन नसूनहि ती चांगलीच गोरी होती. तिला पाहतांना रामस्वामीला त्या छोट्या अँग्लोइंडियन पोरींची आठवण आली. त्यासुद्धां अशाच निष्पाप पण


अत्यंत सुबक साड्या व तऱ्हेतऱ्हेचें कापड

याकरितांच

श्रीधर भालचंद्र

आणि कंपनी

: स्थापना १९१७ :

प्रार्थनासमाज नाका, गिरगांव मुंबई ४

अवखळ होत्या. कदाचित् गोऱ्या कातडीला आपली निरागसता डागाळून घेण्याचा शापच मिळाला असावा ! आज आपली अपेक्षा नसतांना या हेलनच्या शीलाचे धिंडवडे निघताहेत; उद्यां त्या चिमुरड्या पोरीसुद्धां दुसऱ्या एखाद्या महासागरांतील बोटीवर अशाच छंदीफंदी मित्रांच्या केबिनमध्यें शेरी पीत आणि कोंबडी खातखात स्वतःला विसरतील ! त्या भयंकर विचारानें रामस्वामीच्या हळव्या मनाची कालवाकालव झाली.

दुपारच्या चहानंतर रामस्वामी उघड्या डेकवरील लाउंजमध्यें एक पुस्तक वाचीत बसला होता. डोक्यावर पंखा गरगरत होता, त्यामुळेंच आपण जिवंत आहोंत असें वाटत होतें. एरवीं तांबड्या समुद्राला आगीच्या रंगाचें नांव कां दिलें आहे याबद्दल कोणतीहि शंका मनांत राहूं नये इतका जिवाचा तडफडाट होत होता.

रामस्वामीला एकामागोमाग एक अशा चार डुलक्या आल्या. लाउंजमध्येंच आपण झोंपून पडूं या भीतीनें त्यानें चटकन् पुस्तक मिटलें आणि तो केबिनमध्यें जाण्यासाठीं उठला. पाहतों तर कोंपऱ्यांत पिआनो ठेवला होता तेथेंच एका कोचावर हेलन, तो शीख आणि त्यांच्याबरोबर आपल्या बालीश आवाजांत गप्पा मारीत बेटी आणि ल्यूसी बसलीं होतीं. साहजिकच त्यांना चुकवावें असा विचार करून त्यानें तोंड वळविलें. पण तेवढ्यांत बेटीनें त्याला हांक मारली, " अंकल, इकडे बघा काय मजा आहे ती ! "

नाईलाजानें रामस्वामी त्यांच्याजवळ गेला. हेलन म्हणाली, " तुमची ओळख आहे वाटतं या पोरींशीं ? "

" या बोटीवर त्याच माझ्या खऱ्याखुऱ्या मैत्रिणी आहेत ! " रामस्वामी म्हणाला.

त्याच्या उत्तरांतली खोंच लक्षांत न येतां, हेलननें त्याची आणि सुरिंदरची ओळख करून दिली. रामस्वामीच्या मनांत मत्सराचा जो किडा सुप्तपणें वळवळ करीत होता त्याला आतां जास्तच फांटे फुटले. आपली ज्या मुलींशीं एवढी दोस्ती आहे त्यांच्या मैत्रीवर हेलन आणि तिचा मित्र आपला हक्क गाजवूं पाहत आहेत असें त्याला वाटलें. ज्या मुलींना पाप हा शब्दसुद्धां माहीत नव्हता त्यांच्याशीं सलगी करण्याचा या छचोर प्राण्यांना काय अधिकार होता ?

" अंकल, तुम्हांला जादू येते ? " ल्यूसीनें विचारलें.

रामस्वामी सुरिंदरकडे पाहत किंचित् शेळपटपणें हंसला आणि उत्तरला, " मला कसली जादू येणार ? या सुरिंदरसाहेबांना सांग जादूबिदू करायला ! "

तो सुरिंदरसुद्धां अगदींच मठ्ठ असावा, कारण रामस्वामी आपल्याला टोंचून बोलत आहे हें त्याच्या लक्षांतच आलें नाहीं !

इतक्यांत त्या पोरींना या प्रौढांचा कंटाळा आला असावा. त्यांना सोडून त्या लाउंड व डेक यांच्या दरम्यान लपंडाव खेळूं लागल्या.

सुरिंदरनें रामस्वामीला विचारलें, " इंग्लंडमध्यें तुम्हीं कशाला गेला होतां ? "

" शिकायला ! लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची पीएच्. डी. करायची होती मला ! "

" असं ? मला माहीत नव्हतं हें ? " हेलन म्हणाली.

" हो, पण मला पूर्ण करतां आला नाहीं माझा प्रबंध ! " रामस्वामी म्हणाला.

" तुमची नि यांची पूर्वींची ओळख दिसते ? " हेलनकडे पाहत सुरिंदर रामस्वामीला म्हणाला.

" हो, आम्हीं दोघं इंडिया हाउसमध्यें होतों ! " रामस्वामीनें माहिती पुरविली.


— नवीन पुस्तकें —

देशापुढील आर्थिक व राजकीय प्रश्न समजण्यास उपयुक्त

**समाजवादी समाजरचना**

पृष्ठें २३१ ] ले. श्री. स. मा. गर्गे [ किं. ४॥ रुपये

* * *

नवीन तुफान विनोदी नाटक !

**संसार पहावा मोडून !**

लेखक : बाबुराव गोखले : किं. १॥ रुपये

* * *

**त्यागाचं तेज**

नऊ नाट्यरूप संवाद

लेखक : शिवराम गोविंद भावे, किं. १ रुपया

* * *

किंमतीइतकी रक्कम आगाऊ आल्यास अन् रजि. ट. ख. माफ

**नवीन किताबखाना**

संझगिरी सदन : : बुधवार चौक

गिरगांव-मुंबई ४ : : पुणें नंबर २

"अरे वा, इंडिया हाउसमध्यें ? मी खूप वेळां यायचा तिथं !" सुरिंदर पुन्हां आधाशी नजरेनें हेलनकडे पाहत म्हणाला.

"तुम्हीं काय करत होतां इंग्लंडमध्यें ? रामस्वामीनें आपलें प्यादें पुढें सरकविण्याचा प्रयत्न केला.

"मी ना ? मी एअर इन्शुरन्सचा कोर्स केला लंडनला !" सुरिंदर सांगूं लागला, "आतां मुंबईला पोंचलों, कीं ग्रेशॅममध्यें एअर इन्शुरन्स इन्स्पेक्टर म्हणून काम करणार आहे मी ! लंडनमध्येंच नेमणूक झालीय् माझी !"

"एअर इन्शुरन्स म्हणजे काय रे सुरिंदर ?" हेलननें विचारलें.

"एअर इन्शुरन्स म्हणजे विमानाचा इन्शुरन्स !" सुरिंदर म्हणाला. जणूं आपणच या विम्याच्या प्रकाराचा शोध लावला असल्यासारखें तो बोलत होता. "कुठं विमान अपघात झाला, कीं लगेच विमाकंपनीला त्याची भरपाई द्यावी लागते–पण त्यासाठीं अगोदर अपघाताच्या परिस्थितीची चौकशी करावी लागते. तेंच माझं काम !"

"मग विमानाचा जसा इन्शुरन्स तसा बोटीचाहि असेल नाहीं ?" रामस्वामीनें विचारलें.

"हो तर, लॉइड्सकडे सगळ्या बोटी इन्शुअर केलेल्या असतात !"

"मग समजा बोट बुडाली तर पी. ॲन्ड ओला भरपाई मिळेल, अं ?" रामस्वामीनें विचारलें.

"चला, उगाच कांहीं तरी अभद्र बोलूं नका !" हेलन म्हणाली.

थोडा वेळ रामस्वामी तिच्याकडे पाहत राहिला. तें अंजिरी रंगाचें तलम रेशमी पातळ तिच्या गोऱ्या कांतीला किती शोभून दिसत होतें. ऊंस सोलून खावा त्याप्रमाणें तिचे पुष्ट, गोरे बाहू करकरां चावावे असें रामस्वामीला वाटलें. निदान तिची परवानगी घेऊन एकदां फक्त एकदांच–त्या मांसल अवयवांवर दांत रोंवून पाहायला कांहींच हरकत नव्हती ! सुरिंदरला असें करायची संधी हेलननें कधीं दिली असेल काय ?

लाउंजमध्यें कांहीं वेळ विलक्षण स्तब्धता होती. खिडकींतून येणारें उन्ह मागल्या पावलांनीं हळूंच पसार झालें होतें. उकाडा किंचित् कमी होत होता. कोपऱ्याकोपऱ्यांत कोचांवर स्वस्थ बसलेल्या काळयागोऱ्या प्रवाशांची तंद्री लागल्यासारखी वाटत होती. बेटी आणि ल्यूसी कुठें अदृश्य झाल्या होत्या.

इतक्यांत लाउंजच्या खिडकींतून दोन चिमण्या भुर्रदिशीं आंत आल्या, नि थोडा वेळ पाठशिवणीचा खेळ खेळून डेकवर गेल्या ! रामस्वामीला वाटलें, कीं लाउंजमधल्या तडकलेल्या वातावरणावर जणूं कोणी गार पाण्याचे दोन थेंबच शिंपले आहेत ! त्याच्या डोक्यांत एक मोठा गहन विचार आला. या चिमण्या बोटीवरच्या प्रवाशांपैकीं आहेत, कीं त्या बोटीबरोबरच, पण स्वतंत्रपणें तांबडा समुद्र ओलांडताहेत ? त्या जर वेगळयाच उडत असतील तर त्यांच्या इवल्याशा अंगांत किती ताकद आणि चिकाटी असेल !

लंडनच्या स्कूलमधले रामस्वामीचे प्राध्यापक त्याला म्हणाले होते, "हें पाहा, तुम्हीं अगदींच ढ आहांत असं माझं म्हणणं नाहीं–पण नोकरी सांभाळून तुम्हांला हा प्रबंध पुरा करतां यायचा नाहीं ! एक नोकरी तरी सोडा, नाहींतर प्रबंधाचा विचार तरी सोडून द्या !"

'भारतांतील ट्रेड युनियन चळवळ' या विषयावरील प्रबंधाच्या तयारीला सुरुवात करून रामस्वामीला चारपांच महिने झाले होते, तेव्हांची ही गोष्ट.

त्या वेळीं रामस्वामीच्या खिशांत आठवड्याच्या पगारांतून जेमतेम एक शिलिंग शिल्लक राहत असे ! लंडनमध्यें, इंडिया हाऊसमध्यें कारकुनी करत, त्याला कांहीं कायमचें राहायचें नव्हतें. भारताला परत जाणाऱ्या बोटीचें भाडें त्याला सांठवायचें होतें. प्राध्यापकांचा उपदेश शिरसावंद्य मानून रामस्वामीनें पुढल्या टर्मला स्कूलची फी भरलीच नाहीं, आणि त्या क्षणापर्यंत गोळा केलेलीं प्रबंधाचीं टिपणें भिंतींतल्या शेकोटींत टाकून दिलीं !

त्याच्यापेक्षां त्या चिमण्याच जगायला अधिक लायक होत्या ! आणि त्या चिमुरड्या पोरीहि.

सुरिंदरनें पिआनो वाजवायला सुरुवात केली होती, आणि तल्लीन होऊन हेलन तें गहिरें संगीत ऐकत होती. आतां ही कशी एखाद्या देवतेसारखी वाटते–रामस्वामी मनांत म्हणाला. सुरिंदरचा त्याला हेवा वाटत होता, कारण त्याच्या बोलण्यांत, त्याच्या हातांत अशी कांहीं जादू होती कीं तो या देवतेवरसुद्धां मोहिनी घालूं शकत होता !

हेलनला चाहूल लागूं न देतां रामस्वामी हळूंच कोचावरून उठला आणि लाउंजबाहेर पडला. क्षितिजावर रेंगाळणारे सूर्यास्ताचे रंग त्यानें हृदयांत सांठविण्याचा प्रयत्न केला, आणि रात्रीच्या जेवणापूर्वीची आपली आंघोळ आटपण्यासाठीं तो खालीं निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं दुपारच्या जेवणानंतर बोट एडनला

पोंचली. कृष्णन् त्याला म्हणाला, "येतायू ना तुम्हीं बंदरावर ?"

"हो, चला !" असें म्हणून रामस्वामीनें कपडे केले आणि आपलें पैशाचें पाकीट कोटाच्या आंतल्या खिशांत घालून तो कृष्णन्‌बरोबर बाहेर पडला.

बंदरावर जातांना हेलन आणि सुरिंदर बेटी आणि ल्यूसीला घेऊन आपल्याच लॉंचमध्यें बसलेलीं त्याला दिसलीं. त्यानें हात हलवून त्या चौघांना अभिवादन केलें. सुरिंदर-बद्दलच्या त्याच्या भावना आतां बऱ्याच निवळल्या होत्या. त्या छोट्या मुलींबरोबर हेलनलाहि त्यानें ओढून न्यावें याचें त्याला आज कांहींच वाटत नव्हतें. कदाचित् आतां त्याला घरची ओढ लागायला सुरुवात झाली असावी नि त्यापुढें बोटीच्या टिचभर विश्वांतले हेवेदावे तो हळुहळू विसरून जात होता.

त्याच्या खिशांत तीस पौंड होते. एडनला बऱ्याच वस्तू स्वस्त मिळतात; त्यांतल्या भेट द्यायला उपयोगी अशा सर्व त्याला घ्यायच्या होत्या.

"आतां घरीं गेलो कीं माझे सगळे नातेवाईक नि त्यांचीं छोटीं छोटीं पोरें, लंडनहून काय आणलंत असं विचारीत माझ्या भोंवतीं गोळा होतील !" रामस्वामी कृष्णन्‌ला म्हणाला.

"हो. तीच तर मजा असते !" कृष्णन् म्हणाला. लॉंचमधून उतरून बंदरावर पाय टेकतांच कृष्णन् म्हणाला, "चला, आपण इथल्या हिंदी व्यापाऱ्यांच्या मोहल्ल्यांत जाऊं आधीं. तिथं तुम्हांला पाहिजे तें घेतां येईल !

कृष्णन्‌बरोबर रामस्वामी टॅक्सी करून एडन शहरांतल्या एका बकाल वस्तींत गेला. अंधेऱ्या, दगडी इमारतींत कांहीं सिंधी व खोजा व्यापारी आपलीं कापडाचीं आणि इतर सटरफटर फॅन्सी मालाचीं दुकानें थाटून होते. गिऱ्हाईक दिसलें, कीं शेंदीडशें रुपयाचा माल त्याच्या गळयांत बांधायचा असें त्यांचें धोरण होतें.

"फार लुच्चे असतात हे व्यापारी !" एका दुकानच्या पायऱ्या चढत कृष्णन् म्हणाला.

"अहो, माल इतका स्वस्त असल्यावर लांडीलबाडी चालणारच यांची !" रामस्वामी हळूंच म्हणाला.

दुकानांत कृष्णन्‌नेंच सगळा सौदा केला. दोनचार पायमोज्यांचे जोड, एक जॉर्जेटची साडी, एक बॅटरी, एक शेविंग सेट, कांहीं खेळणीं, एक उंटाच्या कातड्याची बॅग, एक छोटा चिनी मातीचा सेट—एवढें सामान रामस्वामीला त्यानें फक्त अकरा पौंडांत मिळवून दिलें. रामस्वामी अगदीं खूष झाला.

कातड्याच्या बॅगेंत ही सगळी खरेदी भरून ते दोघे बाहेर पडले, तेव्हां रामस्वामीनें कृष्णन्‌ला विचारलें, "तुम्ही नाहीं का कांहीं घेणार ?"

"कफल्लक आहे मी !" हंसत हंसत कृष्णन् म्हणाला.

"मी देतों तुम्हांला हवे असले तर पैसे ! बोटीवर गेल्यावर द्या तुम्हीं मला !"

"अस्सं ? बरं, तुम्हीं म्हणतांच आहां तर घेतों मी एक-दोन पौंडांपर्यंत कांहींतरी !" कृष्णन् म्हणाला.

मग दुसऱ्या एका दुकानांत कृष्णन्‌नें आपल्यासाठीं कांहीं वस्तू खरेदी केल्या. त्यांचें बिल चार पौंड अकरा शिलिंग झालें !

"सॉरी हं, एवढं बिल होईल असं वाटलं नव्हतं मला !" कृष्णन् म्हणाला.

"त्यांत काय झालं ? आपण काय एकसारखे एडनला येणार आहोंत थोडेच !" असें म्हणत रामस्वामीनें बिल भरलें.

पुन्हां टॅक्सी करून ते बंदरावर आले आणि लॉंच थांबली होती त्या धक्क्यावर जाऊं लागले, इतक्यांत जवळच एका खजुरीच्या झाडाखालीं सुरिंदर, हेलन, बेटी आणि ल्यूसी आपला फोटो काढून घेतांना त्याला दिसल्या.


**दिवाळीपासून सुरू होणारें नवीन वर्ष आमचे ग्राहकांना आनंदाचें जावो !!**

# अ शो क बु क सें ट र

आमचे येथें सर्व प्रकारची शालोपयोगी पुस्तकें एक्झरसाईज बुक्स् व शाळेला लागणारा सर्व स्टेशनरी माल, नवीन वर्षाचे रोजमेळ, डायरी, कॅलेंन्डर, पंचांगें व अकाऊंन्ट बुक्स् घाऊक व किरकोळ योग्य दरानें मिळतील. ह्याशिवाय दिल्ली, बनारस, कलकत्ता व मथुराची हिन्दी धार्मिक पुस्तकें ज्योतिष व वैदिक औषधींची पुस्तकें, गोष्टींचीं पुस्तकें आम्ही होलसेल भावानें बाहेरगांवीं पार्सल व्ही. पी. नें पाठवितों.

**जयहिन्द प्रकाशन ... भावे आणि मंडळी ताडदेव बुक डेपो ... सेंट्रल पिक्चर मर्चन्ट व इतर व्यापाऱ्यांचीं सर्व पुस्तकें आमचेकडे त्यांचेच भावानें मिळतील.**

**सी. पी. टॅंक रोड : माधवबाग : मुंबई ४**

"अंकल! अंकल!" बेटीनें त्याला पाहतांच हांक मारली.

"इथं या ना आमच्याबरोबर फोटोंत!" हेलन म्हणाली.

"नको नको!" कृष्णन्‌कडे पाहत रामस्वामी ओरडला.

"या कीं! त्यांनाहि घेऊन या!" सुरिंदर म्हणाला.

"तुम्हीं जा, मी थांबतों धक्यावर!" असें म्हणून कृष्णन् धक्क्याकडे चालूं लागला.



रामस्वामी जाऊन हेलनच्या शेजारीं उभा राहिला. रस्त्यावरचा धंदेवाईक फोटोग्राफर डोक्यावर काळें कापड घेऊन कॅमेऱ्यांत तोंड खुपसून, पाठ वांकवून उभा होता. कवायतीचे हातवारे करीत तो रामस्वामीला म्हणला, "जरा जवळ सरका!"

रामस्वामी हेलनच्या अगदीं जवळ सरकला. तिनें अंगाला लावलेला सुगंध तत्क्षणीं त्याला जाणवला. आणि त्यामागोमाग तिच्या गोंडस, उघड्या बाहूंचा स्पर्श. त्याच्या पाठीच्या मणक्यांतून सर्रकन् विजेची एक चमक उसळून गेली. त्याच्या कानांमागच्या शिरा गरम झाल्या. संकोचानें त्यानें समोर उभ्या असलेल्या छोट्या ल्यूसीच्या खांद्यावर एक हात ठेवला.

पांच मिनिटांत फोटोग्राफरनें फोटो तयार करून दिला. त्यांतल्या आपापल्या छबीकडे कौतुकानें पाहत, हंसतखिदळत मंडळी बोटीवर परत यायला निघाली.

त्या रात्रीं लाउंज जवळच्या डेकवर वेताची खुर्ची घेऊन कृष्णन् बसलेला रामस्वामीला दिसला. त्याच्या एका हातांत बियरचा ग्लास होता आणि निरभ्र आकाशांतील चांदण्यांकडे पाहत तो हलुहलूं ग्लासाला ओंठ लावीत होता.

रामस्वामीला पाहतांच कृष्णन् म्हणाला, "बियर घेणार?"

"नाहीं, मी पीत नाहीं!" रामस्वामी उद्गारला.

"पीत नाहीं? आश्चर्य आहे!" कृष्णन् म्हणाला, "बसा तर!" त्यानें जवळची एक खुर्ची आपल्या बाजूला सरकविली.

रामस्वामीसुद्धां खुर्चीवर बसून आकाशांतल्या चांदण्या मोजूं लागला.

मध्येंच कृष्णन् म्हणाला, "हें पाहा मिस्टर, तुमचे मी पन्नासएक रुपये देणं आहे! मुंबईला पोंचतांच देऊन टाकीन हं मी!"

"सावकाश! सावकाश!" आकाशाकडे पाहात रामस्वामी म्हणाला.

"आत्तां दिले असते, पण जरा कमी पडताहेत!"

"कांहीं हरकत नाहीं!"

रात्रीं जेवणाच्या वेळेला रामस्वामीनें हेलनजवळ खूप गप्पा मारल्या. लंडनचे रस्ते, इंडिया हाउसमधले ऑफिसर, बोटीवरचे तऱ्हेवाईक प्रवासी, बेटी आणि ल्यूसीचा अवखळपणा—विषय संपतां संपेनात. शेवटीं रामस्वामीनें हेलनला हळूंच सांगून टाकलें, कीं दररोज सकाळीं आपण पोहायला जातों!

"मीसुद्धां माझा स्विमिंग ड्रेस आणलाय् हो! पण सकाळीं उठायलाच उशीर होतो!" हेलन म्हणाली.

"मग उद्यां या कीं जमलं तर!" रामस्वामी म्हणाला.

"पाहतें! आज डान्स आहे डेकवर! जाग्रण झालं तर हालच आहेत!" हेलन म्हणाली.

दुसऱ्या दिवशीं उजाडायच्या आधींच रामस्वामी पोहायच्या हौदावर जाऊन बसला. हौदावरचें जाळें लास्करांनीं ओढून काढीपर्यंत त्याला मुळींसुद्धां उसंत राहिली नाहीं. मग एकदांची त्यानें हौदांत उडी मारली आणि तो हेलनची वाट पाहत राहिला. परीक्षेच्या निकालाच्या दिवशींहि तो इतका अधीर झालेला नव्हता!

सात वाजले तरी हेलनचा पत्ता नव्हता. रामस्वामी हिरमुसला झाला. केबिनमध्यें परत जावें कीं नाहीं याचा विचार करीत, उताणा पडून तो हौदांत तरंगत राहिला.

त्यानें आशा अगदी सोडून दिली इतक्यांत हेलन आली. रामस्वामीच्या छातींत धडधडूं लागलें. ड्रेसिंग गाउन कठड्यावर ठेवून, रामस्वामीकडे पाहून स्मित करीत, ती पाण्यांत उतरली.

पोहण्याच्या पोशाखांत ती कितीतरी बुटकी दिसत होती. तिचा पोशाख युरोपिअन मुलींच्या मानानें फारच सोंवळा होता! तरी रामस्वामीनें एरवी ज्यांच्या पुष्टतेची नुसती

कल्पनाच केली होती त्या गोऱ्यापान, नितळ कातडीच्या अवयवांचें त्याला प्रथमच ओझरतें दर्शन झालें.

त्या दिवशीं रामस्वामीच्या मनांतली नैराश्याची काजळी साफ धुवून निघाली. ट्रेड युनियन चळवळीवरील प्रबंधा-पेक्षां हेलनसारख्या मुलीच्या सहवासांतलें पोहणें कितीतरी महत्त्वाचें आहे असें त्याला वाटलें. क्षणभर ही बोट मुंबईला पोंचूंच नये आणि दररोज सकाळीं हेलननें असें पोहायला यावें अशी वेडी इच्छा त्याच्या मनांत डोकावून गेली.

त्या रात्रीं बोटीवर फॅन्सी ड्रेस कॉंपिटिशन होती. एरवीं रामस्वामी त्या स्पर्धेला चुकूनसुद्धां गेला नसता. पण आतां त्याचें मन हौदांतल्या जलाशयाप्रमाणें हलकें, तरल झालें होतें. कोणत्या तरी गूढ संवेदनांचे तरंग त्या जलाशयाला हलकेच झणकारून जात होते. आतां फक्त त्यानें स्वतः एखादा विचित्र पोशाख चढवून त्या स्पर्धेंत भाग घ्यावयाचें तेवढें राहिलें होतें. पण त्याचा मुळचा लाजाळूपणा आडवा आला. स्पर्धकांची मिरवणूक पाहत तो डेकवरच्या एका कोंपऱ्यांत शांतपणें बसून राहिला.

फॅन्सी ड्रेसमध्यें हेलन आणि सुरिंदर यांनीं हिंदी वधूवरांचें फारच लोभसवाणें सोंग काढलें होतें. कोठून हे पोशाख नि या मुंडावळया त्यांनीं मिळविल्या होत्या कोण जाणे! फर्स्ट क्लासच्या डेकवरून वांकून बघत असलेल्या बैटीनें आणि ल्यूसीनेंदेखील त्यांना पाहून जोरानें किंचाळत टाळ्या पिटल्या. रामस्वामीला मात्र वाटत होतें, लुटुपुटूचीं कां होईना पण नवराबायको म्हणून ही मिरवताहेत; म्हणजे हेलनबरोबर आपण पोहलों, तें सगळें साखरझोंपेतलें स्वप्न होतें तर!

त्या रात्रीं कधीं नाहीं इतक्या उशीरांपर्यंत रामस्वामी फॅन्सी ड्रेसची मजा पाहत डेकवर बसून राहिला. केबिनमध्यें जाण्यासाठीं म्हणून तो उठला, नि त्यानें सहज आपल्या कोटाच्या खिशांत हात घातला. पाहतों तर पैशाचें पाकीट नाहीं! क्षणभर त्याच्या छातींत भीतीची कळ आली. केबिनमध्यें तर आपण पाकीट विसरलों नाहीं.

धांवत तो केबिनमध्यें गेला आणि आपलें कपाट उघडून त्यानें पाहिलें. पाकीट फळीवर सुखरूप होतें। रामस्वामीला हायसें वाटलें. त्यानें पाकीट उघडून आंतल्या नोटा मोजल्या. अरे बापरे! चक्क पन्नास रुपये कमी पडत होते! एडनला बोट थांबलेली असतांनाच त्यानें पौंडांचे रुपये करून घेतले होते. त्याच्याकडे निदान दीडशें रुपये तरी होते-नि आतां पाहतों तर फक्त शंभराची एक नोट राहिली होती!

कृष्णन्! खास कृष्णन्नेंच हे चोरले असले पाहिजेत! रामस्वामीला दरदरून घाम सुटला. संताप, दुःख, भीति–अनेक संमिश्र भावना त्याच्या मनांत गर्दी करूं लागल्या.

इतक्यांत केबिनचें दार उघडून कृष्णन् आंत आला. रामस्वामीचा कावराबावरा झालेला चेहरा पाहून तो म्हणाला, "काय झालं?"

"मलाच काय झालं म्हणून विचारतां?" रामस्वामी उसळून म्हणाला, "सांगा, तुम्हीं माझे पन्नास रुपये चोरलेत कीं नाहीं?"

"पन्नास रुपये? मी? हें काय बुवा?" कृष्णन् उद्गारला.

"माझ्या पाकिटांतले पन्नास रुपये बेपत्ता झाले आहेत–नि ते तुम्हींच चोरले आहेत असा माझा समज आहे!"

"असं असेल तर माझं सामान तपासून पाहा तुम्हीं!" कृष्णन् अत्यंत शांतपणें म्हणाला.

"अगोदर माझे चारपांच पौंड उसने घेतलेत, नि आतां या पन्नास रुपयांवर डल्ला मारलात!" रामस्वामी रागारागानें बोलत होता, "तुम्हीं खरोखरच आर्. ए. एफ्. मध्यें होतां का हो?"


**नवीन वर्ष आमचे असंख्य ग्राहकांना आनंदाचें व भरभराटीचें जावो!**

भजनीमंडळया, भजनीबुवा व भजनाची आवड असणारे ज्या पुस्तकांची उत्कंठतेनें वाट पहात होते

**श्रीजयदास भजनमाला**

**पृष्ठें ३४० च्या वर : पांढरा शुभ्र कागद**
**तिरंगी मुखपृष्ठ : मूल्य चार रुपये**

**कथा कल्पतरू**

[भाग १ ते ४]

**किंमत प्रत्येकीं पांच रुपये**

ह्याशिवाय शाळेचीं मराठी-गुजराथी पुस्तकें पंचागें, रोजमेळ, डायऱ्या, कॅलेंडरें व स्टेशनरी माल घाऊक व किरकोळही मिळतो.

**मे. श्री लक्ष्मी बुक डेपो**
**माधवबाग : मुंबई ४**

" हें पाहा, मिस्टर ! " कृष्णन् पूर्वीइतक्याच शांतपणें म्हणाला, " तुम्हांला माझा संशय येत असेल तर तुम्हीं कॅप्टनला सांगून माझ्या सामानाची झडती घ्या ! माझे खिसे तपासा ! केबिनमध्यें आणखीहि दोन उतारू आहेत; त्यांनीं कशावरून घेतले नसतील तुमचे पैसे ? "

काय बोलावें तें रामस्वामीला सुचेना. त्याची कानशिलें तापलीं होतीं. कृष्णन् जे अनेक उपाय सुचवित होता त्यांपैकीं कांहींच आपल्या हातून होणार नाहीं याची त्याला खात्री वाटत होती. इतक्यांत त्याच्या मनांत काय विचार आला कोण जाणे, तो तडक हेलनच्या केबिनकडे धांवला आणि त्यानें दारावर टकटक केलें.

हेलन नुकतीच आपले फॅन्सी ड्रेसचे कपडे उतरवीत होती. तिनें आंतूनच विचारलें, " कोण आहे ? "

" मी रामस्वामी ! माझे पैसे चोरीला गेलेयत् ? "

" काय म्हणालांत ? " दार उघडीत हेलननें विचारलें. परकर पोलक्यावर तिनें ड्रेसिंग गाउन चढविलेला होता.

" आमच्या केबिनमधल्या त्या कृष्णन्नं माझ्या पन्नास रुपयांवर डल्ला मारला कीं हो ! " रामस्वामीचा चेहरा आणि आवाज विलक्षण केविलवाणे वाटत होते.

" काय झालं तरी काय ? " हेलननें विचारलें.

रामस्वामीनें आपली सगळी कहाणी सांगितली. खलनायकासारखें कृष्णन्चें काळेंकुट्ट स्वभावचित्र रंगविलें, आणि हेलनची सहानुभूति संपादन करून तो पुन्हां आपल्या केबिनमध्यें परतला. कृष्णन् अगदीं गाढ झोंपला होता.

रामस्वामीनें दुसऱ्या दिवशीं लगेच कॅप्टनच्या कानावर ही गोष्ट घातली. पुराव्याशिवाय आपल्याला कांहींच करतां येणार नाहीं असें सांगून कॅप्टननें त्याला मुंबईला पोंचतांच पोलिसांना वर्दी देण्याचा सल्ला दिला !

त्या दिवसापासून रामस्वामीनें कृष्णन्शीं अबोला धरला. अर्थात् तो फक्त चोवीस तास टिकणार होता, कारण दुसऱ्या दिवशीं बोट मुंबईला पोंचणार होती. आणि त्यांचे मार्ग भिन्न होणार होते.

दिवसभर खिन्न मनानें रामस्वामी लाउंजमध्यें बसून राहिला. बेटी आणि ल्यूसी त्याला शोधीत तेथें आल्या, त्यांच्याशींसुद्धां तो नीटसा बोलला नाहीं. त्याचा पडलेला चेहरा पाहून त्या पोरीहि दुसरीकडे खेळायला निघून गेल्या.

रात्रींच्या जेवणाच्या वेळीं सर्व उतारूंना रंगीबेरंगी कागदाच्या टोप्या, मुखवटे, फुगे आणि पिपाण्या वाटण्यांत आल्या. हेलननें त्याला म्हटलें, " चला, उद्यांपासून आपल्या जीवनाला वेगळंच वळण लागणार ! " तिच्या चेहऱ्यावरून ती खुशींत असल्यासारखी दिसत होती.

" हो, बोटीवरचे हे दिवस म्हणजे नुसते बुडबुडे ! डबक्यांत एखाद्या पोरानं दगड मारल्यामुळं उठणारे तरंग ! " सुस्कारा सोडीत रामस्वामी म्हणाला.

" तुमचे पैसे मिळाले का हो ? " हेलननें विचारलें.

" छे हो, त्या जंटलमन डाकूनें घातले ते घशांत ! " रामस्वामी म्हणाला.

" जाऊं द्या, असं पैशानं काय कोणी गरीब होत नाहीं ! तुम्हांला पाहिजे तर माझ्याकडून घ्या हं ! " हेलनच्या आवाजांत त्या रात्रीं कांहीं आगळाच गोडवा होता.

जेवण संपवून तो हेलनबरोबर डेकवर गेला. तिथें सुरिंदरनें त्यांना गांठलें. रामस्वामीला पाहतांच तो म्हणाला, " महाराज, बोट उद्यां मुंबईला पोंचणार ! आज प्यायचं असेल तेवढं पिऊन घ्या ! "

" मी पीत नाहीं ! " रामस्वामीनें आपला नेहमींचा खुलासा केला.

" कमनशिबी आहांत ! " असें म्हणून रामस्वामीच्या डोळ्यांदेखत सुरिंदर, हेलनला ओढीत लाउंजमधल्या बारमध्यें घेऊन गेला.

आपला रोजचा आहार लज्जतदार




व्हावा असें वाटत असेल तर अगदीं घरगुती वाटतील असे बेडेकर मसाले लोणचीं व पापड वापरण्याची संवय ठेवा.

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स
प्रायव्हेट लि., मुंबई ४

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ

दिवाळीसाठीं सुगंधी उटणें, तेलें व अत्तरें मिळतात.

विषण्ण मनानें रामस्वामी डेकवर फेऱ्या घालीत राहिला. मनांतल्या मनांत त्याचा हिशोब चालला होता. आतां आपल्याकडे शंभर रुपये राहिले. त्यांतले वीसएक रुपये स्टुअर्ड्सना बक्षिसी म्हणून जाणार! मद्रासचं तिकीट तीसचाळीस रुपये थर्ड क्लासचं, मुंबईला कांहीं डयूटीबिटी द्यावी लागली तर पन्नासएक रुपये हाताशीं असायला हवेत. —आणि हो, जाण्यापूर्वीं कृष्णन्‌चा पत्ता घेऊन ठेवायला हवा, म्हणजे निदान आपले उसने घेतलेले पैसे द्यायचा तगादा लावतां येईल त्याला!

मध्यरात्र उलटली तरी रामस्वामीला झोंप आलेली नव्हती. डेकवर अनेक उतारू हंसतखिदळत उभे होते, आरामखुर्च्यांवर बसून शेवटच्या गप्पा मारून घेत होते. कित्येकांना चांगलीच चढल्यामुळें ते घोड्यासारखे खिंकाळत आरडाओरडा करीत होते.

रामस्वामीनें सहज कोटाच्या खिशांत हात घातला, तों त्याच्या हाताला दोनचार इंग्लिश पेनी लागल्या. त्याला आश्चर्य वाटलें. आतां मुंबईला पोंचल्यावर या विलायती नाण्यांचा कांहींसुद्धां उपयोग होणार नव्हता. खिशांत हात घालून रामस्वामी विमनस्कपणें तीं तांब्याचीं नाणीं खुळखुळावूं लागला.

इतक्यांत त्याचें लक्ष डेकच्या कठड्याकडे गेलें. आणि त्याला जें दृश्य दिसलें तें पाहून त्याला भयंकर धक्का बसला.

पिऊन तर्र झालेल्या कृष्णन्‌नें एका हाताच्या कवेंत हेलनला कवटाळून धरलें होतें आणि दुसऱ्या हातानें तोल जात असलेल्या सुरिंदरच्या खांद्याला आधार दिला होता! हेलन कांहींतरी बडबडत होती, आणि सुरिंदर क्षितिजाकडे बोट दाखवून नाचण्याचा प्रयत्न करीत होता. आपण कोण आहोंत आणि कोणाच्या मिठींत आहोंत याची हेलनला कांहींसुद्धां शुद्ध राहिलेली दिसत नव्हती. तो बीभत्स प्रकार पाहून रामस्वामीच्या अंगावर शहारे आले.

तो लगेच एका टोंकाला जाऊन कठड्याशीं उभा राहिला. खालीं काळेंनिळें पाणी कालकूटाप्रमाणें फेंसाळत, खळखळत, छिन्नविच्छिन्न होत होतें. रामस्वामीनें खिशांतून मघांच्या पेनी काढल्या आणि लहान मुलासारखा नेम धरून तो त्या समुद्राच्या पाण्यांत टाकूं लागला. एकापाठोपाठ क्षीण तरंग उठले, त्यांच्याकडे तो वेड्यासारखा पाहत राहिला.

त्याच क्षणीं समोरच्या क्षितिजाकडे त्याचें लक्ष गेलें. क्षितिजाची कडा आणि त्याच्या निकटचा आकाशाचा भाग कोटी नक्षत्रें एकत्र जमावींत तसा चमचमत होता. त्या प्रकाशाची प्रभा क्षितिजावरच्या समुद्रांत प्रतिबिंबित झाली होती. डेकवरचे सर्व उतारू त्या उजळत्या जादूकडे बोट दाखवून आनंदाचे, आश्चर्याचे उद्‌गार काढूं लागले. रामस्वामीच्या अंगावर रोमांच उभे राहिले. हेलनला, सुरिंदरला, कृष्णन्‌ला, बेटीला, ल्यूसीला, स्वतःला देखील तो त्या क्षणीं विसरून गेला.

मुंबईचे दिवे दिसूं लागले होते, आणि रामस्वामीचें हृदय निळ्या जलाशयांत उठणाऱ्या निसटत्या तरंगांसारखें अगदीं नाजुक झालें होतें. ●●●


# शाळकरी

लेखक : डॉ. कृ. श्री. म्हसकर

या पुस्तकांत ६ ते १२ वर्षांपर्यंतच्या मुलांचें संगोपन कसें करावें यासंबंधींची चिकित्सा केलेली आहे. कुटुंबांतील माता-पित्यांना हें पुस्तक उत्तम मार्गदर्शक आहे.

**सुंदर तिरंगी मुखपृष्ठ : मूल्य दीड रुपया**

**जय हिंद प्रकाशन** : झावबाची वाडी : मुंबई २

आमच्या असंख्य ग्राहकांना दिवाळी शुभचिंतन!

शाळा व कॉलेजचीं सर्व इंग्रजी–मराठी पुस्तकें, रोजमेळ, स्टेशनरी, डायऱ्या व दिवाळी भेट कार्डे घेण्यासाठीं

दादरमधील सर्वांत मोठें दुकान

# दादर बुक डेपो

रानडे रोड : दादर : मुंबई

( टे. नं. ६१०११ )



# साधना

लेखिका : शिरीष पै

अंबानगरीपासून सुमारें तीन मैल अंतरावर इंद्रवदन-महाराजांचा आश्रम होता. अंबानगरीची वेस ओलांडली म्हणजे अनघा नदीच्या कांठानें उगवलेलीं कुरणें व लावलेलीं शेतें दिसूं लागत. तीं ओलांडली की दाट जंगल सुरू होई. प्रथम प्रथम विरळ झाडी लागे आणि मग दिवसा देखील डोळे फाडून पाहिले तरी पुढच्या वाटेचा मागमूस लागूं नये असले काळ्याकुट्ट काळोखाला मिठी मारून बसलेलें भयाण जंगल सुरू होई. सुमारें दोन मैलपर्यंत असें जंगल तुडविलें म्हणजे एकदम गुहेंतून बाहेर डोकावावें तसें प्रकाशानें भरलेलें विस्तृत मैदान दिसूं लागे. जंगल आणि मैदान ह्यांच्या सीमारेषेवर इंद्रवदन महाराजांचा आश्रम बांधला होता. जंगलांतून वळसे घेत घेत बाहेर पडलेली अनघा आश्रमाच्या पाठीमागून दूर मैदानात वहात गेली होती.

इंद्रवदन महाराजांचा आश्रम हा अंबानगरीच्या परिसरांत असलेल्या इतर आश्रमांपेक्षा फार निराळ्या स्वरूपाचा होता. त्यांच्या आश्रमांत अध्ययन होत असें तें ग्रंथांचें व धर्माचें नसून नृत्यकलेचें होत असे! पण राजदरबारांत नृत्यकला जें विलासी स्वरूप धारण करते त्या विलासाला व शृंगाराला त्यांच्या आश्रमांत संपूर्ण मज्जाव होता. काल त्यांच्या आश्रमांत विरक्त तपस्विनीप्रमाणें व्रत धारण करून राहिली होती. कला हा भोग नसून त्याग आहे हें सिद्ध करण्याचा चंग बांधून इंद्रवदन महाराजांनीं हा आश्रम उभा केला होता. राजाश्रयानें कला वाढूं लागली म्हणजे निव्वळ रंजन हाच तिचा हेतु होऊन बसतो; वासनापूर्तीचें ती एक साधन होते आणि मग केवळ स्वैर विलासांत तिचा अधःपात होतो; राजाच्या मर्जीनुरूप तिची वाढ होते वा खुंटते असें इंद्रवदन महाराजांचें मत बनलें होतें—नव्हे तो एक मोठा इतिहासच होता.

अंबानगरीच्या शुद्धबोधन महाराजांच्या पदरीं मदनमोहन नांवाचे जे प्रख्यात नृत्यकार होते त्यांचे इंद्रवदन पट्टशिष्य होते. शुद्धबोधन महाराजानंतर त्यांचा ज्येष्ठ पुत्र चित्रांगद गादीवर आला आणि थोड्याच दिवसांत मदनमोहनहि मरण पावल्यानें त्यांची जागा इंद्रवदनना मिळाली. शुद्धबोधन महाराजांच्या अमलाखालीं बसलेली राज्याची घडी चित्रांगद महाराज सिंहासनावर बसतांच विस्कटून गेली. कारभारांतल्या शिस्तीच्या चिंधड्या उडाल्या. खजीन्यातला मोहरा विलासिनींच्या पायांवर नुपुरांसारख्या खणखणू लागल्या. मदिरेचे चषक रात्रंदिवस रिते होऊ लागले. नाचगाण्याच्या निनादांनी महाल दुमदुमू लागला. वास्तविक इंद्रवदनांसारख्या नृत्यकाराची चलती होण्याची ती संधी होती. त्यांनी नाचकाम शिकविलेल्या कसबी नृत्यांगनांचे पाय नाचता नाचता मोडून जावयाची पाळी आली होती. पण इंद्रवदन मनांतून नाराज होते. चित्रांगद महाराज कलेला गुलामासारखे राबवीत होते. तिच्यांत नव्हतें शास्त्र, नव्हती साधना. त्यांच्या वासनांची आग शमविण्यासाठीं नृत्यकलेची लक्तरें भस्म होऊन चालली होती. केवळ मस्तीनें फुललेलें, मादकतेनें धुंदलेलें, नखऱ्यानें नग्नशिखांत नहालेलें अश्लील नृत्य त्यांच्या शिव्या चित्रांगदमहाराजांच्या

मर्जीनुसार नाचत होत्या. त्याला नव्हता ताल—नव्हती लय. नुसताच थयथटाट भरला होता त्यांत !

ह्यासाठीं का आपण आपल्या शिष्य आणि शिष्या ह्यांना इतके दिवस नृत्याची तालीम दिली ? इंद्रवदनांच्या मनाला हा प्रश्न बेचैन करूं लागला. नृत्यकलेच्या त्या हिडीस अधः-पाताचा नी त्याला कारणीभूत झालेल्या त्या लोभी मोहवश स्त्रियांचा त्यांना तिटकारा आला. ते एका सकाळीं ताडदिशी उठले आणि कोणाला न सांगतां, न सवरता पिसाटासारखे अंबानगरी सोडून धांवत सुटले.

अनघा नदीच्या तीरावर त्यांनी व्रतस्थ तापस्याप्रमाणें तीन दिवस आणि तीन रात्री घालविल्या. डोळ्यासमोर सारा अंधार, अंधार दिसत होता. डोकं सुन्न झालं होतं. नजर शून्यांत खिळली होती. ज्या कलेसाठीं आजवर देह नी आयुष्य झिजवलें तिचा आपल्या हातानें खून केल्यासारखी अपराधी जाणीव त्यांना बोचणी देत होती. तिसरी रात्र तर प्रत्यक्ष काळरात्रीपेक्षांहि भयाण वाटली त्यांना. पाठीमागें भयानक जंगल पसरलें होतें. त्यांची सारी तपश्चर्या गिळून सुस्त झालेल्या हिंस्र जनावरासारखे ते घोरत पडले होते. समोर अनघा मृत्यूचें आमंत्रण देत क्रूरपणें फोफावून वहात चालली होती. अमावास्येची काळोखी रात्र होती ती. आभाळातली चांदण्याची लुकलुकहि त्यांना चेटकिणीच्या डोळ्यांसारखी भकास आणि तेजोहीन वाटली. त्या रात्रीची तळमळ संपता संपेना. पहाट होता होताच त्यांना जरा डोळा लागला. तोंच कुणीतरी अनामिक पक्षी त्यांच्या मस्तकावरून फडफडत गेला. त्यानं गोडशी शीळ घातली. इंद्रवदनांनी डोळे उघडले. समोर पूर्वेला क्षितिजाची कड तांबुस गुलाबी दिसत होती. त्या प्रसन्न लालीची मुक्त उधळपट्टी पूर्वेच्या समग्र आकाशावर झाली होती. अनघेवरून शेवाळ्याचा उग्रमधुर गंध घेऊन वारा मंद वहात येत होता. साऱ्या जंगलांत पक्ष्यांची मंजुळ गाणीं गुंजत होती. आणि वर आकाशांत बगळ्यांची लांबलचक माळ कसला तरी गूढ पण मंगल संदेश घेऊन चाललेल्या दूतासारखी नदीच्या पलीकडच्या तीराकडे चालली होती. नदींतून एक नाव वहात चालली होती व ती वल्हविणाऱ्या नावाड्यांच्या गीताचा लांबलचक सूर आर्त हाकेप्रमाणें प्रतिध्वनित होऊन त्यांच्या कानीं पडत होता.

इंद्रवदन महाराज स्फूर्ति आल्यासारखे, साऱ्या अंगभर एखादी संगीताची लकेर संचारल्यासारखे उठले. पूर्वेकडे नजर रोखून आणि हात जोडून ते तटस्थ उभे राहिले. आणि उगवत्या सूर्याच्या आगमनाचें स्वागत करणारें एक अलौकिक नृत्य त्यांना स्फुरलें. ते त्यांचे पदाघात, त्या मुद्रा, तो अभिनय अत्यंत स्वाभाविक आणि अंतःकरणाच्या आवेगातून उमटलेला होता. प्रकाशाची पूजा करण्याच्या उदात्त हेतूचा स्पर्श त्यांच्या प्रत्येक हालचालीला झाला होता.

त्याक्षणींच त्यांनी त्या जागीं आश्रम उभारावयाचें ठरविलें. निसर्गाच्या सान्निध्यात, कल्पनेची आरती करीत असताना ज्या उत्स्फूर्त भावना आळविल्या जातात त्यावरच नृत्य रचावयाचा त्यांनी निश्चय केला. चंद्राचें चांदणें, सूर्याचा उदयास्त, नदीची रुणझुण, ओढ्याची खळखळ, पाखरांची भरारी, कळीचा विकास, श्वापदांची जिजीविषा, ऋतूंचे कालिक विलास, ह्या साऱ्यांमध्यें इंद्रवदनांना जन्ममरणाच्या गूढ तत्त्वाचा साक्षात्कार होई आणि तो तो विषय त्यांच्या नृत्यांतून व्यक्त होत राही. आपल्या निवडक शिष्यांसह हें अघोर व्रत त्यांनी आरंभिलें. त्यांच्या आश्रमांत कला फक्त आत्म्याचा अविष्कार म्हणून नांदत होती. आध्यात्मिक वस्त्रांचा भगवा साज घेऊन ती विस्मीत दिवस कंठीत होती. कुणाचा अनुनय, कुणाचें रंजन हें तिचें ध्येय नव्हतें. कुणाच्या विलासासाठीं तिला


नवीन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना सुखाचें व भरभराटीचें जावो !

शाळा—कॉलेजचीं जुनीं व नवीं पुस्तकें मिळण्याचें दादरमधील

सर्वांत जुनें व मोठें दुकान

नरेंद्र बुक डेपो

न. चिं. केळकर रोड

दादर—मुंबई २८

राबायचें नव्हतें. शुद्ध नृत्य आणि नृत्यानुकारी शुद्ध संगीत ह्यांच्या शोधासाठीं इंद्रवदन सतत तळमळत होते.

त्यांच्या आश्रमात स्त्रियांना स्थान नव्हतें. इंद्रवदन स्त्रीजातीचा मनस्वी तिटकारा करीत. स्त्री साधनेतला महान् व्यत्यय आहे—आत्मविकासाचा मार्ग खुंटविणारी ती एक प्रतिगामी दुष्ट शक्ति आहे असें स्पष्ट मत होतें. स्त्री संसाराच्या जाळ्यांत पुरुषाला गुरफटविते, पोरांचें जंजाल त्याच्या पाठीमागें लागतें आणि स्वतःबरोबर त्याच्या जीवनाची छकलें करून टाकते असें त्यांना वाटे. स्त्रीला स्वतःला साधना मुळींच जमत नाहीं कारण ती मोहवश आणि आळशी आहे; अंतिम पूर्तीकडे तिचें कधीच लक्ष नसतें, थोड्याशा साध्यानेंच ती चढून जाते आणि त्या घमेंडीत आपला आणि कलेचा अधःपात घडवून आणते अशी त्यांची चित्रांगद महाराजांच्या दरबारांत खात्री होऊन चुकली होती. स्तुतीची चटक स्त्रीला भयंकर असते आणि दुसऱ्याला भुलविणें हाच तिचा कलेच्या अभ्यासामागचा हेतु असतो; ह्या कारणाकरिता स्त्रियांना त्यांनी आश्रमाचें दार बंद केलें होतें. पद्मपराग आणि रक्तारूण ह्या आपल्या दोन लाडक्या शिष्यांसह व इतर कांहीं निवडक अभ्यासकांसह ते आश्रमात नृत्याचें शोधन व अध्ययन करीत होते.

× × ×

शिशिरांतली एक संध्याकाळ. सूर्य केव्हांच मावळला होता. हवेंत थंडी भरली होती. कणाकणावर हिंव थरथरत होतें. पानं पिसासारखी गळून चालली होती. पाचोळा कापरं वारं भरून सळसळत होता. कुठेतरी एक रातकिडा कर्कशपणें चिरचिरत होता. आश्रमापुढच्या सारवलेल्या मोठ्या पटांगणात शेकोटी पेटवून तिच्याभोवती इंद्रवदन आणि त्यांचे शिष्य शेकोटीची ऊब घेत बसले होते. त्या हिवाळ्यातल्या संध्याकालावर रचलेलें एक काव्य पद्मपराग उच्च स्वरानें बोलून दाखवीत होता. त्याचा आशय होता—

रात्र आतां मोठी झाली आहे. रानातला हिरवा बहर गळून नुसत्या लाकडाचे सांगाडे उरले आहेत. या भयाण रात्रीं ते मनाची उदासीनता मात्र वाढवीत आहेत. आकाशातले तारे काकडून स्तब्ध बसले आहेत. त्यांच्यातले कांहीं थंड हवेत तेजोरेषा काढीत गळून पडत आहेत. वारा दूर कुठेतरी कापरें भरून घुमत आहे. नदीचं पाणी गारठून स्थिर झालें आहे. मृत्यो, तुझं राज्य असंच असेल का रे? ना ऊब, ना प्रकाश—अशी त्याची स्थिती असेल काय? माझ्या जन्माची अखेर झाल्यावर तूं मात्र अशा थंडगार भयाण प्रदेशांत नेऊन सोडणार आहेस काय?'

इतक्यात बाजूच्या झाडीत घुंगरें थरथरल्याचा भास होऊन रक्तारुण दचकला.

'कोण आहे?' त्यानें उठून मोठ्यानें विचारलें.

पुन्हा घुंगरें झणकारली.

इंद्रवदन महाराज गंभीर होऊन म्हणाले, 'कुणीतरी स्त्री आसपास लपली आहे खास! हे कोमल पदाघात स्त्रीशिवाय दुसऱ्या कुणाचे?'

सर्वजण चकित होऊन इतस्ततः त्या अज्ञात व्यक्तीचा नजरेनें मागोवा घेऊ लागले. क्षणा दोन क्षणात घुंगरांना वेगानें चालवत आणि दोन्ही हातांना पसरून हवेवर तरंगत आल्याप्रमाणें एक व्यक्ति पुढें आली ती इंद्रवदनांसमोर शेकोटीच्या नजीक येऊन भिडली. तिच्या मुखावर एक पातळ अवगुंठन होतें. शेकोटीच्या पिवळ्या केशरी जाळाच्या प्रकाशांत त्या अवगुंठनातून तिचा चेहरा अंधुकसा जाणवत होता. क्षणभर स्तब्ध राहून तिनें तें अवगुंठन फेकून दिलें

मावळंकर ब्रदर्स, प्रायव्हेट लि.
२५० गिरगांव रोड : मुंबई नं. ४
कामाची वेळ :– ८॥ ते ११-३० व ३ ते ८
दर सोमवारीं दुकान बंद असतें

आणि घुंगरांना थयथय झुलवीत तिनें चपळ अंगविक्षेपांनी भरलेलें एक अजस्र नृत्य करण्यास प्रारंभ केला.

ती एक अत्यंत देखणी तरुण स्त्री होती. बर्फावर चंद्राचे किरण पडून त्याची शुभ्रता चमकावी तसं तिचं गोरं पान अंग तेजस्वी दिसत होतं. त्या अंधुक उजेडातहि तिच्या मुद्रेचा स्वैर आविष्कार उमटून दिसत होता. तिची लांबसडक बोटं कमळाच्या पाकळ्यासारखी मिटत आणि उलगडत होती आणि तिची नाजुक पावलं क्षणभरहि भूमीवर न स्थिरावता अचपळपणें फिरत होती.

तिच्या त्या अद्भूत नृत्यानें इंद्रवदन इतके स्तिमित झाले कीं त्यांच्या तोंडून क्षणभर शब्दहि फुटेना. अखेर तिचें तें अनाहूत अकल्पित आक्रमण असह्य होऊन ते ओरडले, 'थांब! थांब जरा! काय चालवलं आहेस तूं हें? कोण आहेस तूं?'

नाचता नाचता ती थांबली आणि म्हणाली 'का? आवडलं नाहीं माझं नृत्य तुम्हाला?'

'आवडण्याचा काय प्रश्न? तुला कुणीहि न बोलावता तूं इथं कां आलीस? स्त्रियांना मज्जाव आहे हें माहीत नाहीं तुला?'

'पण माझ्या बाबतीत हा निर्बंध सैल होईल अशी खात्री आहे मला!'

'कशावरून? कशावरून ग असं ठामपणें म्हणतेस तूं?'

'माझ्या मनातला दृढ निश्चय मला हें बोलायला लावतोय!'

'कोण आहेस तूं? काय नांव आहे तुझं? कशाला आली आहेस तूं इथं?'

'माझं नांव गंधमदा. मी अंबानगरीच्या चंद्रमुखी नर्तिकेची मुलगी. तुमच्याकडे नाच शिकायच्या इच्छेनें मी आले आहे. मला उत्कृष्ट नृत्य एकटे तुम्हीच शिकवूं शकाल अशी माझी खात्री झाल्यावरून मी इथें आले आहे. तुमचा लौकिक आज कित्येक वर्षें मी हृदयांत साठवून ठेवलाय!'

'ह्या तुझ्या लाडीगोडीचा काडीमात्र परिणाम होणार नाहीं, तूं आल्यापावली परत जा. माझ्याकडून तुला नाच शिकविणें जमणार नाहीं. एकदा मी निश्चय करून चुकलो आहे कीं स्त्रीला नाच म्हणून शिकवावयाचा नाहीं.'

'आपण तो निश्चय कां केलात हें मला ठाऊक आहे. माझी आई खुद्द चित्रांगदमहाराजांच्या दरबारांत होती'

'होय ना? मग मुकाट्यानें जा कशी इथून, तुला नृत्य शिकविणें कालत्रयींहि शक्य नाहीं.'

'पण माझ्या बाबतींत हा हट्ट आपण सोडावा.'

'कां म्हणून? स्त्रीच्या हातून अध्ययन होऊ शकणार नाहीं अशी माझी खात्री होऊन चुकली आहे. स्त्री ही स्वभावतःच मोहवश असते. खडतर साधना करणें तिला आळशीपणामुळें साधत नाहीं. एवढेंच नव्हे तर दुसऱ्याची साधना मोडण्यात तिला दुष्ट आनंद होतो. निर्विकार, अनासक्त वृत्तीनें कलेचें अंतिम टोक गाठणें तिला अशक्य आहे व तिच्या सान्निध्यांत पुरुषाला अशक्य आहे.'

'पण मी जर आपली खात्री पटविली कीं अनासक्त, निर्विकार वृत्तीनें मी कलेची साधना करीन तर आपण मला शिकविणार नाहीं का? आपण त्यासाठीं माझी वाटेल ती कठोर परीक्षा घ्या!'

'गुरुजी, राहूं द्या गंधमदेला आश्रमात!' पद्मपराग तिची बाजू घेत म्हणाला.

'तिला संधी देऊन पहाण्यास हरकत नाहीं गुरुजी!' रक्तारुण म्हणाला.

इंद्रवन विचारात पडले. कांहीं क्षण मूक शांततेत ढळले. इंद्रवदन सावकाश पण शब्दाशब्दावर जोर देऊन कठोरपणें म्हणाले, 'ठीक आहे. तुला आश्रमांत रहावयास मी परवानगी देतो. पण ह्या आश्रमापासून थोड्या अंतरावर एक झोपडी बांधून त्यांत तुला ठेवण्यात येईल. एखाद्या कैद्याप्रमाणें तुला इथें जीवन व्यतीत करावें लागेल.


# माझी जन्मठेप

लेखक : वि. दा. सावरकर

पृष्ठें ५३४, मूल्य आठ रुपये

**सवलतीची किंमत ५ रुपये**

**कांहीं अभिप्राय**

वीररसानें आमूलाग्र ओथंबलेली एक अद्भुतरम्य आणि रोमहर्षक कादंबरी, भारतीय जीवनाचें आणि वाङ्मयाचें अमर भूषण. —आचार्य अत्रे

भीषण, अद्भुत आणि रोमांचक आत्मचरित्रांचा मेरुमणी. —बनहट्टी

सावरकरांच्या "माझी जन्मठेप" या ग्रंथाची आपण प्रशंसा करूं तेवढी थोडीच. -प्रो. रा. कृ. लागू

**मॅजेस्टिक बुकस्टॉल**

**गिरगांव : मुंबई ४**

अध्ययनाच्या कामापुरती काय ती मोकळीक तुला मिळेल. बाकीचा सारा वेळ तुझ्या झोपडीचें दार कडीकुलपात राहील. पण ज्या क्षणीं मला असें आढळेल कीं तूं स्त्रीस्वभावानुरूप चाळवाचाळव करण्याचा प्रयत्न करीत आहेस, त्याच क्षणीं तुला मी एक अघोर शिक्षा देऊन परत पाठवीन. मृत्यूहून ती शिक्षा भयंकर असेल. तुझा चेहेरा कुरूप करून टाकण्यात येईल ! आणि तुझ्याबरोबर जो कोणी माझा शिष्य प्रेमाचा खेळ खेळण्याचा प्रयत्न करील, तो त्याहूनहि भयंकर शिक्षेला पात्र होईल. त्याचे हातपाय तोडले जातील.'

'कबूल—सारें कबूल,' गंधमदा निर्धारानें पण हर्षोत्फुल्ल होऊन म्हणाली. आपल्या शिष्यांकडे वळून पहात इंद्रवदन म्हणाले, 'तुम्हाला कबूल आहे ? तुमची परवानगी आहे हिला इथे ठेवून घेण्यास ?'

साऱ्या शिष्यांनी माना डोलाविल्या.

फक्त रक्तारुण म्हणाला, 'गुरुजी, इतका कठोर शेवट जर अपराधाचा होणार असेल तर हें दिव्य न पत्करलेलेंच बरें.'

पण इतर कुणी कांहींच म्हणालें नाहीं.

शेकोटीच्या ज्वाळांत गंधमदेच्या चेहऱ्यावरील आनंद चमकत होता.

× × ×

एका दिवसाचा हात धरून दुसरा दिवस उजाडत होता. एका महिन्याच्या पाठीमागून दुसरा महिना उगवत होता. अशा रीतीनें वर्ष होऊन गेलें. गंधमदेची ती उग्र तपश्चर्या निश्चयानें चालू होती. वर्षाच्या अवधींत इंद्रवदन जें जें शिकवतील तें तें ती सहजपणें आत्मसात् करीत होती. त्यांनी शिकवलेलें नृत्य ती स्वतःचा आत्मा त्यांत ओतून नाचूं लागली म्हणजे, त्याला कांहीं आगळाच रंग चढे. विरक्त भावांचें नृत्यहि आसक्तीचें वातावरण निर्माण करूं पाहे. नृत्याच्या उग्र छटांचा विलासहि मादक वाटूं लागे. इंद्रवदनाच्या तें लक्षांत येई. परंतु ती जाणीव ते आंतल्या आंत कोंडून टाकीत. गंधमदेची ती निष्ठा, तो निर्धार, तें अध्ययन, ती तपस्या पाहून-त्यांचा तिच्यावरचा राग हळुहळु विरघळत गेला होता. सुरुवातीला तिच्याशी ते जितक्या कडवटपणें वागता येईल तितक्या कडवटपणें वागत. कधीं कधीं कांहीहि न शिकविता तिला पिंजऱ्यांतल्या पोपटासारखे कोंडून ठेवीत. तिची नृत्यांत आगळीक होतांच तिला वाटेल तसें टाकून बोलत.

पण मानी गंधमदा निर्विकारच राही. न जाणों डोळ्यांतून टिपूस काढले तरी आपण मोहांत ओढीत आहोंत असा गुरुजींना भास होईल असें वाटून ती दुःखाचा कढहि आवरून धरी. नृत्याची तालीम करण्यांत ती तासचे तास घालवी. त्या कष्टांनीं तिचें शरीर शिझून कृश झालें होतें. तिच्या चेहऱ्यावरील आरक्त रंग मावळून तो फिकट पांढरा पडला होता. तरीहि तिच्या अंगांतला जोर कायम होता. तिची पावलें कधीं थकत नव्हती. इंद्रवदनाच्या शिष्यांकडे तर नजर वर करूनहि पहात नसे. तिला लागणारा शिधा आणून देण्याचें काम पद्मपराग करीत असे. तो येताच ती त्याच्याकडे पाठ फिरवून बसे. तो कांहीं बोलल्यास त्याच्याकडे न पहातां उत्तर देई. ती अनघेवर स्नानाला गेल्यास रक्तारुण तिच्यावर लांबून नजर ठेवी. पण तो जेथें असेल त्या दिशेला ती नजरहि फिरवीत नसे.

अशा रीतीनें दिवस चालले होते.

एके दिवशीं नृत्याची तालीम चालली होती. गरूड आणि नाग ह्यांच्या झुंजीवर आधारलेलें एक अवघड नृत्य इंद्रवदन गंधमदेला शिकवीत होते. गरुडाची अदम्य झेप आणि नागाच्या सळसळीतला त्वेष ह्या दोहोंचा आविष्कार गंधमदेनें इतका बहारीचा केला होता कीं इंद्रवदन थक्क होऊन तिच्याकडे पहातच राहिले. तिच्या चेहऱ्यावरील त्या विरक्त छटा आणि नाचून नाचून कृश झालेलें तिचें शरीर पाहून त्यांना तिची क्षणभर कींव आली. दोन्ही हात बाजूस पसरून खांदे मुरडता मुरडता अचानकपणें गंधमदेच्या कंचुकीची गांठ सुटली व कंचुकीच्या पट्टींत आवळून धरलेले तिचे नाजुक गोरे स्तन अलगदपणें खालीं ओघळले. तिला

सणसणणारे, हलणारे दांत, रक्त पू सूज येणाऱ्या हिरड्यांवर
पायोक्युर
औषधी दंतमंजन
सर्वत्र मिळतें.

उष्णतानाशक केशवर्धक
मेंदू थंड ठेवून केसांची विपूल वाढ करतें.

नाभा एजन्सीज : १६० खाडीलकर रोड : मुंबई ४

तें जाणवतांच तिनें पटकन् खालीच बसकण घेतली आणि दोन्ही गुडघ्यांत आपलें डोकें घालून ती शरमेनें चूर होऊन बसली.

'गुरुजी, आपण जावं इथून,' ती कशीबशी म्हणाली.

इंद्रवदन हलकेच बाहेर पटांगणात आले. कंचुकी नीट सावरून खालच्या मानेनें गंधमदा धावतच आपल्या झोपडीकडे गेली. तिच्या वक्षस्थलाच्या अस्पष्ट दर्शनानें इंद्रवदनाच्या सुप्त वासना क्षणभर पिसाळून उठल्या. मोठ्या कष्टानें त्यांना त्यांनी आवरून धरलें. पण तशा स्थितीतहि गंधमदेच्या चेहऱ्यावर उमटलेली लज्जेची गोड छटा आणि शरमेनें संकुचित झालेल्या तिच्या डोळ्यांची ती कावरीबावरी उघडझांप ते विसरू शकले नाहीत. स्त्रीसुलभ भावनांचा तो क्षणिक खेळ त्यांच्या मनाला गोड स्पर्श करून गेला. आणि कां कुणास ठाऊक ह्या साऱ्या छटावांचून आपलें नृत्य अपूर्ण आहे अशी जाणीव त्यांच्या अंतःकरणांत उमटून राहिली.

त्यानंतर अध्ययनाच्या वेळीं फिरून तसा प्रसंग घडला नाहीं. गंधमदेनेंहि त्या प्रसंगाची जाणीव होईल असें वर्तन केलें नाहीं. ती पूर्वीसारखीच विरक्त, थंड, निर्विकार होती. पण इंद्रवदनाची मात्र तिच्याकडे पाहण्याची दृष्टि बदलली. तिच्या चेहऱ्यावर त्या दिवशीं उमटलेल्या त्या लज्जेच्या मधुर छटा त्यांना वारंवार आठवत आणि तो भाव फिरून पाहावयास मिळावा म्हणून आतुरपणें त्यांचे डोळे तिच्या डोळ्यांतील भाव हुडकूं पाहात. पण ती सदैव विकारशून्य असे. त्यामुळें तिची ही विरक्ति स्वाभाविक आहे कीं हें एक साधनेसाठीं चालविलेलें नाटक आहे हें कोडें इंद्रवदनाना पडलें. त्याचा शोध लावण्याचा त्यांनी निश्चय केला.

वसंत ऋतु नुक्ताच येऊं पहात होता. झाडांना गुलाबी पालवी फुटली होती. साऱ्या रानांत मोहराचा उग्र गंध दरवळत होता. भुंग्यांचा प्रियाराधनाचा खेळ दिवसाउजेडी फुलांफुलांवर चालला होता. हवेतला उष्मा चित्तवृत्ति व्याकुळ करीत होता आणि गंधाच्या मादक नी शीतळ दुनियेंत वावरण्याचें आवाहन देत होता. अशा वेळीं इंद्रवदनानी गंधमदेला तपोसाधनेला बसलेल्या शंकरावर आपले शर सोडावयास आलेल्या मदनाचें नृत्य शिकविण्याचा निर्धार केला. त्या नृत्यांतले ते लाडिक हावभाव, त्या कातर पण कोमल हालचाली, ते ठेकेदार, विशिष्ट आघातांतून गोड लय उडविणारे पदक्षेप ह्या साऱ्यांचें अनुकरण करतां करतां गंधमदेच्या स्त्रीसुलभ शृंगारिक प्रवृत्ति फुलून आल्या. तिचें शरीर नृत्याच्या लयीत घुमता घुमता धुंद झालें. मस्तकांत चक्कर भरेपर्यंत ती बेभान होऊन नाचली. शृंगाराचें तें अति मनोहर चित्र पाहून इंद्रवदन थक्क झाले. त्या नृत्याच्या हावभावांत खुलून दिसणारी गंधमदेची देहयष्टि आणि सौंदर्य पाहून इंद्रवदनाच्या हृदयांत मदनदेव आवर्जून उठला. सारें ब्रह्मांड आपल्याभोवतीं फिरत असल्यासारखें त्यांना वाटूं लागलें. मदिरेच्या घोटासारखे कढत कढत उद्रेक त्यांच्या शरीरांतून फुटूं लागले. ते व्याकुळ झाले.

पण गंधमदा........

तिला इंद्रवदनाची जराही दाद नव्हती. ती आपल्याच उन्मादांत फिरत होती. तिच्या शृंगारांतली ती अलिप्तता आणि निर्विकल्पता पाहून इंद्रवदन शरमून गेले. आपला होत चाललेला अधःपात त्यांना जाणवला. त्या जाणीवेनें भान विसरून ते किंचाळले—

'थांब, पुरे कर हे सारे नाचरंग. मला आतां असह्य झालें आहे हें सारं!'

चमकून गंधमदा थबकली. इंद्रवदनाचें शरमेनें म्लान झालेलें मुख पाहून ती मनांतून समजून चुकली.

दोहो हातांनी तोंड झांकून स्फुंदतच इंद्रवदन म्हणाले, 'जा, फिरून येऊं नकोस इथें. तुझी परीक्षा घेण्यास गेलो पण मीच हरलों; तूं मात्र जिंकलीस. तूं साधना पुरी केलीस. तुझा विजय झाला.'

गंधमदा विनयानें म्हणाली—

'गुरुजी, पण स्त्री तर आळशी, मोहवश असते असें आपण म्हणाला होतात!'

'स्त्री असते किंवा नाहीं हें मी कोण सांगणार? पण पुरूष मात्र खास असतो. जोवर पुरुषाला मोह जिंकता येत नाहीं तोवर त्यानें स्त्रीस दूषण कशाला द्यावें?'

'पण, आपणाकडून मला कितीतरी शिकावयाचें आहे गुरुजी!'

'मी तुला आणखी काय शिकविणार? तूंच तुझी यापुढें गुरु! ज्या भावनांनी नृत्याला सौंदर्य प्राप्त होतें त्या भावना मला दगडाला काय कळणार? त्याचा आविष्कार स्त्रीलाच उत्तम साधतो. जा, आणि तुझी ही कला जगाला सुखविण्यासाठीं तुझ्यासह घेऊन जा. ह्या रानांत वैराग्यानें तिचें भस्म करूं नकोस. कारण कलेला विरक्तीची जरूर फक्त नाममात्र आहे. साधनेपुरती आहे. तिचें तें अंतिम साध्य नव्हे.'

इंद्रवदनाना नमस्कार करून गंधमदा हळूहळू आश्रमाबाहेर निघून गेली. तिच्या घुंगरांचा अस्पष्ट ध्वनि मात्र इंद्रवदनाच्या कानांत रेंगाळत राहिला. ●●●

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र, स्वतंत्र गोवा आणि काश्मीरचा प्रश्न निश्चित सुटणार !

हे पहा तुमचे ग्रहयोग

# वर्षभविष्य

– कृ. वि. सोमणशास्त्री

दीपावलींतील पहिल्या प्रभातकालीं अभ्यंगस्नानाचा आनंदोत्सव घरोघर साजरा होत असतांना पूर्वेस सूर्योदयाच्या आधीं चंद्र-गुरूंचें एकत्र पुण्यशाली दर्शन होण्याचा मंगल सुयोग यावेळीं साधणार आहे. सूर्य उगवण्यापूर्वी १ तास ८ मिनिटें चंद्र उगवेल. चंद्राच्या मागोमाग १६ मिनिटांनीं गुरु उगवेल. त्यावेळीं ग्रहमालेच्या राजाचा सिंहाकृति राजप्रासाद म्हणजे सिंहराशि पूर्वआकाशांत पूर्णपणें दिसूं शकेल. देवांना गतवैभव पुनश्च प्राप्त करून देणारे सामर्थ्यशाली पुनर्वसु पूर्वेस आकाशमध्याजवळ असतील. तपस्तेजानें दीप्तिमान् झालेले सप्तर्षि ईशान्येकडे नुकतेच उगवलेले दिसतील. एकाच आचमनानें सर्व समुद्र प्राशन करणारा अगस्ति दक्षिण दिशेला प्रकाशित करीत असेल. वनांतील हरिणींकडून ज्ञानोपदेश झाल्यामुळें उद्धरून दिव्य लोकीं अधिष्ठित झालेला व्याध आग्नेयीकडील आकाशांत खूप उंच दिसेल. पूर्वेपासून कांहींसे आग्नेयीकडे वासुकिहृदय आणि आकाशमध्यापासून कांहींसे वायव्येस ब्रह्महृदय हीं दोन हृदयें सात्विक तेजानें विलसत असतील. दिवाळीच्या पहिल्या प्रभातकालीं अभ्यंगस्नान करतांना आकाशाकडे पाहिलें असतां अशा प्रकारचे असंख्य तारे दिसतील. तारे हे आकाशांत स्थिरप्राय दिसतात. त्यांच्यांत परस्परांमधील अंतरें कमीजास्त होत नाहींत. ग्रह मात्र आपापल्या गतीनें सतत परिभ्रमण करीत असतात. पृथ्वीच्या उत्पत्तीपासून हा सर्व स्थिरचर तेजोगोलांचा परिवार पृथ्वीवर आपापल्या सामर्थ्यानुसार अखंड तेजोवृष्टि करीत आहे. त्यांचीं आकर्षणें सर्व दिशांकडून पृथ्वीवर परिणाम करीत आहेत. स्थिर तारकांचे परिणाम स्थिर असतात, पण सतत परिभ्रमण करणारे ग्रह त्या स्थिर परिणामामध्यें नानाविध बदल सतत करीत असतात. पृथ्वीवर घडणाऱ्या अशा परिणामांचा नियमसंग्रह म्हणजेच ज्योतिषशास्त्र होय. पृथ्वीवरील प्रत्येक हालचाल त्या ग्रह-तारकांच्या पृथ्वीवर घडणाऱ्या परिणामांचेंच निदर्शन होय असा फलज्योतिषशास्त्राचा निसर्गसिद्ध असा अबाधित सिद्धांतच आहे.

एकादी व्यक्ति, संस्था, समाज, राष्ट्र, विशिष्ट राजकीय अंमल, आणि उन्हाळा–पावसाळा वगैरे नैसर्गिक घटना इत्यादि अनेक विषयांचें भवितव्य ग्रह-तारकांच्या गति-स्थितींवरून जाणतां येतें. त्या प्रत्येक विषयाच्या पद्धति स्वतंत्र आहेत. या निरनिराळया सर्व पद्धतींचा विचार प्रस्तुत करावयाचा नाहीं. येथें फक्त मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र, गोवें, काश्मिर या प्रकरणांसंबंधींचें भवितव्य जाणण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. तसेंच व्यक्तीच्या जन्मकालीं ज्या राशींत चंद्र असेल त्या राशीच्या आधारें या वर्षांत त्या व्यक्तीला सामान्यतः कोणते अनुभव येतील याचें दिग्दर्शन करावयाचें आहे.

उपरिनिर्दिष्ट महाराष्ट्र, गोवें आणि काश्मिर यांच्यासंबंधाचा भविष्यविचार ज्योतिषशास्त्रांतील 'मेदिनीय भविष्य' या प्रकरणांत येतो. आपल्या भारत देशांत 'मेदिनीय भविष्य' विषयक विचाराला जोराची चालना वराहमिहिराचार्य यांनीं दिली. निरनिराळया भूप्रदेशांची राशिपरत्वें, नक्षत्रपरत्वें, ग्रहपरत्वें त्यांनीं विभागणी केली. ग्रहतारकांच्या तेजस्वितेंतील नानाविध रंग, त्यांच्या बिंबांची स्थिति वगैरे अनेक साधनें या कामीं वराहमिहिरांनीं उपयोगांत आणिलीं. पण त्याच दिशेनें नवीन संशोधन आणि बदलणाऱ्या ऐतिहासिक घटनांची व्युत्पत्ति लावण्याचें कार्य वराहमिहिरांनंतर कोणी विशेष रीतीनें केलेलें उपलब्ध नाहीं. पाश्चात्य देशांत याविषयीं 'टॉलमी' हा मोठा आद्यसंशोधक झाला. त्यानें पृथ्वीवरील निरनिराळया देशांच्या राशि निश्चित केल्या. अलीकडे टॉलमीच्या पद्धतीचा विकास करणारे ज्योतिषी लिली, सेफारियल, डॉ० सीमोनाईट,

राफेल वगैरे पाश्चात्य देशांत झाले. सध्यां इंग्लंडांतील कार्टर नामक ज्योतिष्यांचीं या विषयांतील मतें विद्वान लोक बहुधा प्रमाणभूत धरितांना आढळतात. पण पाश्चात्य देशांत जरी एतद्विषयक विचारपरंपरा पुढें चालली, तरी त्यांत नवीन विशेष महत्त्वाची भर पडली असें म्हणतां येत नाहीं. त्याच त्याच कल्पनांचें चर्वितचर्वण नवीन भाषेंत आणि नवीन उदाहरणांनीं केलेलें आढळतें. अमेरिकेंतील याविषयींचे ग्रंथ तर इंग्लंडांतील ग्रंथांच्या आश्रयानेंच आपला संसार थाटतांना दिसतात. पृथ्वीवरील निरनिराळ्या राष्ट्रांच्या किंवा प्रदेशांच्या राशि सेफारियलनेंच मान्य केलेल्या सध्यां प्रमाणभूत मानल्या जातात. अलीकडे कांहीं शहरांच्या राशिअंशांची निश्चिती झालेली आहे. उदाहरणार्थ कांहीं स्थळांचे दशमभाव असे आहेत—लंडन मिथुन ९ अंश, पॅरीस मिथुन ११ अंश, बर्लिन मिथुन २० अंश, न्यूयार्क मीन २४ अंश, टोकियो तूळ २९ अंश, सिडने वृश्चिक १० अंश, रोम मिथुन २२ अंश, केपटाऊन मिथुन २७ अंश, पेकिंग तूळ ६ अंश, मुंबई सिंह २२ अंश, कलकत्ता कन्या ७ अंश, दिल्ली कुंभ १५ अंश, न्यू ऑर्लियन्स मीन ३ अंश, वगैरे, दशम भावाच्या आधारें लग्नादि सर्व भागांची निश्चिती करून कुंडली तयार करतां येते. या सर्व माहितीचा प्रपंच येथें करावयाचा नाहीं. भारतांतील ज्या तीन प्रदेशांसंबंधें विचार येथें करावयाचा आहे; त्या प्रश्नांचा निर्णय होण्याचा अनुक्रम गोवें, महाराष्ट्र आणि काश्मिर असा राहाणार आहे असें ज्योतिषशास्त्राधारें दिसतें. त्यांचा येथें विचार करूं.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र हा प्रश्न ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीनें अगदीं मामुली परंतु क्लिष्ट आहे. तो भारतांतील कांहीं व्यक्तींच्या मताचा प्रश्न आहे. भारताच्या सर्वांगीण उत्कर्षासाठीं सर्वमान्य भाषिक तत्त्वावर जी अंतर्गत प्रांतविभागणी सोयीप्रमाणें व्हावयाची, त्यांत संयुक्त महाराष्ट्र व गुजरात मिळून एक द्विभाषिक असावें कीं मराठी भाषिक मुलूख निराळा व गुजराती भाषिक मुलूख निराळा अशी विभागणी असावी एवढाच काय तो त्यांत मुद्दा आहे. त्यांत देशप्रेमाची सरसनिरसता वगैरे जी परिभाषा घुसडली जाते त्यांत कांहीं अर्थ नाहीं. मुंबईसारखें एकादें शहर महाराष्ट्रामध्यें राहील कीं महाराष्ट्राबाहेर राहील असा एकाच राज्याच्या अंमलाखालील प्रांतविभागाचा व शहरांचा विचार अत्यंत कठीण आहे. त्यासाठीं कोणत्या कुंडलीचा किंवा ग्रहस्थितीचा विचार करावा हा प्रश्न फार जटिल आहे. त्यासाठीं द्विभाषिक अंमल सुरू झाल्याच्या वेळची कुंडली प्रमाणभूत धरावी असा बहुधा अभिप्राय पडतो. तारीख १ नोव्हेंबर १९५६ ही तारीख सुरू होण्याच्या वेळीं रात्रीं १२-८ वाजतां या द्विभाषिकास प्रारंभ झाला असें गृहीत धरून कुंडली मांडली असतां हर्शेल पूर्वक्षितिजावर उगवत होता. सध्यांच्या द्विभाषिकापूर्वी त्या प्रश्नावर मुंबई व महाराष्ट्रांत गोळीबार वगैरे जे क्रूर प्रकार घडले, त्यावेळीं सध्यांचें द्विभाषिक नव्हतें. त्या प्रकारांचा विचार मुंबई आणि अन्य स्थानें यांवरील ग्रहांच्या व राशींच्या अंमलाप्रमाणेंच करावा लागेल. सध्यांच्या द्विभाषिक कुंडलीवरून विचार केला, तर यांत लवकरच बदल घडणार असें दिसतें. त्यांतील प्रोग्रेस चंद्र रवि, राहू, शनि यांच्याशीं युति करून जाऊं लागला, म्हणजे या द्विभाषिक रचनेला धक्के बसूं लागतील. या द्विभाषिक राज्यांत उधळपट्टी आणि अनागोंदी होईल असें हर्शेलवरून दिसतें. दारिद्र्य वाढेल आणि केंद्रसरकारवर या द्विभाषिकाचा आर्थिक बोजा अधिक पडेल. १९५८ च्या शेवटीं प्रोग्रेस चंद्र रवीवर येईल तेव्हां व्यापारी लोक राज्यकारभारांतील कायद्यांमुळें नाखूष होतील. त्याचवेळीं दशमबिंदु हर्शेलच्या केंद्रांत येणार असल्यामुळें अधिकारी वर्ग आपला कारभार व्यवस्थित चालला आहे हें पटवून देऊं शकणार नाहीं. त्या सर्व कटकटींच्या परिणामीं १९६० च्या प्रारंभापर्यंत हा प्रश्न पूर्णपणें सुटलेला असेल असें वाटतें. यांत हाणामारीचें उग्र स्वरूप केव्हांच येणार नाहीं. सत्याग्रह करावा लागलाच तर अत्यल्प होईल. १९५७-५८ सालींच घाईनें हें द्विभाषिक फुटेल असें समजण्याचें कारण दिसत नाहीं. त्यासाठीं १९६० पर्यंत थांबावें लागेल.

त्यापूर्वी गोव्याचा प्रश्न सुटेल. सुमारें साडेचारशें वर्षांपूर्वी शके १४३२ मार्गशीर्ष कृष्ण ९ सोमवार तारीख २५ नोव्हेंबर १५१० या दिवशीं सूर्योदयाच्या वेळीं गोव्यावर पोर्तुगीजांचा अंमल स्थिर झाला. त्या वेळची कुंडली मांडली असतां त्या आधारें गोव्याचा प्रश्न समजून येतो. गोव्याच्या प्रश्नाचें स्वरूप मुंबईचा प्रश्नाहून निराळें आहे. गोवें हा जुना परकीय सत्तेखालचा प्रदेश आहे. तो भारतभूमीच्या अंतर्गत असल्यामुळें भारताच्या अन्य सर्व प्रदेशांप्रमाणें गोव्याचा प्रदेशही परकीय सत्तेखालून मुक्त होऊन भारतांत सामील व्हावयाचा आहे. गोवें प्रांत भारतांत सामील व्हावयाचा म्हटला म्हणजे भारताच्या कुंडलीचाही विचार केला पाहिजे. तारीख १५ ऑगस्ट १९४७ च्या प्रारंभींची कुंडली ही भारताची सध्यांची स्वातंत्र्य कुंडली आहे. या भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या कुंडलीचा विचार करतांना ब्रिटिशांच्या

अंमलाखालचा स्वातंत्र्याचा प्रयत्न सन १८५७ सालीं प्रथम विशाल प्रमाणांत झाला याचा विचार करावाच लागेल. सामान्य वाचकाला कंटाळपणा होणारा तो प्रपंच मी येथें करीत नाहीं. पण एक तत्त्व असें गृहीत धरावें लागेल कीं, ज्या ग्रहयोगांनीं भारतावरील परकीय अंमल उठविला, त्याच ग्रहयोगांची पुनरावृत्ति होईल तेव्हां गोव्यावरील परकीय सत्ता संपुष्टांत येईल.पोर्तुगाल देशावर मीनराशीचा अंमल असून त्यांतही मीन राशीचा दुसरा होरा, तृतीय द्रेष्काण, सातवा नवमांश आणि विशेषतः २१-२२-२३ अंश हें पोर्तुगालचें ज्योतिषशास्त्रदृष्टीनें मर्मस्थान (सेन्सेटिव्ह पॉइंट) आहे. ३० डिसेंबर १९०७ रोजीं या स्थानीं शनि-मंगळयुति झाली तेव्हां निर्माण झालेल्या वातावरणानेंच पुढें १९०८ मध्यें पोर्तुगालच्या राजाचा व युवराजाचा खून झाला. आणि याच परिस्थितीचें पर्यवसान म्हणून सन १९१० सालीं राजसत्तेचा अंत होऊन रिपब्लिकची स्थापना झाली. १९२६ सालीं याच स्थानीं हर्शल-मंगळांची युति झाली त्या योगें लोकशाहीचा पाडाव होऊन डिक्टेटरशिपची प्राणप्रतिष्ठा झाली. देशांच्या कुंडलीचें प्रमाणभूत साधन मिळालें तर ग्रहस्थिति आणि राजकीय स्थिति यांचा आश्चर्यकारक स्पष्ट संबंध अशा रीतीनें दिसून येतो. गोव्यावर पोर्तुगीज अंमल स्थिर झाला त्या वेळची कुंडली पाहातां १९५८ च्या जानेवारींत जी शनि मंगळांची युति होईल तिचा अर्थ गोवा परकीय सत्तेतून मुक्त होईल असा आहे. आणि १९५९ च्या प्रारंभापर्यंत स्वतंत्र गोवा आपणांस दिसूं शकेल. तोंपर्यंत गोव्यांत राजकीय वैमनस्यें वाढतील. आर्थिक कफल्लकपणा कमालीचा वाढेल. आणि युद्ध झाल्याशिवाय गोवा प्रांत भारतांत विलीन होईल. सैन्यबळाचा वापर केला तरीही प्रत्यक्ष मोठें रणांगण माजणार नाहीं. ज्या शनि-प्ल्यूटोंनीं भारताला स्वातंत्र्य मिळवून दिलें, तोच शनि-प्ल्यूटो योग गोव्याच्या कुंडलींत गोव्याला स्वातंत्र्य मिळवून देणार आहे. त्यामुळें तें बव्हंशीं शांततामय मार्गानेंच मिळेल. गोवा भारतांत विलीन होतांना त्यासंबंधीचे पोर्तुगाल व भारत यांमध्यें कांहीं तपशील ठरतील त्यांचें विवेचन येथें करीत नाहीं. पण ते धार्मिक हितसंबंधाचेच सामान्यतः असतील. येत्या ३।४ महिन्यांत त्यासंबंधींची एकादी घटना घडण्यास आरंभ होईल. पोर्तुगीज सरकारनें भारतांतील अन्य वसाहतींत जाण्याच्या मार्गासंबंधानें राष्ट्रसंघाकडे ज्या तक्रारी नोंदविल्या त्या तक्रारींचा निकाल व्यवस्थित लागेल असें दिसत नाहीं. तो निकाल लागण्यापूर्वीच पोर्तुगीज व भारत यांमध्यें करार होऊन गोव्यावरचा पोर्तुगालचा राजकीय अंमल विसर्जित होईल असें वाटतें.

आतां काश्मिरसंबंधानें विचार करूं. मुंबईचा प्रश्न आणि गोव्याचा प्रश्न यांपेक्षां काश्मिरचा प्रश्न निराळा आहे. सर्व काश्मीरचें भारतांत प्रथम कायदेशीर समिलीकरण झालें आहे. त्यानंतर त्यावर परकीय आक्रमण सुरू होऊन त्यांतला कांहीं भाग सध्यां परकीय आक्रमणाखालीं आहे. तें परकीय आक्रमण रद्द व्हावें आणि सबंध काश्मिर हा भारताचाच एक विभाग हें सर्व राष्ट्रांनीं निःसंदिग्धपणें मान्य करावें अशा प्रकारचें काश्मिर प्रश्नाचें सध्यांचें स्वरूप आहे. आक्रमक पाकिस्तान हें भारताचें शेजारी राष्ट्र आहे. तेव्हां त्या दृष्टीनें भारतीय कुंडलीच्या संदर्भानें त्याचा विचार केला पाहिजे. त्या आक्रमणाच्या वेळची प्रत्यक्ष कुंडली माझ्यासमोर नाहीं. कारण ती नक्की वेळ मला उपलब्ध नाहीं. पाकिस्तान व भारत यांच्या कुंडल्यांच्या कलह विषयक प्रश्नांच्या दृष्टीनें अभ्यास करतां असें दिसतें कीं, सध्यांच १९५७-५८ मध्यें काश्मिरचा प्रश्न निकालांत निघेल असें नाहीं. कदाचित् तो यापेक्षांही लांबेल. या प्रश्नावरून मोठें युद्ध होईल असें वाटत नाहीं. बहुधा सन १९६१ च्या सुमाराला काश्मिरचा निर्णय भारतानुकूल होऊन हें प्रकरण मिटेल असें वाटतें.


## [ नवीन प्रकाशन ]

# छान छान चित्रें

**रंगीत पशू-पक्ष्यांच्या चित्रांचें पुस्तक**

आर्ट पेपरवर छापलेली सोळा तिरंगी सुंदर चित्रें. शिवाय श्री. दिनानाथ दलाल यांचें आकर्षक मुखपृष्ठ आणि नयनरम्य सजावट. मूल्य ७५ नये पैसे

**याशिवाय आमचीं**

| | |
|---|---|
| (१) बालवाचन आणि अंकलेखन | ०—६—० |
| (२) रंगीत अक्षर ओळख | ०—१०—० |
| (३) मुळाक्षर शिक्षक | ०—६—० |
| (४) गटवार मुळाक्षरें | ०—८—० |

उपासना वगैरे माल व्यापारी भावानें मागवा.

**ज्यो त्स्ना प्र का श न**

**माधवदास प्रेमजीची चाळ :**
**५५।१४ मुगभाट, मुंबई ४**

## प्रत्येकाचें राशिभविष्य

मनुष्याच्या जन्मकालीं आकाशांत चंद्र ज्या राशींत असेल तीच त्या मनुष्याची जन्मराशि असें म्हणतात. त्या राशीपासून या वर्षाचीं ग्रहभ्रमणें विचारांत घेतलीं तर राशिभविष्याचा अंदाज अशा रीतीनें करितां येतो—

**१ मेषः**—या वर्षी गुरु-नेपच्युनांची जोडी बहुधा तुमच्या राशीसमोर राहाणार आहे. विद्याध्ययनामध्यें उत्तम प्रगति होईल. व्यवसायांतील अडचणी क्रमशः कमी होतील. पूर्ण चौकशी केल्याशिवाय अपरिचित गृहस्थांशीं भागीदारी किंवा अपरिचित कार्यक्षेत्रांत प्रवेश करूं नये. फसगती होतील. या वर्षी जानेवारी, जुलै, सेप्टेंबर हे महिने विशेष खर्चाचे आणि त्रासदायक होतील. नोव्हेंबर, मार्च, एप्रिल, ऑगस्ट हे महिने अनुकूल गोष्टी घडविणारे आहेत.

**२ वृषभः**—अखंड सावधान असावें हा समर्थांचा संदेश या वर्षी लक्षांत ठेवावा. प्रकृतींत जुने आजार असतील तर दुर्लक्ष करूं नये. चोऱ्या, फसवणुकी यांचा त्रास होईल. पण एकंदरींत आर्थिक टंचाईमुळें चिन्ता करीत बसण्याची वेळ येणार नाहीं. डिसेंबर, फेब्रुवारी, एप्रिल, मे हे महिने ठीक आहेत, त्या वेळीं आर्थिक शिल्लक वाढेल. मंगल कार्यांत आणि सार्वजनिक उत्सव समारंभांत भाग घ्यावा लागेल. धंद्यामध्यें व नोकरींतही वातावरण अनुकूल राहील. या वर्षी बेकार राहाण्याची वेळ येणार नाहीं. जानेवारी, जून, जुलै, ऑगस्ट, हे दिवस नुकसानकारक होतील. त्या वेळीं प्रेमसंबंध, व्यसनी लोकांशीं मैत्री, यांपासून दूर राहावें. आर्थिक जबाबदाऱ्या घेऊं नये.

**३ मिथुन :**—हें वर्ष कार्यक्षमता आणि विद्याभ्यास वाढवायला चांगलें आहे. गुरु-नेपच्यून चांगली मदत करतील. मात्र परीक्षेच्या वेळीं अनपेक्षित अडचणी न येण्याविषयीं जपावें. अनेक विषय हाताळण्याचा आव आणूं नका. एकाच ध्येयावर लक्ष केंद्रित करावें म्हणजे हें वर्ष लाभदायक होईल. गृहस्वास्थ्य या वर्षी मनाजोगें मिळणार नाहीं. आर्थिक स्थिति चांगली राहील, पण खर्चंही त्या प्रमाणांत वाढेल. नोव्हेंबर, मार्च, एप्रिल, जून, सप्टेंबर हे महिने लौकिक वाढविणारे आणि अनेक प्रकारें कार्यसाधक ठरतील. डिसेंबर, जानेवारी, जुलै, ऑक्टोबर हे महिने त्रासदायक आणि उधळपट्टी करविणारे आहेत.

**४ कर्कः**—या वर्षी तुमच्या राशीवरील हर्शल तुम्हांला उपद्रव न देतां अनपेक्षित साह्य देऊन पुष्कळ चांगल्या गोष्टी घडतील. मात्र आप्तेष्टमंडळी तुमच्याकडून पुष्कळ फायदा घेतील. तुम्हीं केलेले उपकार किंवा दिलेला पैसा यांचें योग्य चीज या वर्षी मनाजोगें होणार नाहीं. बेकारी नष्ट होऊन व्यावसाय मिळेल. कोर्टकचेरींत भाग घेऊं नये. अध्ययन छान चालेल. जानेवारींत मुलांबाळांच्या प्रकृतीला जपावें. नोव्हेंबर, फेब्रुवारी, एप्रिल, जुलै हे महिने छान असतील. त्या वेळीं गृहस्वास्थ्य चांगलें मिळेल. मे पासून सेप्टेंबरपर्यंत सट्टेबाजी नवीन खरेदी वाढवूं नये. प्रापंचिक कटकटी नेहमीं निर्माण होत राहातील. वर्ष अखेरीस आर्थिक टंचाई देखील भासेल.

**५ सिंहः**—तुम्हांला स्वास्थ्य मिळवून देणारें ग्रहमान यावर्षी दिसत नाहीं. पराक्रम स्थानीं गुरु-नेपच्युनचा सहवास भागीदारी, शेजारी व आप्त यांचेशीं हितसंबंध यांमध्यें दगदगी वाढतील. आर्थिक त्रास वाढेल. अध्ययनांत ग्रहयोग अनुकूल आहेत. शहरी उद्योगधंद्यापेक्षां ग्रामीण

## येतो क्षण एखादा

संध्येच्या घटकांमधिं
सूर्याचें विरतां तप
सरतो मम दैनंदिन
जीवन-यज्ञाचा जप

× ×

मोहरतें स्वप्न उरीं
साकारुनि येतें करिं
नभ अनंत स्पर्शाया
चढतें मन ज्योतिपरी

× ×

मातीमधिं असुनि उभा
ध्यास मला मुक्तीचा
लोचनांत मम निरन्त
स्नेह-दीप भक्तीचा

× ×

रात्रींची नीरवता
आळवित भाव सदा
शब्द-बद्ध होउनि कधिं
येतो क्षण एखादा

प्रफुल्ल-दत्त

व्यवसाय लाभदायक होतील. महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची धडपड यशस्वी होणार नाहीं. डिसेंबर, जानेवारी, ऑगस्ट, सप्टेंबर, हे दिवस त्रासदायक आहेत. नोव्हेंबर, जून, जुलै हे महिने लाभदायक होतील. यांत्रिक कलांमध्यें लाभ ठीक होतील.

**६ कन्याः**—विश्रांति दुर्मिळ करणारें हें वर्ष आहे. मोठ्या संघटना, सार्वजनिक संस्था यांचेशीं घनिष्ठ संबंध येतील. पैसा बरा मिळेल, पण कौटुंबिक आप्तेष्टमित्रांच्या हितसंबंधांत खर्च मनाविरुद्ध वाढेल. भागीदारी फारशी करूं नये. नवीन आश्वासनें कोणाला देऊं नये. कोर्टकचेरींत भाग घेऊं नये. व्यापार ठीक चालेल. बेकारी असल्यास हें वर्ष उत्तम कामकाज मिळवून देईल. नोव्हेंबर, फेब्रुवारी, मे, आक्टोबर हे महिने छान आहेत. जानेवारींत प्रयास करूं नयेत. महत्वाचे करारही त्यावेळीं करणें हिताचें नाहीं. जून, जुलै, ऑगस्ट हे महिने त्रासदायक आहेत. मंगलकार्ये उतावळेपणानें जमवूं नयेत. वर्ष अखेरीला व्यवसाय सुधारेल.

**७ तूळः**—साडेसातीचा शेवटचा शनिकाल तुम्हांला कौटुंबिक त्रास देईल, खर्चही वाढवील. या वर्षी महत्त्वाचे शास्त्रीय विषय अभ्यासावे. नोकरींत नियमाविरुद्ध जाऊं नये. मंगलकार्यें फार चौकशी करून मग जमवावी. शिल्लक कमी उरेल. नोव्हेंबर, फेब्रुवारी, एप्रिल, मे, ऑगस्ट हे महिने छान आहेत. जानेवारी, सप्टेंबर, आक्टोबर हे महिने त्रास देतील. प्रवास कमी करावे.

**८ वृश्चिकः**—शनीचा त्रास चालूच आहे. पण त्यांतही हर्शलच्या शुभ योगानें व्यापारधंदा ठीक चालेल. बेकारी असल्यास कामकाज मिळेल. धंद्यामध्यें धोरणें बदलूं नयेत. अपरिचित कार्यक्षेत्रांचें काम स्वीकारूं नये. विस्मरण, चोऱ्या, खरेदींत फसवणूक वगैरे प्रकार घडतील. नोव्हेंबर, जानेवारी, एप्रिल, ऑगस्ट सप्टेंबर हे महिने चांगले नाहींत. मार्च, मे, जून हे महिने ठीक लाभप्रत आहेत.

**९ धनुः**—हें वर्ष छान आहे. मधून मधून आर्थिक टंचाई भासली तरी पैशांची प्राप्ति व्यवस्थित होतच राहील. घरांत आजार वाढेल. पण आरोग्य चांगलें राहील. यांत्रिक कला, वैद्यकी, वाहनव्यवसाय, बागाईत हे विषय आर्थिक लाभ देतील. आप्तेष्टमित्रांचें साह्य चांगलें मिळेल. कुटुंबांत मंगलकार्यें जमतील. अध्ययन छान चालेल. शनि तुमच्या राशीवर फारसा त्रासदायक होणार नाहीं. जानेवारी, मे, सप्टेंबर हे महिने त्रासदायक होतील. नोव्हेंबर, मार्च, जून हे महिने लाभदायक होतील.


**१० मकरः**—या वर्षी फेब्रुवारीपासून मे पर्यंत तुमच्या राशीला साडेसाती लागणार आहे. पण एकंदरींत व्यवसाय छान चालेल. आर्थिक हितसंबंध सुधारतील. कौटुंबिक जबाबदाऱ्या यशस्वीपणें सिद्धीला जातील. नोकरींत बढतीचा योग येईल. धार्मिक बाबतींत फसवणुकीचा संभव आहे. बुवाबाजीपासून आणि लबाड लोकांपासून दूर राहावें. जानेवारींत मुलांच्या प्रकृतीला जपावें. सट्टे लॉटरीपासून दूर राहावें. डिसेंबर, मार्च, मे, ऑगस्ट, आक्टोबर हे महिने छान लाभदायक होतील.

**११ कुंभः**—या वर्षी अध्ययंन छान चालेल. मात्र परीक्षेच्या ऐनवेळीं गुरु नेपच्यून कांहीं अडचणी आणतील. कौटुंबिक गुंतागुंती वाढतील. पण व्यवसाय छान चालेल. अर्थलाभ चांगला होईल. फसवणुकी आणि चोऱ्या यांचा त्रास होईल. यांत्रिक कला यशस्वी होईल. जानेवारीमध्यें आणि सप्टेंबरमध्यें धंद्याचें स्वरूप वाढवूं नये. नोव्हेंबर फेब्रुवारी, मार्च, आक्टोबर हे महिने छान आहेत.

**१२ मीनः**—या वर्षी आप्तेष्ट मित्रांपासून तुमच्यावर नवीन जबाबदाऱ्या पडतील, आणि त्यांत खर्च व व्याप वाढतील. व्यवहारामध्यें शक्य तों अनुभविकांचा सल्ला घेऊन वागावें. थोडी चूक ही जास्त नुकसानकारक होईल. मुलां-बाळांची प्रकृति सांभाळावी. आर्थिक प्राप्ति ठीक होईल. सट्टे, लॉटरी, स्पर्धा यांपासून दूर राहावें. जानेवारी, ऑगस्ट सेप्टेंबर, नोव्हेंबर हे चार महिने त्रासदायक आहेत. डिसेंबर, एप्रिल, मे, जून हे महिने छान लाभदायक होतील.

●●●

बगीच्यांतील ताज्या फुलांचा
मोहक सुगंध असलेलें
अत्तर लव्ह
वापरून दिपवाळीला सुगंधाची मजा लुटा!
गजानन जनार्दन बोडस, अत्तरवाले
* ठाकुरद्वार : मुंबई नं. २ *



# माझा दिवाळी अंक

**—वि. आ. बुवा**

**" दिवाळी अंक हाहि एक किफायतशीर धंदा आहे. "**

— एक शेंगदाण्याच्या तेलाचा व्यापारी-संपादक.

**" दिवाळी अंक हें जाहिरातींच्याद्वारां पैसे मिळविण्याचें उत्कृष्ट साधन आहे. "**

— एक जाहिरात-एजंट-संपादक.

**" दिवाळी अंक हा आमच्या पोटापाण्याचा धंदा आहे. "**

— एक सर्वसाधारण संपादक.

**" दिवाळी अंक ही सरस्वत्युपासना आहे. "**

— एक मूर्ख संपादक.

**" दिवाळी अंकामुळें वर्षभर रद्दीचा छान पुरवठा होतो. "**

— एक किराणा मालाचा दुकानदार.

दिवाळी अंकाबद्दलचे प्रत्येकाचे प्रातिनिधिक दृष्टिकोन मीं वर दिले आहेत. आणखीहि पुष्कळ देतां येतील. परंतु लेखाच्या सुरुवातीलाच फार कोटेशन्स देऊं नयेत अशी विद्वज्जनांची प्रथा आहे. कारण शिल्लक कोटेशन्स जणुं कांहीं स्वतःलाच सुचलीं आहेत अशा थाटांत लेखांतील मजकुरांत घुसडण्यासाठीं आवश्यक असतात ना! याच्या बुडाशीं हा व्यावहारिक दृष्टिकोन आहे. कांहींहि असो. आपल्या या परमपवित्र मराठी भाषेच्या नगरींत ब्रह्मविद्येचा सुकाळु होण्याऐवजीं दिवाळी अंकाचा सुकाळ मात्र फारच झालेला दिसून येत आहे.

लढाया मारणाऱ्या आपल्या या श्रीशिवछत्रपतींच्या मुलुखांत वाङ्मयप्रेमाचा हा प्रचंड उमाळा कसा काय निर्माण झाला ही एक संशोधनाचीच बाब ठरावी. शिवाजीनें बालपणीं काय रामायण-महाभारताचें श्रवण वाचन केलें असेल तेवढेंच. या व्यतिरिक्त त्यानें कांहीं सॉलिड वाचन केलें असेल असा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नसावा. तेंच लिहिण्याच्या बाबतींतहि. शिवाजीनें कथा-कविता लिहिल्याचें मुळींच ऐकिवांत नाहीं. नाहीं म्हणायला त्यानें मानसिंगाला एक प्रदीर्घ पत्र लिहिलें होतें. अशी वस्तुस्थिति असतांना या महाराष्ट्रभूमींत सहस्रावधि पुस्तकें निघतात; शेंकडों मासिकें निघतात; दिवाळी अंकांचे टेकड्यांपासून डोंगरांएवढे ढीग निर्माण होतात.— आणि भाऊबीजेपर्यंतच सर्व दिवाळी अंकांची विल्हेवाट निरनिराळ्या मार्गांनीं चोख लागते.

मी लेखक असल्यामुळें माझा मासिकांशीं घनिष्ठ (अनिष्टहि) संबंध आहे. अनेक मान्यवर संपादक माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. कांहींना दिवाळी अंकाच्या कामांत मीं कांहीं प्रमाणांत संपादकीय साहाय्यहि केलें आहे. आणि करीत असतोंहि. गेलीं दोन तीन वर्षें मला कुठल्या तरी अंकाच्या संपादकीय कामाची 'सुपारी' येत असते. यावरून मला एक गोष्ट कळून आली कीं, माझ्या अंगीं दिवाळी अंक काढायला लागणारे सद्गुण आहेत. जर हे सद्गुण माझ्या मालकीचे आहेत तर त्यांचा उपयोग दुसऱ्यांचे दिवाळी अंक सजविण्यापेक्षां स्वतःच एखादा दिवाळी अंक काढून ते सार्थकीं लावले तर ते सद्गुण अधिक शोभायमान दिसतील असें मला वाटलें.

माझ्या मनानें 'दिवाळी अंक' काढण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें मी तयारीला लागलों. माझ्या स्वतःजवळ कांहीं

पैसे होतेच ( शप्पत ! ) कांहीं पैशांसाठीं सासऱ्यापुढें हात पसरला. कांहीं उधारी केली. कांहीं उसनवारी केली. कांहीं वायदे केले आणि पैसा उभा केला.

अंकाचीं चक्रें फिरूं लागलीं. साडेतीन आम मराठी जनतेला या ' न भूतो न भविष्यति ' अशा अनुपम अंकाची माहिती व्हावी म्हणून नागपूरपासून कोल्हापूरपर्यंत बऱ्याच वर्तमानपत्रांत जाहिरात दिली. गांवोगांवच्या एजंटांचे पत्ते जमवून त्यांना प्रेमपत्रें लिहिलीं. हा झाला व्यावसायिक भाग.

नंतर मी लेखकाकडे वळलों. महादेवशास्त्री जोशी, व्यंकटेश माडगूळकर, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, अं. शं. अग्निहोत्री, अनंत काणेकर, शांता शेळके, द. मा. मिरासदार प्रभृति प्रसिद्ध लेखकांना दिवाळी अंकासाठीं उत्तमोत्तम साहित्य पाठविण्याबद्दल विनंतिपत्रें लिहिलीं. बहुतेक साहित्यिक माझ्या परिचयाचे असल्यामुळें मला त्यांच्याकडून आनंदानें होकार आला.

आतां तिसरी आघाडी म्हणजे जाहिरातींची. दिवाळी अंकांत काय किंवा नेहमींच्या अंकांत काय ही आघाडी नेहमींच भक्कम असावी लागते. दोन रुपये देऊन अंक विकत घेणाऱ्या जनतेकडून दिवाळी अंकाचा खर्च कधींच भागत नसतो. शिवाय जनता मोठी चत्कारिक असते. आम्ही संपादक ज्यांना पैसे देऊन साहित्य छापतों तें वाचायला ती उत्सुक असते; आणि ज्यामुळें आम्हांला चार पैसे मिळतात अशा जाहिरातीमात्र ती वाचत नाहीं. खरें म्हणजे नॉव्हेल्टी म्हणून का होईना एखादा जाहिरात-विशेष अंक निघाला पाहिजे; आणि फिल अप म्हणून मधून मधून एखादी कविता, एखादी लघुतम कथा, एखादी किंचित्-कविता घालावी.

एकंदरींत मीं दिवाळी अंकाची प्राथमिक तयारी सुरू केली. कागदवाला आणि छापखानेवाला या दोन सर्वांत महत्त्वाच्या व्यक्ती असतात. त्यांना परिचितांच्या मध्यस्थीनें गांठलें. कागदवाल्याकडे तशी मध्यस्थीची आवश्यकता नसते. कारण ते (लेकाचे) सारा व्यवहार रोखीनेंच करतात. त्यांना अजून सरस्वत्युपासनेचें महत्त्व कळलेलें दिसत नाहीं. म्हणून ते माल उधार द्यायला टाळाटाळ करतात. मराठी भाषेचें दुर्दैव. दुसरें काय ?

एके सुदिनीं सरकारदरबारीं जाऊन मीं ' डिक्लेरेशन ' या नांवाचा विधि पार पाडला. सरकार भारीच प्रेमळ माणूस. आपण करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीची त्याला भारी आस्था. यास अनुसरून सरकारनें माझें सत्कार्यहि मोठ्या आपुलकीनें आपल्या दफ्तरीं नोंदवून ठेवलें.

अंकाच्या आंतील चित्रांसाठीं तीन चार होतकरू चित्रकारांना प्रसिद्धीचें आमिष दाखवून गटवून ठेवलें. तसा थोडा मोबदलाहि देण्याचें ठरविलें. या बाबतींत माझा एका चित्रकाराशीं झालेला संवाद खाली देतों.

' मुंगी ' या विषयावर एका लेखकानें, कोणत्या तरी इंग्रजी पुस्तकांतून मारलेला लेख माझ्या दिवाळी अंकासाठीं पाठविला होता. या लेखाचें चित्र करायला मीं एका चित्रकाराला सांगितलें. त्या चित्रकारानें टेकडी काढावी त्याप्रमाणें एक वेडावांकडा त्रिकोण वारूळ म्हणून काढला आणि वारुळाच्या आंत मुंग्या आहेत अशी कल्पना यावी म्हणून वारुळाबाहेर आठ दहा ठिपके काढून मुंग्यांना जन्म दिला. झालें चित्र. असल्या चित्राला चार दोन रुपये का होईना देणें मला जड वाटूं लागलें. मीं त्याला एक नया पैसा या दरानें दहा मुंग्यांचे दहा नये पैसे आणि वारुळाचे पांच नये पैसे मिळून एकंदर पंधरा नये पैसे देऊं केले. हें पाहून तो मला म्हणाला, " हें हो काय ? हा कसला किंचित् मोबदला ? "

" किंचित् चित्राचा मोबदलाहि किंचित्‌च ! " मीं सांगितलें, " अहो मुंगीच्या चित्राला जर मी रुपये मोजूं लागलों तर हत्तीच्या चित्रासाठीं मला तुम्हांला लाखों रुपये द्यावे लागतील. तेवढे पैसे आहेत कुठं माझ्याजवळ ? तर आपण आतां असं करूं या. आपण या बाबतींत एक दरपत्रकच तयार करूं या.

" म्हणजे कसं ? " चित्रकारानें विचारलें.

" ऐका. कथेच्या चित्रांत पुरुष किंवा स्त्री असली तर नगास दहा नये पैसे देईन. बारा वर्षांखालील मुलास पांच नये पैसे देईन. आणि तान्हें मूल असल्यास कांहीं देणार नाहीं. "

" अहो ही आगगाडीच्या तिकीटांच्या दराची भाषा झाली. " चित्रकार म्हणाला.

" असूं द्या हो, हा व्यवहार आहे. वडाचं झाड काढलं तर दहा नये पैसे मिळतील आणि तुळशीचं झाड काढलं तर एक नया पैसा मिळेल. "

“ हे तुमचे दर निराळेच दिसतात. बाकीचे मासिकवाले असला उपद्व्याप करीत नाहींत.” चित्रकार कुरकुरूं लागला.

“ अहो आम्हांला एंटायर्ली आगळा अंक काढायचा आहे. त्याची ही चुणूक आहे. तुम्हांला प्रसिद्धी पाहिजे कीं पैसे ? ” मीं पेंचाचा प्रश्न टाकला.

“ म्हणजे...पैसे पाहिजेत...नाहीं...प्रसिद्धी पाहिजे. ” चित्रकार चांचरत म्हणाला.

“ हां. मीहि तेंच म्हणतों. तुम्ही प्रसिद्ध व्हा अगोदर. मग दुसऱ्या मासिकांकडून खोऱ्यानं पैसे ओढा. कोण नको म्हणतंय् ? मीं त्याला, हलवायाच्या दुकानावर तुळशीपत्र ” या थाटाचें प्रोत्साहन दिलें, “ पाहिजे तर आम्ही त्यावेळीं तुम्हांला आमच्या खर्चानं खोरं पुरवूं. ” मी त्याला आणखी गटवला.

अंक काढायचा म्हटलं कीं कमींत कमी एक तरी कारकून पाहिजे. व्याप कमी का असतो ? लेखकांचा पत्रव्यवहार आहे, एजन्सीचा पत्रव्यवहार आहे, जाहिराती आहेत, हिशेब आहे, नाना भानगडी असतात. माझ्या ओळखीची एक मालन मोहिले या नांवाची एस्. एस्.सी. झालेली मुलगी आहे. ( दिसायला बरी असूनहि ) अजून बेकारच होती. मीं तिला, “ महाराष्ट्र-शारदेची सेवा करतेस काय ? ” म्हणून विचारलें. आणि त्या बाळीनेंहि मला लगेच होकार दिला. ( स्वतःच्या दोन चार भिकारतम कविता अंकांत छापवून आणण्याच्या दुष्ट आणि गुप्त हेतूनें तिनें हा होकार दिला होता हें माझ्या टाळक्यांत भलत्याच उशीरां आलें. )

सुप्रसिद्ध लेखक-कवींना पुनः पुनः स्मरणपत्रें पाठवून पोस्टखात्याची वार्षिक तूट भरून काढण्याचा सदुद्योग आम्हीं सुरू केला. मी कार्यबाहुल्यांत असल्यामुळें पत्रें लिहिण्याचें काम मीं मालनवरच सोपविलें. ( ‘कार्यबाहुल्य’ हा शब्द मला फार आवडतो. मी अगदीं रिकामटेकड्यासारखा बसलेला असलों आणि हा शब्द उच्चारला तरीहि आपण अनेक कार्यांच्या उचापतींत गढून गेलों आहोंत असा छान भास होतो. म्हणून मला विशेष काम नसलें कीं मी हा शब्द वापरतों. )


# मे. नानिवडेकर आणि मंडळी

ईश्वरभुवन : कांदेवाडी : मुंबई नं. ४

( शाखा : कांदेवाडी ठाकुरद्वार कॅनेडीब्रिज )

सर्व प्रकारचा किराणा व स्टेशनरी माल मिळण्याचें
मुंबईतील एक फार जुनें व नामवंत दुकान

सर्व प्रकारचे मसाले, पापड व लोणचींही मिळतात.

आमच्या असंख्य ग्राहकांना दिवाळीचें शुभचिंतन

मालनचें मराठी भाषेचें ज्ञान फारच 'बंधनापलीकडे गेलेलें आहे. 'फ्री स्टाइल मराठी' हें तिच्या मराठीचें नजरेंत भरणारें खास वैशिष्ट्य. चुणूक म्हणून तिनें एक लेखकाला लिहिलेलें खास तिच्या (अ) शुद्धलेखनाचें पत्र वाचा.

श्रि ......कार्यालय.

मुंबई

दि. ............

श्री. म्हादेवशास्त्री जोशि यांस शी. सा. न. वि. वी.

आमच्या दीवाळि अंक्रासाठीं गोस्ट पाठवा म्हणुन आम्हि तुम्हांला लीहीलेलि दोन्हि पत्रें मिळाली असतिलच. तुम्हि अजुन तुमच्याकडुन गोस्ट पाठवीलि नाहिं म्हणुन हे पुन्ह पत्र लीहित आहे. क्रुपा करून हे पत्र पाहतांच ताबडतोब एक प्रदिर्घ कथा लिहुन संध्याकाळच्या टपालान पाठवावि वाट पहात आहे. तूमचि गोस्ट पहीलीच छापण्याचि आमचि इच्छा आहे. तरि पत्र पोंचुतांच लगेल लीहायल बसावें. गोस्ट वेळेवर आलि म्हणजे शूध्यलेखन वगैरे निट बघता येते. असो. गोस्ट लौकर पाठवावि अशी आग्रहाचि जैहिंद आहे. कळवे. आपली

माल नमोहिले

संपादकाकरितां

वर मासला दिला आहे. सर्व लेखक-कवींना मालनने अशींच दिव्य पत्रें पाठविलीं होतीं. हेंहि माझ्या टाळक्यांत खूप उशीरां आलें. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला — मोठ्या साहित्यिकांनीं दिवाळी अंक काय दर्जाचा निघणार आहे हें चटकन् ताडलें आणि आपल्या साहित्याचें मुद्राराक्षसाकडून बरें वाईट होऊं नये म्हणून विविध सबबी कळवून (अथव न कळवून) साहित्य पाठविण्याचें टाळलें.

मोठ्या साहित्यिकांच्या बाबतींत हें झालें. परंतु त्याच वेळी प्रसिद्धी-बुभुक्षित अशा असंख्य वखवखलेल्या आत्म्यांनीं अनाहूत प्रचंड प्रमाणांत लेख पाठवून मला हैराण हैराण करून टाकलें. चारदोनजणांनीं साहित्यासोबत परतीचीं तिकिटें ठेवण्याऐवजीं पांच रुपयांच्या, दहा रुपयांच्या नोटाच ठेवल्या होत्या. हेतु हा कीं, या नोटा पाहून तरी मीं त्यांच्या साहित्याचें सम्यग् मूल्यमापन करावें आणि छापावें. आणि झालेंहि असेंच. साहित्याचें मूल्यमापन करण्याची शक्ति पैशांच्या ठायीं असते. हा शोध मला लागला. आशय, अभिव्यक्ति, कलात्मकता, रंजकता, बोधप्राचुर्य, कथनचातुर्य, तिरकस आशय इत्यादि शब्दांच्या अदृश्य फुटपट्ट्या लावून साहित्याचें केलेलें मूल्यमापन अगदीं मोघमच काय परंतु परस्परविरोधीहि होतें हें एकाच साहित्याचें निरनिराळ्या विद्वानांनीं केलेल्या परीक्षणांच्या मतभेदावरून स्पष्टपणें दिसून येतें. 'अ' नामक विद्वानानें म्हणायचें कीं, 'या लेखांत श्री. क्ष यांच्या बुद्धिवादाची उंची नजरेंत भरावी' आणि नेमक्या त्याच लेखाबद्दल श्री. ब यांनीं छातीठोकपणें सांगायचें कीं, 'श्री. क्ष यांच्या या लेखांत भावनेची खोली प्रकर्षानें जाणवावी.' आतां आली का पंचाईत? बुद्धिवादाच्या उंचीचा डोंगर आणि भावनावादाच्या खोलीची दरी म्हणजे केवढें दांडगें अंतर! खांडेकरांच्या तावडींत हें वाक्य सांपडलें असतें तर त्यांनीं लगेच त्यावर 'दोन टोकें' या नांवाची कादंबरी लिहून टाकली असती; आणि तिच्यांतील नायकाच्या तोंडीं, 'जीवन हा बुद्धीचा डोंगर नसून भावनेची खोल दरी आहे' असें सुभाषित-'वजा' वाक्य घातलें असतें. (म्हणून माणूस वारंवार खड्ड्यांत पडत असतो.)

ज्यांच्या साहित्याबरोबर लक्ष्मी पाठराखीण म्हणून आली होती त्यांचें साहित्य मीं सर्वांत अगोदर पसंत केलें. असें साहित्य कधींच परत करतां येत नाहीं. जाहिराती आपण कधीं परत करतों का? मुळींच नाहीं. जाहिरातींमुळें (वसूल झाले तर) द्रव्यलाभ असतो. मग जाहिरातींतील मजकूर कांहीं का असेना.

कथेंत अघटित किंवा अतार्किक घटना दाखविल्या कीं, कथेला अवास्तवतेचा वास आणि असंभाव्यतेचा स्पर्श जाणवतो अशा सबबीखालीं संपादक ती परत पाठवून देतात. परंतु त्याच वेळीं तेच संपादक, कार्यसिद्धि ताईत बांधल्यामुळें नोकरीधंदा, व्यापार, प्रेम, कोर्ट, खटले, मृतांची गांटभेट, सावकाराची टाळाटाळ, रेस, सट्टा, जुगार, पुत्रप्राप्ति इत्यादि यच्चयावत् बाबतींत हमखास यश देणाऱ्या जाहिराती मात्र छापतात. हें असें कां? याचें उत्तर पैसे! पैसे बरं पैसे! लेखकाला पैसे द्यायचे असतात आणि जाहिरातदारांकडून पैसे यायचे (किंवा येणें) असतात हा याच्या बुडाशीं असलेला फरक आहे.

आतां माझ्याकडे कसलें कसलें साहित्य आलें याची माहिती देतों. 'पाचक' मासिकें (डायजेस्ट) फार निघाल्यामुळें आणि अशा मासिकांतील, वाचकांनाच लेखक 'बनविणाऱ्या' सदरांचा सुकाळ झाल्यामुळें, मुंबई, बेळगांव,

कारवारसहित अखिल संयुक्त महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व लोक (तान्हीं मुलें सोडून) लेखक झाले आहेत. त्यामुळें साहित्याचें उत्पन्न फारच प्रचंड प्रमाणावर चाललेलें असतें. पापड लाटावेत तसे लोक कविता लाटत बसलेले असतात. एखाद्या परदेशी पाहुण्यानें मुंबई, पुणें, नागपूर, किर्लोस्करवाडी इत्यादि शहरांना भेटी द्याव्या त्याप्रमाणें एकेका लेखकाची तीच ती गोष्ट वरील शहरांना (म्हणजे तेथील मासिकांना) भेटी देऊन बूमरँग सोडल्याप्रमाणें बरोबर परत स्वस्थानीं येऊं लागली.

माझ्याकडे आलेल्या बहुतेक साहित्याचा प्रकार डायजेस्ट पध्दतीच्या मासिकाला अनुरूप होता. म्हणून मला माझ्या अंकाचें स्वरूप डायजेस्ट पध्दतीचें करणें ओघानेंच भाग पडलें. काय करणार ! म्हणतात ना, वारा येईल तशी पाठ फिरवली पाहिजे आणि पोरी येतील तसें तोंड फिरवलें पाहिजे.

किरकोळ मजकुरानें तर जीव नक्कोसा केला. टपाल फोडलें कीं, चिल्लर मजकुरांच्या चिटोऱ्या टेबलावर इतक्या पडूं लागल्या कीं त्या आवरतां आवरतां माझ्या नाकीं नऊ अन् मालनच्याहि नाकीं नऊ मिळून दोघांच्या नाकीं अठरा आले.

अमृत, नवल, संजय इत्यादि डायजेस्टांतील विविध सदरांतून जो मजकूर असतो तसलाच – परंतु आगळाच भिकारपणा असलेला – मजकूर माझ्याकडे घाऊक प्रमाणांत आला. म्हणून मींहि निरनिराळ्या सदरांना अमृत–नवल सारखींच, परंतु निराळीं नांवें दिलीं.

'किलबिल'च्या ऐवजीं 'चिमण्या चोंचींतील चाटूक्ति.' 'उपसंपादकाच्या डुलक्या' ऐवजीं 'घोरी घराण्यांतले उपसंपादक,' 'मुद्राराक्षसाचा विनोद' ऐवजीं, 'जुळाऱ्यांचा 'ध' चा 'मा'' 'जाहिरातदारांचा विनोद' याऐवजीं 'जाहिरातदारांची विनोदी वाङ्मयांतील कामगिरी' अशीं नवीं सदरें मीं पाडलीं.

आतां विविध सदरांतील आणि सदरांव्यतिरिक्त जें जें साहित्य आलें त्यांचीहि झलक मी खाली दाखविणार आहें.

## चिमण्या चोंचींतील चाटूक्ति

—एकदां आम्ही रात्रीं आठच्या सुमारास भाजी घेऊन घरीं परत येत होतों. आमच्याबरोबर आमचा छोटा सुधीरहि होता. समोरून एक मोटर येत होती. त्या मोटारीचा एकच


आमच्या ग्राहकांना ही दिवाळी आनंदाची जावो !

**बेलापूर पेपर मिल्स**

टिटागर पेपर मिल्स, बेंगॉल पेपर मिल्स

यांचा क्राऊन व डेमीचा प्रिंटिंग पेपर स्वच्छ पांढरा गुळगुळीत

**पुस्तकांसाठीं वापरा**

याशिवाय सर्व प्रकारचा देशी व परदेशी [ प्रिंटिंग व आर्टपेपर ] कागद मिळतो.

**पटेल पेपर मार्ट**

(टेलिफोन नंबर ७२५२३)

खत्तरआळी गल्ली : मुंबई ४

दिवा लावलेला होता. तें पाहून आमचा छोटा सुधीर मला म्हणाला, "बाबा, बाबा तें पहा. ती मोताल कशी डोला मारते!" हें ऐकून आमची हंसून हंसून मुरकुंडी वळली आणि थोड्या वेळांत पोटहि दुखूं लागले.

— चा. व. टकले

( ही काय चाटूक्ति आहे काय म्हणायला? सरळ चावटोक्ति आहे. पोरं काय अशी किलबिल करतात होय? ही चक्क पोराच्या बापानेंच केलेली किलबिल आहे हें उघड दिसतें. म्हणून मी 'चावट चोंचीतील चाटूक्ति' हें नवें सदर सुरू करून त्यांत ही उक्ति टाकण्याचें ठरविलें. )

—आम्ही एकदां मुंबईहून कल्याणला लोकलगाडीनें आलों. प्लॅटफॉर्मवर उतरल्यावर आम्हीं गाडीच्या कडेनेंच चाललों होतों. आमच्याबरोबर आमची छोटी चारुभाषिणीहि होती. ती बोलण्यांत फारच चुणचुणीत आहे. गाडीच्या ड्रायव्हरनें व्हॅक्यूम सोडला तेव्हां खूप जोरानें 'टुस्स्स्' असा आवाज झाला. तेव्हां आमच्या चारूनें तोंडावर हात ठेवून आणि लाजल्याचा अभिनय करून म्हटलें, "अय्या! आई, गाडी कित्ती मोठ्यांदा पादते ग!" हें ऐकतांच माझ्याप्रमाणेंच स्टेशनवरील कितीतरी लोकांचीं हंसून हंसून पोटें फुटलीं. ( खरोखर नाहीं. आपलीं खोटीं खोटीं. )

— सौ. मंगला पावटे

—एकदां आमचा छोटा सुभाष माझ्याप्रमाणेंच कागद पेन्सिल घेऊन मोठ्या ऐटींत लेख लिहीत बसला होता. ( मी 'जनज्ञानाचा सामोसा' या वृत्तपत्रीय सदरासाठीं पत्रें लिहीत असतांना गुलामानें पाहून ठेवलें होतें. ) तें पाहून शेजारच्या देशपांड्यांच्या विमलताई माझ्या हिला सहज म्हणाल्या, "तुमचा सुभाष म्हणजे बापसे बेटा सवाई दिसतो."

सुभाषनें तेवढें लक्षांत ठेवलें; आणि मीं संध्याकाळीं घरीं आल्यावर ( मी ए. जी. च्या ऑफिसांत इन्वर्ड क्लार्क आहे. सरकार पगारवाढ कधीं करणार कोणास ठाऊक? ) त्यानें मला विचारलें, "बाबा, तुमचें वय काय?"

"चाळीस." मी म्हणालों.

थोडा वेळ तोंडानें कांहीं तरी पुटपुटून सुभाष मला म्हणाला, "मग मी पन्नास वर्षांचा आहे पहा!"

"तें रे कसं काय?" मीं आश्चर्यानें विचारलें.

"सकाळीं विमलताई मला म्हणाल्या," सुभाष सांगूं लागला, "कीं, मी बापसे बेटा सवाई आहे. आतां तुम्ही चाळीस वर्षांचे आहांत तर मग मी चाळीस सव्वं पन्नास वर्षांचा आहे कीं नाहीं बोला?"

सुभाषचें गणितविषयाचें ज्ञान पाहून आम्ही कमालीच्या बाहेर थक्क झालों. आम्ही त्याला रँग्लर करणार आहोंत. त्याची आम्ही संध्याकाळीं दृष्टहि काढली.

— था. पा. मारेकर.

— मी एकदां आमच्या छोट्या प्रियंवदेला घेऊन 'सीताहरण' हा सिनेमा पहायला दुपारचाच गेलें होतें. ( संध्याकाळच्या खेळाला गेलं कीं स्वयंपकाची पंचाईत होते बाई. ) सिनेमा सुरू झाला. कांहीं वेळानें सीता अशोकवनात एका झाडाखालीं बसल्याचें दृश्य पडद्यावर दिसत होतें. सीतेच्या अंगांत, पौराणिक पोषाखास अनुसरून चोळी नव्हती. फक्त काचोळी होती. तीहि पदराआड होती. तिचे दंड उघडे होते. हें पाहून प्रियंवदा खणखणीत आवाजांत मला म्हणाली, "आई, त्या झाडाखालीं कोण ग वडारीण बसली आहे?"

"अग ती वडारीण नव्हे. सीता आहे." मीं सांगितलें.

"अग पण तिच्या अंगांत चोळी कुठं आहे?" तिनें पुन्हां खड्या आवाजांत विचारलें.

हें ऐकतांच शेंकडों चेहरे हंसल्याचें अंधारांतून स्पष्ट ( म्हणजे अस्पष्ट ) दिसत होतें. आणि विशेष म्हणजे पडद्यावरील सीताहि हें ऐकून हंसली असें मला वाटतें.

— सौ. रतन वि. चित्रे

— मी एकदां माझ्या मित्राबरोबर फोर्ड मोटरीबद्दल बोलत होतों. जवळच आमचा छोटा अनिल उभा होता. मी मित्राला सांगत होतों, "या फोर्डची बॉडीच बघ ना, किती टिकाऊ अन् सुंदर असते ती."

"बाबा, फोर्ड कोण हो?" अनिलनें मला मध्येंच विचारलें.

"तो एक मोठा पुरुष होऊन गेला." मीं थोडक्यांत सांगितलें.

"अरे बाप रे! तो पुरुष असून सुंदर सुंदर बॉडी घालतो? मग तो बायकांसारखं झंपरहि घालीत असेल?" अनिलनें शंका विचारली.

अनिलचें स्त्रियांच्या वस्त्रोपवस्त्रांबद्दलचें हें ज्ञान पाहून आम्हीं दोघेहि उत्तम प्रकारें थक्क झालों.

— वं. ड. लघाटे

( ही चावट किलबिल वाचून मीहि थक्क झालों. म्हणून मी ही किलबिलदेखील ' चावट चोंचींतील चटूक्ती 'मध्यें टाकली. )

' चिमण्या चोंचींतील चाटूक्ति ' अशा अनेक सुरस आणि चमत्कारिक बाल (?) आख्यायिका आल्या होत्या. आतां दुसऱ्या सदराची झलक बघा.

जुळाऱ्याचा ' ध ' चा ' मा '

—रोखीचा धंदा : काल शहरांतील सर्व वेश्यांची ( वैश्यांची ) सभा भरली होती. आपला व्यवहार रोखीनेंच करावा असें त्या सभेंत ठरलें.

—वेल्हाळ श्यामराव गामी.

—सरकारचा मूर्खपणा : सरकारनें सुशिक्षित बेकारां-कडून कर्ज ( अर्ज ) मागवले आहे.

— धं. दा. अिल्ले

—नव्या नेमणुका : श्री. हरिभाऊ पाटसकरांना मद्य-प्रदेशाचे ( मध्यप्रदेशाचे ) राज्यपाल नेमण्यांत आलें असून कैलासवासी ( नाथ ) काटजू यांना मुख्य मंत्री करण्यांत आलें.

— फे. क. बंडले

— अजब नवरा : पार्लमेंटचें अधिवेशन सुरू व्हायला आलें होतें. तेवढ्यांत खालदार श्री. ...... हे लगबगीनें काखेंत बाइल (फाइल) घट्ट धरून सभागृहांत गेले.

— दे. तो. दडपून

—बिचारे कारकून : आज लोकलगाड्यांच्या लाइनवर बिघाड झाल्यामुळें सर्व कारकून कचऱ्यांत (कचेऱ्यांत) उशीरां गेले.

— उ. की. रडे

आतां आणखी एका सदराची ओळख करून घ्या.

जाहिरातदारांची विनोदी वाङ्मयांतील कामगिरी.

— पिष्टपेषण : पीठ दळण्याची गिरणी. आमच्या गिरणींत सर्व प्रकारचीं पिठें दळून मिळतात.

—बादशाही साबण : केशवर्धक औषधींनीं युक्त असलेला आणि दशदिशांत सुगंध दरवळविणारा आमचा बादशाही साबण वापरा आणि खात्री करून घ्या.

—विलक्षण तोडगा : मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होण्या-साठीं आमचें मूळव्याधीवरचें रामबाण औषध घ्या.

— अजब कुत्रा : दोन फूट लांब काळे कान असलेलें कुत्रें हरवलें आहे. आणून देणाऱ्यास धन्यवाद देण्यांत येतील.

—घातकी तेल : आमचें सुखनिद्रा तेल रात्रीं डोक्याला लावून झोंपल्यास इतकी गाढ झोंप लागते कीं, चोर येऊन चोरी करून गेले तरी पत्ता लागत नाहीं.

आणखी एक सदर पहा.

## ' घोरी ' घराण्यांतील उपसंपादक

— काय हा चावटपणा ? बड्या राष्ट्रांनीं अनुवस्त्राची ( अणुअस्त्राची ) चांचपणी ( चांचणी ) बंद केल्यावांचून तरुणोपाय ( तरणोपाय ) नाहीं.

— वं. ड. लवाडे.

— जमिनीला बायकी रोग : शेतजमिनीच्या धुपणीचा ( धूप ) विचार कालच्या सभेंत करण्यांत आला.

— आ. हे. खोटे

— मरणोत्तर बाधा : तिनें मेल्यावर शव वैद्यकीय कॉलेजला द्यायला सांगितलें.

— चा. र. शेवीसकर.

— दांडगी तयारी : " एवढीं मुलें कोठून आणलीं, " असें पं. नेहरूंनीं सभाचालकांना विचारलें असतां ते म्हणाले, " आम्ही गेल्या कित्येक वर्षांपासून आजच्या या समारंभाची तयारी करीत आहोंत.

— द्या. व. टपले.

वर कांहीं नेहमींच्या सदरांतील मजकूर दिला आहे. याशिवाय विविध माहिती म्हणून आणखीहि गंमतीचा मजकूर माझ्याकडे आला होता. त्यांतील कांहीं नमुना खालीं देत आहें.

## देशोदेशींचीं पाप-पुण्यें

प्रत्येक देशांत पापपुण्याच्या कांहीं कांहीं कल्पना मोठ्या मजेशीर असतात. नमुन्यादाखल खालीं कांहीं उदाहरणें देत आहें.

—राष्ट्रगीत चालू असतांना माणसानें आपलें नाक निदान तीनदां तरी खाजवावें. नाहीं तर निश्चलपणानें उभें राहिल्याचें पाप लागतें अशी भारतांत पापाबद्दलची एक कल्पना आहे. भारतीय लोक धार्मिक मनोवृत्तीचे असल्यामुळें ते हें पाप कटाक्षानें टाळतात.

—शेजाऱ्याचें उघडें कार्ड पोस्टमननें रस्त्यांत आपल्या जवळ दिलें असतां आपण तें न वाचतांच शेजाऱ्यास दिलें तर महापाप लागतें अशी 'नेबरलंड' मधील लोकांची समजूत आहे.

—शेजारी कुलूप लावून बाहेर गेले असतां त्यांची यथास्थित निंदा नाहीं केली तर चक्क नरकवास भोगावा लागतो अशीहि एक समजूत 'नेबरलंड' मधील लोकांत आहे. येथील लोकहि पापभीरू असल्यामुळें तेहि असलीं पापें आपल्या हातून न होण्याची नेहमीं दक्षता घेतात.

—पावसाळ्यांत पावसानें ओलीचिंब झाल्यामुळें जिचीं वस्त्रें अंगाला चिकटलीं आहेत आणि त्या पारदर्शक वस्त्रांतून जिचे अवयव कमी जास्त प्रमाणांत दिसत आहेत, अशा तरुण 'वसंतसेने'कडे एखाद्या दिव्याच्या खांबाची किंवा झाडाची धडक लागेपर्यंत वळून वळून पाहिलें म्हणजे नरदेहाचें सार्थक होतें आणि अंतीं ब्रह्मपदीं नाचण्याची संधीहि मिळते असें 'चतुःशत-विंशति प्रदेशां'त मानतात.

—लग्नाच्या समारंभांत आपण नजर चुकवून निदान दोनदां तरी आईस्क्रीम खाल्लें नाहीं तर चित्रगुप्ताच्या वहीवर आईस्क्रीमच्या भारंभार पाप नोंदलें जातें अशी समजूत 'आईसलंड' मधील लोकांत आहे.

●

हल्लीं शोधज्योतीचें युग आहे. कोणी कशावर प्रकाश टाकतो, कोणी आणखी कांहीं उजेडांत आणतो. कोणाच्या मतें झांशीची लक्ष्मीबाई तशी कांहीं मोठी स्वातंत्र्यप्रिय लागून गेली नव्हती, तर कोणाच्या मतें राम हा अनार्य आणि लबाड होता. या विध्वंसक मनोवृत्तीचें दर्शन घडविणारा एक भयंकर आणि क्षणाक्षणाला हादरे देणारा एक लेख माझ्याकडे आला होता. त्याचें थोडक्यांत सार मी पुढें देत आहें.

## रामायणावर शोधज्योत

राम आणि रावण या दोघांचेंहि सीतेवर प्रेम होतें. सीतेचें मात्र रावणावर प्रेम होतें. (हादरा) याचीं कारणें दोन. एक म्हणजे बायकांना दागिन्यांचें दांडगें आकर्षण असतें. लंकेंत तर विटा देखील सोन्याच्याच असतात. यास भुलून तिचें रावणावर अधिक प्रेम असणें अगदीं शक्य होतें. आतां दुसरें कारण, स्त्रियांना चुंबनेंहि आवडतात. रावणावर प्रेम केलें तर आपल्याला त्याच्या दहा तोंडांमुळें एका वेळींच दहा दहा चुंबनें मिळतील हें काळकाम वेगाचें अंकगणित जाणणाऱ्या सीतेनें हेरलें होतें.

शिवधनुष्य उचलण्याचें स्वयंवरहि तिनें मनांत विशिष्ट हेतु धरूनच मांडलें होतें. तें जड धनुष्य रावणाशिवाय दुसऱ्या कोणालाच उचलतां येणें शक्य नव्हतें. (अशी तिची समजूत होती.) त्यामुळें रावणाच्या गळ्यांतच आपली माळ पडणार हें ती मनोमन जाणून होती. परंतु आयत्या वेळीं 'खलनायक' राम तेथें 'क्रेन' घेऊन आला आणि त्यानें क्रेनच्या साहाय्यानें तें धनुष्य लीलेनें उचललें. त्यामुळें कायदेशीररीत्या सीतेला रामाशीं लग्न करणें भाग पडलें. शिवाय घराण्याची अब्रू संभाळणेंहि तिला भाग होतें.......

......पुढें सीतेनें रामाला कांचनमृगाची शिकार करायला पिटाळलें आणि लक्ष्मणालाहि त्याच्या पाठोपाठ पाकटवलें. स्वतः रावणाची वाट पहात झोंपडीच्या दारांत उभी राहिली. ठरलेल्या संकेताप्रमाणें रावण तेथें आला आणि त्यानें सीतेला नेलें—नव्हे, सीताच त्याच्या खांद्यावर बसून गेली. वर रामाला खिजविण्यासाठीं ती वाटेंत स्वतःचे दागिने टाकीत गेली. रावणाच्या घरीं सीतेचे सहा महिने छान गेले. ......

......रामानेंहि तोडीस तोड म्हणून मंदोदरीला पळवून आणण्याचें ठरविलें. परंतु रामाच्या अंगांत रावणाप्रमाणें 'गटस्' नसल्यामुळें शेवटीं स्वतःचीच बायको कशीबशी घेऊन त्याला परतणें भाग पडलें.......

......रामाला संशयानें ग्रासलें होतें. म्हणून त्यानें सीतेला अग्निदिव्य करायला लावलें. तरी बरें त्यावेळीं सीतेनें फायरप्रुफ कपडे घातले होते.......इ.

हें विलक्षण रामायण वाचून मी बेशुद्धच झालों. मालननें (तिच्या संस्कृत शब्दोच्चारांत) रामरक्षा म्हटल्यावर मी शुद्धीवर आलों. हें भयंकर रामायण जर मीं छापलें असतें तर लोकांनीं मला बदड बदड बदड बदड बदडलें असतें आणि मी पुन्हा बेशुद्ध झालों असतों. म्हणून हें रामायण छापायचें नाहीं असें मीं पक्कें ठरवून टाकलें.

'तुम्हांस माहीत आहे काय ?' हें एक सदर बहुतेक मासिकांतून तुम्हांला अक्कलकाढा देण्याचें सत्कार्य करीत

असतें. अशा सदराचा मजकूर माझ्याकडेहि आला होता. त्यांतील कांहीं वेंचक मजकूर खालीं देतों.

—पासिफिक महासागरांत अगदीं लहानांत लहान मासे साखरेच्या कणाएवढे असून मोठे मासे भलतेच मोठे आहेत. अशा सर्व माशांची संख्या ९७५७८९३४५६१९०-४५६५ इतकी आहे.

—जगांतील सर्व माणसांचे दांत पाडून ते एका पेटींत ठेवायचे ठरविलें तर त्या पेटीचें घनफळ पुढीलप्रमाणें असेल : १०५० यार्ड × २१०० यार्ड × ५२५ यार्ड.

—कावळ्यांना सर्दी झाली म्हणजे ते कोकीळेच्या मादीचें चुंबन घेतात. तसें केलें म्हणजे त्यांची सर्दी जाते.

—एक हजार अस्वलाचे केस कापून त्यांतील प्रत्येक केस एकापुढें एक ठेवल्यास खरोखरच्या आकाराचा पृथ्वीचा नकाशा तयार होईल.

—कावळे आपलें घर बांधण्यासाठीं शेण जमवितात आणि चिमण्या मेण जमवितात. परंतु कावळ्याचें शेण गाईम्हशी पळवितात आणि चिमण्यांचें मेण मधमाशा लुबाडून नेतात.

—मुंग्यांची उत्पत्ति झाल्यापासून आणि साखरेचा शोध लागल्यापासून जर मुंग्यांनीं साखर खाल्ली नसती तर त्या साखरेचा हिमालयाएवढा लांब आणि उंच पर्वत झाला असता.

—जगांतील सर्व वायकांची तोंडांतील वाफ एकच केली तर त्या वाफेच्या जोरावर जगांतील सगळ्या आगगाड्या छानपैकीं चालतील.

—आफ्रिकेच्या दाट जंगलांत एक प्रकारच्या कोंबड्या आहेत. त्या प्रसूत होऊन त्यांना गाईचें वासरूं झालें कीं तेथें पावसाळा सुरू होतो. कोणत्या ना कोणत्या कोंबडीला असें वासरूं नेहमीं होत असल्यामुळें तेथें जवळ जवळ बाराहि महिने पाऊस पडतो.

असो. अशा बहुगुणसंपन्न विविध प्रकारच्या साहित्यानें आमच्या टोपल्याच्या टोपल्या भरल्या. त्यांतूनच कांहीं साहित्य पाखडून मीं घेतलें.

अंकाची प्रत्यक्ष छपाई सुरू झाली. मी जातीनें छापखान्यांत हजर राहूं लागलों. कांहीं मजकूर छापून झाला. मधून मधून कविता छापणेंहि चालू होतें. मालनची कविता कंपोज झाली होती. मालनची कविता म्हणजे अजब प्रकार असतो. ही कंपोज झालेली कविताच पहा.

**माझ्या मनाच्या इवलाल्या कुंडींत**
**तुझ्या प्रीतीचा, फुले वटवृक्ष**
**वटवृक्षाचीं तीं पिंपळपानें**
**करी सळसळ पारावरती**
**माझ्या प्रेमाच्या वडाची**
**साल तुझ्या पिंपळाला**
**ये रे ये रे राजा**
**घालू गळ्यामाधिं गळा**

कु. मालन मोहीले

कशी आहे कविता? कुंडींत वटवृक्ष काय लावलाय्? वडाला पिंपळाचीं पानें काय आलींय्? पुढें वडाची साल पिंपळाला काय लावलीय्? गळ्यांत गळा घालण्याचा गळेपडूपणा काय करतेय्? सगळाच आचरटपणा!

या कवितेचें काय करावें या विवंचनेंत मी असतांनाच स्वतः मालननेंच एक 'गजकर्णा' ची जाहिरात आणून दिली. जाहिरात बरोबर मालनच्या कवितेच्या मापाची होती. जाहिरात टाळण्याचें माझ्या जिवावर आलें. उधारीची का होईना ती जाहिरात होती. (शिवाय चोवीस तासांत गजकर्ण एकदम खलास होण्याची गॅरंटी असलेलें एक वाक्यहि त्या जाहिरातींत होतें.) 'मालन कीं गजकर्ण' असा पेंच माझ्यापुढें निर्माण झाला, आणि शेवटीं माझ्या मनोदेवतेनें गजकर्णाच्या बाजूला कौल दिला. मालनची समजूत काढतां काढतां मला बराच त्रास झाला. (त्रास, दहादां हॉटेल, पांच सिनेमा, दोन पातळें, पांच ब्लाऊजचीं कापडें, चॉकोलेट लिमलेट असंख्य) पुढील अंकांत (निघतोय्! वाट बघा!) सबंध पानभर सचित्र (म्हणजे मालनच्या चित्रासह) कविता छापतों असें आश्वासन (आश्वासनच तें) दिलें आणि वेळ कशी तरी भागवून नेली.

अशा प्रकारें नाना प्रकारच्या अडचणींतून माझा दिव्य दिवाळी अंक तयार झाला. मुखपृष्ठावर 'ज्ञानेश्वराचें चांगदेवास पत्र' हें चित्र छापलें. (म्हणजे मुखपृष्ठ कोरें ठेवलें.)

अंक बाजारांत विक्रीला आला.
आणि —
एकाच दिवसांत
सगळ्या अंकांची
तडाखेबंद विक्री झाली —
— तीन आणे रत्तल या भावानें!

● ● ●

# केळफूल

लेखक : वि. द. चिंदरकर

चांगले चारसहा महिने त्या गोष्टीला होऊन गेले होते; तरीहि त्यामुळें मनाला लागलेली रुखरुख कांहीं कमी झाली नव्हती. मुकुंदरावांना वाटत होतें, जशी काय ती गोष्ट कालच घडली आहे. आणि तिच्या जाणिवेनें त्यांच्या मनाला शतशः वेदना होत. वाटे, असेंच्या असें जाऊन आपण अरविंदाची क्षमा मागावी. पण असें कुठं झालेंय्? बापानें का मुलाची क्षमा मागायची? फारतर त्याला आपला अन्याय विसरायला लावण्यासाठीं अधिक प्रेमानें वागवायचं. त्याला आवडीच्या वस्तु देऊन खूष करायचं.

त्याप्रमाणें त्यांनीं केलंहि होतं. त्याला नवे नवे कपडे केले होते. चांगलीं पुस्तकें विकत घेऊन दिलीं होतीं. उदारपणानें सिनेमा दाखविले होते. परंतु इतकें करूनहि अरविंदाच्या मनांतील अढी कांहीं दूर झाली नव्हती. तो पूर्वीसारखा आपल्याशीं मनमोकळेपणानें बोलत नाहीं असें मुकुंदरावांना वाटत होतें. त्यांनीं आपल्या पत्नीला म्हटलें सुद्धां, "तुझा मुलगा अगदीं तुझ्या वळणावर गेला आहे हां."

"तें कसं काय बाई ?" कमळाबाईंनीं विचारलें होतें.

"इतके दिवस झाले तरी त्या दिवशींची गोष्ट विसरायला तयार नाहीं. मनांत अढी ठेवून वागतो आहे—" मुकुंदराव विषादानें म्हणाले.

"म्हणजे मी तुमच्याशीं मनांत अढी ठेवून वागतें, असं म्हणायचं आहे तुम्हांला ?"

"नाहींतर काय ? तूं सुद्धां कधीं कधीं अशीच वागतेस—"

"पण तें तेवढ्यापुरतं—"

"मी माघार घेतों म्हणून तेवढ्यापुरतं—"

"अमं असं ? म्हणजे चांगुलपणाचं सारं श्रेय तुम्हाला. कुणाला वाटेल नवऱ्याला केवढ्या धाकांत ठेवते आहे बाई !" असं म्हणून कमळाबाई हंसल्या.

"पण हा कांहीं माघार घेतली तरी वळत नाहीं—"

"मग तो तुमच्याच वळणावर गेला आहे असं म्हटलं पाहिजे. मीं माघार घेतली तरी तुम्ही असेच वागतां माझ्याशीं—तुम्ही नि तुमचा मुलगा, काय वाटेल तें करा-मी मधें पडलें तर माझ्यावर बोल येईल—"

"नाहीं मी बोल लावीत तुला. सारा बोल माझ्याकडेच आहे. कुठून मला त्या दिवशीं दुर्बुद्धि झाली नि मी त्याला जेवणावर टाकून बोललों."

त्यानंतर अनेक दिवस मुकुंदराव याच गोष्टीचा विचार करीत. त्या प्रसंगाच्या स्मृतीनें त्यांचं मन अस्वस्थ होई. मनाला सारखी रुखरुख वाटे. आजहि त्यांचं मन असेंच अस्वस्थ झालें होतें.

सहा महिन्यांपूर्वी घरांत केळफूल आणलें होतें. केळफुलाची भाजी सर्वांच्याच आवडीची. बरेच दिवस केळफूल मिळालें नव्हतें म्हणून मुकुंदरावांनीं मुद्दाम आणलें होतें.

चौदावें वर्ष म्हणजे कांहीं फार मोठें वय नाहीं. समज येऊं लागलेला, पण अल्लडपणा गेलेला नाहीं असें वय. अरविंदा याच सीमारेषेवर रेंगाळत होता. अरविंदासारखा शहाणा मुलगा नाहीं असें त्याच्या आईबापांना वाटे. शेजारचीं माणसेंहि तसेंच म्हणत. इतकें असूनहि आपल्या मित्रांत अत्यंत हूड आणि दांडगा म्हणून त्याची ख्याति होती. शाळेंत वर्ग चालू असतां त्याच्यावर अजूनहि कधीं कधीं बांकावर उभे राहाण्याची पाळी येई. असें असलें तरी अरविंद घरीं अतिशय सालसपणें वागे.

तो शाळेंतून आला तेव्हां कमळाबाई केळफूल सोलत बसल्या होत्या. केळफूल पाहून अरविंदाच्या हर्षवृत्ति उसळून आल्या. त्यानें पाकीट टेबलावर ठेवलं आणि तो आईजवळ जाऊन बसला होता. त्यानें केळफुलाचीं सोपें घेऊन तीं पायांत घालून त्याचे जोडे केले आणि मग तो गॅलरींतून हवा तसा फिरला. एवढा मोठा चौदा वर्षांचा मुलगा केळफुलांच्या सोपांचे जोडे घालून हिंडतो म्हणून शेजारच्या रमाबाईंनीं त्याची थोडी थट्टाहि केली, तरी त्यानें मनाला लावून घेतलं नाहीं. त्यानें मग आपली बहीण सुनंदा हिच्या-बरोबर सोपाचे दोर काढून ते एकमेकांत गुंतवून त्यांचं तेल काढलं. एवढें सगळें झाल्यावर केळफुलांतला गर हवा म्हणून आईकडे हट्ट घेऊन बसला.

ईझीचेअरवर पडून वाचत बसलेले मुकुंदराव मोठ्या कौतुकानें आपल्या मुलाचे चाळे पाहात होते.

केळफुलाच्या आंतील गराचा तुकडा कमळाबाईंनीं त्याच्या हातावर ठेवला तेव्हां कुठें तो शांत झाला आणि मग खेळायला बाहेर गेला.

त्यानंतर मुकुंदराव जेवणाच्या वेळचा प्रसंग आठवूं लागले. केळफुलाची भाजी अरविंदाच्या अत्यंत आवडीची. पण भाजी आवडते म्हणून ती कांहीं भातासारखी खायची नसते, असें आपलें मुकुंदरावांना वाटलें. त्यांना माहीत होतें, केळफुलाची भाजी आपल्या बायकोलाहि फार आवडते. ती अशी भातासारखी खाऊन संपवली तर सगळ्यांच्या शेवटीं जेवायला बसणाऱ्या कमळाबाईंना ती मुळीं उरायचीच नाहीं अशी भीति त्यांना वाटली.

त्यासरशी ते म्हणाले, "नुसती भाजीच काय बोकणत बसलायस्? पाठीमागं माणसं जेवायचीं आहेत याची कांहीं आठवण!"

त्यावर कमळाबाई म्हणाल्या होत्या, "खाऊं दे. त्याला आवडते ना? खाऊं दे. मला नाहीं उरली तरी चालेल—"

"काय चालेल? मुळींच चालायचं नाहीं." मुकुंदराव एकदम ओरडून म्हणाले होते, "घरांत शिजलेली वस्तु प्रत्येकाला मिळालीच पाहिजे. एकट्यानं खायचं नि दुसऱ्यांनीं काय त्याच्या तोंडाकडे पाहात राहायचं? तें कांहीं नाहीं. मीं सांगतों तसं झालंच पाहिजे—"

सुनंदा तें पाहून जेवायची थांबली होती.

अरविंदाचा घांस त्याच्या हातांतच राहिला होता.

त्याचे डोळे पाण्यानें डबडबले होते.

तें पाहून मुकुंदरावांची स्थिति अत्यंत चमत्कारिक होऊन गेली होती.

कमळाबाई म्हणाल्या होत्या, "आतां राहूं द्या हं!"

"काय राहूं द्या? मी कांहीं गैर का सांगतों आहें?" मुकुंदरावांनीं मोठ्या स्वरांत विचारलें, "आज लहान आहे तोंवर बरं दिसतं पण उद्यां मोठेपणींहि हीच संवय लागायची. अशा संवयीनें बायकापोरं उपाशी मरायचीं!"

"केव्हां काय बोलावं हें तुम्हांला कसं समजत नाहीं?" कमळाबाई म्हणाल्या. आणि त्याचवेळीं अरविंदाच्या डोळ्यांतील आंसवें त्याच्या गालांवर ओघळत होतीं. तो तसाच पानावरून उठला.

तोंच मुकुंदराव गरजले, "कुठं चाललास? बैस खालीं. मुकाट्यानं जेव." "असं भरल्या पानावरून उठून जाऊं नये बाळ–" कमळाबाई समजावणीच्या स्वरांत म्हणाल्या.

आणि अरविंद लगेच खालीं पाटावर बसला. आणि डाव्या हाताच्या मनगटानें डोळे पुसून तो खालच्या मानेनें जेवूं लागला. तो जेवला. पण त्यानें भाजीला बोट लावलें नाहीं.

मुकुंदरावांच्या तें ध्यानीं आलें. त्यांनीं कमळाबाईकडे पाहिलें. त्यांनीं डोळ्यांनींच, 'कांहीं बोलूं नका' असें पतीला दटावलें.

छोटी सुनंदा एकदां दादाच्या तोंडाकडे पाही, तर एकदां वडिलांच्या तोंडाकडे पाही. आणि दोघांकडे पाहून झालें कीं मग आईकडे पाही.

साऱ्यांचीं जेवणें झाली खरीं, पण जेवल्यासारखें कुणालाच वाटलें नाहीं. पोटें भरलीं होतीं, पण मनें रिकामीच होतीं.

ती रात्र मुकुंदरावांनीं अस्वस्थ चित्तानें काढली होती. पश्चात्तापानें त्यांचें मन होरपळत होतें. मुलाच्या पाठीवरून मायेनें हात फिरवावा असें त्यांना कितीतरी वेळां वाटलें असेल. हा प्रसंग कांहीं त्यांना अगदीं नवा होता असें नाहीं. त्यापूर्वीं असे रागावण्या-रुसण्याचे प्रसंग अनेक वेळां बापलेकांत येऊन गेले असतील. परंतु त्यावेळीं अरविंद लहान होता. मुकुंदराव रागावले, त्यांच्या हातचा मार मिळाला तरी त्याच्या मनाची त्यांच्याकडे असलेली ओढ लपून राहात नव्हती. तो लगेच येऊन त्यांना बिलगे. आणि मग ते त्याला जवळ घेऊन गोंजारीत. पुनः सर्व कांहीं ठाकठीक होऊन जाई.

पण यावेळचा प्रकार कांहीं वेगळाच होता. अरविंद आतां लहान नव्हता. तो मोठा झाला होता. मानापमान त्याला कळूं लागला होता. स्वाभिमान दुखावलेला त्याला खपत नव्हता. तो पूर्वींसारखा बापाला जाऊन बिलगला


कोणतेंही पुस्तक मागवा

निंबकर आणि मंडळी: बुकसेलर्स

माधवबाग, मुंबई ४

नव्हता. पूर्वीसारखा हळूच त्यांच्या कुशींत येऊन शिरला नव्हता.

तो आतां एक मानधन पुरूष होऊं घातला होता.

त्या पुरुषाचा अभिमान दुखावला होता.

त्याच्यांतील या बदलाची जाणीव होतांच मुकुंदरावांचा ऊर अभिमानानें भरून आला. आपला मुलगा मोठा बाणेदार निघाला आहे याचें त्यांना समाधान वाटलें. कौतुकानें ते स्वतःशींच हंसले. याच वयांत आपणहि अगदीं असेच होतों, असें त्यांना वाटलें.

आणि त्यांचा मुलावरील राग क्षणांत नाहींसा होऊन गेला. पश्चात्तापानें त्यांचें मन होरपळूं लागलें.

त्यानंतर मुकुंदरावांनीं अरविंदाची मर्जी सुप्रसन्न राहील असे पुष्कळ प्रयत्न जाणून बुजून केले. त्याला हवे हवे तसे कपडे दिले. ट्रिप्ससाठीं दूरदूर जाण्याची परवानगी दिली. पोहायला शिकविण्याची हौस पुरी केरी. सायकलवरून उपनगरांत जाऊं दिलें. डिटेक्टिव्ह कादंबऱ्याहि वाचूं दिल्या. सर्व कांहीं त्याच्या मनासारखें होऊं दिलें.


दिवाळीसाठीं खास सवलत

जगाच्या अक्षर वाङ्मयाला ललामभूत असलेले

मराठी भाषेंत बरीच वर्षे दुर्मिळ झालेले

# अरेबियन नाईटस

अर्थात

# अरबी सुरस कथा

तीनरंगी मुखपृष्ठ : व्हाईट पेपर

८०० पृष्ठें, किंमत १० रुपये. ट. ख. १॥ रु.

**१० रुपये म. ऑ. नें पाठविल्यास**

**दिवाळीसाठीं ट. ख. माफ**

## महाराष्ट्र ग्रंथ भांडार

गिरगांव : मुंबई ४


आणि त्यांनीं मधून मधून केळफूलहि भाजीसाठीं आणलें. पण अरविंदानें पुनः कांहीं सोपांचे जोडे केले नाहींत. सोपांचे दोर काढून तेल काढण्याचा प्रयत्न केला नाहीं. आणि मुकुंदरावांना विशेष धक्का देणारी गोष्ट म्हणजे अरविंदानें केळफुलाच्या भाजीला कधीं चुकून सुद्धां स्पर्श केला नाहीं. मग खायची गोष्ट कशाला! असें तीन वेळां झालें. तेव्हां मुकुंदरावांनीं मुळीं भाजीसाठीं केळफूल आणायचेंच सोडलें. त्यांच्या मनाला याची खंत वाटली.

चांगले चार सहा महिने होऊन गेले तरीहि त्यांच्या मनाला लागलेली ही रुखरुख कांहीं कमी झाली नव्हती. मुकुंदरावांना वाटत होतें, जशी काय ती गोष्ट कालच घडली—आहे. आणि तिच्या आठवणीनें त्यांच्या मनाला शतशः वेदना होत. वाटे, असेंच्या असें जाऊन अरविंदाची आपण क्षमा मागावी.

आपलें बोलणें मनाला लावून घेऊन त्यानें आपली आवडती भाजी वर्ज्य केली याचें दुःख त्याच्या मनाला कुसरंड्यासारखें डंसून राहिलें होतें.

काय केलें असतां अरविंदाच्या मनांतील अढी दूर होईल याचा ते अलिकडे सारखा विचार करीत होते.

रात्रीं झोंपल्यावर कमळाबाई खालच्या आवाजांत पतीला म्हणाल्या, "ऐकलं का, जागे आहांत?"

"आहे ना. ऐकतों आहें!"

"एवढं मनाला लावून घेतलं? झोंपसुद्धां उडाली?"

"हुं!"

"हुं काय? मी काय कहाणी सांगतें आहें?"

"हुं!"

"बरं राहिलं. म्हटलं लेकाला अगदींच कांहीं माया नाहीं असं नाहीं हां."

"बरं, पुढं?"

"आज चौकशी करत होता. विचारत होता, बापू हल्लीं केळफूल आणत नाहींत नं?"

मुकुंदरावांनीं विचारलें "मग तूं काय उत्तर दिलंस?"

"सांगितलं, तूं खात नाहींस ना भाजी केळफूलाची, मग कशी आणतील ते?"

"मग काय म्हणाला?"

"म्हणाला, मी खाली नाहीं म्हणून काय झालं? त्यांना आवडते, तुला आवडते नि सुनंदाला आवडते. मी खात नाहीं म्हणून तुम्ही थोडीच खाऊं नये असं आहे? त्यावर

मी म्हटलं, तूं नाहीं खाल्लीस तर नाहीं कुणी खायचं. तूं आमचा लाडका मुलगा. वहिणीचा लाडका भाऊ—मीं इतकं म्हटलं मात्र, तेथून उठला नि बाहेर निघून गेला खेळायला—अगदीं गोरामोरा चेहरा करून गेला— ”

मुकुंदराव बिछान्यावरले एकदम उठून बसले.

ते तसेच उठले आणि खोलींत येरझारा घालूं लागले.

पलिकडच्या खोलींत अरविंद झोंपला होता. त्याच्या दीर्घश्वसनाचा परिचित आवाज त्यांच्या कानीं पडत होता.

ते बराच वेळ तशाच येरझारा घालीत होते. शेवटीं पाय दुखूं लागले तसे ते अंथरुणांत जाऊन पडले.

पण झोंप कांहीं येईना.

बराच वेळ विचार करीत राहिल्यावर त्यांना वाटलें, डोकीवर थंडगार पाणी तरी शिंपडून गारवा आणावा म्हणजे झोंप येईल.

ते हळूच उठले. त्यांनीं बत्ती लावली. आणि ते आंतल्या खोलींत गेले. त्यांनीं बाथरूममध्यें जाऊन डोळ्यांना पाणी लावलें. डोक्यावर थोडें गार पाणी शिंपडलें. आणि पुसण्यासाठीं टॉवेल घेण्यास गेले.

टॉवेलानें अंग पुसतां पुसतां त्यांची नजर खालीं जमिनीवर गेली. आणि ते टॉवेल हातांत घेऊन तसेच टक लावून पाहात राहिले. त्यांनीं खालीं वांकून पाहिलें आणि ते स्वतःशीच हंसले. ते तसेच बाहेरच्या खोलींत गेले. त्यांनीं कमळाबाईंना उठवून आंत आणलें आणि खालीं बोटानें निर्देश केला.

जमिनीवर रंगीत पाट मांडला होता.

आणि पाटावर एक केळफूल होतें.

दोघांनींहि एकमेकांकडे पाहून सहेतुक हास्य केलें.

केळफुलाच्या खालीं एक चिठ्ठी ठेविली होती.

मुकुंदरावांनीं ती चिठ्ठी उचलून घेतली आणि कागदाची घडी उघडी केली.

कमळाबाई आणि मुकुंदराव वाचूं लागले —

*" ती. आई हिला;*

*ती. बापूंना केळफुलाची भाजी आवडते*
*म्हणून मी केळफूल आणून ठेवलं आहे.*
*उद्यां तूं याची भाजी कर. मी खाईन.*
*सोपांचे जोडे करीन. सोपांच्या*
*दोरांचं तेल काढीन —*

*तुझा आवडता —*
*अरविंद "*

मुकुंदरावांचे डोळे भरून आले होते, पण ओंठ हांसत होते.

त्यांनीं अरविंदाच्या खोलीकडे दृष्टी टाकली—

त्याचें दीर्घश्वसन ऐकूं येत होतें.

कमळाबाई तेथेंच फतकल मारून बसल्या, आणि केळफुल सोलूं लागल्या. मुकुंदराव तिच्याकडे पहात राहिले आणि मानाशीं म्हणाले, " ही आपली बायको यावेळीं किती सुंदर दिसते आहे! जशी काय हिरव्यागार पानांनीं नटलेली सुहास्यवदनागौरांगी कर्दलीच ! "

केळफुलाचीं सोपें कमळाबाई बाजूला करून ठेवीत होत्या. सोपांचा तो लाल भडक रंग पाहून त्यांना वाटलें, " आपण अरविंदासारख्या लहान असतों तर किती बरं झालं असतं. हीं सोपें पायांत घालून, जोडे घातले म्हणून मिरवलों असतों नि सोपांचे दोर एकमेकांत गुंतवून त्यांचं तेलहि काढलं असतं. "

● ● ●


## रंगभूमीवर रंगणारीं नाटकें

| | |
|---|---|
| ● नामधारी राजे | ले. कै. माधवराव जोशी |
| ● उधार उलनवार | ” |
| ● पैसाच पैसा | ” |
| ● घराणें | आचरेकर |
| ● ऐका हो ऐका | पाटील |
| ● वादळ | जावकर |
| ● देवता | वसंत जाधव |
| ● गौरीशंकर | ” |
| ● सौभाग्य | ” |
| ● नवा संसार | ” |
| ● प्राणाचं दान | ” |
| ● निराधार | शिवलकर |
| ● अन्नदाता | ” |
| ● पोटचा गोळा | ” |
| ● तुफान | तोडणकर |

किंमत प्रत्येकीं दीड रुपया

रा म कृ ष्ण बु क डे पो, मुं ब ई ४



# डमी

लेखक : ग. ल. ठोकळ

लाकडी वाड्यांतल्या आपल्या खोलीच्या बाहेरच्या ओट्यावर बसून चिमणी जगताप जॉर्जेटचें जुनें पातळ शिवीत होती. डोक्यावर गोंणपाटाच्या बारदानाची वळकटी व हातांत एक कळकट गाठुडें घेऊन येणाऱ्या खंडू साळुंखेला पाहून तिला फार नवल वाटलें. त्यापेक्षांहि जास्त नवल खंडूला तिच्याकडे पाहून वाटलें. फुलाफुलांची नक्षी असलेलें वायलचें तलम पातळ, चिकन कापडाचें नखरेबाज झंपर, गळ्यांत खोट्या मोत्यांची माळ, कानांत बाजारी, लांबडे चमकदार डूल, कपाळावर सोनेरी वर्ख मिसळलेला जांभळ्या कुंकवाचा टिकला, केस उलटे विंचरलेले, मानेवरल्या अंबाड्यावर काळ्या दोऱ्यांची जाळी आणि वर कलाबतू घातलेली निशिगंधाची लफ्फेबाज वेणी. असा चिमाचा थाट होता. दुमडलेल्या तेलकट टोपीखालीं अस्ताव्यस्त वाढलेले कोरडे केंस, ओढलेले डोळे, माजलेली दाढी मांजरपाटाचा फाटका, मळका खमीस, चिरफळलेल्या जागीं गांठी मारलेलें घाणेरडें धोतर आणि पावशेर गोंडेल पाजलेल्या खंगरी, पण झिजून तुटलेल्या वहाणा. असा खंडूचा अवतार होता.

खंडूच्या तोंडून शब्द फुटेना. चिमाही गप्प होती. 'ढमे' अशी हाक मारीत आबाई बाहेर आली. खंडूला पाहून डोक्यावरला पदर सांवरीत तिनें 'अग्ग बयो' असा उद्गार काढला. आंत जाऊन पाण्याचा तांब्या व भाकरीचा तुकडा घेऊन ती लगबगीनें बाहेर आली. खंडूच्या अंगावरून ओंवाळून पाण्याचा तांब्या तिनें पायाशीं ओतला. तुकडा फेकून देऊन तिनें त्याच्या हातांतलें गाठुडें घेतलें. डोक्यावरली वळकटी खालीं टाकून खंडूनें तिच्या पायांवर डोकें ठेवलें. तोंडांतल्या तोंडांत आशीर्वाद देऊन आबाईनें त्याची अलाबला घेतली व आपल्या कानशिलांवर कडाकड बोटें मोडलीं. खंडूच्या हाताला धरून आबाई त्याला घरांत घेऊन गेली. तरीही चिमा गप्पच!

खंडू हा चिमाच्या आत्याचा मुलगा. तिचा बाप हा खंडूचा सख्खा मामा. राहाण्याचें गांव शिरवळ. गांवालगतचा चार एकरांचा एक कोरडवाहू तुकडा खंडू वाट्यानें करीत होता. त्याचे आईबाप त्याच्या लहानपणींच वारले होते. जेवायखायला तो मामाच्या घरींच असे. चिमाचा बाप मोटार स्टॅण्डवरल्या एका हॉटेलांत नोकरीला होता. तीन वर्षांपूर्वीं घटसर्प होऊन तो एकाएकीं मेला. मायलेकी उघड्या पडल्या. खंडूच्या कमाईवर तीन भुका भागणें शक्य नसल्यामुळें शिरवळचें किडुकमिडुक गुंडाळून आबाई लेकीला घेऊन पोट पिकवण्यासाठीं पुण्याला आली होती. गेल्या तीन वर्षांत चिमाची व खंडूची नजरभेट नव्हती. तिचें त्याच्याशीं लग्न ठरलेलें होतें. मामाची लेक म्हणजे हक्काची बायको. वाङ्निश्चय (साखरपुडा) झालेला होता. बाप मध्येंच मेला नसता, तर चिमा एव्हांना संसाराला लागली असती.

आबाईनें चुलीवर चहाचें आधण ठेवलें. ती खंडूशीं बोलूं लागली. चिमा कान देऊन आंतली बातचीत ऐकूं लागली. सरकारनें कुळाचा कसलासा कायदा पास केला होता. शेताच्या मालकानें खंडूकडून नोकरनामा मागितला होता. चौकशी न करतां, मागेंपुढें न पहातां खंडूनें त्या कागदावर तलाठ्याच्या देखतां सही केली होती.

गेल्या वर्षीं मालकानें खंडूला शेताच्या बाहेर काढलें होतें. नंतर तो स्टँडवरच्या त्याच हॉटेलमध्यें नोकरीला राहिला होता. हॉटेलच्या मालकानें चार दिवसांपूर्वीं कसल्याशा चुकीवरून त्याला झालेल्या दिवसांचा पगारही न देतां हांकलून दिलें होतें. म्हणून मग नाइलाज होऊन त्यानें आज पुण्याची एस्. टी. पकडली होती. म्हणजे खंडू जो आला होता तो परत न जाण्यासाठीं!

शिरवळच्या शिवारांत वाढलेली चलाख, चिमुरडी चिमा, मोटारींतून हरहमेश येणाऱ्या नव्यानव्या पाशिंजर लोकांशीं

गोड गोड बोलून त्यांना केळ्यांच्या फण्या विकणारी तल्लख किशोरी चिमा आणि पुण्यासारख्या अफाट, अनोळखी शहरांत येऊन दुनिया बघून हुषार झालेली तरुण चिमा विचार करीत होती. तीन वर्षांपूर्वी खंडूच्या सामने खंड पडूं न देतां एकसारखी चिवचिव करणारी चिमा आज त्याला पाहून, पातळाला रेशमी टाके घालतां घालतां, तोंडाला टाके मारल्यागत चिडीचूप झाली होती.

" ढमे, चा प्यायला ये. " आंतून पुकारा झाला.

" मला नको चहा. "

चिमी एकदांची बोलली. मग आबाईनं खंडूला दोन कप चहा पाजला, चुलीवर तवा टाकून तिनें परातींत पीठ मळलें. भाकरीवर थाप टाकून ती हलकेच म्हणाली,

' जा भाइर. बायकूसंगं गपाटप्पा कर. '

' नगं. मी बसतों इथंच. '

' अरे, लाजतो कशापायीं ? जा. '

' मी आंगूळीला जातों. '

' जा. ती बालडी घे अन् तो तांब्या. '

खंडू चिमाच्या अंगावरून समोर बघत मोरीकडे गेला. चिमाचे डोळे धाग्यांत अडकले होते. खंडू आंघोळ करून, कपडे बदलून व पारोसे कपडे धुऊन येईपर्यंत भाकरी झाल्या होत्या. चिमा जेवत होती, खंडूचें ताट वाढून तयार होतें. तो जेवायला बसला. आबाई वाढीत होती; वाढतांना बोलत होती, खंडू नुसती मान हलवीत होता. फक्त घांस घेण्यासाठीं तोंड उघडणाऱ्या चिमाकडे तो चोरून पहात होता. चिमा किती म्हणतां किती बदलली ! उंचीनें वीतभर वाढली असावी. अंगानें केळीच्या सोटासारखी गच्च भरलेली दिसते. आदल्या रात्रीं सायीचें थेबाड चोळल्याप्रमाणें गाल तुकतुक करीत आहेत. दांत कसे जोंधळ्यांच्या लाह्यांसारखे सफेत. ओठ कसे करडीच्या फुलासारखे. अशी बायको मिळायला नशीब पाहिजे. पण ही मला पत्करील का ? म्हातारीच्या मनांत दिसतं. पण हिच्या मनांत असेल का ? तसं लक्षण कांहीं दिसत नाहीं. मी हा असा. हिची तरी काय चूक ! बिचारा खंडू कुचंबल्यासारखा झाला होता. एका भाकरीची भूक ठेवून तो तसाच थाळींत हात धुऊन उठला. बाहेरच्या ओस्र्यावर पडलेल्या चटईवर तो आडवा झाला आणि घोरूं लागला.

" खंडेराव !" चिमाच्या आवाजानें खंडूला जाग आली.

" अग, नांवानं काय हांक मारली ! "

आबाईचा आवाज शेजारच्या खोलींतून आला. खंडूनें डोळे उघडले. हातांत चहाचा कप घेऊन चिमा समोर उभी होती. तिनें कपडे बदलले होते. ते नुसते चमचम, चकचक करीत होते. तिचा चेहरा जास्त पांढुरका दिसत होता. चहाचा कप खालीं ठेवून ती आंत गेली. चूळ न भरतां खंडू चहा प्यायला व आळस झाडून उभा राहिला. शेजारच्या खोलींत आबाई शेणानें भुई सारवीत होती. खोली रिकामी होती. या वाड्याला ' लाकडी वाडा ' कां म्हणतात तें खंडूच्या ध्यानांत आलें. खोलीच्या भिंती देवदारी खोक्यांच्या फळ्यांच्या होत्या. वरून मातीचें दाट सारवण दिलेलें होतें. वाडा बैठा, बारा खोल्यांचा होता. चौकांत एक मोठी मोरी व मोरींत एकच नळ होता. संडास कुठें दिसत नव्हता. वाडा गांवाच्या बाहेर असल्यामुळें आजूबाजूला मोकळें रान होतें. खंडूला प्रश्न पडला. पण त्याच्या मनांतल्या प्रश्नाला लगेच उत्तर मिळालें.

" खोली रिकामी व्हती. ढमीनं आज ताब्यांत घेतली. भाडं रुपये धा. ढमीनं पैसं भरलं."

शिरवळला असतांना आबाई पोरीला चिमी म्हणत. ढमी हें नांव खंडू आज नव्यानें ऐकत होता. चिमीचें नांव बदललें कां व आपल्यासाठीं निराळी खोली कां, असे दोन प्रश्न त्याच्या डोळ्यांपुढें नाचत होते. याशिवाय एक मोठा प्रश्न तो आल्यापासून त्याच्या मनाला उसत होता. होईल, हळुह एकेकळू उलगडा होईल.

" खंडेराव, चला माझ्याबरोबर. "

" कुठं ? "

" चल म्हटलं कीं चलावं. "

चिमा वाड्याबाहेर पडली. खंडू मुकाट्यानें उठला व तिच्या मागोमाग चालूं लागला. तिच्या अंगावरून येणारा गोड वास नाकांत शिरून त्याच्या डोक्यांत गोड झिणझिण्या उठवित होता. आपल्या अंगाला कुबट भपकारा येत असावा, अशी त्याला शंका आली. तो शरमला व अंतर ठेवून चालूं लागला. चिमाच्या खांद्यावर एस्. टी. च्या कंडक्टरची असते तशी चामड्याची पण झोंकदार पिशवी होती. तिच्या पायांतलीं चमकदार पायतणें कुर्रकुर्र वाजत होतीं. तिच्या चिंचोळ्या कमरेखालच्या पसरट, भरींव, गोल भागाचा डौल त्याच्या नजरेला गोड वाटत होता. ती रस्त्याच्या बाजूला एका खांबाजवळ थांबली. तोही थांबला. जराशानें एक लाल मोटार येऊन थांबली. चिमा चढली. तोही चढला. ती एका बाकावर बसली. तो मागच्या बाकावर बसला. ती उतरल्यावर तोही उतरला. बाजारपेठेंत जाऊन, निरनिराळ्या दुकानांत शिरून तिनें खूपच खरेदी केली. चौकटीचे, अर्ध्या बाह्यांचे दोन सदरे, दोन खाकी

अर्ध्या विजारी, दोन गंजिफ्राक, दोन चड्डया, एक टॉवेल, दोन हातरुमाल, कॅनव्हासचे विटकरी रंगाचे बूट, चामड्याचा कमरपट्टा, चटई, सतरंजी, उशी, पांघरायची चादर, आरसा, दाढी करण्याचें खोरें, साबण वगैरे वगैरे. परत आल्यावर जेवण करून खंडू आपल्या खोलींत डाराडूर झोंपला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चिमा खंडूला घेऊन बाहेर पडली. एका हेअर कटिंग सलूनमध्यें नेऊन तिनें त्याचे केस नवीन फॅशननें कापून घेतले. दाढी तुळतुळीत झाली. घरीं गेल्यावर वाटीभर शिकेकाई व लाइफबॉय साबणाची अर्धी वडी खर्चून चिमानें त्याला आपल्या देखरेखीखालीं न्हाऊं घातलें. नवे कपडे घातल्यावर खंडू नखशिखान्त पालटला. भितीला खिळा ठोकून लटकावलेल्या आरशांत तेल लावलेल्या केसांचा भांग पाडतांना आपली छबी देखून तो खूष झाला. हा कोणीतरी नवीन खंडू आहे, असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें.

दुपारचा चहा झाल्यावर चिमा खंडूला घेऊन पुन्हां बाहेर पडली व शंकरशेट रोडवरल्या एका स्टुडिओंत शिरली. शिरवळच्या शाळेंत खंडूचीं चार बुकें वाचून झालीं होतीं. लहानपणीं शिरवळच्या मोटारस्टँडवर हुचपणा करीत दिवसाचा बहुतेक वेळ घालवल्यामुळें व वर्षभर नटनटींच्या उघड्या कपबशा विसळल्यामुळें स्टुडिओ म्हणजे काय व सिनेमा म्हणजे काय हें त्याला माहीत झालें होतें. शिरवळ हा कोल्हापूरला जाणाऱ्या व कोल्हापूराहून येणाऱ्या मोटारींचा महत्त्वाचा टप्पा ! फाटकांतून आंत गेल्यावर चिमा थबकली व हलक्या आवाजांत बोलली,

" खंडेराव, मी तुझी कोण अन् तूं माझा कोण, हें इथं कोणाला सांगायचं नाहीं. "

खंडूला बाहेर थांबायला सांगून चिमा एका खोलींत शिरली. खोलीच्या बाहेर लावलेल्या 'अरुणादेवी' या पाटीकडे पहात खंडू उभा राहिला. थोड्या वेळानें चिमा बाहेर आली. तिच्या बरोबर एक अतिशय सुंदर बाई होती. त्या दोघी पलीकडच्या एका खोलींत शिरल्या. एक पांढरें केंसाळ कुत्रें लपक लपक करीत त्यांच्या मागोमाग आंत गेलें. त्या खोलीच्या बाहेर 'गोकुळशेट' अशी पाटी होती. बऱ्याच वेळानें चिमा बाहेर आली. तिनें खंडूला खूण केली. खंडू आंत गेला. मधल्या मोठ्या खुर्चीवर एक गोरा माणूस बसला होता. शेजारीं एक किडकिडीत माणूस उभा होता. तो इतका वाकून उभा होता कीं खंडूला वाटलें, याला कुबड तर नाहीं ! अरुणादेवी शेजारच्या खुर्चीवर बसल्या होत्या. त्या खुर्चीची पाठ धरून चिमी उभी राहिली. समोरच्या टेबलावर एक मोठी फळांनीं भरलेली बशी होती. त्या गोऱ्या माणसानें—गोकुळशेटनें विचारलें,

" काय रे, तुझं नांव काय ? "

" खंडेराव तुकाराम साळुंखे. राहाणार शिरवळ, जिल्हा उत्तर सातारा, जात मराठा, वय चोवीस. "

" उंची पावणेसहा दिसते. वजन किती ? "

" माहीत नाहीं. "

" दोन मण असेल. " खंडूच्या मनगटावरले कणखर स्नायू व पिंढऱ्यांचे पीळदार गोळे न्याहाळीत शेट पुढें म्हणाले, " तगडा जवान आहे. पोलादाच्या कांबीसारखा दिसतो. काय मॅनेजर ! "

" हँ हँ हँ ! " कुबड काढलेले मॅनेजर उगीचच हंसले.

" फार ताकदवान आहे आमचा खंडेराव. " चिमानें तरफदारी केली.

" कशावरून ? "

" परीक्षा घ्या. " नंतर बशींतलें एक सफरचंद उचलून तें खंडूच्या हातांत देत चिमा म्हणाली, " खंडेराव, या सफरचंदाचा रस निघाला पाहिजे. "

खंडूनें तें लाललाल, मऊ मऊ सफरचंद हातांत घेतलें व त्याच्यावर दोन हातांची पकड बसवली. एक मोठा श्वास छातींत भरून त्यानें तें सफरचंद दाबायला सुरवात केली. त्याच्या मनगटांवरल्या व कंठावरल्या शिरा तटाटल्या. रक्त चढून त्याचा तरतरीत चेहरा लालटला. चिमा कौतुकानें, प्रेमानें व अभिमानानें त्याच्याकडे पहात होती. त्याच्या ताकदीबद्दल तिला पुरेपूर खात्री होती. शिरवळच्या बाजार पेठेंत मोकाट सुटलेल्या एका मस्त खोंडाला त्याचीं शिंगें हातांत पकडून, मागें रेटून खंडूनें कसें दाव्यानें बांधलें होतें, तें तिनें प्रत्यक्ष पाहिलें होतें. अरुणादेवींची नजर खंडूवर खिळली होती. सफरचंदांतून रस गळूं लागला; टिपू टिपू टिपू करीत फरशीवर पडूं लागला. अरुणादेवींचा कुत्रा शेपूट हालवीत गेला व तो रस चाटूं लागला. अरुणादेवी टाळ्या वाजवीत म्हणाल्या,

" आमच्या टॉमीला फळांच्या रसांचा रोज रतीब आहे. कधीं डाळिंबाचा, कधीं द्राक्षांचा, कधीं संत्र्याचा, तर कधीं मोसंबीचा. सफरचंदाचा रस आज त्याला पहिल्यांदा मिळाला."

" कमाल केली. सॅमसन अँड डिलायला पिक्चरमधला सॅमसन आहे. " शेटनीं कौतुक केलें.

" टारझन !" मॅनेजरनें सुचवलें.

रस गळायचा थांबल्यावर खंडूनें चोथा फेंकून दिला व आपल्या खाकी विजारीला हात पुसले. चिमाच्या डोळ्यांतला वटार पाहिल्यावर त्याला आपली चूक उमगली. खिशांतला रुमाल काढून तो उरलेला चिकटा निपटूं लागला. शेठनीं तोंड उघडलें.

" मॅनेजर, हा माणूस आपल्याला पायजे. याला लाइट बॉय म्हणून लावून घ्या." नंतर खंडूला उद्देशून, " उद्यांपासून कामावर ये. पगार रुपये बावन्न देऊं."

शिरवळच्या स्टॅंडवरला हवालदार दोन पाय जुळवून जसा सलाम ठोकतो, तसा सलाम खंडूनें ठोकला. शेठना हसूं लोटलें. अरुणादेवीकडे पाहात ते म्हणाले,

" चॉकलेट, या खंडोबाचं नांव काय ठेवायचं ?"

" तुम्हीच सांगा. या बाबतींत तुमचं डोकं फार चालतं."

" याचं नांव आपण झंबो ठेवूं."

" झंबो ? नको बाई. तें होलीवुडमधल्या माकडाचं नांव. हा आपल्या डमीचा गांववाला. शिवाय दिसायला कांहीं वाईट नाहीं." अरुणादेवी ऊर्फ चॉकलेट बोलल्या.

" टोंगो कसं वाटतं ?"

" टोंगो ? चालेल."

" मॅनेजर, याचं नांव आजपासून टोंगो. डमी, तुला आवडलं का नांव ?"

" खूप आवडलं. छान आहे." चिमा ऊर्फ डमी उत्तरली.

" टोंगो, तुझं लग्न झालं का ?" अरुणादेवींनीं प्रश्न टाकला.

" नाहीं. ठरलं आहे."

" कुठं आहे तुझी ठरलेली बायको ? शिरवळला ?"

" नाहीं. इथंच आहे." डोळ्यांतून ठिणग्या फेंकणाऱ्या चिमाकडे पहात खंडूनें उत्तर केलें.

" आमच्या टॉमीला सफरचंदाचा रस फार आवडला. त्याला रस काढून देण्याची कामगिरी आतां तुझ्याकडे."

" काढील तो." खंडू गप्प बसलेला पाहून चिमानें त्याच्या वतीनें सांगितलें.

टोंगो, तूं आतां जाऊं शकतोस." शेठनीं विषय तोडला.

चिमा व खंडू स्टुडिओंतून बाहेर पडले व घराच्या रस्त्याला लागले.

" चिमा !"

" मला डमी म्हणायचं,"

" डमी म्हणजे काय ?"

" डमी म्हणजे नक्कल. एखाद्या दिवशीं देवी हजर नसल्या, तर त्यांचे कपडे घालून मी काम करतें. माझे पाठीमागून व बाजूनें शॉट घेतात, देवींची व माझी अंगलट सारखी आहे. मी त्यांची डमी आहे. गेल्या वर्षी 'जहरी नागीण' पिक्चरमध्यें कड्यावरून नदीच्या डोहांत उडी मारण्याचा सीन होता. पोहोण्याचे कांहीं प्रसंग होते. देवींना पोहतां येत नाहीं. मग मीं उडी मारली."

" मान्यांच्या मळ्यांतल्या विहिरींत आपण पोहायला जायचें. थारोळ्यावरल्या चौकटींतनं तूं धडाधड उड्या झोंकायची."

" ती संवय उपयोगी पडली. तेव्हांपासून शेठनीं माझं नांव डमी ठेवलं. त्यापूर्वी मी नुसती एक्स्ट्रॉ होतें. कामाच्या दिवशीं तीन रुपये रोज मिळत होता. आतां सव्वाशें रुपये पगार मिळतो."

" त्या चॉकलेटबाई ..."

" त्यांना आपण नाहीं चॉकलेट म्हणायचं. तो अधिकार फक्त शेठजींचा. आपण त्यांना देवी म्हणायचं."

" त्या देवींचा तुझ्यावर फार जीव दिसतो."

" जीव उगीच लागत नाहीं. लावून घ्यावा लागतो. मी त्यांचं पडेल तें काम करतें. त्यांना चहा करून देतें, विडे लावून देतें, जेवायला वाढतें; मेकअपला मदत करतें; कपडे नेसवतें म्हणून त्यांनां मी आवडतें. त्यांचे सगळे जुने कपडे मला वापरायला मिळतात. आज त्यांनीं शब्द टाकला म्हणून तुला नोकरी मिळाली."

" खरं आहे. डमी तूं फार हुषार आहेस."

" मलाही त्या फार फार आवडतात. आमचं दोघींचं अगदीं गूळपीठ जमलं आहे. त्या मला खूप गप्पा सांगतात. कधी कधीं चावट गोष्टीहि सांगतात. मला त्या धाकट्या बहिणीसारखं वागवतात. त्यांच्या मनांत काय चाललं आहे हें मला त्यांचे डोळे पाहून समजतं. कधीं कधीं आमची शर्यत लागते. त्यांनीं माझ्या मनांतलं ओळखायचं अन् मी त्यांच्या मनांतलं ओळखायचं. त्या एखादवेळीं जिंकतात. मी नेहमी जिंकतें. आमच्या आवडीनिवडी अगदीं सारख्या. मला जो माणूस आवडत नाहीं तो त्यांना आवडत नाहीं. आपल्या स्टुडिओंत जबडे मास्तर म्हणून माणसांचा दलाल आहे. खरं म्हटलं तर त्यानेंच मला या धंद्यांत घातलं. एक्स्ट्रॉ म्हणून त्यानें माझी शिफारस केली. मी त्याला त्याच्या कमिशनचा एक रुपया खुषीनें द्यायची.

तो द्यावाच लागतो. तो माझ्याशीं कधीं वाईट वागला नाहीं. मला नेहमीं काम द्यायचा. सारखा गोड बोलायचा. कां कोण जाणे, पण मला त्या माणसाची शिसारीच बसली. एक दिवस त्याचा विषय निघाल्यावर देवींनं मला सांगितलं त्यांनाही तो माणूस मुळींच आवडत नाहीं. कारण कांहींच नाहीं. त्यांचा तर जबर्दस्तीं संबंधही येत नाहीं. एक किनरी-वाला भिकारी मला फार आवडतो. म्हातारा आहे. किनरी छान वाजवतो. मला तो कारण नसतांना आवडतो. तो दिसला कीं मीं त्याला एक आणेली देतें. एके दिवशीं तो स्टुडिओंत आला. देवींनीं त्याला एक रुपया दिला. तो त्यांना फार आवडल्याचं त्यांनीं मला सांगितलं. टॉमी हा त्यांचा कुत्रा म्हणून मी त्याचे लाड करते असं नाहीं. टॉमी मला खरोखरीच फार फार आवडतो. असं आमचं मेतकूट आहे. त्यांना गुलाबी रंग फार आवडतो. मलाही तोच आवडतो. त्यांचं जें फूल आवडतं तेंच माझं आवडतं. मोगरा. त्यांना कोको आवडतो. आपल्या घरीं कोकोचा डबा आहे. त्या नेहमीं चॉकोलेट चावतात. मीही चावते. पण त्यांच्या पर्समधलीं. आपल्याला परवडेल तें करावं. '

" डमी, तूं फार व्यवहारी आहेस. तुझा कित्ता घ्यायला पाहिजे. "

" एक दिवस असा येईल कीं त्या दिवशीं नक्कल अस्सल होईल. म्हणजे ही डमी मुख्य नटी होईल.

" वाः रे ! '

" त्यांत काय कठीण आहे ! एके काळीं देवी दुय्यम काम करीत होत्या. आतां ' बदामची राणी ' हें पिक्चर सुरू होणार आहे. त्यांत मला राणीच्या दासीचं छोटंसं काम मिळालं आहे. एक गाणंसुद्धां मी गाणार आहें. म्हणजे ओठ हलवणार. हें काम मी मन लावून करीन, चांगलं करीन; खूप धडपड करीन. पुढच्या खेपेला मी मोठं काम मिळवीन. '

" डमी, लग्न कधीं करणार ? "

" करीन तर करीन. नाहींतर करणार नाहीं. "

" दुसऱ्या कोणाबरोबर जमलं तर नाहीं ना ? "

" अजून नाहीं. "

" डमी, आपला वाङ्निश्चय झाला. म्हणजे अर्धे लग्नच झालं. मोडूं नये म्हणतात. "

" कबूल आहे. पण बावन्न रुपयांनं तूं माझं पोट कसं भरणार ? शिवाय ही सिनेमांतली नोकरी आज आहे, तर उद्यां नाहीं. टोंगो, आम्हां दोघींना महिन्याला ऐंशीं रुपये लागतात. "

" मी कमवीन. "

" कसं कमवणार ? "

" धंदा करीन. "

" हें बघ, तूं धंदा कर, पैसे कमव अन् मग मला विचार. आज तोंडाची वाफ कशाला दवडतोस ! "

" तुझं बोलणं रास्त आहे. पटलं आपल्याला. " जवळून दिसणाऱ्या वाड्याच्या टपरीकडे पहात खंडू बोलला.

" टोंगो, वाड्यांतही तूं आमचा गांववाला म्हणून वागा-यचं आईला मी आज सांगून ठेवणार आहें. "

" ठीक आहे. जेवणाचं काय करायचं ? खाणावळींत जाऊं ? " वाड्यांत शिरण्यापूर्वी खुलासा करून घ्यावा हें ठीक.

" नको. गांववाला जेवायला राहिला, म्हणून कांहीं बिघडत नाहीं. "

खंडू कामावर रुजू झाला. डोळे उघडे ठेवून पाहायचे, शिकतां येईल तेवढें शिकून घ्यायचें, एकसारखी धडपड करायची व पाऊल पुढें टाकायचें, या डमीकडून शिकलेल्या मंत्राची तो उजळणी करूं लागला. स्टुडिओच्या आवारांत हंसतमुख ठेवून तो पडेल तें काम झटझट उचलूं लागला.

गोकुळशेटचा स्वभाव खूप गंमत्या असून कोणत्याही खालच्या दर्जाच्या नोकराशीं ते पाठीवर थाप मारून बोल-तात आणि निरनिराळे गमतीचे आवाज काढून हंशा पिकवतात, हें त्यानें पाहून ठेवलें. डमी देवींची ' पेट ' असल्यामुळें स्टुडिओंतले झाडून सगळे लोक तिच्याशीं आद-रानें बोलतात, हें त्याला समजून आलें. आवाई डमीच्या बरोबर स्टुडिओंत येते, दूर बसून राहाते, पण डमीवरची नजर ढळूं देत नाहीं हें तो रोज पहात होता. शेठनीं तिचें नांव ' ओबाई ' ठेवलें होतें. ओबाईच्या अखंड पहाऱ्यामुळें डमीची चेष्टा करण्यासाठीं टग्यांच्या जिभा धजावत नव्हत्या, पाडव्याच्या दिवशीं पुजायला आणलेल्या स्लेटपाटीप्रमाणें डमी कोरी असून चावटपणाचा ओरखडाही तिनें अजून उठूं दिला नाहीं, अशी खात्री पटून खंडूचें समाधान झालें. स्टुडिओंत ती त्याच्याशीं बोलत नसे कीं त्याच्याकडे पहातही नसे. तोही तसाच वागे. कामाशीं काम. काम म्हणजे काम. थोड्याच दिवसांत लाइटबॉय म्हणून काम करणारा 'टोंगो' सगळ्यांचा आवडता झाला.

पहिला पगार हातांत पडल्यावर टोंगोनें डमीच्या हातांत दहाची एक नोट ठेवली.

"हे तूं दिलेले खोलीभाड्याचे पैसे." डमीनें ती नोट पर्समधें ठेवल्यावर तो पुढें म्हणाला, "त्या दिवशीं माझ्या कपड्यासाठीं किती खर्च झाला तें सांग. मी हप्त्याहप्त्यानें फेडीन."

"ते पैसे मी घेणार नाहीं. तुझ्या मामीनें तुला कपडे करून दिले असं समज. पुन्हां विचारूं नकोस."

"पण..."

"गप्प म्हटलं कीं गप बसावं."

टोंगो गप झाला. डमीच्या गैरहजेरींत त्यानें आबाई-जवळ गोष्ट काढली.

"मामी, जेवणाचं काय करायचं ?"

"जेवायचं."

"तें झालं. पण तुमचे पैसे खर्च होतात. मला आतां पगार मिळतो. फुकट कसं खायचं ?"

"मग पैका दे."

"किती देऊं ?"

"दे पंधरा."

टोंगोनें पंधरा रुपये मोठ्या आनंदानें आबाईच्या हातांत ठेवले. पुढच्या महिन्याचें अगाऊ भाडें दिल्यावर सतरा रुपये राहिले. दोन रुपये किरकोळीसाठीं ठेवून त्यानें एक दहाची व एक पांचाची अशा दोन नोटा आपल्या उशींत घालून शिवून टाकल्या. पैसे जमवून लवकरच कोणतातरी धंदा करायचा, असा बेत त्यानें ठरवून ठेवला होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं टोंगो कामावर जाण्यापूर्वी आबाईनें अच्छेर दुधाचा तांब्या त्याला प्यायला दिला.

"मला कशाला दूध ?"

"प्यायला."

"पण..."

"मी म्हटलं कीं प्यावं."

टोंगोनें दूध पिऊन टाकलें. मग आबाईनें हळूच खुलासा केला. हा रतीब तिनें डमीच्या सांगण्यावरून सुरू केला होता. टोंगोनें एक रुपया शेराप्रमाणें मनांतल्या मनांत हिशेब केला आणि त्याचें हृदय भरून आलें. डमीचा आपल्यावर जीव आहे, अशी खूणगांठ त्यानें बांधिली. त्याचा जीव वाऱ्याच्या झुळुकीवर वाहून जाणाऱ्या पिसा-सारखा हुरावला.

बदामच्या राणीचें शूटिंग सुरू झालें. अरुणादेवी नायिकेचें काम मस्त करूं लागल्या. डायरेक्टरचें नांव के. अनन्तन् होतें. डमी आपली भूमिका काळजीकाळ्यानें वठवूं लागली. शूटींगच्या कामकाजाची टोंगोला चांगली माहिती झाली. सेटच्या भिंतीच्या शेंड्यावर लावलेले मोठ मोठ्या लाइटचे गोल डब्बे कुठें वळवायचे, कधीं वळवायचे, कसे वळवायचे, केव्हां 'डिम' करायचे हें त्याला कळूं लागलें. झाडाच्या आडव्या सरळसोट फांदीवरून उभ्यानें धांवत जाण्याचा त्याला सराव होता. कॅमेरामननें सूचना देण्याचा अवकाश कीं, टोंगो माकडासारखा धांवत जाऊन तें काम करी.

नायकाचें काम करणारा नट भारी देखणा व नाजूक होता. त्याचे कपडे भारी ऐटबाज असत. त्याचें नांव किरण-कुमार. गोकुळशेटनें त्याचें नाव 'डॉल' ( बाहुली ) ठेवलें होतें. किरण कुमारखरोखरीच एखाद्या सजवलेल्या भावल्या-सारखा सुरेख दिसत होता. देवींना तो फार आवडत होता आणि डमीलाही. देवी डॉलशीं नेहमीं गप्पागोष्टी करीत. तोहि केसांच्या झुलपांवरून हात फिरवीत त्यांच्याशीं गोड गोड बोले. डमीहि त्यांच्या गप्पागोष्टींत भाग घेई. केव्हां, काय, कुठें व कसें बोलावें या कलेंत ती चांगलीच तरबेज झाली होती. आपण एक हलकी फुलकी नटी आहोंत, हा भाव तिच्या वागण्यांत दिसत असे. बोलण्यात, हसण्यात, हातवारे करण्यांत ती देवींची सहीसही नक्कल करी. देवींचे कपडे जसे तिला 'फिट्ट' बसत तसा देवींचा अभिनयही ती 'डिट्टो' करी. डमी सोळाच्या सोळा आणे डमी होती.

देवी सेटवर नसल्या कीं डॉल डमीशीं बोलत बसे. तिलाही संकोच वाटत नसे. किंबहुना डॉलशीं कुजबुज करण्यांत डमी अलीकडे जास्त गुंगून जाते, अशी टोंगोला शंका येऊं लागली. तिच्या हालचालीवर त्याची बहिरी-ससाण्यासारखी नजर असे. मात्र आपली तिच्यावर नजर आहे, हें तो कुणाला कळूं न देण्याची दक्षता घेई. डमी स्वतःला फार धूर्त समजत असे. टोंगोही कांहीं कमी नव्हता. ती ज्या गांवचें पाणी प्याली होती, त्याच गांवचें पाणी तो तिच्यापेक्षां जास्त प्रमाणांत प्यायला होता.

शूटिंग जसजसें पुढें चाललें तसतशी टोंगोची डोकेंदुखी वाढूं लागली. डॉल डमीशीं मुद्दाम लगट करीत आहे, घसट वाढवीत आहे, हें त्याच्या लक्षांत आलें. देवींचा साखरघास आटोक्याबाहेरचा असल्यामुळें डमीच्या गुळखड्यावर झडप घालण्याचा त्याचा डाव टोंगोनें ओळखला. त्याला वाईट

वाटत होतें याचें कीं, डमी डॉलच्या रोज पुढें पडणाऱ्या पावलाला अटकाव करीत नव्हती. तो चवळला आहे हें कळत असूनही ती त्याच्या सलगीच्या सावलींत शिरत होती. तो हंसला कीं ती हंसायची. त्यानें हात पुढें केला कीं ती टाळी द्यायची. त्यामुळें टॅंगोला डोकेदुखीबरोबर पोटदुखी सुरू झाली. सुंठीचा व ओव्याचा बटवा आबाईच्या कंबरेला होता म्हणून ठीक. आपल्या पिचपिच्या डोळ्यांचा पहारा तिनें अलिकडे जास्त कडक केला आहे, हें टॅंगोनें जाणलें होतें. शिरवळचं पाणी त्या दोघांपेक्षां जास्त प्रमाणांत पोटांत घातलेली ती म्हातारी टॅंगोच्या पहाऱ्यावर विसंबून रहायला तयार नव्हती. मायलेकींत अलीकडे खटके उडूं लागले असावेत अशी टॅंगोची अटकळ होती.

पुढच्या पगाराला टॅंगोनें पंचवीस रुपयांच्या नोटा बाजूला काढून उशींत शिवून टाकल्या. नवीन स्वतंत्र धंद्याची कल्पना त्याच्या डोक्यांत पक्की रुजली. भांडवलाचा पत्ता नसतांनाही त्यानें चौकशीला सुरुवात केली.

नायक व नायिका यांच्या लग्नाचा सीन व्यायचा होता. त्यासाठीं बोहेल, मुंडावळ्या, हार, अंतरपाट लिंबू लावलेली सुरी नारळ वगैरे तयारी प्रॉपर्टी मास्तरनें जय्यत ठेवली होती. जवडे मास्तरनें दोन भटजी व मॉबसाठीं पन्नास नग आणून ठेवले होते. बारा आणे पुल्लिंगी व चार आणे स्त्रीलिंगी. बॅंकवाले, चौघडेवाले, सनईवाले सगळे सज्ज होते. नवरदेवाचा छानदार पोशाख घालून डॉल सजला होता. डमी करवली म्हणून आधींच मिरवत होती. देवींना मात्र अजून पत्ता नव्हता. रोज घरूनच मेकअप करून आयत्यावेळीं येण्याचा त्यांचा रिवाज होता. ट्रॉलीवर कॅमेरा लावून ठेवलेला होता. नंबरटेकर नंबर लिहून तैयार होता. साऊंड व्हॅनमधले हातवळणे मधून मधून उगीचच हलाव हलाव करीत होते.

गोकुळशेट गडबडीनें सेटवर आले. त्यांनीं स्फोट केला.

"चॉकोलेटचा फोन आला. ती आज येत नाहीं. डोकं फार दुखतं. मी जातों तिकडे."

"एवढा मॉब परत पाठवायचा म्हणजे उगीचच खर्च!" के. अनन्तन् कुरकुरले.

"परत कशाला पाटवतां! सीन घेऊन टाका. बोलून चालून लग्न. डायलॉग नाहीं की फायलॉग नाहीं. क्लोजअप्स नंतर घ्या. डमी कुठं आहे?"

काय, शेट? डमी पुढें आली.

"जा, ' कपडे उतर. नुसते उतरूं नकोस. हा हा हा! नवरीचे कपडे घाल. आज तूं नवरी. डॉल तुझा नवरा. ओह्लोलेलो!"

शेट निघून गेले. डमी नवरीचे कपडे घालून, मुंडावळ्या बांधून आली. तिच्या नखऱ्यावर लोकांची नजर ठरेना. टॅंगोच्या पोटांत मात्र कळ उठली. के. अनन्तन् कामाला लागले. लग्नाचे शॉटस् सुरू झाले. डॉल डमीचा हात धरतो आहे, दाबतो आहे, कुरवाळतो आहे, तिच्याकडे पाहून हंसतो आहे, तिच्या गळ्यांत हार घालतो आहे, तिच्या हातचा घालून घेतो आहे, हे प्रकार खंडूला बघवेनात. आज त्याच्या हातून चुका होत होत्या. कॅमेरामन त्याच्या अंगावर खेकसत होता. के. अनन्तन् त्याच्याकडे टवकारून पहात होते. डमी खुदुखुदु हसत होती. मुंडावळीमागून तिचे डोळे आनंदानें लकाकत होते. खरोखरीच्या नवरीचें तेज तिच्या तोंडावर चढलें होतें.

संध्याकाळपर्यंत लग्नाचा सीन व्यवस्थितपणें पार पडला. शूटिंग आटोपलें. मेकअप धुऊन मॉब घरोघर गेला. सेटवरला स्टाफ पांगला. मेकअप तसाच ठेवून डमी व डॉल बोहल्यासमोरच्या कोचावर बसून कोको पीत होतीं; खो खो हसत होतीं. टॅंगो प्रॉपर्टीची आवराआवर करीत होता. डॉलनें हाक मारली.

"टॅंगो, इकडे ये." टॅंगो तिकडे गेला. "एक सिगारेटचं पाकीट घेऊन ये." डॉलनें एक रुपयाची नोट पुढें केली.

"मी तुझा नोकर नाहीं."

"माझं ऐकत नाहीं? गद्धा कुठला!" डॉल चिडला.

"तूं गद्धा." टॅंगो शांतपणें बोलला.

"तुम्ही त्याच्या नादीं लागूं नका."

डमी मध्यें पडली. कोचवरून उठणाऱ्या डॉलचा हात धरून तिनें त्याला खालीं बसवलें. तणतणत तो टॅंगोच्या अंगावर ओरडला.

"उभा काय राहिलास! जा, चालता हो."

टॅंगोला मुकाट्यानें निघून जाणें भाग होतें. पलीकडच्या बाजूला आबाई बसलेल्या होत्या. त्यांच्याजवळ जाऊन 'जातों' असें सांगून तो निघून गेला.

आठ वाजण्याच्या सुमारास दोघी परत आल्या. त्या रात्रीं चूल पेटली नाहीं. दोघीहि उपाशीच झोंपल्या. "दुपारची शिळी भाकर खाऊन घे." हा आबाईचा आग्रह मोडून टॅंगो आपल्या खोलींत पडून राहिला. स्टुडिओंतून परत येतांना मायलेकींचं कडाक्याचें भांडण झालें असावें, हें टॅंगो उमजला.

दुसऱ्या दिवशीं देवींची तब्येत बघायला त्यांच्या बंगल्यावर जाण्यासाठीं डमी लौकर बाहेर पडली. चुलीच्या पुढें बसून टोंगोनें विषय काढला.

" मामी, डमीचं काय बिनसलं ? "

" येडी पोरगी आहे. "

" काय, म्हणते काय ? "

" म्हंते कीं, तुझ्यासंगं लगीन करायचं नाहीं. "

" कां ? "

" म्हंते कीं, कालचं लगीन बामनानं लावलं. अक्षत पडली. "

" बाप रे ! "

त्या दिवसापासून टोंगोनें हाय खाल्ली. घरच्या घरीं डमीबरोबर तो जें काय थोडेंसें मामुली बोलत होता, तेंही त्यानें बंद केलें. डमीच्या डोळ्यांना डोळे देणेंही त्यानें सोडून दिलें. डमीला त्याचें शुभाशुभ नव्हतें. मायलेकींतली भाषा कमी पडली. आबाई कुब्यासारखी बोले. डमी अटरून बोले. डॉलबरोबरची तिची सलगी वाढत चालली. स्टुडिओंतले लोक तिचें नांव त्याच्या जोडीनें घेऊन चेष्टेनें बोलूं लागले. स्लेटपाटीवर ओरखडा पडला. त्यांना मिळणारा एकांत मात्र कधीं निर्वेध नसे. टोंगोच्या खाकरण्याची किंवा आबाईच्या खोकल्याची अडचण ठेवलेली असे. डॉलला टोंगोच्या अडथळ्याची कल्पना आलेली दिसली. डमीनें त्याला त्यांच्या नात्याची कल्पना दिली असावी. कारण टोंगोला पाहून तो डोळे गरगर फिरवूं लागला; उगीचच त्याच्या अंगावर दुरून ओरडूं लागला; के. अनन्तन्‌जवळ त्याच्या चुगल्या करूं लागला. त्याचं ऐकून ऐकून के. अनन्तन्‌चें मत टोंगोविषयीं गढूळ झालें.

एक निराळा सीन घ्यायचा होता, रात्रीच्या वेळीं एक चोर नायिकेच्या घरांत शिरतो. तिजोरी उघडून तो चोरी करूं लागतो. नायिका जागी होते व ओरडते. नायक नेमका प्रवेश करतो. चोराचा व त्याचा सामना होतो. अखेरीस नायक चोराला पिटून पिटाळून लावतो. चोराचं काम करण्यासाठीं जो इसम जबडेमास्तरनें आणला होता तो के. अनन्तन्‌ला पसंत नव्हता. ते जबडेमास्तरशीं बाचत होते. एवढ्यांत शेट सेटवर आले, तक्रार ऐकून घेतल्यावर शेट म्हणाले,

" नको, हा शामळू माणस तद्दन नको. चोर कसा पाहिजे ? टा रा रा रा रा टा ! जबडे, याला घेऊन जा. आपला टोंगो कुठं आहे ?"

" काय, शेट ?" वरून आवाज आला.

" खालीं ये."

टोंगो खालीं आला. शेटनें आपल्या हातानें त्याच्या अंगावर चोराची ड्रेपरी चढवली. मेकअपची जरुरी नव्हती. तोंडावर काळें फडकं बांधून झाल्यावर त्याची पाठ थोपटीत शेट उद्गारले,

" टोंगो, अरे तूं अस्सल चोर दिसतोस. डा डा डा डा डा ! आमी आज शूटिंग बघणार. "

शेट एका खुर्चीवर बसले. डॉल व के. अनन्तन् यांची चर्चा झाल्यावर के अनन्तन्‌नें टोंगोला सूचना दिल्या. आज रात्रींची पाळी होती. दहा वाजतां पहिला शॉट सुरू झाला. टोंगो खिडकींतून उडी मारून आंत आला. तिजोरी उघडून त्यानें दागिने बाहेर काढले. देवी जाग्या झाल्या. त्यांनीं किंकाळी फोडली.

" जोरांत पाहिजे. " हातवळणेंचा आवाज आला. हातवळणे मोठे गमती होते. त्यांनीं देवींना खूप वेळ किंचाळायला लावलें. शेडमधें पडल्यावर फायनल टेक झाला. मग डॉलनें प्रवेश केला. त्याच्या हातांतली काठी चांगली जाडजूड होती. त्याचे डोळ आनंदी व धोकेबाज दिसत होते.

डॉलनें चोराला खूप पिटावें, चोरानें मुकाट्यानें मार खावा असें ठरलें. तेराव्या काठीला खिडकीबाहेर उडी मारण्याची के. अनन्तन्‌नें टोंगोला सूचना दिली. शॉटला सुरवात झाली. डॉल दात खाऊन टोंगोला झोडपूं लागला. त्याच्या डोळ्यांत त्वेषाची धग दिसत होती. टोंगो मुकाट्यानें मार खात होता. बघणाऱ्या लोकांना तो प्रसंग चमत्कारिक वाटूं लागला. नाटकसिनेमांत कुठें असा मार द्यायचा असतो ! काठीचे प्रहार सपासप बसत होते. देवी आपल्या खुर्चींत चुळबुळ करूं लागल्या. दहावा तडाखा टोंगोच्या तोंडावर बसला आणि " कट् ! " असा आवाज झाला. कॅमेरा थांबला. के. अनन्तन् चिडल्यासारखे दिसले. 'कट' ची ऑर्डर त्यांनीं दिली नव्हती. ती बायकी आवाजांतली होती. डमी बोलली होती. शेटना खूपच गंमत वाटली.

" आमी भुललो होतों. अरे, हा डमीचा गांववाला. बराबर आहे, काय मार खाल्ला ! वा वा वा ! धडाक् फडक्, तडाक् धडाक् ! मॅनेजर, टोंगोला दहा रुपये पगार वाढवा. '

" मला वाटतं कीं, हा सीन चुकला." देवींनीं मत दिलें, " चोरानें भरपूर मार खावा हें ठीक. पण त्यानें प्रतिकार करायला पाहिजे."

" तसं असेल तर रिटेक नको. " डॉल.

" रिटेक तर घ्यायलाच पाहिजे." के. अनन्तन्.

" मग मघासारखा रिटेक घ्या." डॉल.

" चोरानें तीन चार टोले द्यायलाच पाहिजेत." शेटना देवींचें मत पटणें अगदीं साहजिक होतें.

बराच वेळ चर्चा झाल्यावर एका टोल्यावर सौदा मिटला. डॉलनें बारा टोले पुन्हां मारावेत व टोंगोनें खिडकींतून उडी मारण्यापूर्वीं डॉलच्या हातांतली काठी हिसकावून घेऊन एक टोला मारावा असें ठरलें. पुन्हा बारा टोले देण्याची संधि मिळाल्यामुळें डॉल खुषींत आला. रिटेकचा नंबर पडला. शॉटला सुरवात झाली. या खेपेला तर डॉलनें कमाल केली. गेल्या जन्माचा वैरी हातांत सांपडावा, अशा अवसानांत तो दणके लगावीत होता. बारावा तडाखा संपतांच टोंगोनें मोहरा फिरवला, डॉलच्या हातांतली काठी उपसून घेतली आणि ती डोक्यावर फिरवून डॉलच्या नडगीवर एक प्रहार केला. विचित्र आवाज झाला. लगेच उडी मारून टोंगो खिडकीबाहेर पसार झाला. के. अनन्तनला "कट" म्हणावयाचें भान राहिलें नाहीं. डॉल उताणा पडला होता. त्यानें डोळे पांढरे केले होते. त्याची पँट रक्तानें भरली होती. सेटवर एकच गडबड उडाली. चोवीस तडाखे खाल्लेला टोंगो सेटवर येऊन शांतपणें घाम पुशीत उभा राहिला. काळ्या फडक्याच्या फटींतून दिसणारे त्याचे डोळे लकाकत होते.

डॉलच्या तोंडावर तांब्याभर पाणी ओतूनही तो शुद्धीवर येईना. त्याच्या पँटमधून रक्ताचे ओघळ वाहूं लागले. बारा वाजून गेले होते. फोन करून डॉक्टरना बोलावून घेण्याचा कांहीं उपयोग नव्हता. डॉलला दवाखान्यांत ताबडतोब पोंचविणे जरूरीचें होतें, तें काम देवींनीं आपल्या अंगावर घेतलें. शूटिंगचे बारा वाजलेच होते. डॉलला तिघाचौघांनीं उचलून देवींच्या मोटारींत निजवलें. त्या मोटारींत बसल्या मोटार सुरू झाली व थोडेंसें पुढें जाऊन थांबली. बाहेर डोकें काढून देवी बोलल्या

"कोणीतरी माझ्या सोबतीला या."

डायरेक्टर म्हणाले, 'मी' कॅमेरामन म्हणाला, 'मी' प्रत्येकजण छातीला हात लावून अहम टिकेनें पुढें सरकूं लागला. 'मी' चा नुसता कल्लोळ उसळला.

"देवी, मी येऊं का?" डमीनें विचारलें.

"नको. त्या टोंगोला पाठव."

टोंगोच्या नांवानें अनेक तोंडांतल्या हाका एकदम बाहेर पडल्या. टोंगोने चोराचे कपडे नुकतेंच उतरून ठेवले होते फडकें सोडलें होतें. तो मोटारीजवळ गेला. दार उघडलें गेलें. तो मोटारींत बसला. मोटार निघून गेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दातांना मशेरी लावीत डमी चौकांतल्या मोरीवर गेली. बघते तों टोंगो ओकत होता. घशांत बोटें घालून तो ओकाऱ्या काढीत होता. चौकांत मनस्वी घाण सुटली होती. नाकाला पदर लावून डमी माघारी फिरली.

चहाचा कप घेऊन आज कित्येक दिवसांनीं डमी टोंगोच्या खोलींत शिरली. तो भिंतीला टेकून स्वस्थ बसला होता. त्याचे डोळे लाल दिसत होते. डमीनें चहाचा कप त्याच्या हातांत दिला. त्यानें तो झटक्यांत पिऊन टाकला.

"केव्हां आलास?"

"मघाशीं."

"कुठं झोंपला होतास?"

"बंगल्यावर."

"दारू प्यालास ना?"

"हो."

"देवींच्या कपाटांतून चोरली?"

"नाहीं. त्यांनीं पाजली."

"काल चिक्कार मार खाल्लास. म्हणून त्यांनीं दिली असेल. तशा देवी फार मायाळू आहेत."

"हं.' टोंगो हुंकारला."

"डॉल शुद्धीवर आला?"

"माहित नाहीं."

"म्हणजे?"

"आम्ही त्याला घारपुऱ्यांच्या दवाखान्यांत ठेवला; तेव्हां तो शुद्धीवर नव्हता."

"चांगलं केलंस. आतां तो बरा होईपर्यंत शूटिंग बंद!"

"मी त्याला काय करणार!"

"समजलें मी."

"एक विचारूं का?"

"काय?"

"प्रभात टॉकीजच्या समोर एक पानपट्टीचं दुकान विकाऊ आहे. चार आठ दिवसांत पैसे दिले, तर सामानासकट ताबा मिळेल. मालक पांचशें रुपये म्हणतो. पण बैठकीला बसल्यावर पाणी तुटेल."

"मला कां सांगतोस?"

"तें दुकान घ्यावं, असं मीं ठरवलं आहे. मजजवळ फक्त चाळीस रुपये आहेत. बाकीचे तूं दे."

"मी तुला कां पैसे द्यावेत?

"उसनवार दे. मी व्याजासकट फेड करीन."

"नोकरी सोडणार?"

"दुकान घेतलं तर लगेच सोडणार, नाहीं तर निलटपणें करणार."

"कालच्या प्रकारामुळें कंपनीचं नुकसान होणार. मला नाहीं वाटत शेट तुला ठेवतील म्हणून."

"ते ठेवतील, पण माझी तिथून बाहेर पडण्याची इच्छा आहे. तूं पैसे दिलेस तर जमेल सगळं."

"मजजवळ कुठले इतके पैसे!"

" तुझ्याजवळ आहेत, नसले द्यायचे तर सरळ ' नाहीं ' म्हणून सांग."

" सरळ सांगते, मजजवळ तेवढे पैसे आहेत. पण मी तुला देणार नाहीं. तूं माझा कोणी नाहींस अन् मी तुझी कोणी नाहीं. मी तुला कर्जाऊ पैसे द्यावेत इतकी तुझी लायकी नाहीं. तुला नोकरीला लावूनच मी पस्तावलें आहें. आणि हें बघ. आजपासून तुझी जेवायची सोय बाहेर कर."

" ठीक आहे."

ऊमी स्टुडिओंत गेल्यावर तिला डॉल्ची बातमी समजली. डॉक्टर झोपले होते. मेट्रननें त्यांना फोन केल्यावर ते लगेच दवाखान्यांत आले. तोंपर्यंत डॉल शुद्धीवर आला होता. डॉक्टरांनीं त्याला तपासलें. फ्रॅक्चर झालें होतें. नडगीचें हाड पिचलें होतें. चामडी फाटली होती. डॉक्टरनीं त्याला लगेच ऑपरेशन थिएटरमध्यें नेलें व टाके मारून प्लॅस्टर बांधले. प्लॅस्टर काढणें दोन महिन्यांनीं जमेल. तीन महिन्यांनीं डॉल काठी घेऊन चालूं शकेल. के. अनन्तन् दवाखान्यांत जाऊन आले होते. स्टुडिओंत थव्याथव्यानें याच बातमीची चर्चा चालली होती. डॉलच्या ऐवजीं शेटनीं दुसरा हीरो घेतला असून रिशूटिंगला आठ दिवसांनीं सुरवात होणार, अशी दुसरी बातमी संध्याकाळीं उठली.

ऊमी पगारी नोकर असल्यामुळें तिला हजेरी देण्यासाठीं रोज जावें लागे व काम नसलें तरी सहा वाजेपर्यंत बसावें लागे. टोंगो जेवायला यायचा थांबला होता. आबाईची व तिची भाषा एकदम बंद पडली होती. टोंगोच्या खोलीला सदैव कुलूप दिसत होतें. तो स्टुडिओंत तरी येतो कीं नाहीं हें तिला माहित नव्हतें. देवी स्टुडिओकडे फिरकत नव्हत्या. असे चार दिवस गेले.

संध्याकाळची वेळ. स्टुडिओ सुटण्याची घंटा झाली. ऊमी निघण्याच्या तयारींत होती. इतक्यांत देवींच्या मोटारीचा हॉर्न वाजला. ऊमी घाईघाईनें बाहेर आली. देवी मोटारींत एकट्या होत्या. ड्रायव्हिंग त्याच करीत होत्या. मोटार थांबली. जवळ जाऊन ऊमी बोलली,

" देवी, आज स्वतः ड्रायव्हिंग ! आणि टॉमीला कां नाहीं आणलं ?"

" जा, त्या टोंगोला बोलावून आण."

मोटारींतून उतरत देवी म्हणाल्या, चार दिवसांनीं स्टुडिओंत आल्यावर आपल्या प्रश्नाला उत्तरही न देतां देवींनीं टोंगोची चौकशी करावी, या गोष्टीचा ऊमीला विषाद वाटला. टोंगोला बोलवायला जाण्याचें तिच्या जिवावर आलें. पण देवींच्या हुकुमाची तामिली करायलाच पाहिजे. फुरंगटल्यासारखी होऊन ती टोंगाचा शोध करूं लागली. लोक घरोघर चालले होते. बराच वेळ शोधलें तरी तिला त्याचा पत्ता लागेना. अखेरीस स्टुडिओच्या मागच्या कोपऱ्यांत एका झाडाखालीं लोळत असलेला टोंगो तिला दिसला. कपाळाला आठ्या घालून ती म्हणाली,

" तुला देवींनीं बोलावलं आहे."

" कोण देवी ?"

" अरुणादेवी."

" कशाला बोलावलं ?"

" मला काय माहित !"

" मी नाहीं येत."

" तसं मी त्यांना सांगतें."

असें बोलून ऊमीनें पाठ फिरवली. टोंगो उठून उभा राहिला. एक जांभई देऊन तो म्हणाला,

" थांब. मी जातों. हडळ कुठली !"

" मला हडळ म्हणतोस !"

" तुला नाहीं ग, तुझ्या त्या देवीला."

लांब टांगा टाकीत टोंगो निघून गेला. त्याचें एकंदर वागणें ऊमीला भारी चमत्कारिक वाटलें. हळुहळू पावलें टाकीत ती निघाली. स्टुडिओंत सामसूम झाली होती. सेट ओलांडून पुढें गेल्यावर तिला मोटार दिसली. देवी मोटारीजवळ उभ्या होत्या व खंडूशीं बोलत होत्या. त्यांची बोलण्याची पद्धत ऊमीला जरा निराळी, आर्जवाची वाटली. ती थबकली व एका झाडाच्या खोडाआड उभी राहून पाहूं लागली. देवी खंडूला मोटारींत बसायला सांगत होत्या व तो ' नाहीं ' म्हणत होता. शब्द तिला नाहीं ऐकूं आले, पण आशय समजला. एक भयानक विचार तिच्या डोक्यांत आला. तिच्या अंगावर सरसरून कांटा उभा राहिला. देवींनीं आजूबाजूला पाहिलें व टॉमीची पाठ लाडालाडानें थोपटावी त्याप्रमाणें टोंगोच्या गालावर हळुवार चापट मारली. टोंगो मागें सरकला व त्यानें जोरजोरानें नकारार्थी मान हलवली. देवी मोटारींत बसल्या. दरवाजा खूप जोरानें लावून घेतल्याचा आवाज झाला. फुर्रर्र करीत मोटार निघून गेली.

ऊमी धांवतच पुढें गेली. टोंगोचा हात धरून ती म्हणाली,

' चल, लवकर घरीं चल. मी तुला पैसे देतें. आजच्या आज जा अन् त्या दुकानाचा सौदा कर. पैसे मी एका जमाडी–जमतीत ठेवलेत. आईलासुद्धां माहीत नाहीं. चल, तुला उशी उसवून देते. खंडेराव, मी तुझीच आहें–रे !" ●

अलिकडलें कांहीं उत्कृष्ट अनुवादित साहित्य

- **शिखरावरून**

  जगप्रसिद्ध उद्योगपतीची आत्मकहाणी.

- **दयेची देवता**

  अमेरिकन रेड क्रॉसच्या संस्थापिकेची चरित्र-कथा.

- **नवें घर : नवें आयुष्य**

  ओसाड भागांत जीवन फुलविलेल्या कुटुंबाची गोष्ट.

- **झेंप**

  हंगेरियन नर्तक–युगुलाची आत्मकहाणी.

- **आशा-गीत**

  अमेरिकेंतल्या श्रेष्ठ हॉटेल मालकाचें आत्मकथन.

या प्रत्येक पुस्तकाची किंमत : रुपये दोन.

- **भाग्यवती, मी भाग्यवती**

  भागवन-गायिकेची सुरेल आत्मकथा
  किमत : रुपया दीड.

- **चारही वाटा**


  युद्ध आणि विध्वंसाच्या पार्श्वभूमीवरची चित्तथरारक कादंबरी
  किंमत : रुपये तीन.

- **कारभारीण**

  शहरांतल्या गृहिणीचे खेड्यांतले खमंग अनुभव
  किंमत : रुपये दोन.

नवलेखन प्रकाशन, ई ५ मॉडेल हाउस, प्रॉक्टर रोड, मुंबई ४

बालविभाग : मुलांमुलींकरितां सुंदर, सचित्र व सुबोध कादंबरी




## प्रकरण १ लें....... बालपणचे दिवस

रत्नागिरी शहराच्या चारी बाजूला सह्याद्रीच्या डोंगराचा वेढा पडला आहे. पहावें तिकडे लहान मोठे डोंगर, हिरवेंगार गवत पांघरून डौलानें बसलेले. डोंगराच्या पायथ्यापासून खूप लांब आकाशाला टेकलेला समुद्राचा अनंत विस्तार दिसतो. संध्याकाळीं सूर्य मावळाय गेला कीं, त्याचे सोनेरी किरण पाण्यावर पसरतात आणि समुद्र अधिकच शोभूं लागतो.

त्या लहानमोठ्या डोंगरांच्या पायथ्याशीं अलीकडे पलीकडे लहान लहान खेडेगांवें आहेत. सुमारें १५-२० घरें, तितकेच गोठे. आजूबाजूला लहान लहान शेतें. जवळ नारळी-पोफळींच्या बागा आणि या चिमुकल्या गांवांची नांवें तरी किती मजेदार. फणसावळें, मिरजोळें, चमेली, कण्हेरी अशी फळांची फुलांची गमतीदार नांवें त्या गांवांना होती.

एका हिरव्यागार डोंगराच्या पायथ्याशीं कण्हेरी गांव वसला होता. गांवांत घरें होती अवघी पंधरा सोळाच. लहान लहानशी तीं बसकी घरें जशा कांहीं पटावर मांडलेल्या सोंगट्याच. अशाच एका लहान कौलारू घरांत उमा आजी नांवाची एक म्हातारी रहात असे. साठीच्या घरांत गेलेली, कंबरेंत वाकलेली उमा आजी साऱ्या गांवाला ठाऊक होती. कारण ती कोणाचेंही अडलें पडलें पाही. आजाऱ्याला औषधपाणी देई, दुखलें खुपलें पाही. म्हातारी मोठी प्रेमळ होती. घरांत दुसरें कोणी नव्हतें. फक्त आजीची एक ९ वर्षांची नात आजी-जवळ रहात असे. तिचें नांव होतें शोभाराणी. राणी गेलीं २ वर्षें आजीजवळ रहात होती. कारण तिचे आईवडील तिला टाकून थोड्याच अंतरानें देवा-कडे गेले होते. पूर्वी त्यांना पुण्याला एका मोठ्या ऑफिसांत नौकरी होती. ३०० रुपये पगार होता. आपल्या बायकोमुलीसह ते मोठ्या सुखानें रहात

पण कसलासा आजार होऊन ते एकाएकी देवाकडे निघून गेले. पाठोपाठ ३।३ महिन्यांत राणीचीआईही गेली. राणी एकटी पोरकी पोर झाली. आतां ती कोणाजवळ राहणार ? उमा आजीनें एका माणसाला पाठवून तिला आपल्या घरीं आणलें. तिच्या मुलीची ती मुलगी. म्हणून म्हातारीचा जीव कळवळला. ती मनांत म्हणाली " माझी मुलगी गेली तरी नात आहे. माझी दुधावरची साय आहे ती, जपलें पाहिजे तिला. आजची उद्यां मोठी होईल, आणि नांव सांगेल आईबापांचें.

असें म्हणून उमाआजीनें शोभाराणीचें संगोपन चालविलें. तिला न्हाऊं माखूं घातलें. गाईचें दूध रोज आजी राणीला प्यायला देई. वेणी घाली, परकर नेसवी. सकाळीं मऊभात टाकून मेथकूट घालून भरवी. कांहीं दिवसांनीं शोभाराणीचें मन आजीजवळ रमलें. आईवडिलांची तिची आठवण हळुहळु पुसट होऊं लागली. आजी हीच आपली आई, असें तिला वाटूं लागलें आणि तिचे दिवस त्या चिमुकल्या खेड्यांत आनंदानें जाऊं लागले.

राणी सकाळीं उशिरांच निजून उठे, सूर्यनारायण आपले किरण पाठवून तिला उठवी. ती उठे तोंपर्यंत उमा आजीचें केरपोतेरें, सडासारवण होऊन दारापुढें रांगोळी पडे. आणि ताकाच्या डेऱ्यांत रवीचा खुळखुळ असा आवाज येऊं लागे.

मग राणी उठून तोंड धुवी आणि देवाला नमस्कार करी. मग लोणी खायला आजीजवळ येऊन उभी राही. रोज देव्हाऱ्यांतल्या बाळकृष्णाला लोणीसाखरेचा नैवेद्य दाखवण्याचा आजीचा नेम होता. लहानशा वाटींत मोठ्या सुपारीएवढें लोणी व चमचाभर साखर नित्यनेमानें राणीला मिळे. त्यानंतर कपभर दूध पिणें आणि मग १० वाजतां सकाळचें जेवण. खाण्यापिण्याची चांगली बडदास्त आणि आजीचें प्रेम आणि कौतुक यामुळें राणी फार आनंदी, तेजस्वी खेळकर दिसत असे. तिचे गोरे गाल गुलाबाच्या फुलाप्रमाणें लाल व टवटवीत झाले. आणि डोळ्यांत कमळें फुलली होतीं.

कण्हेरी गांवांत शाळा नव्हती. आजीच्या मनांत येई " या पोरीचें शिकणें सवरणें कसें होणार. शिकून शहाणी झाली नाहीं तर तिला सध्यांच्या काळांत विचारणार कोण, तिचें लग्न कसें जमेल, चांगलें स्थळ कसें मिळेल, या काळजीनें अलीकडे आजीचें मन कितीदां तरी अस्वस्थ होई. पण बोलून कोणाजवळ दाखविणार !

शोभाराणीला आतां ९ वर्षें पूर्ण होत आलीं होतीं. तिला शाळेंत घालून तिच्या शिकण्याची सोय करणें भाग होतें. राणीला मात्र यांतलें कांहीं समजत नव्हतें. ती अगदीं सुखांत होती. सकाळीं दिवस वर आल्यावर उठावें. लोणीसाखर खावी. दूध प्यावें, दारापुढील झाडांचीं परडीभर फुलें काढावीं. त्यांचे हार करावे, मनीमांजरीच्या गळ्यांत दोरी बांधून तिला ओढीत नेऊन खेळवावें, वासराच्या पाठीवर बसावें. घरापाठीमागें काजूचें झाड होतें. काजू पिकले कीं त्यांच्या बिया निवडाव्या आणि मग सारे खेळ झाल्यावर आजीच्या गळ्याला पाठीमागून येऊन मिठी मारावी. असा तिचा सारा वेळ हंसण्या वागडण्यांत आनंदानें जात असे. पण आनंदाचे, सुखाचे दिवस झाले तरी त्याला शेवट हा असतोच.

एक दिवस पोस्टमननें एक पत्र आजीच्या ओटीवर आणून टाकलें. आजीनें तें शेजारच्या वासुभटजीकडून वाचून घेतलें. पत्र राणीच्या काकांकडून आलेलें होतें. तिचे काका रत्नागिरीला एका ऑफिसमध्यें नोकरीला होते. काका शोभाराणीला नेण्याकरतां चार दिवसांनीं येणार होते. तिला ते रत्नागिरीला नेऊन आपल्याजवळ ठेवणार होते, शाळेंत घालणार होते. पत्रांतला हा मजकूर वासूभटजींनीं आजीला वाचून दाखविला. म्हातारीला वाटलें पोरीच्या शिकण्याची आपल्याला काळजी लागली होती. देवानें आपलें गाऱ्हाणें ऐकलें. तरी पण तिच्या डोळ्यांतून चटकन दोन टिपं आलीं. शाळेसाठीं; शिकून शहाणी होण्यासाठीं ही पोर दूर करावी लागणार, म्हणून म्हातारीच्या डोळ्यांना पाणी आलें. राणी जवळच उभी होती तिला पत्रांतला मजकूर समजला. तिनें कावरेंबावरें बघून आजीच्या गळ्याला मिठी घातली आणि तिच्या कुशींत आपलें तोंड लपवलें.

# प्रकरण २ रें ....... काका येतात

पत्रांत लिहिल्याप्रमाणें ४ दिवसांनीं संध्याकाळचे काका येऊन पोंचले. त्या दिवशीं शनिवार असल्यामुळें त्यांच्या हपीसाला अर्धा दिवस सुटी होती. म्हणून ते आज आले होते. उद्यां रविवारचे राणीला घेऊन परत जाणार होते. येतांना त्यांनीं पिशवींतून केळीं आणलीं होतीं. एक बिस्किटांचा दोन आणेवाला पुडा पण आणला होता.

काकांना गूळपाणी देऊन आजी त्यांच्याजवळ बोलत बसली. राणी घरांत पळाली. तिनें तो पुडा उघडून पाहिला. बिस्किटांचा जुना उग्रवास तिला आवडला नाहीं. तिला वाटलें आपली आजी आंब्याचें साट घालते तें यापेक्षां किती छान लागतें

काकांना पाहून ती लाजल्यासारखी झाली. तिनें त्यांना आतांपर्यंत कधींच पाहिलें नव्हतें. ती आजीच्या आणि काकांच्या गोष्टी दाराआडून ऐकत उभी राहिली. काका सांगत होते—

"बापूंचा म्हणजे राणीच्या वडिलांचा विमा आहे पांच हजारांचा, शिवाय त्यांचे फंडाचे ५।८ हजार रुपये येतील, ते सर्व ताब्यांत घेऊन राणीच्याच नांवानें ठेवावयाचे आहेत. फक्त अज्ञानपालक म्हणून मी देखरेख पाहणार, यासाठीं शोभा माझ्या जवळ राहिली पाहिजे."

हें ऐकून उमाआजी डोळ्यांना पदर लावून रडूं लागली. ती म्हणाली "तुम्हीं न्या पोरीला, पण शाळेंत घाला, शिकवा, आज तिचें शिकण्याचें वय आहे. आज दोन वर्षांत तिला मी दूर केली नाहीं." आईवेगळी पोर असें म्हणून म्हातारीनें डोळे पुसले.

काका म्हणाले, "तुम्हीं काळजी सोडा, माझीं चार मुलें, त्यांतच पांचवी माझ्या भावाची मुलगी. मी तिचे हाल कसे करीन. मला तरी कांहीं माया आहेच कीं नाहीं," असें म्हणून "येग शोभा इकडे" अशी त्यांनीं राणीला हाक मारली. पण शोभा राणीला त्यांच्या जवळ जावेंसेंच वाटेना, ती आजीच्या पाठीमागें येऊन लपून बसली. आजी तिला गोंजारीत म्हणाली—

"असें काय करावें वेड्यासारखें, काकांच्या गांवीं रत्नागिरीला छान शाळा आहे. तिथे खूप मुली आहेत. शाळेंत तिकडे जाऊन शिकणार ना माझी सोनसाखळी!"

मग आजी उठली आणि राणीच्या जाण्याची तयारी करूं लागली, कणीक भाजून तिनें चार लाडू केले, परकरांच्या घड्या घातल्या. दोन शेर पोहे व एक खोबऱ्याचा तुकडा एका फडक्यांत बांधले. हें सारें करीत असतांना आजीचा जीव आंतल्याआंत कासावीस होत होता. तिच्या मनांत येत होतें हिच्या बापाचे पैसे आहेत, म्हणून तर हा कृष्णराव पोरीला नेत नसेल ना! चांगलें करतीलना तेथें तिला!

पण इकडे शोभाराणी काय करीत होती, उद्यां, आपण रत्नागिरीला जाणार, मोटारींत बसणार, म्हणून तिला थोडा आनंद झाला होता. तरीपण तिच्या मनाला रुखरुख लागली होती. आपण आतां आपल्या आजीला तसेंच सवंगड्यांना सोडून जाणार, म्हणून तिला मनांतल्या मनांत वाईटही वाटत होतें. तिनें शेजारी जोश्यांकडे जाऊन त्यांच्या बापूचा निरोप घेतला. बापू तिच्याच वयाचा होता, तो जवळच वायंगणी गांवच्या शाळेंत जात होता.

त्याच्या खांद्यावर हात ठेवून राणी म्हणाली— "बापू, ओळख ठेव हो, विसरूं नकोस मला, मी रत्नागिरीला काकांकडे जात आहे. आणि हें बघ, मी गेल्यावर माझी आजी एकटी राहणार, तिला मदत कर, अडेल पडेल तेथें."

उद्यांच्या उद्यां शोभा रत्नागिरीला जाणार, याचें बापूलाही वाईट वाटलें. आतां आपल्याशीं खेळायला कोण, असें त्याच्या मनांत आलें, त्यानें अद्याप रत्नागिरी पाहिली नव्हती, पण तेथील समुद्राच्या पाण्याच्या गमती ऐकल्या होत्या, समुद्रांत मोत्यें सापडतात, असेंही त्याला कोणी सांगितलें होतें. तो शोभाराणीला म्हणाला—

" शोभे, जातेस तर जा तूं रत्नागिरीला काकांच्या घरीं, पण पत्र पाठव बरें का मला, आणि हें वघ तूं समुद्रावर जाशील केव्हांतरी, तेथें मोत्यें सांपडलीं तर घेऊन ये थोडीशी. "

खरेंचकीं, मोत्यें सांपडली तर किती छान होईल. चकचकीत टपोऱ्या मोत्यांची माळ करून आपण आपल्या आजीला जपाला देऊं. आजीची सध्यांची जपाची माळ किती काळीकुट्ट नी मेणचट झाली आहे. आजीला आपण एक मोत्यांची माळ करून द्यायचीच, अशा विचारानें राणीला फार आनंद झाला. इतक्यांत तिला आठवण येऊन ती म्हणाली–

" बापू, तुला पत्र पाठवायचें, पण मला लिहितां कुठें येतें आहे ? " असें म्हणत असतां तिचें तोंड एकदम उतरलें. बापू तिला धीर देऊन म्हणाला—

" राणी, तूं आतां शाळेंत जाणारना, मग लौकरच तूं लिहूं वाचूं लागशील, लिहितां आल्यावर मगच मला तूं पत्र पाठव, मग तर झालें ना ! "



असें म्हणून बापूनें आपल्या विजारीच्या खिशांतून दोन भाजलेल्या काजूच्या बिया काढून राणीच्या हातावर ठेवल्या. शोभाराणीला बापूचें बोलणें ऐकून आनंद झाला. तिच्या मनांत आलें, खरेंच आपण आतां शाळेंत जाऊन शिकणार आहोंत, मग लिहितां आल्यावर आजीला, बापूला छान छान पत्रें पाठवूं. मग ती बापूचा निरोप घेऊन तडक घरीं आली. दुसऱ्या दिवशीं सकाळींच रत्नागिरीला जायला निघायचें होतें, म्हणून राणीनें आपल्या साऱ्या सवंगड्यांचे निरोप घेण्याचें ठरविलें, परसवांत व अंगणाच्या कडेला तिच्या आवडीची किती तरी फुलझाडें होती, त्या साऱ्या झाडांच्या पानांना व फुलांना तिनें हात लावून पाहिला नी त्यांना गोंजारलें. पोफळी, नारळी, केळी यांच्या बुंधाजवळ जाऊन त्यांच्या अंगावरून हात फिरवला आणि हळूच म्हटलें—

' गड्यांनों, मी उद्यां जाणार हं रत्नागिरीला

आणि मग पडवींत कपिलेची टिकली पाडी खुंटाला बांधली होती तिच्या जवळ जाऊन राणीनें एकदम टिकलीच्या गळ्याला मिठी घातली. तिला म्हणायचें होतें—

" टिकले, इकडे तिकडे धावून आणि हुंदडून आजीला त्रास देऊं नकोस हं. " पण तिचा गळा एकदम दाटून आला, आणि तिनें एकदम हुंदका दिला.

रात्रीं सारें सामसूम झालें तरी राणीला झोंप आली नाहीं. आजीच्या कुशींत ती डोकें खुपसून पडून राहिली. रत्नागिरी कशी असेल, तेथील शाळा केवढी असेल, काकांच्या मुली आपल्याशीं कशा वागतील, आजी देते तशी लोणीसाखर तेथें आपल्याला कोण देईल इत्यादि विचार तिच्या मनांत गर्दी करीत होते. आजी पण जागीच होती. म्हातारीला झोप कशी येणार! आपल्या काळजाचा घड ती दुसऱ्याच्या स्वाधीन करीत होती. पण मग तिनें विचार केला. पोरीच्या बापाचा पैसा आहे, प्रत्यक्ष चुलता तिला नेतो आहे, तर पाठविली पाहिजे. आपला काय नेम, आपण आतां पिकलें पान केव्हां गळून पडूं नेम नाहीं, तेव्हां शोभाला पाठविलेलीच बरी. त्यांतच तिचें कल्याण आहे. तर आपण माया घट्ट केली पाहिजे. असा विचार करून आजीनें आपलें मन आवरलें, शेवटीं बराच वेळ अंथरुणांत चुळबुळ केल्यावर राणीला झोप लागली.

आजी मोठ्या पहाटेला उठली, तिनें विस्तव पेटवून आंघोळीचें पाणी तापवलें. थोडा मऊ भात टाकला, दूध काढून आणलें आणि मग राणीला उठविलें. तिचे काकाही उठून आपले सकाळचे विधि उरकीत होते. झाली दोघांची तयारी. काकांचा चहा झाला. राणीचें वेणी-अंग धुणें-दूध पिणें झालें, आजीनें मेतकूट, दहींभात ताटलींत उसपला. पाट मांडला, पण एक घासही राणीच्या गळ्याखालीं जाईना. घोटभर पाणी पिऊन ती उठली. तिनें देवाला व आजीला नमस्कार केला. आजीनें नातीला पोटाशीं धरून तिचा एक पापा घेतला आणि म्हटलें " सांभाळून रहा बरें, माझी गुणाची बाई ती. "

मोटारींत बसायला दोन कोस चालायचें होतें. म्हणून राणीला उचलून घ्यायला आजीनें भगवान गड्याला बोलावलें होतें. त्यानें तिला खांद्यावर घेतली. काका म्हणाले " येतों, बरें का आजीबाई. मुलीची काळजी करूं नका. "

असें म्हणून ते चालूं लागले. आजी १०-१५ पावलें पोंचवायला गेली. पण पुढें तिचे पाय उचलत ना.

सूर्य उगवण्याच्या वेताला कृष्णरावकाका मोटारीच्या सडकेवर येऊन पोंचले. इतक्यांत मोटार आलीच. राणीला घेऊन ते मोटारींत बसले. मोटार चालू झाली. राणीला वाटलें " किती वाऱ्यासारखी पळते ही! "

## प्रकरण ३ रें ....... काकांच्या घरीं

कृष्णरावकाका दुपारीं १२च्या सुमाराला शोभाराणीला घेऊन रत्नागिरीला येऊन पोंहोंचले. त्यांचें घर म्हणजे लहानसें ३ खोल्यांचें बिऱ्हाड होतें. दारापुढेंच रस्ता होता. रस्त्याच्या कडेला पाण्याचा नळ होता. समोरच एक विजेच्या दिव्याचा खांब होता. त्या लहानशा जागेंत काका-काकू आणि त्यांचीं ५ मुलें कशीतरी दाटीदाटीनें रहात असत.

काकांच्या बरोबर शोभाराणी घरांत गेली, भिंतीला टेकून उभी राहिली. तिच्या परकर पोलक्यांची पिशवी काकांनीं कोपऱ्यांत ठेवली होती. त्यांत आजीनें दिलेला पेढ्यांचा डबा होता. राणीला खूप भूक लागली होती. तिला पिशवींतल्या डब्याची आठवण झाली. पण डबा बाहेर काढावा, असें वाटेना. राणी तशीच भिंतीशीं बसून राहिली काकांच्या तिन्ही मुली तिच्याकडे टकमक पहात उभ्या होत्या. काकू भाकरी भाजीत होत्या. त्यांनीं आपल्या धाकट्या मुलीला-नंदिनीला हाक मारली आणि म्हटलें,

" नंदा, जा तिला पाय धुवायला पाणी दे आणि आतां पानें मांडा बरें का, जेवायला झालें आहे. "

मग मोठ्या कुंदेनें पाटपाणी केलें. सारीं पानावर येऊन बसलीं. राणी नंदाच्या पानाजवळच्या पानावर येऊन बसली. मघाशीं नंदानें तिला पाय धुवायला पाणी दिलें, तेव्हां तिच्याकडे पाहून नंदा हंसली होती. दिसण्यांतही ती राणीएवढीच होती. म्हणून राणीला तिचा आधार वाटूं लागला.

सारीं जेवीत होतीं. काकू वाढीत होत्या. जेवतांना काका म्हणाले " उद्यांपासून हिला शाळेंत घेऊन चला. चार अक्षरें शिकूं दे, आणि घरकामाचें पण थोडें थोडें वळण लागूं दे. "

शोभाराणी खालीं मान घालून जेवीत होती. तिला भाजी आमटी तिखट लागत होती. भाकरीचा तुकडा तोंडांत फिरूं लागला. राणीला रोज लोणी-भाकरी खायची संवय होती. शेवटीं ती थोडा दहींभात जेवीत असे. तिची आजी तिला भात कालवून देई. आज सारेंच निराळें. कसातरी थोडा ताकभात खाऊन ती उठली. बरेंच पाणी प्याली. आणि एकीकडे बाहेरच्या खोलींत बसून राहिली.

काय करावें तें तिला सुचेना, दिवस कसातरी रस्त्यावरचें लोकांचें जाणें येणें पाहण्यांत गेला. रात्रीं ती नंदाच्या अंथरुणावरच निजली. आणि येतांना आजीनें दिलेली तांबड्या लुगड्याची गोधडी गाठोड्यांतून काढून पांघरायला घेतली. तें पाहून नंदा म्हणाली " हें ग काय, असली कसली तुझी चादर, माझी बघ कशी फुलांची चादर आहे ती."

यावर राणी कांहीं बोलली नाहीं. तिनें गोधडी सर्व अंगाला घट्ट लपेटून घेतली आणि डोळे मिटले.

दिवे मालवून जिकडे तिकडे काळोख झाला आणि राणीला एकदम आजीची आठवण येऊन रडूं येऊं लागलें. तिनें आपलें तोंड हातानें घट्ट दाबून धरलें. जवळच नंदा व कुंदा निजल्या होत्या त्यांना समजलें तर त्या आपल्या आईला ही गोष्ट सांगतील या भीतीनें राणी अगदीं गप्प पडून राहिली आणि देवाला हात जोडून हळूच मनांत म्हणाली—

" देवा माझ्या, आजीला सुखी ठेव. तिला खोकला लागूं देऊं नको."

मग बऱ्याच वेळानें तिला झोंप लागली.

## प्रकरण ४ थें ....... रत्नागिरीची शाळा

दुसऱ्या दिवशीं नंदिनीबरोबर शोभाराणी शाळेंत गेली. तिला अजून पाटी पेन्सिल घेतली नव्हती. काकू म्हणाल्या, " आजचा दिवस अशीच जाऊं दे शाळा पहायला, मागाहून घेऊं पाटी. मग राणी तशीच शाळेंत गेली होती.

ती शाळा मुलांमुलींची होती. शाळेंत केवढा तरी गोंगाट चालला होता. दांडगी मुलें गरीब मुलांना मस्ती करून पाडवीत होतीं. कोणी खिडकींत चढून उड्या मारीत होतीं. राणीला वाटलें, कसें होणार इथं आपलें. इथे शिकायचें तरी कसें, पण इतक्यांत ' खण्, खण्, खण् ' घंटा वाजली, मग सारीं मुलें गप्प बसलीं. सर्व मुलगे मुली ओळींत उभे राहून प्रार्थना करूं लागले. सर्व मास्तर आणि बाई मुलांच्या समोर उभीं राहिलीं. प्रार्थना चालू झाली, शोभाराणीला हें सारें नवीन होतें.

ती आज पहिल्यानेंच शाळा पहात होती. ती पण नंदाबरोबर मुलींच्या ओळींत हात जोडून उभी राहिली. एखाद्या भ्यालेल्या ससाप्रमाणें ती इकडे तिकडे पहात होती. मुलांबरोबर प्रार्थना म्हणायला तिनें आपले ओठ हालवले, पण तिला तें गाणें म्हणतां येईना. तिनें असें सर्वांबरोबर कधींच गाणें म्हटलें नव्हतें.

प्रार्थनेनंतर वर्ग चालू झाले. शोभाराणी लहान मुलांच्या वर्गांत बसली. तेथें शिकवायला बाई होत्या. त्यांनीं नवीन आलेल्या सर्व मुलांची चौकशी केली. राणीला पण हांक मारून जवळ बोलावलें. आणि विचारलें—

" बाळ, नांव काय तुझं ? "

" शोभाराणी " राणी म्हणाली.

"आणि राहतेस कुठे ?"

"काकांच्या घरीं" असें सांगतांना ती जरा बावरली. काकांचें सर्व नांव, पत्ता तिला माहीत नव्हता. बाईपण तिचें बोलणें ऐकून हंसल्या, आणि मग इतर मुलांची चौकशी करूं लागल्या. वर्गांत पुष्कळ मुलगे मुली आल्या होत्या, बाईनीं साऱ्यांची प्रेमानें चौकशी केली. वर्ग मोठा लांब रुंद आणि हवाशीर होता. भिंतींना चित्रें लावलीं होती. अंक मोजायला रंगीत गोळ्यांची चौकट होती. हें सारें पाहून राणीला मोठें नवल वाटलें आणि आनंदही झाला. सर्व मुलें मग पाटीवर अक्षरें काढूं लागलीं. राणीजवळ पाटी नव्हती. तिला वाटलें, आपणही लिहिलें असतें असें पाटीवर, आतां उद्यांतरी आपल्याला पाटी मिळते का पाहूंया, मग ती एवढेंसें तोंड करून तशीच बसून राहिली.

आज पहिला दिवस, म्हणून शाळा लौकर सुटली होती. राणी नंदाबरोबर घरीं आल्यावर मात्र तिला उदास वाटूं लागलें. आजीची आठवण आली. आणि तिच्या डोळयांतून पाणी येऊं लागलें. नंदा, कुंदा, मंदा साऱ्याजणी आल्याबरोबर पोळी खायला घरांत गेल्या. राणी मात्र बाहेर बसून राहिली. मग बऱ्याच वेळानें काकूला आठवण झाली. त्यांनीं तिला हांक मारून म्हटलें "ही पोळी घे, खा, असें मागें राहूं नये!" काकूनीं एका केळीच्या फाळक्यावर अर्धी पोळी आणि गुळाचा खडा ठेवला होता. राणी खायला बसली. तिला असल्या खाण्याची संवय नव्हती. तिची आजी तिला कधीं दूध पोहे तर कधीं पानगी भाजून देत असे, वर तूपसाखर घालीत असे. राणीनें काकूनें दिलेली ती गूळपोळी कशी तरी संपवली. आणि पाणी पिऊन हात धुतले. मग कुंदा नंदा उष्टी काढण्याकरतां भांडूं लागल्या.

कुंदा म्हणाली, "मी दुपारीं पानें मांडलीं होतीं आतांचीं उष्टीं नंदानें काढलीं पाहिजेत." आणि नंदा म्हणाली, "वा, ग वा, मीच जेव्हां तेव्हां काय म्हणून, नाहीं जा मी आतां कांहीं करणार !"

मग दोघी भांडूं लागल्या. एकमेकींचे झगे ओढूं लागल्या. त्या गडबडींत खातांना जवळ घेतलेला पाण्याचा तांब्या उपडा झाला. काकू ती गडबड नी ओरड ऐकून घरांत आल्या आणि त्यांनीं दोघींच्या पाठींत एकेक धपाटा घालून म्हटलें—

"व्हा चालत्या एथून, द्वाड कार्ट्यां, तूं काढ ग शोभा आतां एवढी पानें, आणि भांडीं नळावरून घासून आण."

हें ऐकून नंदा, कुंदा रडतां रडतां हंसूं लागल्या. आणि म्हणाल्या "शोभाराणी, काढा बरें का उष्टीं." आणि तेथून पळून गेल्या.

शोभाराणी ९ वर्षांची होती. पण ती आजीच्या प्रेमाच्या छायेंत वाढलेली. तिला काम येत नव्हतें. आणि असले भांडणतंटे माहीत नव्हते. तिनें भीत-भीतच पोळीचे तुकडे गोळा केले. आणि पानें उचलून शेण लावलें. शेणाचे हात धुतले. पण हाताची घाण कांहीं जाईना. शेवटीं तिनें पुन्हां एकदां पायरीवर हात चोळून धुतले नी परकराला पुसले. मग तिनें मनाशीं ठरविलें, आतां भिऊन चालायचें नाहीं, आपल्याला सारें कामकाज आलें पाहिजे.

## प्रकरण ५ वें ....... पिंजऱ्यांतला पोपट

दुसऱ्या दिवशीं शोभाराणीला तिच्या काकूनें अडगळींतून एक पाटी काढून दिली. तिची चौकट निखळलेली होती. एक कोपरा फुटलेला होता. तसलीच पाटी हातांत घेऊन आणि पेन्सिलीचा तुकडा मुठींत धरून राणी शाळेंत गेली. तिला शाळेंतल्या मुली, मुलगे आणि बाई केव्हां एकदां पाहीन असें झालें होतें. काल बाई तिच्याशीं बोलल्या होत्या, तिच्याकडे पाहून हंसल्या होत्या, म्हणून तिला त्या फार आवडल्या होत्या. त्यांना, पुन्हां पाहण्याची राणीच्या मनांत ओढ लागली होती.

राणी नंदा, कुंदा, यांच्या बरोबर गेली. आज तिची वेणी तिनेंच घातली होती. त्यामुळें केसांचें

वळण चांगलें साधलें नव्हतें. ते इकडे तिकडे सुटले होते. सकाळीं काकू म्हणाल्या होत्या, माझी घाई आहे स्वयंपाकाची, आज तुम्ही आपापल्या वेण्या घाला. कुंदा, नंदा, मंदा, यांनीं एकमेकींच्या दोन दोन वेण्या घातल्या.आणि वेण्यांना रीबनी बांधल्या. नंदाची वेणी मंदानें घातली. पण राणीला कोणी हाक मारीना. कुंदा म्हणाली, " घाल ग आपली वेणी. तुझ्या केसांना हात लावायला आम्हांला घाण वाटते. "

मग राणीनें फणीचा तुकडा घेऊन आपले केस विंचरले. तिला आपली वेणी घालण्याची संवय नव्हती. केसांत जटा मात्र झाल्या. मग कशी तरी वेणी घातली. तशीच ती जेवून शाळेंत गेली.

घंटा प्रार्थना झाली. मग बाईनीं फळयावर शब्द लिहून दाखवले. त्यानंतर पाटीवर काढून दिले. राणीला तें पाहून मोठी गंमत वाटली. तिनें फळ्याकडे पाहून एकेक अक्षर पाटीवर काढलें. बाईनीं पाटी पाहून तिला शाबासकी दिली.

हळुहळु राणीला अक्षरओळख झाली. सोपे धडे वाचूं लागली. बाईची ती फार आवडती झाली. आईवेगळी पोर, पण बुद्धीनें हुशार आणि चुणचुणीत आहे, म्हणून बाई तिला प्रेमानें वागवीत. पण काकांच्या घरीं मात्र सारें पारडें फिरलें. त्यांच्या मुली नंदा, मंदा व कुंदा तिला अगदीं पाण्यांत पाहूं लागल्या. काकू घरांतलें बरेंच काम राणीकडून करून घेत. रोज तिनें पाटपाट मांडावें, तूप मीठ वाढावें. जेवल्यावर उष्टी काढावीं, हा तर रोजचाच क्रम झाला. आपले परकर पोलकें तिलाच धुवावें लागे. पहिल्या पहिल्यानें हें राणीला फारच जड गेलें. तिला काम येत नव्हतें. हातपाय दुखूं लागत आणि मग आजीच्या आठवणीनें तिला रडूं येई. रडलें तर नंदा, मंदा, हंसतील, काका रागें भरतील म्हणून ती आपलें रडणें आंतल्या आंत दाबून टाकी. तिला मधुनच कपिलेच्या टिकल्या पाडीची, अंगणांतल्या गुलाबाच्या झाडाची, नारळी पोफळींची आणि घरामागच्या काजूंची आठवण होई. आणि वाटे उगाच आलों आपण इकडे, पण शाळा, शाळेंतलीं मुलें, मुली आणि त्या छान गोष्टी सांगणाऱ्या बाई, यांची आठवण झाली कीं, तेवढ्यापुरतें तिला बरें वाटे.

एकदां राणी नंदा, मंदा बरोबर समुद्रावर गेली. तेथें वाळूंत खूप लहान मुलें खेळत होतीं. वाळूंत ओल्या वाळूचे बोगदे करीत होतीं. समुद्राचा फेस आणि लाटा पाहून राणीला फार गंमत वाटली. तिला वाटले, या समुद्राच्या फेसांत बहुतेक मोत्यें असावींत. मग राणीला आजीकरतां जपाला नवीन माळ हवी होती, त्याची आठवण झाली. फेसांत मोती असेल तर पहावें, म्हणून ती पाण्यांत पुढें पुढें गेली. गुढघाभर पाण्यांत उभी राहिली. इतक्यांत कुंदा मोठ्यानें ओरडली—

" शोभे, पाठी फीर नाहींतर जाशील समुद्रांत. एक लाट जोरानें पुढें पुढें येत होती. राणीला भीति वाटली. ती तशीच मागें परतली. मोत्यें नाहींत नी कांहीं नाहीं. पाण्याचा पांढरा शुभ्र फेस किनाऱ्यावर आपटून विरघळून जात होता. तें पाहून राणीला वाईट वाटलें. समुद्र आपल्याला फसवतो कीं काय, आतां कसलींयेथें मोत्यें मिळायला बसलीं आहेत. असें वाटून ती निराश झाली.

मग थोड्या वेळानें त्या सर्व मुली परत आल्या. रात्रीं मंदानें जेवतांना सारी हकीकत सांगितली. काका एकदम रागावले. ते म्हणाले—

" खबरदार, पुन्हा समुद्रावर जाशील तर पोरी, चांगलें चौदावें रत्न देईन."

राणी मुकाट्यानें जेवली आणि अंथरुणांत पडून राहिली. तिला वाटलें,आपल्यालाच कां बरें साऱ्यानीं बोलावें. काय केलें असें आपण ! ती निजे त्या खोलींत एका कोंपऱ्यांत पोपटाचा पिंजरा होता. पोपट पिंजऱ्यांतल्या पिंजऱ्यांत पंख फडफड वाजवी आणि ओरडे, राणीच्या मनांत आलें, हा पोपट आणि आपण दोघें सारखींच. त्याला पिंजऱ्यांत कोंडलें आहे, आपल्याला घरांत ठेवलें आहे. पिंजराच आहे हा एक, हें घर म्हणजे. मग तिला झोप लागली.

# प्रकरण ६ वें........ नको मला पोळी

राणी आतां खूपच भराभर वाचूं लिहूं लागली. शाळेंत ती सर्वांची आवडती झाली होती. तिचा गळाही फार गोड होता. बाई शिकवीत तीं गाणीं, कविता ती केव्हांच पाठ करी आणि गोड गळ्यानें म्हणे. शंभर अंक, पाढे, पावकी, निमकी तिनें भराभर तयार केलीं. एक दिवस कवितेचा तास होता. सर्व मुलींनीं गाणीं, कविता म्हटल्या, पण राणी खालीं मान घालून बसून राहिली. आज तिची कळी खुलेना, ती हंसेना कीं बोलेना. बाईंनीं तिला म्हटलें—

"राणी गाणें म्हण छानसें." पण राणीनें मान वर केली नाहीं. तिच्या डोळ्यांतून टपटप पाण्याचे थेंब पडूं लागले. जणुं मोत्याचे दाणेच गळून पडत होते. बाईंनीं जवळ जाऊन तिच्या पाठीवरून हात फिरवला व म्हटलें—

"उगी, रडूं नकोस, काय झालें तुला?" बाईंचा हात पाठीवरून फिरतांच शोभाराणीला ज्यास्तच जोरानें हुंदका आला. शाळा सुटली. साऱ्या मुली गलका करीत पांखरांसारख्या घरीं निघाल्या. राणी अजून आपल्या जागेवरून हालली नव्हती. बाईंनीं मग तिला एकटीला जवळ बोलवून विचारलें—

"बाळ, काय झालें तुला, कां रडूं आलें?" राणीनें आपले डोळे परकराला पुसले आणि म्हटलें—

"बाई, मला संध्याकाळीं शेवटच्या तासाला फार भूक लागते. सकाळीं ११ वाजतां जेवल्यावर रात्रीपर्यंत कांहीं खाणें मिळत नाहीं. मग मला कांहीं सुचेनासें होतें" असें म्हणून राणी खिन्न होऊन बसून राहिली.

तिचें बोलणें ऐकून बाईंना फार वाईट वाटलें. त्या म्हणाल्या—

पण तुझे काकाकाकू येथें आहेत, त्यांचेकडे असतेस ना तूं. मग त्यांच्या नंदा, मंदा बरोबर मधल्या वेळीं कांहीं खाणें नाहीं का मिळत?"

शोभाराणी म्हणाली, "पहिल्यानें काकू देत असत पोळी, नाहींतर भाकरी, पण मला नुसती मिरचीबरोबर भाकरी खाववेना. एक दिवस मी भाकरी टाकली, तेव्हांपासून मला आतां मधल्या वेळीं कांहीं मिळत नाहीं."

हें ऐकून बाईंना फार वाईट वाटलें. त्या म्हणाल्या, माझ्या घरीं चल, मी देते तुला खाणें."

पण शोभाराणी गेली नाहीं. कुंदा मंदा काकूला सांगतील आणि मग काकू रागावेल, अशी तिला भीति वाटत होती. तिनें पाटी पिशवी घेतली व ती घरीं निघाली. जातांना हलकेच म्हणाली—

"बाई, सांगू नका कोणाला हें."

"बरें" असें म्हणून बाई पण घरीं गेल्या. त्यांना वाटलें, एवढीशी नऊ-दहा वर्षांची पोर, पण शहाणपण केवढें मोठ्या माणसासारखें. प्रसंग आला कीं देवच शहाणें करतो माणसांना दुसरें काय!"

दुसऱ्या दिवशीं मधल्या सुटींत शोभाराणीला बाईंनीं एकीकडे हांक मारली आणि म्हटलें—

"जा, माझ्या कपाटांत एक लहानसा डबा आहे, तो घे आणि पलिकडच्या जिन्याखालच्या खोलींत जाऊन बस आणि खा."

राणीनें कपाट उघडलें आणि डबा काढला. डब्यांत एक पोळी आणि पानांत गुंडाळलेली थोडी तूपसाखर होती. एकीकडे आडोशाला जाऊन राणीनें भराभर पोळी खाऊन टाकली. कितीतरी दिवसांनीं तिला तूप लावलेली मऊ पोळी आणि तूपसाखर मिळाली होती. भराभर पोळी खाऊन, नळावर पाणी पिऊन राणीनें डबा विसळून कपाटांत आणून ठेवला. आणि परकराला हात तोंड पुसून वर्गांत येऊन ती बसली. बाई अभ्यास शिकवूं लागल्या. पण आजही राणी खालीं मान घालून बसली होती. तिचें तोंड कालच्याप्रमाणेंच खिन्न उदास दिसत होतें.

संध्याकाळीं शाळा सुटल्यावर रोजच्याप्रमाणें भुरुभुरु चिमण्या उडून गेल्या. शोभाराणी मागें

राहिली. आपल्याशींच चुळबूळ करीत ती बसून होती. बाई घरीं जायला उठल्या. तरी राणी बसूनच होती. इतक्यांत त्यांचें लक्ष तिच्याकडे गेलें. त्या म्हणाल्या—

"हें ग काय, घरीं नाहीं का जायचें, आणि अशी खिन्न कां? बरें नाहीं कीं काय तुला?"

मग राणी उठून बाईंच्या जवळ गेली, आणि खालच्या मानेनें हळूच म्हणाली—

"बाई, मला उद्यांपासून नको पोळी. मला नुसती प्रेमानें हांक मारा म्हणजे झालें. माझी आजी मला लाडानें बबडी म्हणते, तसें तुम्हीं म्हणत जा मला."

हें राणीचें बोलणें ऐकून बाईंना आश्चर्य वाटलें. त्यांना वाटलें होतें, पोळी खाऊन ह्या मुलीला आनंद झाला असेल, आतां ती हंसत, नाचत घरीं जाईल आणि रोज मधल्या वेळीं खाण्याच्या डब्याची वाट पाहील. आपण कौतुकानें एक दिवस पोळी आणली. रोज कसें जमणार आहे आपल्याला तरी. हे असे विचार त्यांच्या मनांत घोळत होते. इतक्यांत ही विलक्षण मुलगी आपण होऊनच पोळी नको म्हणाली, आणि खाणें मिळालें, तरी खिन्न होऊन बसली याचा बाईंना थोडा रागही आला, पण तो बाहेर न दाखवितां, त्या म्हणाल्या—

"कां, काकूला समजेल अशी भीति वाटली होय?"

यावर राणी म्हणाली—

"काकूची भीति तर आहेच, शिवाय मला माझ्या आजीनें शिकविलें आहे कीं, कोणाकडे खाणें मागूं नये. कोणाकडे खाऊं नये. म्हणून मला उद्यांपासून पोळी नको."

"पण तुझ्या आजीला कसें कळणार, तुझें हें पोळी खाणें" बाई म्हणाल्या.

यावर शोभाराणी म्हणाली, "मी माझ्या आजी जवळून कांहीं चोरून ठेवीत नाहीं. आजी भेटल्या-वर तिला मी सांगेन ना सारी इकडची हकीगत. शिवाय माझी आई, आकाशांत चांदणी होऊन बसली आहे. ती तेथून सगळें पहात असेल बाई. तुम्हींही मला माझ्या आई सारख्याच वाटतां.माझ्या-वर तुम्हीं रागावूं नका."

असें म्हणून राणी पाटी दप्तर घेऊन घरीं गेली. बाईपण आपल्या वाटेला लागल्या. त्या मनांत म्हणाल्या—

"किती विलक्षण मुलगी आहे ही!"

## प्रकरण ७ वें....समुद्रा, मला जवळ घे!

शोभाराणीला काकांच्या घरीं येऊन ३ वर्षे झालीं. आतां तिला पुष्कळ समजूं लागलें होतें. एकाद्या मोठ्या माणसासारखी तिची वागणूक असे. सकाळीं उठावें, घरांतलें सारें कामधाम करूं लागावें. आंघोळ आटोपून आपला परकर पोलका धुऊन टाकून मग शाळेंत जावें, मिळेल तें दोन वेळां खावें; असा तिचा क्रम चालला होता. शाळेंत मात्र तिचें मन फारच रमलें होतें. तिनें भराभर अभ्यास करून ४ इयत्ता पूर्ण केल्या. आतां ती पांचवीत गेली होती. तिची हुषारी पाहून शाळेंत ती सर्वांना हवीहवीशी वाटे. शाळा हीच तिची विश्रांति. कारण घरीं आलें कीं कुंदा, मंदानें भांडणें काढावीं, काकूनें काम सांगावें आणि काकां-नीं रागें भरावें असें रोज चाले. त्यामुळें राणीला घर नकोसें वाटे. या ३ वर्षांत ती आपल्या आजीला एकदांही भेटली नव्हती. कांहींना कांहीं कारणानें तिचें आजीकडे जाणें रहीत होई. उन्हाळ्याच्या सुटींत कुंदा आजारी पडली. दिवाळीला काकूंचें बाळंतपण आलें. मग घरांत वरकामाला कोणी नाहीं म्हणून काकाकाकूंनीं तिला आजीकडे पाठ-विलें नाहीं. आतां यंदा ती जायची होती. पण आजी काशीयात्रेला म्हणून सहा महिन्यांपूर्वी गेली ती मुंबईला आजारी पडली होती. मग राणी आजीला कशी भेटणार. आजीसाठीं तिचा जीव

सुकला होता. केव्हांतरी राणी समुद्रावर फिरायच्या निमित्तानें येई आणि वाळूंत बसे. तिची नजर आकाशाला टेकलेल्या त्या काळ्या भुरक्या डोंगराकडे जाई. मग तिला त्या डोंगराच्या आड असलेल्या कण्हेरी गांवाची आठवण येई. राणी टक लावून डोंगराकडे पहात बसे. जणुं कांहीं ती त्याला विचारीतच होती "माझी आजी आली कायरे !" पण दगडच तो, काय बोलणार तिच्याशीं ! केव्हांतरी तिला मुंबईला जाणारी आगबोट दिसे. राणी मनांत म्हणे "बोटी मुंबईला जातेस ना ? तूं माझ्या आजीला येतांना घेऊन ये."

एक दिवस तिचे काका संध्याकाळीं आपल्या कचेरींतून घरीं येतांना एक पत्र खिशांतून घेऊन आले. आणि स्वयंपाकघरांत जाऊन काकूजवळ हलकेच म्हणाले "म्हातारी देवाकडे गेली, आज पत्र आलें आहे."

काकू म्हणाल्या "खरें कीं काय ! पण आतां इतक्यांत बोलूं नका नाहींतर ती पोरटी रडून गोंधळ घालील. जेवणें, उष्टीं, खरकटीं सगळें काम आटोपूं दे. मग सांगा तिला."

काकांना काकूचें सांगणें एकदम पसंत पडलें. त्यांनीं तें पत्र आपल्या कोटाच्या खिशांत ठेवलें आणि ते मुकाट्यानें हातपाय धुऊन चहा घेऊन ओटीवर येऊन वर्तमानपत्र वाचीत बसले.

राणी वातीच्या चिमणीजवळ आपला अभ्यास करीत बसली होती. कुंदा तेथें येऊन तिला म्हणाली "शोभ्ये, तुझी आजी गेली देवाकडे, पत्र आलें आहे, तुला ठाऊक नाहीं का ?"

हें ऐकून शोभाराणीच्या अंगांतून एकदम भीतीची शिरशिरी आली, डोळ्यापुढें अंधार वाटून तिला रडूं येऊं लागलें. ती तें पहिल्यानें दाबीत होती, पण मग हुंदका फुटलाच, आणि ती पुस्तकावर कपाळ टेकून हमसाहमशी रडूं लागली. काका काकू तेथें आलीं तीं कुंदाला रागें भरूं लागलीं. त्यांनीं तिला एक चापटी मारून म्हटलें—

"आतां कशाला तूं चोंबडेपणा केलास, जेवणें तरी होऊं द्यायची होतीस, मग आम्हीं सांगितलें असतें." पण मग सगळीं तेथें जमलीं. शेजारीं सखूताई नांवाची एक पोक्त बाई रहात होती. ती ही गडबड ऐकून तेथें आली. तिनें शोभाराणीला उठविलें आणि जवळ घेऊन उगी केलें. तिच्या पाठीवर डोक्यावर हात फिरविला. कितीतरी दिवसांनीं दुसऱ्या माणसाचा हात आपल्या अंगाला लागला असें वाटून राणीला त्यांतच जरा धीर आला. तिनें उठून आपलें तोंड धुतलें, केसांवरून हात फिरविला आणि भांडेंभर पाणी पिऊन अंथरूण टाकून त्यावर ती पडून राहिली. सगळ्यांनीं बोलावल्यामुळें ना— इलाजानें ती पानावर जाऊन बसली, पण घास तिच्या तोंडांत फिरूं लागला.

रात्रीं ती झोपेंतून जागी झाली, तों काका-काकूचें बोलणें तिच्या कानावर आलें. काकू म्हणत होती— "आतां एकदां त्या कण्हेरी गांवांत जाऊन म्हातारीची चीजवस्तु काय असेल ती घेऊन या. शेत पण या पोरीच्या नांवानें करून घ्या. आपण तिचे पालक आहोंत. म्हातारीचें तरी दुसरें कोण आहे ? तिचें सारें हिलाच मिळायचें."

यावर काकाकाकूंचें आणखी बरेंच हळुहळु बोलणें झालें, पण शोभाराणीला तें नीट ऐकूं आलें नाहीं. तिला आतां बरेंच समजूं लागलें होतें. गेल्या वर्षीं तिच्या वडिलांचे विम्याचे पैसे आले. त्यावेळीं काका काकू असेच हळुहळु बेत करीत होते. एके दिवशीं काकानीं तिला कोर्टांत एका साहेबापुढें नेऊन उभी केली आणि "मी हिचा पालक" असें सांगून पैसे घेतले होते. तो प्रसंग राणीला आतां आठवला. आणि तिला वाटलें काका आतां आजीचे पैसे पण असेच घेणार ! तिला सारखें रडूं येऊं लागलें. भीति पण वाटूं लागली. आपल्या आजीच्या लुगड्याची आणलेली चौघडी ती आपल्या अंगाशीं अगदीं घट्ट लपेटून घेतली. तिला वाटलें आजी अशीच आपल्याला कुशीत घेत असे. मग तिनें देवाला हात जोडले आणि त्याची मनांतल्या मनांत प्रार्थना केली व म्हटलें— "देवा, माझ्यावर कृपा कर, मला वांचव, आतां

तुझ्याशिवाय मला दुसरें कोणी नाहीं.." मग बऱ्याच वेळानें तिला झोप लागली.

दुसऱ्या दिवशीं राणी शाळेंत गेली. पण तिचें तोंड सुकलेल्या फुलासारखें कोमेजलें होतें. डोळे रडून रडून सुजले होते. बाईंनीं तिची चौकशी केली आणि शाळा सुटल्यावर एकीकडे बोलावून समजूत घातली. राणीला एकदम गहींवरून आलें. आज सारा दिवस तिचें अभ्यासांत लक्ष नव्हतें. ती शाळा सुटतांच मुकाट्यानें घरीं आली. आणि पाटी दप्तर ठेवून कोणाला न सांगतांच तिनें समुद्राचा रस्ता धरला.

आज समुद्राला खूप भरती आली होती. त्याच्या मोठमोठ्या लाटा किनाऱ्यावर घोंघावत येऊन वाळूवर आपटत होत्या. सूर्यनारायण आकाशाच्या टोकाला येऊन पाण्याशीं भिडला होता.

राणी आली ती थेट किनाऱ्यावर येऊन पाण्याच्या कांठाशीं वाळूंत उभी राहिली. तिनें एकवार कण्हेरी गांवच्या आड असलेल्या डोंगराकडे पाहिलें. नंतर मावळत असलेल्या सूर्याला नमस्कार केला. आणि आकाशाकडे पाहून मनांत म्हटलें, " देवा, माझ्या आईला, बाबांना नेलेंस. आजीला नेलेंस तसें आतां मला पण ने. मी तरी आतां कोणासाठीं



" समुद्रा, मला जवळ घे."

येथें राहूं ! स
असें म्हणून ुद्रा, मला जवळ घे, घे मला जवळ.
सागराचा ाणी पाण्यांतून पुढें पुढें निघाली.
टेकला होता अफाट विस्तार आकाशाला
नाहीं. एके त्याची तिला भीति वाटली
क लाट डोंगरासारखी मोठी

होऊन पुढें पुढें नाचत होती. त्या लाटेच्या कुशींत शिरावें, म्हणून राणीनें आपले हात पसरले आणि डोळे मिटून घेतले. लाट खळाळत आली आणि त्या कोवळ्या कळीच्या अंगावरून पुढें निघून गेली.

# प्रकरण ८ वें ........ वांद्र्याला रवानगी

राणीनें डोळे उघडले, तों तिच्या भोंवतीं माणसांची खूप गर्दी झाली होती. जो तो आपल्या परी बोलत होता. कोणी म्हणे एवढीशी पोर पुढें कशी गेली. कोणी म्हणालें " हिचे कोणी नातेवाईक नाहींत का तपास तरी करा. " कोणी उगाचच गर्दी करून मजा पहात होते. राणीला तो देखावा पाहून रडूं येऊं लागलें. तिनें खालीं मान घातली व दोन्ही हातांनीं आपलें तोंड झाकून घेतलें. तिला वाटलें "आपण समुद्राच्या कुशींत गेलों आणि तेथून परत कोणी आणलें आपल्याला ! समुद्रांतील देवता सुद्धां आपल्यावर रागावल्या कीं काय ? आतां काकांकडे कोणत्या तोंडानें जावें, अशा विचारानें तिच्या जिवाचा थरकांप उडाला. तिचे केस, परकरपोलकें सारें समुद्राच्या खाऱ्या पाण्यानें भिजून गेलें होतें. इतक्यांत त्या गर्दीतून सतरा-अठरा वर्षांचा एक तरुण मुलगा वाट काढीत पुढें आला आणि म्हणाला—

" मला या मुलीच्या घराचा पत्ता माहीत आहे. मी पोंचवितों तिला घरीं. बिचारी सहज पाण्यांत उभी होती, ती लाटेच्या तडाख्यांत सांपडली. मी जवळ होतों, म्हणून पकडली तिला पुढें होऊन. नाहीं तर कठीण अवस्था झाली असती. त्या मुलाचे कपडेही पार भिजले होते. त्यानें राणीला लाटेच्या झोतांतून पुढें होऊन तिचा हात धरून ओढून परत आणलें होतें. त्या नवख्या मुलानें एक गाडी बोलावून आणली व राणीला हात धरून गाडींत बसविलें. आपणही बसला आणि गाडी चालू झाली.

आपल्याला हें स्वप्न पडत आहे कीं काय, असें राणीला वाटलें. आतां ती पूर्ण सावध झाली होती. ती त्या तरुण मुलाला म्हणाली—

" मला तुम्हीं समुद्रांतून बाहेर काढलेंत, पण आतां माझे काका मला फार रागें भरतील. काय करूं मी तेथें जाऊन. आतां एवढें तरी करा, मी आपण होऊन समुद्रांत शिरलें, असें तुम्हीं काकांना सांगूं नका. "

असें बोलून राणी खालीं मान घालून बसली. त्या तरुणाचें नांव विनायक असें होतें. तो म्हणाला—

" तूं भिऊं नकोस शोभाताई, तुझी सारी हकीगत मला समजली आहे. तुझ्या काकांच्या घरासमोरच पटवर्धनांच्या वाड्यांत माझे मामा राहतात, त्यांचेकडे कांहीं कामासाठीं आठ दिवसांपूर्वीं मी आलों आहे. इथें आल्यावर मला तुझी सारी हकीगत समजली. आमच्या मामांची मुलगी उषा तुझ्याच शाळेंत जाते. तिनें मला सारें सांगितलें. तुला त्रास होईल असें मी कृष्णरावांजवळ कांहीं सांगणार नाहीं. "

राणीच्या मनांत विनायकाला आणखी किती गोष्टी विचारायच्या होत्या, तूं असतोस कोठें, शिकतोस काय, तुला आई आहे का ? इत्यादि हकीगत ती त्याला विचारणार होती. पण इतक्यांत काकांचें घर आलें. गाडी थांबली. राणी खालीं उतरली आणि विनायकाला हळूच म्हणाली—

" जा तूं, आतां घरांत जाईन मी " असें म्हणून ती पटकन घरांत गेली. संध्याकाळ झाली होती. घरांत कोणी नव्हतें. काकू देवाला गेली होती. काका बाहेरून अद्याप आले नव्हते. राणीनें घरांत जाऊन चटकन आपला दुसरा परकर नेसली. केस पुसले, दिवे लावले, आणि ती पुस्तक घेऊन मान खालीं घालून वाचीत बसली. तिला वाटलें, आपण कोठें गेलों काय केलें, हें आतां कोणाला समजणारच नाहीं. रात्रीं रोजच्याप्रमाणें सर्वांचीं जेवणें झालीं. अंथरुणें पांघरुणें झालीं. राणी आपलें अंथरुण घालून गोधडी गळ्याइतकी पांघरून अंथरुणावर पडली. इतक्यांत तिचे काका हातांत कंदील घेऊन आंत आले. त्यांच्या हातांत एक बारीकशी काठी होती. ते राणीच्या अंथरुणाजवळ जाऊन रागानें म्हणाले, " ऊठ, उभी रहा माझ्या समोर. " राणीला ते असें कां बोलत आहेत त्याचा अर्थ कळेना. ती उठून उभी राहिली. काका रागानें म्हणाले " आज तूं समुद्रावर कां जीव देत

होतीस ? काय आहे तुझ्या मनांत ? " असें म्हणून हातांतील छडीनें छड्या राणीच्या पायावर पाठीवर-हातावर मारल्या. काय होत आहे तें तिला समजेना. वेदना सहन न झाल्यामुळें ती तोंडावर हात दाबून रडूं लागली. आणखी छड्या देऊन काकांनीं काठी कोपऱ्यांत फेकून दिली आणि म्हटलें " उद्यांच्या उद्यां या पोरटीला पाठवून देतों वांद्र्याला सईताईकडे, तिलाही माणसाची गरज आहे. ही विजवटी पोर एकादे वेळीं कठीण प्रसंग आणील माझ्यावर. आज मेली असती समुद्रांत बुडून तर पोलिसांत जाब जवाब द्यावे लागले असते मला. भावाची मुलगी पोरकी अनाथ म्हणून आणली पण पोर साधीसुधी नाहीं, अपेश देईल ती. "

असें म्हणून काका निघून गेले. राणी बिचारी रडून रडून दमली आणि तोंडावरून पांघरूण घेऊन निजली. तिचें सर्वांग दुखूं लागलें. तहान लागली पण पाणी प्यायला उठण्याचा तिला धीर झाला नाहीं. तिनें हळूच ओंठावरून जीभ फिरवली आणि पडून राहिली. आतां तिला रडूंही येईना. तिच्या मनांत आलें काका आपल्याला बरेच वेळां पोरकी, अनाथ म्हणतात. आपलें खरेंच कोणी नाहीं, पण आपल्या वडिलांचे पैसे काकांनीं गेल्या वर्षीं घेतले, मग म्हणून तरी त्यांनीं आपल्याला नको का चांगलें करायला. काकांनीं जर आपणाला वांद्र्याला पाठवली तर तेथें आपलें कसें होईल, अशी काळजी तिला वाटूं लागली. सईताई ही तिची आत्याबाई, वांद्र्याला रहात होती. सईताई आपल्या पांच मुलांना घेऊन रत्नागिरीला आली होती. लठ्ठ, तुसड्या स्वभावाची आणि ऊठ सूट अंगावर ओरडणारी अशी सईताई राणीला डोळ्यापुढें दिसूं लागली आणि तिच्या अंगावर भीतीनें कांटा उभा राहिला. मग राणीनें देवाला हात जोडले. कृष्ण तिचा आवडता देव होता; त्याला मनांतल्या मनांत हांक मारून म्हटलें " मुरारी, कृष्ण सख्या, आतां तूंच माझें रक्षण कर. " मग तिला झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं शोभाराणी शाळेंत गेल्यावर मधल्या सुटींत आपल्या बाईंना एकीकडे गांठून म्हणाली " बाई, उद्यां मी येथून जाणार, काका मला वांद्र्याला पाठवीत आहेत."

तें ऐकून बाईंना मोठें नवल वाटलें. त्या म्हणाल्या " खरें कीं काय ? उगाच एवढी चांगली मुलगी शाळेंतून काढून नेत आहेत. मी सांगूं का तुझ्या काकांना, पाठवूं नका म्हणून. "

यावर शोभा म्हणाली " नको बाई, तुम्हीं कांहीं सांगूं नका, फार रागावले आहेत ते माझ्यावर, मला गेलेंच पाहिजे, माझी तयारी सुद्धां केली आहे, काकूनें. "

असें म्हणून तिनें काल घडलेली सर्व हकीगत बाईंना सांगितली, ती ऐकून त्यांना फार वाईट वाटलें. त्यांनीं राणीला खाऊची एक पुडी आणून दिली आणि म्हटलें इथेंच खा तूं. राणीनें खाऊ खाऊन आपल्या बाईंना नमस्कार केला आणि पुस्तकांच्या पिशवींतून एक रुपया काढून म्हटलें " बाई, हा माझा रुपया तुम्हीं ठेवून द्या, माझ्या आजीनें मला येतांना दिला होता तो. जपून ठेवायला माझ्याजवळ जागा नाहीं. " बाईंनीं रुपया हातांत घेतला आणि त्या कांहीं बोलणार, इतक्यांत बाई मी जातें आतां, असें म्हणून राणी पिशवी घेऊन वाऱ्यासारखी तेथून निघून गेली.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ती शेजारच्या सदूभाऊंबरोबर मुंबईला जाण्याकरितां बोटींत बसली. बोटींतून तिनें रत्नागिरी बंदराकडे एकवार पाहिलें, तिला कण्हेरी गांवाच्या समोर उभा असलेला तो उघडाबाघडा डोंगर दिसला. ज्या वाळूच्या किनाऱ्यावर आपणाला मोत्यें मिळतील या वेड्या आशेनें ती येत असे त्या किनाऱ्याकडे तिनें पाहिलें. तिला भास झाला तेथें आपल्यावर माया करणाऱ्या,आपल्याला शाळेंत पोळी आणून देणाऱ्या आपल्या त्या प्रेमळ बाई उभ्या आहेत. मग राणीनें आकाशांतल्या एका चांदणीकडे पाहून हात जोडले आणि हळूच ' आई ' अशी हांक मारली. बोट धुराचे लोट सोडीत चालू झाली.

## प्रकरण ९ वें ........ सई आत्याच्या घरीं

आगबोट मुंबई बंदरांत आली, धुराचे लोट सोडीत धक्क्याला लागली. कोण ती गर्दी आणि आरडाओरड. हमाल इकडे तिकडे धावत होते. तऱ्हेतऱ्हेचा माल विकणारे निरनिराळे आवाज काढून ओरडत होते. बोटींतील उतारू आपापलीं अंथरुणें गुंडाळून बोटींतून उतरण्याची घाई करूं लागले. शोभाराणी भांबावून गेली. तिनें इतकी गर्दी नी आरडाओरड कधींच पाहिली नव्हती. ती तोंडांत बोट घालून इकडे तिकडे पाहात राहिली. तिचे केस वाऱ्यानें भुरुभुरु उडत होते. कुंकू पुसटलें होतें आणि तोंड सुकलें होतें. इतक्यांत सदूभाऊंनीं आपली वळकटी बांधली आणि तिच्या दंडाला धरून म्हटलें—

"चल पोरी, खालीं उतर, वेंधळ्यासारखी बघीत काय राहिलीस?"

राणी सदूभाऊंच्या मागोमाग धक्क्यावर उतरली. आपण लाकडी धक्क्यावरून चालतांना समुद्रांत पडूं कीं काय, असें सारखें तिला वाटत होतें. रात्रीं जेवलेली नसल्यामुळें पोटांत भुकेनें ढवळत होतें व पाय लटपटत होते, पण राणीला ती गर्दी व माणसांची धावपळ पाहून फार नवल वाटलें.

सदूभाऊ तिला घेऊन घोड्याच्या गाडींतून स्टेशनवर आले आणि आगगाडींत बसले. अबब केवढी मोठी ही लांबच लांब गाडी, आणि वाऱ्यासारखी धावते कशी, याचा राणीला मोठा अचंबा वाटला. तिनें मनांत म्हटलें "बरें झालें आपण येथें आलों तें, इकडे किती तरी गंमत आहे. मग तिनें आपले वाऱ्यानें उडणारे केस मागें सारले आणि अर्धवट सुटलेली वेणी पुन्हा वळली. इतक्यांत गाडी थांबली. "हं उतर खालीः सदूभाऊ म्हणाले." राणी गाडींतून उतरली व थोड्या वेळानें आपल्या आत्याबाईच्या घरीं येऊन पोंचली. सदूभाऊ म्हणाले—

"हं, सांभाळा या पोरीला, कृष्णरावांकडून रत्नागिरीहून आलों आहें. त्यांनीं हें पत्र दिलें आहे तुम्हांला. असें म्हणून सदूभाऊ चहा पिऊन निघून गेले. राणी तेथें राहिली.

आत्याबाईचें घर अवघें दोन खोल्यांचें होतें. मागें लहानशी पडवी होती. तेथें कोळशांचीं पोतीं, शेणाचे गोळे, जमीन पुसण्याचे फडक्यांचे चोथे ठेवलेले होते. स्वयंपाक खोलींत व बाहेरच्या बैठकींत इतर सामान गर्दीनें रचलें होतें. त्या लहानशा चाळींत सहा बिऱ्हाडें होतीं. साऱ्यांना मिळून दोन नळ होते. राणीनें असली गर्दीचीं घरें पाहिलीं नव्हतीं. एकाद्या भिऊन गेलेल्या हरिणाप्रमाणें ती इकडे तिकडे पहात भिंतीला चिकटून उभी होती.

आत्याबाईना ६ मुलें होतीं. तीन मुली तीन मुलगे. आतां पुन्हां त्यांचें बाळंतपण जवळ आलें होतें. त्यांचा नवरा परळच्या गिरणींत मास्तर होता. तो सकाळींच जेवणाचा डबा घेऊन कामावर जाई तो रात्रीं एकदम घरीं परत येई. दिवसभर पोरें घरांत मस्ती व मारामारी करीत, आत्याबाई त्यांना मारीत पिटीत, पण मुलें थोडीच ऐकतात. राणीला तें सारें नवीन होतें. आत्याबाईच्या सांगण्याप्रमाणें तिनें हातपाय धुतले, आंघोळ केली. जेवायला बसली, पण गळ्यानें घास खालीं उतरेना. आपल्याला रडूं येईल कीं काय, असें सारखें तिला वाटूं लागलें. प्रवासाच्या त्रासानें तिचें सारें अंग दुखूं लागलें. रात्रीं निजतांना तिनें देवाला हात जोडून मनांत म्हटलें—

"देवा, आतां या नव्या ठिकाणीं आलें आहे, माझी राखण कर."

## प्रकरण १० वें ........ वांद्र्याचे दिवस

राणीला आत्याबाईकडे येऊन १५ दिवस होऊन गेले. तेथील मुलांशीं तिची ओळख झाली आणि कामाची संवय झाली. राणीला मनांतून वाटत होतें, आपणाला आत्याबाई शाळेंत घालतील, पण त्या कांहीं बोलेनात. शेवटीं तिनें एकदां धीर करून त्यांना विचारलें, तेव्हां त्या म्हणाल्या

तुला शाळेंत घालायला नाहीं मी येथें आणली, मला घरांत कामाला माणसाची मदत हवी आहे, म्हणून भाऊला मी पत्र लिहिलें, त्यानें तुला पाठवलें. येथें माझ्याजवळ सारें काम करायला शीक, मला मदत होईल. तुलाही काम येईल.

यावर राणी म्हणाली "मला हौस आहे. शाळेची, मी सारें काम करून शाळेंत जाईन, मग चालेल ना शिकलें तरी."

यावर आत्याबाई रागानें म्हणाल्या, "शाळेंत पुस्तकें घ्यायला फी भरायला पैसे नकोत वाटतें. तें कांहीं नाहीं, घरांतलें सारें काम तुला आलें पाहिजे. तेंच शीक आधी."

राणीला तें ऐकून फार वाईट वाटलें. तिच्या मनांत आलें आपल्या वडीलांचे इतके पैसे काकानीं हाताखालीं मदत करावी, गिरणींतून दळण दळून आणावें. यांत तिचा सारा वेळ जाऊं लागला. राणीला वाचनाची अतिशय आवड होती, पण आत्याबाईच्या घरांत तिला पुस्तकाला कोणी हात लावूं देईना. सुनंदा ५ वीत होती. मालती ८ वींत होती वासंती ११ वींत होती. पण त्यांच्या पुस्तकांना राणीनें हात लावलेला कोणाला खपत नसे. मग दुकानांतून सामान येई, तें भरून ठेवतांना राणी पुड्यांचे कागद नीट साफ करून घडी घालून ठेवी आणि साऱ्यांची नजर चुकवून मागच्या पडवींत उभी राहून वाची.

असे दिवस चालले होते. राणी आतां मोठी दिसूं लागली. तिला आत्याबाईकडे येऊन ९ वर्षें होऊन गेलीं. साडी नेसण्यासारखी उंच नी मोठी



घेतले आणि आपल्याला इकडे हाकून लावलें. आतां शाळाही नाहीं आणि कांहीं नाहीं. आतां कसें होणार आपलें.

ती घरांतलें सारें काम करूं लागली. नळाचें पाणी भरावें, धुणें धुवावें, स्वयंपाक व आत्याबाईंना ती आतां झाली होती. परकर तिला वाईट दिसे. शेजारणी म्हणूं लागल्या आतां शोभाला साड्या घेतल्या पाहिजेत. पण आत्याबाईनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. मग एक दिवस त्या म्हणाल्या पोरींची जुनीं पातळें पडलीं

आहेत घरांत. त्यांतलीं दोन नेसत जा तूं. राणी सुनंदाचें जुनें पातळ शिवून नेसूं लागली, त्यांतही ती शोभून दिसे. आत्याबाईच्या मुली काळ्या कळकट, नाकें बसकटलेलीं, केस थोडे, अशा होत्या. त्या आपलीं तोंडें पावडरीनें गोरीं करीत; वेण्यांना गोंडे लावून लांब करीत, तरीही त्या सुरेख दिसत नसत. राणी मात्र खरोखरच राणी होती. जुनें फाटकें पातळ नेसून सुद्धां ती एकाद्या राजकन्येप्रमाणें तेजस्वी नी सुंदर दिसे. तिचा रंग गोरापान, नाक सरळ नी केस काळेभोर लांब सडक होते. तिची वेणी छान येई, ती पाहून त्या पोरींना मोठा हेवा वाटे. आत्याबाई मग तिला म्हणत, एवढी लांब वेणी येते, तर घालतेस कशाला तो शेपटा. अंबाडा बांधीत जा तूं नाहींतर वाढतांना पानांत लोळेल जेवणारांच्या.

असली घालून पाडून बोलणीं राणी निमूटपणें सोशीत होती. आपले दिवस ढकलत होती. मोठी होत होती.

प्रेमाचा शब्द अलीकडे कित्येक दिवसांत तिनें ऐकला नव्हता, कीं मायेचा हात तिच्या अंगावरून फिरला नव्हता. तरी पण धरणी माता रात्रीं तिचा दमलेला देह आपल्या मांडीवर घेई, मग राणी मनांत म्हणे, रात्र माझी आई, मला ती कुशीत घेऊन झोपवते, मला विसावा देते. आणि मग तिला शांत झोप लागे.

## प्रकरण ११ वें ....... लग्न जमलें

राणीला आतां सोळावें संपून सतरावें वर्ष लागलें होतें. ती अंगानें पहिल्यापासूनच उफाड्याची, आतां घरांतलें सारें कामधाम करून कणखर ली होती. वर्ष सतरावें असलें तरी ती चांगली स वर्षांची दिसे. गोरापान रंग, भुंग्यांप्रमाणें ळेभोर डोळे आणि चाफेकळीसारखें नाक मुळें ती चटकन कोणाच्याही मनांत भरे.

ती ज्या चाळींत रहात असे, त्याच्याच समोर सरी एक बाटलीवाल्याची चाळ होती. त्या ळींत दुसऱ्या मजल्यावर मोतीवाले काळे या वाचे गृहस्थ रहात होते. ते सराफाचा धंदा रीत. त्यांचेकडे 'रावबहादूर राजे' या नांवाचे हुणे गेले चार दिवस येऊन राहिले होते. वय न्नाशी उलटलेलें, केस पिकलेले, डोक्याला टक्कल से ते गृहस्थ रोज गॅलरींत उभे राहून शोभाराणी ळावर पाणी भरीत असली, धुणी धूत असली ं, तिच्याकडे टक लावून पहात रहात. रावबहारांची बायको ४ महिन्यांपूर्वी क्षयानें वारली होती. ांच्या मनांत पुन्हां लग्न करावयाचें होतें. राजे प श्रीमंत होते, आपली मोटार घेऊन ते कांहीं मासाठीं काळे सराफांकडे आले होते. राणीला पाहून ते मनांत अगदीं खूश झाले, त्यांनीं सराफांजवळ तिची चौकशी केली. दोघांचें बराच वेळ बोलणें झालें. त्यांनीं बेत ठरविला, आईबाप नसलेली पोरकी पोर आहे, सहज मिळेल रावबहादुरांना. पैसा कितीही खर्च झाला तरी हरकत नाहीं. या विचारानें रावबहादूर मनांतून अगदीं हुरळून गेले.

दुसऱ्या दिवशींच रावबहादूर राजे आणि मोतीवाले यांनीं सईआत्याच्या घरीं येऊन तिच्या यजमानांजवळ शोभाराणीच्या लग्नाच्या गोष्टी काढल्या. आत्याबाईचे यजमान वामनराव म्हणाले

"हो, लग्न करावयाचें आहे खरें तिचें, पण तिच्या काकांना-कृष्णरावांना मला विचारलें पाहिजे."

यावर राजे म्हणाले, "मुलीला जरा बाहेर बोलवा, पुढचें मग पाहूं, तुमच्या मनांत असेल तर सर्व गोष्टी जमून येतील."

वामनरावांनीं शोभाराणीला हाक मारली व चहा आणायला सांगितलें. राणी चहाचे कप घेऊन बाहेर आली आणि खाली मान घालून उभी राहिली. 'लग्न' हा शब्द तिनें आंतून ऐकला होता. तिला वाटलें, या श्रीमंत पाहुण्याचा मुलगा असेल

लग्नाचा, किंवा धाकटा भाऊ असेल. लग्नाच्या कल्पनेनें तिचे गाल लाजेनें लाल झाले. चहा घेतल्यावर पाहुणे म्हणाले "मुली, जा बरें घरांत." राणी त्यांना नमस्कार करून घरांत आली. पाहुणे मग वामनरावांशीं बराच वेळ बोलत बसले होते. वामनरावांना पुढील बोलणीं करण्याकरितां घरीं यावयला सांगून ते दोघे निघून गेले.



राणीला त्या दिवशीं जेवण गेलें नाहीं कीं, काम सुचलें नाहीं. सारखे तिच्या मनांत आपल्या लग्नाचे विचार घोळत होते. तिला वाटत होतें, आपलें लग्न झालें तर बरें होईल. सुटेन एकदां या जाचांतून. नाहींतरी आपल्याला शिक्षण नाहीं मरमर काम करावें आणि दोन वेळां खावें, काय अर्थ असल्या जगण्याचा. तिनें त्या पाहुण्यांचा मुलगा कसला असेल, केवढा असेल, त्याचें कल्पनेनें मनाशीं चित्र रेखाटलें. तिला वाटलें तो बहुतेक कॉलेजांत जात असेल. सायकलवर बसत असेल. किती उदार नि थोर आहेत हे पाहुणे, त्यांच्या मुलाशीं लग्न झालें तर सुटेन या दुःखातून. "देवा माझें लग्न या घरीं नक्की जुळूंदे." अशी मनांतल्या मनांत प्रार्थना करून देवाला हात जोडून ती रात्रीं झोंपली. झोपेंत तिला आपल्या लग्नाचेंच स्वप्न पडत होतें......

रावबहादूर राजेसाहेबांच्या मुलाशीं तिचें लग्न झालें. त्याच्या शेल्याच्या पदराला गाठ देऊन आणि त्याचा हात धरून फुलांनीं सजवलेल्या मोटारींत ती बसली. असें स्वप्न ती पहात होती. इतक्यांत अपला हात मोटारीच्या दारांत सांपडला, असा भास तिला झाला आणि ती 'अयाईग' असें म्हणून एकदम जागी झाली. बाहेरच्या खोलींत दिवा जळत होता आणि आत्याबाईबरोबर वामनराव बोलत असल्याचें तिच्या कानीं पडलें.

वामनराव म्हणाले, "रावबहादूर दोन हजार रुपये देणार आहेत. लग्नाचा आपल्याला कवडीही खर्च येणार नाहीं. त्यांचें वयही फार नाहीं. असेल

पंचेचाळीस, सेचाळीस म्हणून जमवून टाकलें. नक्कीच करून आलो सारें. "

यावर आत्याबाई म्हणाल्या " पण कृष्णाभाऊला विचारलें पाहिजे होतें अगोदर, तो काय म्हणेल!"

यावर वामनराव म्हणाले " अग, तो नको का म्हणणार आहे! इतक्या सहजासहजीं सोन्यासारखें स्थळ चालून आलें आहे. दोन हजार मिळणार आहेत. त्यांतले कृष्णरावांना पांचशें रुपये देऊं म्हणजे झालें."

आतां आत्याबाईची समजूत पटली. तरी पण त्या म्हणाल्या, पहिलीं चार मुलें आहेत ना ?

यावर वामनराव रागानें म्हणाले, " अग, मुलें काय डोक्यावर बसताहेत का तिच्या ? असलीं म्हणून काय झालें. राजे किति श्रीमंत आहेत. त्यांचे बरोबर मोटारींतून मिरवेल ही पोरटी आतां. तूं कांहीं मध्यें बोलूं नकोस, आणि मुलांचें तिला इतक्यांत कांहीं सांगूं नकोस. मी मुहूर्त सुद्धां नक्की करून आलों आहें. आजपासून दहाव्या दिवशीं, सव्वीस तारीख समजलें ना ? "

आणि मग तीं दोघें दिवा मालवून झोंपलीं. राणीनें हें सारें बोलणें अंथरुणांत पडून ऐकलें होतें. आतां ती पुरती जागी झाली. तिचें स्वप्न मोडलें. तिला रडण्याचा एक मोठा हुंदका आला. तो तिनें तोंडावर हात दाबून परतवला आणि मनांत म्हटलें–

" हाय रे दैवा, आतां कुठे जाऊं मी. त्या म्हातान्याच्या गळ्यांत मला बांधणार तर हीं माणसें, दोन हजार रुपयांना विकणार मला. त्यापेक्षां विहिरींत उडी टाकून मेलेलें काय वाईट. "

तिनें ती सारी रात्र रडून आणि अंथरुणांत तळमळून काढली. पहाटे तिला जरा झोंप लागली. तिला झोपेंत भास झाला. आपली आजी आपल्याला कुशींत घेऊन थोपटीत आहे.

दुसरे दिवशीं राणीचें लग्न ठरल्याची बातमी शेजारीपाजारीं जिकडे तिकडे पसरली. शेजारणी आळीपाळीनें घरांत ये जा करूं लागल्या. नवऱ्या मुलाची माहिती विचारूं लागल्या, आत्याबाई ज्याला त्याला सांगत " नशीब काढलें पोरीनें, मोटारींतून मिरवेल आतां. " आत्याबाईंच्या मुली म्हणूं लागल्या " आम्हांला नवीन पातळें पाहिजेत लग्नाचीं, तिघींना तीन. "

सुनंदा म्हणाली " शोभाराणी, खरोखरच राजाची राणी होणार तूं आतां, मग आमच्याशीं बोलशील तरी का ? का जाशील गर्वानें चढून. "

यावर मालती म्हणाली " अग, ती आतांच आमच्याशीं बोलेनाशी झाली आहे, पहा तरी श्रीमंतीचा तोरा, सकाळपासून एक शब्द तरी बोलली का ? "

पण इकडे राणीचें तोंड सुकलेल्या गुलाबासारखें कोमेजलें होतें. डोळे रडून रडून लाल झाले होते. खरोखरच ती कोणाशीं बोलली नव्हती. तिनें आपलें रोजचें काम उरकलें. धुणें–पाणी केलें, वामनराव जेवून ऑफिसांत गेले. आज ते जरा विशेष घाईत दिसले. सकाळींच त्यांनीं कृष्णरावांना तार केली होती व लग्न ठरल्याचें कळवून बोलावलें होतें. मुली आपापल्या शाळेंत गेल्या होत्या आणि आत्याबाई देवापुढें बसल्या होत्या. त्यांना एकट्याच पाहून राणी तेथें आली. आणि खाली मान घालून म्हणाली–

" आत्याबाई, माझें इतक्यांत लग्न नको. मला– तें राजेसाहेबांचें स्थळ पसंत नाहीं. "

आत्याबाई जपाची माळ हालवीत, त्यांतले मणी मागें पुढें करीत होत्या. त्या एकदम चमकून सावध झाल्या आणि सरसावून बसत म्हणाल्या–

" काय म्हटलेंस ? "

राणी पुन्हा हळूच म्हणाली, मला हें लग्न पसंत नाहीं. आणि ती खाली मान घालून उभी राहिली.

यावर आत्याबाईनीं एकदम मोठा कडकडाट केला, दांत विचकून त्या म्हणाल्या–

" म्हणतेस तरी काय तूं, बेशरम कार्टी, कांहीं लाज तुझ्या मनाला, लग्न नको, मग काय हवें तुला, दळभद्री पोर, आतां मुहूर्त ठरला नी लग्न मोडूं होय ? मोठी इंद्राची अप्सराच कीं नाहीं लागून गेलीय अगदीं! दोन वर्षे गिळायला घातलें, त्याचे हे उपकार फेडतेस वाटतें ? "

हा कडकडाट ऐकून राणीच्या डोळ्यांतून

पाण्याच्या धारा वाहूं लागल्या, तरी पण ती धीर करून म्हणाली--

" राजे म्हातारे आहेत, त्यांना पहिलीं ४ मुलें आहेत. मला अगदीं गरीब स्थळ चालेल, पण तरुण आणि शहाणा पति हवा. मग मी कितीही गरीबी असली तरी आनंदानें राहीन. "

यावर आत्याबाई म्हणाल्या, " मोठी लागून गेली आहेस तूं शहाणी. आम्हीं करतों तें तुझ्या हिताचेंच आहे. राजे कांहीं फार वयाचे नाहींत. असतील ४०।५० वर्षांचे, जरा वय १० वर्षें अधिक असलें म्हणून काय झालें, दागिन्यानीं पिवळी होशील, नशीब म्हणूनच असें स्थळ चालून आलें. आतां मुहूर्तसुद्धां ठरला. उद्यां कृष्णाभाऊ येईल, त्याला तार केली आहे. आमचें ऐक, मुकाट्यानें लग्नाला उभी रहा."

भरलें होतें. दळण तयार करावयाचें होतें. दूध आणावयाचें होतें. राणीनें डोळ्यांतल्या पाण्या-बरोबर दोन घास कसे तरी खाल्ले. कामाचा पसारा आवरला. पाणी भरलें, गिरणींत जायला बाहेर पडली.

तिचें मन आज ताळ्यावर नव्हतें. कुठेतरी पहात भ्रमिष्टासारखी ती चालली होती. तिला एक गुरांचा कळप दिसला. तिच्या मनांत आलें, कुठें बरें जात असतील हीं गुरें ? गाई, वासरें, बैल सर्वांना एक माणूस हाकलून नेत होता. राणी त्या गुरांच्या मागोमाग जाऊं लागली. तिला वाटलें पहावें तरी कोठें जातात-काय होतें तें. सारीं गुरें कसाईखान्याकडे हाकललीं जात होतीं. तिनें त्या जागेचें नांव पूर्वीं ऐकलें होतें. " वांद्र्याचा कसाईखाना " शेंकडो गुरें तेथें बांधलेलीं



राणी कांहीं न बोलतां निमूटपणें आपल्या कामाला निघून गेली. घरांत कामाचा केवढा पसारा पडला होता. स्वयंपाकघर खरकट्यानें

होतीं. कांहीं नवीन येत होतीं. कांहींना आंतील बंद भागाकडे नेत होते. तेथें त्यांचें काय करणार, मारणार, कापणार नसतील ना त्यांना, असें वाटून

राणीच्या अंगावर कांटा उभा राहिला. गुरांच्या मागोमाग आपण कोठें आलों तें तिच्या ध्यानांत आलें नाहीं. आपल्यालाही आतां एक प्रकारच्या कसाईखान्यांत जावें लागणार आहे. या गुरांप्रमाणेंच आपलेंही जिणें होणार, असा विचार तिच्या मनांत घोळत होता.

ती घरापासून बरीच दूर चांगली मैलभर आली होती. पिठाची गिरणी एकीकडेच राहिली. जिकडे तिकडे जंगल, मध्येंच कांहीं झोपड्या, दिसूं लागल्या. राणी वेड्यासारखी इकडे तिकडे पाहूं लागली. इतक्यांत सूट बूट घातलेले, केसांचा भांग पाडलेले, काळेभिन्न धिप्पाड चौघे जण तिच्या समोर आले. त्यांना पाहून राणीला फार भीति वाटली. आतां किंकाळी मारणार पण तिच्या तोंडून शब्द फुटण्यापूर्वींच त्या धटिंगणांनीं एक रुमाल तिच्या तोंडावर टाकला, त्याचा विलक्षण भपकारा तिच्या नाकांत शिरला आणि ती क्षणभरांत बेशुद्ध झाली.

# प्रकरण १२ वें ........ संकटांतून सुटका

शोभाराणीच्या तोंडावर बुरखा टाकून त्या चौघा धटिंगणांनीं तिला उचलून भराभर पळण्याला सुरवात केली. आतां राणी पूर्ण बेशुद्ध झाली होती. लौकरच ते चौघेजण तिला घेऊन एका मोटारीजवळ आले. आणि बेशुद्ध असलेल्या राणीला वळेंच मोटारींत टाकून त्यांनीं धाडकन मोटारीचें दार बंद केलें. दोघे जण पुढें व दोघे मागें बसले आणि मोटार भरधांव चालू झाली. किती वेळ तरी ती रानांवनांतून आड वाटेनें वाऱ्यासारखी पळत होती. शेवटीं गाडी चढावाला लागली. खंडाळा घाट मागें पडला. लोणावळें गेलें, तळेगांव गेलें आणि पुणें जवळ येऊं लागलें. गाडींत बसलेल्या मवाल्यापैकीं एक दुसऱ्याला म्हणाला—

" धोंड्या, शुद्धीवर आली का बघ, आपलें उतरण्याचें ठिकाण जवळ येत आहे. नाहीं तर आरडाओरडा करून आमचा सारा बेत फिसकटून टाकील. "

राणी खरेंच आतां शुद्धीवर आली होती. तिला तहान लागून घशाला कोरड पडली होती. पण मोटारींतल्या माणसांचें बोलणें ऐकून ती बेशुद्ध असल्याचें सोंग करून पडून राहिली. आणखी कांहीं संकट आपणांवर ओढवणार, अशी तिला भीति वाटत होती. तेव्हां काय होईल तें मुकाट्यानें पाहण्याचें ठरविलें. तिनें मनांतल्या मनांत देवाचा धावा चालविला होता. आपणाला कुठें नेत आहेत तें तिला समजेना. बाहेर चांगलीच रात्र पडल्याचें दिसत होतें. भीतीनें तिचा जीव आंतल्या आंत कापूं लागला. रडूं फुटूं नये म्हणून तोंडावर हात दाबून राणी तशीच पडून राहिली. मोटार भर वेगांत धावत होती. इतक्यांत मागच्या बाजूनें पिस्तुलाचा " ठो ठो " असा मोठा आवाज झाला आणि खर्रर्र आवाज करून मोटार तीन चार फूट चालून उभी राहिली. आंतले लोक चपापले. धोंड्या म्हणाला--

" हसन, बघ बघ काय झालें तें, गाडी पंक्चर झाली वाटतें. "

पण ते इतकें बोलत आहेत तों गाडीच्या सभोंवार हत्यारी पोलिसांचा वेढा पडला. त्यांचा मुख्य पुढें येऊन दरडावून म्हणाला—

" ठहरो, दरवाजा खोलो. "

त्याचा हुकमी आवाज ऐकून आंतले लोक भीतीनें गर्भगळित झाले होते. ते पळून जाण्याच्या विचारांत होते त्यांतल्या एकाजवळ एक चकचकीत सुरा होता तो हसननें बाहेर काढला व आतां तो सुरा पोलिसांवर उगारणार इतक्यांत पोलिसांनीं पिस्तुलें रोखून भराभर साऱ्यांना अटक केली व त्यांच्या हातांना दोऱ्या बांधून जवळच पोलिसांची गाडी उभी होती त्यांत ते चारी मवाली नेऊन बसविले.

पोलिसांच्या इन्स्पेक्टरनें आपली बॅटरी घेऊन गाडी तपासायला सुरवात केली, आणि त्याच्या

तोंडून एकदम " अरे, हें काय " असे उद्गार निघाले. गार्डीत शोभाराणीला पाहून पोलीस इन्स्पेक्टरला फार आश्चर्य वाटलें. त्याला एकदम ओळख पटली. कारण तो इन्स्पेक्टर म्हणजे विनायक होता. त्यानें तिला ५ वर्षांपूर्वी रत्नागिरी बंदरावर समुद्राच्या लाटेतून वांचविलें होतें. आपण हें स्वप्नतर पहात नाहीं ना, असें त्याला वाटलें. त्यानें हाताखालच्या पोलिसांना पाणी आणायला सांगितलें. राणी भीतीनें पुन्हा बेशुद्ध झाली होती. डोक्यांवर पाणी मारतांच ती सावध झाली. आणि एकदम तिला रडण्याचा हुंदका आला. विनायक म्हणाला—

" शोभाराणी रडूं नको, तुला आतां कसलीही भीति नाहीं. हा पहा मी विनायक तुझ्यापुढें उभा आहे, ओळखलेंस नाहीं का मला ?"

आपण पाहातों तें स्वप्न कीं खरें तें प्रथम राणीला समजेना, तिनें पुन्हा पुन्हा विनायकाकडे पाहिलें, आतां मागच्यापेक्षां तो मोठा दिसत होता. पोलिसाचे रुबाबदार कपडे त्याच्या अंगावर होते. त्यामुळें राणीला तो पहिल्यानें ओळखला नाहीं पण मग ओळख पटली. त्याबरोबर तिला एकदम रडूं आलें. आणि ती हात जोडून दीनपणानें म्हणाली—

" मला सोडवा हो या लांडग्यांच्या हातांतून आणि वांद्र्याला नेऊन पोंचवा. नाहींतर एकाद्या विहिरींत तरी ढकलून द्या. "

विनायक तिला धीर देऊन म्हणाला—

" राणी, तूं भिऊं नकोस, आतां तुला मी माझ्या घरीं घेऊन जातों. उद्यां तूं सांगशील तेथें तुला मी पोंचती करीन, मग झालेंना ? " ओळखलेंस ना मला ! "

इतक्यांत हाताखालच्या पोलीस शिपायांनीं दुसरी मोटार आणली होती. विनायक शोभाराणीला घेऊन त्या मोटारींत बसला. ती मघाशीं पकडलेली मोडकी मोटार त्यानें शिपायांच्या ताब्यांत दिली. विनायकाची मोटार चालू झाली.

विनायक पोलीस खात्यांत नौकरी करीत होता. तो इन्स्पेक्टर झाला होता. त्याच्याकडे गुन्हे शोधून काढण्याचें काम होतें. कालच पुण्याच्या एका डॉक्टरांची नवी कोरी मोटार चोरीला गेली होती. तिच्या तपासाचें काम चालू होतें. त्या शोधांत तो पोलिसशिपायांना घेऊन खडकीच्या बाजूला आज हिंडत असतांना चोरलेल्या मोटारीच्या हुबेहुब वर्णनाची मोटार भरधाव येतांना त्यांना दिसली. नंबरही तोच होता. म्हणून संशय येऊन त्यांनीं पिस्तुल मारून गाडीचा टायर फोडून ती थांबविली होती. आणि योगायोग किती विलक्षण. अचानक शोभाराणीची संकटांतून सुटका झाली. नाहींतर तिचें आज काय झालें असतें सांगवत नाहीं.

विनायक घरीं आला तों रात्रीचे १० वाजले होते. त्याचे बरोबर शोभाराणीला पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. ही कोण, अशा रात्रीच्या वेळीं इकडे कुठें आली. पण विनायकानें आल्याबरोबर घरांत जाऊन आपल्या आईला सर्व हकीगत सांगून म्हटलें " आई, जशी माझी यमूताई, तशीच शोभाराणी, तिला प्रथम जेवूं खाऊं घाल आणि स्वस्थ निजूंदे तिला. बिचारी फार घाबरली नी दमली आहे."

राणीनें हात तोंड स्वच्छ धुतले घासभर भात खाल्ला नी यमूताईच्या अंथरुणाजवळच मिळालेल्या अंथरुणावर अंग टाकलें. आतिशय दमल्यामुळें तिला चटकन झोप लागली.

## प्रकरण १२ वें ....... पश्चात्ताप

इकडे वांद्र्याला आत्याबाईच्या घरीं त्या दिवशीं फारच गोंधळ उडाला. राणीला गिरणींतून यायला उशीर झाला, म्हणून आत्याबाई पहिल्यानें तिच्यावर रागावल्या. मनांतल्या मनांत चडफडल्या, तिला नाहीं नाहींतें बोलल्या. पण रात्र पडली, दिवे लागले, वामनराव कामावरून घरीं आले तरी राणी गिरणी-

तून घरीं आली नाहीं. मग मात्र त्यांना काळजी वाटूं लागली. भीतीही वाटली. राणीनें जीवबीव दिला कीं काय, असें त्यांच्या मनांत आलें, मग शेजारी पाजारी शोधाशोध चालविली. विहिरींत पाहिलें. तळें शोधलें. वामनराव स्टेशनपर्यंत जाऊन आले. पण फुकट! शोध कांहीं लागला नाहीं. मग सारीं कंटाळून झोंपली.

दुसरा दिवस उजाडला, तोही संपला. तिसरे दिवशीं रत्नागिरीहून कृष्णराव काका आले तों राणी नाहींशी झालेली ऐकून त्यांनाही वाईट वाटलें. तरणीताठी पोर नाहींशी झाली. साऱ्यानांच तें वाईट. जिकडे तिकडे लोकांना टीका करायला मिळाली. ज्याच्याशीं राणीचें लग्न ठरलें होतें ते रावबहादूर राजे आपल्या गांवीं गेले होते. ते-ही परत आले. येतांना त्यांनीं नवरी मुलीसाठीं चपलाहार, मोत्यांच्या बांगड्या, आणि रेशमी साडी आणली होती. कारण आतां वाङ्निश्चय व्हायचा होता. त्यांनीं आणलेले जिन्नस मोठ्या हौशीनें वामनरावांकडे दाखवायला आणले. त्यांना वाटलें नवरी मुलगी दागिने पाहून खूश होईल. पण कसले दागिने नी कसलें काय? राणीचा पत्ता नाहीं. साऱ्यांच्या तोंडचें पाणी पळालें. शेवटीं वामनरावांनीं पोलिसांत वर्दी दिली. आणि वर्तमानपत्रांत जाहिरात देऊन शोध लावणारास ५०० रुपयांचें बक्षीस लावलें. सर्वांना आतां वाईट वाटूं लागलें. आत्याबाई मनांतल्या मनांत कुथूं लागल्या. उगाच आपण पोरीचा छळ केला. जीव तर दिला नसेलना तिनें. आपल्या भावाची मुलगी आपण प्रेमानें सांभाळायला हवी होती असें आतां त्यांना वाटूं लागलें.

कृष्णराव तर मनांत फार खट्टू झाले. आपल्या भावाची मुलगी अनाथ झाली म्हणून आपण आणली. तिच्या वडिलांचा पैसा घेतला. आणि पोरीचे हाल केले, आपला भाऊ स्वर्गांतून आपल्याकडे पाहून सारखा रागावतो आहे असा त्यांना भास होऊं लागला. पैशासाठीं आपण पोरीचे हाल केले असें त्यांचें मन त्यांना खाऊं लागलें. आतां आपण कोणत्या तोंडानें रत्नागिरीला परत जाणार, तेथील लोकांना काय सांगणार, याचा त्यांना विचार पडला. राणीचा शोध लावून यापुढें तिला फुलासारखी वागवायची, तिला चांगला नवरा पाहून द्यावयाचा. असा त्यांनीं मनाशीं निश्चय ला. अणि ते एकेक दिवस मोजून घालवूं लागले.

❖

## प्रकरण १४ वें ....... कॅप्टन राम

विनायकाचे घरीं राणीला येऊन ३ दिवस झाले होते. आतां तिची सवांशीं ओळख झाली. विनायकची बहीण यमुताई ही तर राणीला वहिणी सारखी समजत होती. विनायकाचे आईवडीलांना तिनें आपली सर्व हकीगत पहिल्यापासून सांगितली ती ऐकून सर्वांना फारच वाईट वाटलें. विनायकाचे वडील म्हणाले.

" मुली, आतां तुझें सर्व दुःख संपलें. यापुढें तूं कसहीली काळजी करूं नकोस, माझ्या मित्राची तूं मुलगी आहेस. तुझे वडील आणि मी लहानपणापासून एकत्र होतों, एकाच शाळेंत शिकलों. "

हें ऐकून राणीला फार आश्चर्य वाटलें आणि आनंदही झाला,

आज सकाळपासून विनायककडे मोठी गडबड उडाली होती. त्याचा मित्र राम यायचा होता तो आतां मोठा हुद्देदार झाला होता. मिलिटरीच्या शिक्षणासाठीं तो डेहराडूनला गेला होता. तेथील शिक्षण संपवून आज तो पुण्याला परत यायचा होता. त्यासाठीं घरांत तयारी चालली होती. सारीजणें आतुरतेनें त्याची वाट पहात होती. जसा कांहीं त्यांचाच मुलगा यायचा होता. असें अगत्य ज्याला त्याला वाटत होतें. यमूताईशीं रामचें लग्न जमलें होतें,

ही सारी हकीगत समजल्यावर हा राम कसा आहे, त्याला पाहण्याची राणीलाही मोठी उत्सुकता लागली. राणी यमूताईबरोबर सुचेल तें

काम करूं लागली. अखेर संध्याकाळीं राम एकदांचा येऊन पोंचला. आल्याबरोबर तो हात-पाय धुऊन सर्वांच्या पाया पडला. आणि स्वयंपाकघरांत जाऊन पाटावर बसला. त्यानें सर्वांची चौकशी केली, आणि ही कोण, अशा अर्थानें राणीकडे पाहिलें.

रामला पाहून राणी दिपून गेली होती. विनायकच्याच वयाचा त्याच्याइतक्या उंचीचा राम होता. विनायक गोरा होता, राम जरा सांवळा होता. दोघेही नाका डोळ्यानीं रेखीव आणि देखणे होते. मिलिटरीचें शिक्षण घेऊन रामचा बांधा खूप पिळदार नी बळकट झाला होता. रामचें लाघवी बोलणें आणि प्रेमळ वागणें राणीला अगदी नवीन वाटलें. ती लाजून आंतल्या खोलींत जाऊन बसली.

यमूताईनें तिची रामशी ओळख करून दिली. ती म्हणाली, "ही माझी मैत्रीण शोभाराणी. तिची सर्व हकीगत मी सावकाश सांगेन. आतां लौकरच ही माझी वहिनी होणार आहे."

यमूताईनें "वहिनी" असें म्हणतांच राणी एकदम चपापली आणि लाजेनें लाल झाली. तेथून उठून ती आपल्या खोलींत जाऊन बसली. तिला कांहीं सुचेना. 'वहिनी,' हा एकच शब्द तिला ऐकूं येऊं लागला. तिच्या मनांत आलें 'देवा असें झालें तर किती चांगलें होईल. विनायकनें दोन वेळां आपणाला संकटांतून वाचविलें आतां शेवटपर्यंत त्याची सोबत आपल्याला मिळेल का?' हा विचार तिच्या मनांत पुन्हा पुन्हा येऊं लागला.

राम चार दिवस पुण्याला राहून नंतर आपल्या वडिलांना भेटायला सुंदरपूरला जाणार होता. ते चार दिवस किती गडबडींत गेले. समजलेंही नाहीं. कितीतरी मित्रमंडळी त्याला भेटायला आली. आणि रामचा जायचा दिवस उजाडला. त्या दिवशीं सकाळीं चहा झाल्यावर विनायकाच्या वडिलांनीं राम, यमुना, विनायक आणि शोभाराणी यांना एकत्र बोलावून घेतलें आणि त्यांना आपल्याजवळ बसवून घेऊन ते म्हणाले, मुलांनों, मी तुम्हांला आज एक प्रश्न विचारणार आहें. तुम्हीं आतां शिकून सवरून मोठे व शहाणे झालां आहांत तेव्हां नीट काय तें उत्तर द्या.

हे आतां सांगणार तरी काय, असें वाटून सारींजण मोठ्या उत्सुकतेनें ऐकूं लागलीं. बाबा म्हणाले, "रामनें मोठ्या कष्टानें विद्या मिळविली. त्याचें शिक्षण पूर्ण झालें, माझ्या यमूचें त्याच्याशीं लग्न करावें असें मी ठरविलें आहे. यमूला व रामलाही हें पसंत आहे, असें मला वाटतें. त्याचप्रमाणें विनायकाचेंही शिक्षण होऊन तोही आतां नोकरीला लागला आहे. माझ्या बालमित्राची मुलगी शोभाराणी ही केवळ योगायोगानें मला भेटली. तिला आपली सून करून घ्यायचें मी ठरविलें आहे. पण हें तुम्हां सर्वांना पसंत असेल तरच."

हें बाबांचें बोलणें ऐकून यमुना आणि शोभाराणी खालीं मान घालून बसल्या. दोघींचीही तोंडें आनंदित झालीं होतीं. राम व विनायक गालांतल्या गालांत हंसत हळूंच म्हणाले "आम्हीं कांहीं तुमच्या बाहेर नाहीं."

## प्रकरण १५ वें ....... शुभमंगल

दोन्हीं लग्नें जमलीं. विनायकाच्या वडिलांनी कृष्णराव आणि वामनराव यांना पत्रें पाठवून बोलावून घेतलें. राणीचा शोध लागल्यामुळें वांद्र्याला सर्वांची काळजी दूर झाली. सारीजणें मग पुण्याला लग्नाला आलीं. कृष्णरावांनीं राणीच्या वडिलांच्या पैशांतून २ हजार रुपये लग्नांत हुंडा देण्यासाठीं म्हणून बरोबर आणले.


रामचेही वडील आणि भावंडें सुंदरपुराहून लग्नसाठीं पुण्याला आलीं. घर माणसांनीं भरून गेलें आनंदाला तोटा नव्हता. तयारी सुरू झाली.

राणीनें विनायकाला एकीकडे गांठला आणि म्हटलें "दोन वेळां प्राण वाचविलेत आणि आतां तुमचे उपकार कसे फेडूं?"

यावर विनायक हंसून म्हणाला "आतां या घरांतून जायचें नाहीं, म्हणजे उपकार फिटले."

राणीचें मन आनंदानें भरून आलें. ती आतांपर्यंत भोगलेलें दुःख आणि हाल सारें विसरली. आणि एका मंगल शुभ मुहूर्तावर राणी आणि विनायक, यमूताई आणि राम यांचें शुभमंगल सावधान झालें!


[ समाप्त ]




# मा झी  द क्षि ण  या त्रा

# तिची कल्पना, आपली साडी पांढरीशुभ्र आहे - पण सुधाची रिन्सोनें धुतलेली साडी पाहतांच ती थक्कच झाली !






अधिक काटकसरीसाठीं मोठें पाकेट खरेदी करा !

## बरोबर आहे ! रिन्सोनें कपडे अधिक शुभ्र धुवून निघतात

आपल्याला आपले कपडे केवळ स्वच्छ होऊनच चालत नाहीं, तर ते स्वच्छ आहेत हें प्रत्येकानं पाहावं असं आपल्याला वाटत असतं. आणि हा अभिमान बाळगतां यावा म्हणूनच अधिकाधिक गृहिणी आतां घरांतले सारे कपडे धुण्यासाठीं रिन्सो ही आश्चर्यकारक सावण पावडर वापरूं लागल्या आहेत.

रिन्सोनें पांढरे कपडे अधिक शुभ्र व रंगीत कपडे अधिक चमकदार होतात.

पुढच्या वेळीं कपडे धुण्यासाठीं रिन्सो वापरून पहा. साड्या, पोल्कीं वगैरे आपले सारे कपडे त्यानं स्वच्छ निघालेले पाहून आपण थक्कच व्हाल. रिन्सोच्या प्रभावी फेसानें मळाचा कण न् कण साफ धुवून निघतो—त्यासाठीं कपडे आपटायला नकोत किंवा खसखसा चोळायलाहि नकोत !

आश्चर्यकारक सावण पावडर आपले श्रम वांचविण्याकरितां तयार केलेली !

I X52 MA